**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**

**सभापती** : आज माझ्याकडे सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, सन्माननीय सदस्य श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, केशवराव मानकर, धनंजय मुंडे, चंद्रकांत पाटील, परशुराम उपरकर, रामनाथ मोते यांनी गिरणी कामगारांचा विशाल मोर्चा गुरुवार, दिनांक 28 जुलै, 2011 रोजी मंत्रालयावर हजारोंच्या संख्येने धडकणे, या विषयासंबंधी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. या बाबतीत सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी 1-2 मिनिटांमध्ये आपले म्हणणे मांडावे.

श्री.एस.क्यू.जमा : सभापति महोदय, मेरा पॉइंट ऑफ ऑर्डर है.

**सभापती** : अजून कामकाजाची सुरुवातच झालेली नाही.

श्री.एस.क्यू.जमा : सभापति महोदय, मेरा आपसे निवदेन है कि मुझे बोलने की परमीशन दीजिए. बाद में सभागृह में हंगामा हो जाएगा और मैं अपनी बात आपके सामने नहीं रख सकूंगा.

**सभापती** : आपको बोलने की परमीशन दी जाएगी.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, काल दिनांक 28 जुलै, 2011 रोजी गिरणी कामगारांचा हजारोंच्या संख्येने मंत्रालयावर महामोर्चा आला होता. गिरणी कामगारांच्या या मोर्चाला या राज्यातील सर्व कामगार संघटना आणि राजकीय पक्षाने सुध्दा पाठिंबा दिलेला होता. या मोर्चामध्ये कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाड्यातील कामगार सुध्दा सहभागी झालेले होते. गेली 30 वर्षे गिरणी कामगार आपल्या न्याय्य मागण्यांसाठी संघर्ष करीत आहेत. परंतु त्यांना न्याय मिळत नाही. त्यांच्या फार मागण्या नाहीत. गिरण्या बंद झाल्यावर गिरण्याच्या जमिनी बिल्डर्सना देण्याचा राज्यात सपाटा सुरु आहे. या गिरण्यांची एक तृतीयांश जमीन गिरणी कामगारांच्या घरासाठी राखून ठेवावी असे शासनाचे धोरण आहे. पण आजपर्यंत या गिरणी कामगारांना घरे मिळालेली नाहीत. त्यांच्या मागण्या व्यवस्थित व योग्य आहेत. बेघर, उद्ध्वस्त व रस्त्यावर आलेले हे गिरणी कामगार आहेत. परंतु 30 वर्षांपासून त्यांना न्याय मिळत नाही. म्हणून

. . . A 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

शासनाने आज सभागृहात निवेदन केले पाहिजे. गिरणी कामगारांसंबंधी शासनाची नेमकी भूमिका काय आहे ते जाहीर केले पाहिजे, एवढीच त्यांची मागणी आहे. हा प्रश्न ऐरणीवर आलेला असताना शासन या प्रश्नाबाबत कोणत्या भूमिकेतून विचार करीत आहे हे सदनासमोर येणे आवश्यक आहे. त्या दृष्टीकोनातून आम्ही नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. त्यावर चर्चा झाली तर शासनाकडून त्या बाबत उत्तर मिळू शकेल आणि त्यातून या गिरणी कामगारांमध्ये संदेश जाईल. म्हणून आपण आमची नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना मान्य करावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला अत्यंत खेदाने नमूद करावेसे वाटते की, काल आम्ही याच विषयावर नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिली होती. ती सूचना मंजूर देखील करण्यात आली होती. आम्ही देखील चर्चेला तयार होतो. काल माननीय मुख्यमंत्र्यांनी काही काळ चर्चा करण्याची तयारी होती तसेच प्रभारी सन्माननीय संसदीय कार्य मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांच्यासमोर हे सर्व झाले होते. परंतु एकाएकी सरकारने या चर्चेपासून पलायन केले. काल हजारोंच्या नव्हे तर लाखोच्या संख्येने आमच्या घरांच्या प्रश्नासंबंधी सरकार काहीच करीत नाही याचा आक्रोश व्यक्त करण्यासाठी गिरणी कामगारांनी मोर्चा काढला होता. या सदनाच्या माध्यमातून गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नासंबंधी सरकारची भूमिका कळली असती. ती संधी सरकारने दवडली आहे. काल सरकारने या प्रश्नावरील चर्चा करण्यापासून पळ काढण्याची भूमिका घेतली. म्हणून आज आम्ही या विषयावर पुन्हा नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. त्यात असे म्हटले आहे की, आज माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नासंबंधी घोषणा केली पाहिजे. योगायोगाने आज दूरदर्शनच्या अनेक वाहिन्यांवरुन अशा बातम्या पहावयास मिळालेल्या आहेत की, आज सकाळी माननीय मुख्यमंत्र्यांनी मंत्रिमंडळातील ज्येष्ठ मंत्री महोदयांबरोबर गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नासंबंधी एक बैठक घेऊन निर्णय घेतलेला आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 11:05

(श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, काल आपण कामगारांच्या बाजूने कौल दिला त्याबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो. कामगारांची एक जूट झाली तर काय घडू शकते याचे काल दिग्दर्शन झाले. परंतु कामगारांच्या प्रश्नाबाबत चर्चा न करता, निर्णय न करता सरकारने पळ काढला. अशा प्रकारे सरकारने पहिल्यांदाच पळ काढलेला आहे. सभापती महोदय, माझी शासनाला विनंती आहे की, आजचे सगळे कामकाज थांबवावे आणि गिरणी कामगारांच्या संदर्भात ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांसमवेत झालेल्या बैठकीत जो निर्णय घेतलेला आहे तो तातडीने जाहीर करावा आणि त्यानंतर कामकाज सुरु करावे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, काल जेव्हा नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधीचा उल्लेख झाल्यानंतर सरकारची चर्चेची तयारी आहे, परंतु तत्पूर्वी प्रश्नोत्तराचा तास आणि लक्षवेधी सूचना घ्याव्यात व त्यानंतर चर्चा सुरु करावी असे मी सांगितले होते. असे असताना सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "शासनाने पळ काढला" असा जो वाक्यप्रयोग केलेला आहे तो इष्ट नाही. तो कामकाजातून काढून टाकावा अशी माझी विनंती आहे. गिरणी कामगारांच्या प्रश्नावर चर्चा करण्याची शासनाची तयारी आहे. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना गिरणी कामगारांच्या प्रश्नासंबंधी आपले विचार मांडावयाचे आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांची चर्चेला उत्तर देण्याची तयारी आहे.

श्री. दिवाकर रावते : माननीय मुख्यमंत्री उत्तर द्यायला तयार आहेत तर मग त्यांना सभागृहामध्ये बोलवावे...

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. एस.क्यू.जमा : सभापति महोदय, मेरा पॉइंट ऑफ ऑर्डर है. आप मुझे बोलने दीजिए. विरोधी पक्ष के माननीय सदस्यों को नियम 289 के अन्तर्गत नियम स्थगित करने का प्रस्ताव देने का अधिकार है और वह इस नियम के अनुसार अपना प्रस्ताव दे सकते हैं. मैं सभागृह के अन्य माननीय सदस्यों की तरफ से यह कहना चाहता हूँ कि नियम 289 के अन्तर्गत कोई भी माननीय सदस्य नियम स्थगित करने का प्रस्ताव मूव कर सकता है. सभापति महोदय, इस बारे में आपने जो निर्णय दिया है, उसका आदर करते हुए मैं आपका ध्यान नियम 17 की तरफ आकर्षित

. . . B 2

. . . . श्री. जमा

करना चाहता हूँ. इस नियम के अन्तर्गत यह प्रावधान है कि 1 घंटे का प्रश्नकाल होगा. It is our right to 'Question and Answer' for one hour during Question time and this right is being infringed for no fault on our part.

सभापति महोदय, मैं यह कहना चाहता हूँ कि गिरणी कामगारों के प्रश्न के बारे में आपको निर्णय देने का अधिकार है और सरकार ने भी इस पर चर्चा करने की इच्छा जाहिर की है. मेरा आपसे अनुरोध है कि हमारा प्रश्नकाल का अधिकार नहीं जाना चाहिए. सभागृह में कल कुछ भी काम नहीं हुआ, हमारी लक्षवेधी सूचना भी नहीं हुई. मैं आपसे इस बारे में रुलिंग देने का अनुरोध करता हूँ.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी त्यांचे म्हणणे मांडावे...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. भाई जगताप : माननीय सभापतींनी मला बोलण्याची परवानगी दिलेली आहे.

**सभापती** : नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव कसा योग्य आहे हे सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्यानंतर सन्माननीय मंत्री महोदय श्री.बाळासाहेब थोरात यांनी शासनाची भूमिका सांगितली. दरम्यान सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.जमा यांनी हरकतीचा मुद्दा मांडला.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माझे एवढेच सब्मिशन आहे की, आमची चर्चेची तयारी आहे. विरोधी पक्ष चर्चेपासून दूर का पळतोय हे मला कळत नाही. गिरणी कामगारांच्या प्रश्नाविषयी चर्चा होऊ द्यावी. आमची चर्चेची तयारी आहे.

....नंतर श्री. भोगले....

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, मी हरकतीच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा आहे. विरोधी पक्षाच्या वतीने काल नियम 289 अन्वये स्थगन प्रस्तावाची सूचना दिलेली होती. त्या सूचनेबद्दल सांगोपांग विचार करुन सभागृहाची बैठक काही काळ स्थगित करण्यात आली आणि आपल्या दालनामध्ये माननीय विरोधी पक्षनेते, गटनेते यांच्यासमवेत चर्चा घेण्याचे निश्चित केले. ही चर्चा सुरु असल्यामुळे माननीय तालिका सभापतींनी अनेकदा सभागृहाची बैठक काही काळासाठी स्थगित केली होती. आपल्या दालनामध्ये होणाऱ्या चर्चेचे फलित काय निघाले हे सभागृहाच्या सदस्यांना समजले नाही. वास्तविक तेथील चर्चेचा निर्णय सभागृहाला समजणे हा सर्व सन्माननीय सदस्यांचा हक्क आहे. या ठिकाणी विरोधी पक्षाकडून सांगण्यात आले की, सरकारने पलायन केले. सरकारवर हा गंभीर आरोप केलेला आहे. आपल्या दालनामध्ये झालेल्या चर्चेचा निर्णय सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांचा कळला पाहिजे. तो आमचा अधिकार आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.एस.क्यू.ज़मा यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला त्या संदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की, प्रश्नोत्तराचा तास झालाच पाहिजे. नकळत त्यांनी हरकतीच्या मुद्यावर बोलत असताना पीठासीन अधिकाऱ्यांच्या निर्णय प्रक्रियेवर आक्षेप घेतला आहे. आजपर्यंत पीठासीन अधिकाऱ्यांनी कधीही सभागृहाचे कामकाज बंद केलेले नाही. उलट माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी काही वेळेला प्रश्नोत्तराच्या तासातील जेवढा वेळ वाया गेला तेवढा वेळ वाढवून देऊन प्रश्नोत्तराचा तास पूर्ण केलेला आहे. तो आपला अधिकार आहे. एखाद्या क्षणी असे वाटले की, ही खास बाब आहे तर आपल्या अधिकारानुसार प्रश्नोत्तराचा तास थांबवून चर्चा घेण्यास अनुमती दिली जाते. काल तसा निर्णय घेण्यात आला होता. प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन चर्चा घेण्याचे ठरले होते. माननीय सदस्य श्री.भाई जगताप हे काल सभागृहात उपस्थित नव्हते. सरकारने पलायन केले आहे. सभापती महोदय, आपल्याबद्दल माननीय सदस्यांनी जो आक्षेपार्ह उल्लेख केला आहे ते शब्द मागे घेण्यास सांगावे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सरकारने पलायन केले हे वक्तव्य रेकॉर्डवर ठेवू नये.

**सभापती** : हरकतीचा मुद्दा मागे घेण्याची आवश्यकता नाही. माननीय सदस्य श्री.एस.क्यू.ज़मा यांनी सांगितले की, एखादी बाब महत्वाची आहे असे काही माननीय सदस्यांना वाटते तसे नियम 289 च्या सूचनेनुसार आजच्या कामकाजातील काही भाग स्थगित करावा आणि त्या ऐवजी आम्ही मागणी केलेल्या विषयावर चर्चा घ्यावी असेही काही माननीय सदस्यांना..........





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**........

वाटण्याची शक्यता आहे. त्यामध्ये काही गैर आहे असे नाही. माननीय सदस्य श्री.ज़मा यांनी सांगितले की, प्रश्नोत्तराचा तास व्हावा हा सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांचा हक्क आहे. त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास तहकूब केल्यास त्यांच्यावर अन्याय होण्याची शक्यता आहे. सभापतींनी या दृष्टीने काळजी घ्यावी अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे. मी त्या दृष्टीने काळजी घेत आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी सभागृहाला पुन्हा एकदा विनंती करतो, शासनाने काल सातत्याने चर्चा व्हावी असा आग्रह धरला होता. शासनाने चर्चेपासून पळ काढलेला नाही. त्यामुळे सरकारने पळ काढला हे शब्द रेकॉर्डवरुन वगळले पाहिजेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही हा दोष स्वीकारणार नाही.

श्री.बाळासाहेब थोरात : चर्चेपासून कोणी पळ काढला ही वस्तुस्थिती सगळ्यांसमोर आहे. चर्चा झाली पाहिजे असा आमचा आग्रह आहे. आज सुध्दा हा आमचा आग्रह कायम आहे. प्रश्नोत्तराचा तास पूर्ण झाल्यानंतर चर्चा सुरु करण्यात यावी.

श्री.दिवाकर रावते : संसदीय कामकाज मंत्र्यांनी विधिमंडळामध्ये सत्य बोलायचे असते. सत्य काय आहे हे लोकांना कळले पाहिजे.

**सभापती** : आज सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना देऊन गिरणी कामगारांच्या प्रश्नावर सभागृहात चर्चा व्हावी अशी मागणी केली आहे त्या संदर्भात मी माझा निर्णय देत आहे.

काल देखील सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली होती व कामगारांच्या प्रश्नाविषयी चर्चा घेण्याची मागणी केली होती. हा अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. मुंबईचे भवितव्य ज्यांनी घडविले त्या गिरणी कामगारांच्या प्रश्नाबाबत नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेनुसार प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन अपवाद म्हणून चर्चा घेण्यास मी परवानगी दिली होती. त्या नंतरच्या काळात माझ्या दालनात जवळजवळ दोन ते अडीच तास चर्चा सुरु होती. एकदा व्यवहार पूर्ण ठरल्यानंतर एवढी बाब पाहिजे की नाही यावर चर्चा करण्यात दोन तासाचा वेळ वाया गेला.

नंतर श्री.खर्चे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......

दरम्यानच्या काळात मी माननीय मुख्यमंत्र्यांना सुध्दा माझ्या दालनात बोलाविले. दालनात ही चर्चा सुरु असताना विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांची मागणी होती की कामकाज पत्रिकेतील अन्य कोणतेही कामकाज न घेता फक्त नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेअन्वये फक्त गिरणी कामगारांच्या प्रश्नाबाबत चर्चा करावी. सत्तारुढ पक्षाची मागणी होती की, एक-दोन लक्षवेधी सूचना चर्चेला घ्याव्या किंवा विधेयक तरी चर्चेला घ्यावे. यामध्ये जवळपास दोन ते अडीच तास वेळ निघून गेला. तसेच मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, शासनाने यामध्ये कोणत्याही प्रकारे पलायन वगैरे केलेले नाही.

श्री. दिवाकर रावते : मी माझे शब्द मागे घेतले असून ज्या ज्या ठिकाणी "सरकार पळाले" असा शब्दप्रयोग केला असेल त्याऐवजी "सरकारने पलायन केले" असा शब्दप्रयोग गृहित धरावा.

**सभापती** : त्याचबरोबर सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांच्या मागणीच्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, सभापतींच्या दालनात जेव्हा चर्चा होते त्या वेळेस काही काळासाठी सभागृहाची बैठक स्थगित करण्यात येते. त्या चर्चेतील एखाद-दुसरे वाक्य सभागृहात सांगायला हरकत नाही. शेवटी चर्चेला आपलेच प्रतिनिधी उपस्थित असतात. तेव्हा मला वाटते आजच्या कामकाजातील प्रश्नोत्तराचा तास, पुरवणी मागण्या हे कामकाज प्रथम पूर्ण करुन शेवटी सभागृहाचा दोन तासाचा वेळ गिरणी कामगारांच्या संदर्भातील प्रस्तावाला देण्याची माझी तयारी आहे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, केवळ चर्चेचा विषय नाही तर माननीय मुख्यमंत्र्यांनी गिरणी कामगारांच्या घरांबाबत जो निर्णय घेतला आहे तो सभागृहात जाहीर करावा अशी मी विनंती करतो. कारण माननीय मुख्यमंत्र्यांनी यासंबंधीचा निर्णय घेतल्याची बाब सभागृहाच्या रेकॉर्डवर आलेली आहे, तेव्हा तो निर्णय जाहीर करावा.

( सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बसून चर्चेची मागणी करतात )

**सभापती** : सभागृहात या विषयावर 100 टक्के चर्चा होणारच आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, गिरणी कामगारांच्या संबंधी शासनाने निर्णय घेतलेला असेल तर तो सभागृहात जाहीर करावा. त्यामुळे सभागृहाचा दोन तासाचा वेळ वाचू शकतो. त्यात आपल्याला अन्य कामकाज घेता येईल.

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : गिरणी कामगारांच्या चर्चेच्या संदर्भात मी निर्णय दिलेला आहे. आता सभागृहात प्रश्नोत्तराचा तास, पुरवणी मागण्या व कामकाज पत्रिकेवरील अन्य कामकाज घेण्यात येईल. त्यानंतर सभागृहाचा दोन तासाचा वेळ गिरणी कामगारांच्या प्रश्नावरील प्रस्तावाच्या चर्चेला देण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : महोदय, गिरणी कामगारांच्या संदर्भातील निर्णय शासन सभागृहात जाहीर करीत नाही तसेच चर्चा करण्यासाठी उदासीनता दाखवित असल्याने आम्ही शासनाचा निषेध करुन सभात्याग करीत आहोत.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात )

-------

.....3.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**अतिरिक्त आयुक्त श्री.वरवणकर यांची चौकशी करण्याबाबत**

**(1) * 19358 श्री.जगदीश गुप्ता , श्री.पांडुरंग फुंडकर** : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) आदिवासी विकास विभागाच्या दिनांक 24 सप्टेंबर, 2010 च्या परिपत्रकाप्रमाणे आदिवासी विकास विभागाला विविध योजना राबविण्याकरीता प्रकल्प अधिकारी यांच्या स्तरावरुन मागणी करावी असे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, दिनांक 24 सप्टेंबर, 2010 च्या परिपत्रकामध्ये शुध्दीपत्रक दिनांक 20 नोव्हेंबर, 2010 मध्ये काढण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या शुध्दीपत्रकांमध्ये योजनांसाठी वस्तू खरेदी करताना प्रकल्प अधिकारी यांनी देयके अप्पर आयुक्त यांचेकडे पाठवावे असे नमूद केले, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, प्रकल्प अधिकारी यांनी कोणतीही देयके तयार न करता अतिरिक्त आयुक्त श्री.वरवणकर यांनी स्वत: देयके तयार करुन निधी वितरित केला, हे खरे आहे काय,

(5) असल्यास, त्यानुंषगाने शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (1) व (2) हे खरे आहे.

(3) शासन परिपत्रक दिनांक 24 सप्टेबर, 2010 व दिनांक 20 नोव्हेंबर, 2010 च्या शुध्दीपत्रकान्वये विविध योजनांसाठी आवश्यक असलेल्या वस्तुंची खरेदी प्रकल्प अधिकारी स्तरावर करावयाची नसून उक्त शुध्दीपत्रकानुसार विविध योजनांसाठी आवश्यक असलेल्या वस्तुंची खरेदी अप्पर आयुक्त स्तरावर करावयाची असून त्यांची देयके सुध्दा अप्पर आयुक्त यांच्या स्तरावर प्रदान करावयाच्या सूचना आहेत.

(4) हे खरे नाही.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

......4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 19358.........

**गिरणी कामगारांच्या मोर्चाबाबत**

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय........

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या प्रश्नावर काल निघालेल्या मोर्चात काहीच साध्य झाले नाही म्हणून विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना ते सभागृहात साध्य करावयाचे अशा प्रकारचे राजकारण येथे करण्यात येत आहे. गिरणी कामगारांच्या कोणत्याही प्रश्नावर सरकारची चर्चा करण्याची तयारी आहे.

महोदय, गिरणी कामगारांबद्दल शासनाच्या मनात नितांत आदर आहे. त्यांच्यासाठी शासनाने गिरण्यांची 1/3 जमीन राखून ठेवलेली आहे. पण विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य फक्त निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हे राजकारण करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

श्री. रामदास कदम : महोदय, माननीय मंत्री महोदय आता जे बोलले .....

**सभापती** : मी गिरणी कामगारांच्या चर्चेच्या संदर्भातील माझा निर्णय दिलेला आहे. मला वाटते की या सभागृहात पीठासीन अधिकाऱ्यापेक्षा कोणीही मोठा असू शकत नाही, तेव्हा मी दिलेला निर्णय अंतिम आहे.

श्री. रामदास कदम : महोदय, आपण प्रश्नोत्तराचा तास सुरु केला असून त्यातील क्र. 1 चा प्रश्न पुकारलेला आहे. तरी देखील मंत्री महोदय श्री. नारायणराव राणे सभागृहात वक्तव्य करीत आहेत, त्यांना आपण सुध्दा परवानगी दिली, हे योग्य नाही. जर या शासनाला गिरणी कामगारांना न्याय द्यावयाचा असता तर गेल्या 30 वर्षांपासून गिरणी कामगार देशोधडीला लागले नसते. या कामगारांना देशोधडीला लावण्याचे पाप या शासनाने केलेले आहे. आता मात्र आम्हाला केवळ दोन तासाचा वेळ त्यांच्यावरील चर्चेला दिला जात आहे. मंत्री महोदय मात्र सभागृहात अशा प्रकारचे वक्तव्य करुन राज्यातील जनतेची दिशाभूल करण्याचे काम करीत आहेत.

श्री. दिवाकर रावते : महोदय, मंत्री महोदयांना माझा असा सवाल आहे की, मोर्चात काही घडले नाही असे आपण म्हणालात पण तिकडे आपले कोणाशी काय वाजले हे सुध्दा सांगावे, आपली हिंमत असेल तर सभागृहात ते सांगावे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : कामगारांच्या हिताच्या दृष्टीने मी आज चर्चेला परवानगी दिलेली आहे. सदर प्रश्नांची चर्चा शेवटच्या दोन तासात केली जाईल. या चर्चेच्या दरम्यान सन्माननीय सदस्यांनी आपापले विचार मांडावेत. आता सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता यांनी ता.प्र.क्र. 19358 वर उप प्रश्न विचारावा.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 19358 (चर्चा पुढे सुरु.....)

श्री. जगदीश गुप्ता : सन्माननीय सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात मागील नागपूर अधिवेशनात मी नियम 93 अन्वयेच्या संदर्भातील सूचना दिली होती परंतु 93 अन्वयेच्या सूचनेला चुकीचे उत्तर दिल्यामुळे मी हक्कभंग दिलेला असून हक्कभंगाचा निर्णय अजून लागावयाचा आहे. मागच्या बजेट सेशनमध्ये या प्रश्नाच्या संदर्भात अडकलेल्या अधिका-यांची चौकशी करण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन सन्माननीय मंत्रीमहोदयांनी या सभागृहात दिले होते. संबंधित भ्रष्टाचारी अधिका-यांच्या विरोधात कारवाई व्हावी यासाठी आम्ही पाठपुरावा केल्यानंतरही कोणत्याही प्रकारची कारवाई संबंधित अधिका-यांवर झालेली नसल्यामुळे या अधिका-यांचे मनोबल वाढल्यामुळे हे भ्रष्ट अधिकारी अजून भ्रष्टाचार करीत आहेत. आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील चौथ्या प्रश्नाच्या संदर्भात असे उत्तर देण्यात आलेले आहे की, "प्रकल्प अधिका-यांनी वस्तूंची खरेदी केली असून त्यांच्या सहमतीने सर्व देयके निघालेली आहेत". त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, सदर देयके उपायुक्तांकडे किती तारखेला आली होती, देयके संबंधित पुरवठा धारकांना केव्हा दिलेले आहेत ? या प्रश्नाच्या संदर्भात आपल्याला आदिवासी मुलांना न्याय द्यावयाचा आहे. हा विषय माझ्या मतदार संघाच्या संदर्भातील असल्यामुळे मी हा प्रश्न पोटतिडकीने मांडतो आहे. अधिका-यांवर कारवाई करण्यात यावी यासंदर्भात मी शासनाला वारंवार विनंती केलेली असतांना सुध्दा संबंधित अधिका-यांना प्रोटेक्शन देण्याचे कार्य माननीय मंत्री महोदयांकडून होत आहे. या अधिका-यांची ट्रान्सफर थांबावी म्हणून संबंधित मंत्री महोदय माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे शिफारस करीत आहेत. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, संबंधित भ्रष्ट अधिका-यांना माननीय मंत्री महोदयांचा पाठिंबा आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता यांनी दुसरा जो प्रश्न विचारला आहे त्या प्रश्नाला "भ्रष्ट अधिका-यांना अजिबात पाठिंबा नाही" असे उत्तर आहे. प्रोजेक्ट ऑफिसर लेव्हलवर देयकांच्या खरेदीचे काम देण्यात आले होते परंतु त्यामध्ये अडचणी निर्माण झाल्या होत्या. ज्यावेळेस सरकारी ऑडीट झाले त्यामध्ये त्यांनी सिरियस गोष्टी बाहेर काढल्यामुळे 19 अधिका-यांच्या चौकशीचे काम सुरु आहे. यामध्ये खरेदीची अनियमितता, देयकांचे वाटप यासंदर्भातही चौकशी सुरु असून. आपल्या कायद्याच्या अधीन राहून यासंदर्भात आपण 24



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 19358 पुढे सुरु.....

श्री. बबनराव पाचपुते....

सप्टेंबर, 2010 रोजी परिपत्रक काढलेले आहे. मला पुन्हा एवढेच सांगावयाचे आहे की, प्रोजेक्ट ऑफिसरच्या लेव्हलवर देयके देण्याचा अधिकार होता परंतु त्यामध्ये अडचणी निर्माण झाल्या होत्या. ऑडीटरने जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत ते पडताळून पाहण्यासाठी 24 सप्टेंबर, 2010 रोजी परिपत्रक काढण्यात आले असून परिपत्रका प्रमाणे देयके देण्याचा अधिकार एटीसी लेव्हलवर ठेवलेला आहे. त्याप्रमाणे आपण सर्व देयके दिलेले असून यासंदर्भात जेवढे पैसे मंजूर झालेले होते ते सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. देयकाच्या संदर्भात कमिटी असून त्या कमिटीने यासंदर्भातील एकत्र निर्णय घेतलेला आहे. भ्रष्टाचार व अनियमितता थांबवणे हाच शासनाचा मुख्य उद्देश असून कोणालाही पाठीशी घालण्याचा शासनाचा अजिबात उद्देश नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शासनाने 24 सप्टेंबर, 2010 रोजी जे परिपत्रक निर्गमित केलेले आहे त्या परिपत्रकातील मुद्दा क्रमांक 5 मधील तरतुदी प्रमाणे पुरवठा आदेश अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांनी काढावा पण प्रकल्प कार्यालयात वस्तू प्राप्त झ ााल्यानंतर चलनाची प्रत प्रकल्प अधिका-यांच्या स्वाक्षरीने अप्पर आयुक्त, आदिवासी यांना पाठवावे असे स्पष्ट नमूद करण्यात आलेले असतांना सुध्दा ...

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ KTG/ KGS/ शरद 11:25

ता.प्र.क्र.19358...

श्री.पांडुरंग फुंडकर...

अप्पर आयुक्त यांनी खरेदी बाबतची सर्व देयके प्रकल्प अधिकारी यांच्याकडून प्रमाणित करून घेतली नाही. लाभार्थींची यादी निश्‍तिच नसताना, प्रकल्प स्तरावरून मागणी नसताना विविध योजनांच्या वस्तूंची खरेदी अप्पर आयुक्त यांनी केली. यात अनियमितता झालेली आहे. त्यावेळी अप्पर आयुक्तांनी काय केले आहे ? जनरेटर सेट खरेदी करायचे होते. दर करारा प्रमाणे जनरेटर सेटची किंमत कंट्रोल पॅनल सहित 1 लाख 79 हजार एवढी होती. असे असताना अप्पर आयुक्तांनी प्रती नग 3 लाख 28 हजार 411 या दराने जनरेटर सेटची खरेदी केली. जवळपास 65 जनरेटर सेटची खरेदी चढ्या दराने करण्यात आलेली आहे. आदिवासींच्या विकासासाठी शासन निधी देते. त्या निधीमध्ये अधिकारी अशा प्रकारे भ्रष्टाचार करत असतील तर ते योग्य नाही. शासन या प्रकाराची चौकशी करणार आहे की नाही ? कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत), अकोला यांनी रुपये 20 हजार प्रती जनरेटर संच बसविण्याकरिता अनुज्ञेय असल्याचे कळविले आहे. या अप्पर आयुक्तांनी प्रती जनरेटर संच स्थापित करण्यासाठी रूपये 85 हजार दिलेले आहेत. याची आपण चौकशी करणार नाही का ? देशात मेळघाट हा कुपोषणासाठी प्रसिद्ध आहे. त्यामुळे शासन तेथे प्रचंड प्रमाणावर निधी खर्च करीत असते. त्यामुळे टाळूवरचे लोणी खाणारे अधिकारी असतील त्यांना शासन पाठीशी का घालत आहे. त्या अधिकाऱ्याची बदली झाली होती. ती शासनाने रद्द केली. मागच्या वेळी आम्ही चौकशीची मागणी केली होती. अजून पर्यंत त्याची चौकशी करण्यात येत नाही. उलट त्या अधिकाऱ्याला प्रमाणपत्र देण्यात येते की, त्याने केले ते बरोबर आहे. या अधिकाऱ्याने प्रचंड भ्रष्टाचार केला आहे. त्याला निलंबित करून त्याची चौकशी करावी अशी आमची मागणी आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते व माननीय सदस्य जे काही सांगत आहेत त्या बद्दल 15 दिवसामध्ये चौकशी केली जाईल. ... (गोंधळ)... आपण जी माहिती सांगता ती माझ्याकडे नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती गृहीत धरून चौकशी केली जाईल. तशी परिस्थिती असेल तर पुढची सुद्धा कारवाई केली जाईल. 15 दिवसामध्ये ही चौकशी करू.

..2

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, याच अधिकाऱ्याची चौकशी करण्यात येईल असे आश्वासन मागच्या अधिवेशनात माननीय मंत्रीमहोदयांनी दिले होते. मी सुरूवातीला जे प्रश्न विचारले होते त्यासंबंधीचे उत्तरच आलेले नाही. मागच्या अधिवेशनामध्ये चौकशीचे आश्वासन दिले होते. आता आम्ही पुन्हा पुढच्या अधिवेशनाची वाट पहावी काय ? सभापती महोदय, मी आपल्या दालनात येऊन आपणास विनंती केली होती की, या अधिकाऱ्याने भ्रष्टाचार केला असून या अधिवेशनात प्रश्न मांडायला आपण मला अनुमती द्यावी. मागच्या व ह्याही अधिवेशनामध्ये माननीय मंत्री महोदय चौकशीचे आश्वासन देत आहेत. या अधिकाऱ्याला शासन वाचविण्याचा का प्रयत्न करीत आहे ? त्या अधिकाऱ्याला निलंबित करून त्याची चौकशी करावी एवढीच आमची मागणी आहे. प्रती जनरेटर खरेदी मध्ये एक लाख रूपयाचा भ्रष्टाचार केलेला आहे. त्याही पुढे सांगतो की, दर करार एका कंपनीशी आणि जनरेटर मात्र वेगळया कंपनीचे होते. असे अनेक प्रकारचे गैर कारभार त्या भागामध्ये झालेले आहेत. तेव्हा शासन त्या अधिकाऱ्याला निलंबित करून त्याची चौकशी करणार आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, जो लेखी प्रश्न आहे त्यासंबंधी मी उत्तर दिलेले आहे. त्या पलीकडे त्यांची माहिती असेल तर ती गृहीत धरून चौकशी करण्याचे मी मान्य केले आहे. त्यामुळे येथे कोणाला पाठीशी घालण्याचा विषय नाही.

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारतात )

**सभापती** : विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उठून बोलायला लागले तर आपणाला जे उत्तर अपेक्षित आहे ते मिळणार नाही. त्यामुळे मी आता सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना प्रश्न विचारण्यास अनुमती देत आहे.

या नंतर सरफरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 19358...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात मागील अधिवेशनामध्ये झ ालेल्या चर्चेचे कार्यवृत्त मी आपणास वाचून दाखवितो. यामध्ये सन्माननीय मंत्री श्री. बबनराव पाचपुते प्रश्नाला उत्तर देतांना असे म्हणाले होते की, "सभापती महोदय, मी याबाबतीत उत्तर दिले आहे. योजना असल्यानंतर योजनेतर कामासाठी मंजूरी घ्यावयाची असेल तर त्या संबंधीचा प्रस्ताव नाशिक आयुक्त कार्यालयाकडे पाठवावा लागतो. तसा प्रस्ताव पाठविला आहे. तरीसुध्दा सन्माननीय विरोधी पक्षनेते सांगत आहेत त्याप्रमाणे त्यांची चौकशी करावी लागेल. सदरहू चौकशी करण्यापूर्वी सन्माननीय सदस्य सांगत आहेत म्हणून ताबडतोब निलंबनाची कारवाई कली तर त्यामध्ये अडचणी निर्माण होऊ शकतात". मागील अधिवेशनामध्ये या प्रश्नासंदर्भात चौकशी करण्याचे आश्वासन दिले व या अधिवेशनामध्ये सुध्दा चौकशी करण्याचे आश्वासन दिले जात आहे. तर मग मधल्या काळात हे शासन झोपले होते काय?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य चुकीची गोष्ट सांगत आहेत. मागील वेळी वेगळया स्वरुपाचा प्रश्न विचारला होता. आज उपस्थित करण्यात आलेला प्रश्न वेगळा आहे. सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न विचारला की, अेटीसी यांच्या पातळीवर खरेदी करण्यात आली आहे. प्रकल्प अधिकाऱ्यांच्या पातळीवरील खरेदी दिनांक 24.9.2010 च्या परिपत्रकाप्रमाणे रेट कॉट्रॅक्टप्रमाणे खरेदी केली आहे. सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, रेट कॉट्रॅक्टपेक्षा वेगळया पध्दतीने खरेदी केली आहे. माझ्याकडील माहितीप्रमाणे रेट कॉट्रॅक्टप्रमाणे खरेदी केलेली आहे. तेव्हा जर रेट कॉट्रॅक्टपेक्षा वेगळया पध्दतीने खरेदी केली असेल तर त्याबाबत चौकशी करु. मागील प्रश्नाच्या संदर्भात चौकशीचे आदेश दिले असून ती चौकशी सुरु आहे. त्या चौकशीच्या कामामध्ये आम्ही हस्तक्षेप केलेला नाही. सभापती महोदय,सन्माननीय सदस्य आता सांगत आहेत की, या अधिकाऱ्यांच्या बदलीचे पत्र सन्माननीय मुख्यमंत्र्यांना दिले आहे. तसे पत्र मी अजिबात दिलेले नाही, दिले असेल तर ते पत्र आपण मला दाखवावे मी सभागृहाची माफी मागण्यास तयार आहे. या ठिकाणी कुणालाही पाठिशी घालण्याचा प्रश्न नाही. प्रकल्प अधिकाऱ्यांच्या पातळीवर खरेदी केल्यानंतर त्यामध्ये खूप अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे 19 अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी सुरु आहे. खरेदीचे अधिकार प्रकल्प अधिकाऱ्यांना दिले तर त्यामध्ये अनियमितता होते, किंवा चुकीच्या पध्दतीने खरेदी होते याकरिता आपण शुध्दीपत्रक काढले आहे. शुध्दीपत्रकानुसार रेट कॉट्रॅक्टप्रमाणेच खरेदी करण्याची अट घालण्यात आलेली आहे. त्यामुळे सन्माननीय विरोधी

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

ता.प्र.क्र. 19358....

पक्ष नेत्यांनी सांगितलेली माहिती ग्राह्य धरुन 15 दिवसाच्या आत हे अधिवेशन संपण्यापूर्वी चौकशी करुन ही माहिती मी सभागृहाला देण्यास तयार आहे. यामध्ये कुणालाही पाठिशी घालण्याचा प्रश्न नाही. यामध्ये ज्या चुकीच्या गोष्टी होत होत्या त्या दुरुस्त करण्याचे काम करण्यात आले आहे.

(गोंधळ)

**सभापती** : आता मी पुढील प्रश्न पुकारतो. तारांकित प्रश्न क्रमांक 18706...

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईतील वांद्रे कुर्ला येथील कल्चरल क्रिकेट अकादमीसाठी आकृती बिल्डरला भूखंड परस्पर दिल्याबाबत**

**(२) * १८७०६ श्री.रामदास कदम , श्री.परशुराम उपरकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुर्ला येथील कल्चरल क्रिकेट अकादमीसाठी संकुलात देण्यात आलेला १० एकरचा भूखंड परस्पर आकृती बिल्डरला दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) आकृती बिल्डर क्रिकेटऐवजी कॉर्पोरेट कंपन्यांच्या सहाय्याने बहुउद्देशीय क्रिडा केंद्र बांधण्याचा प्रयत्न करीत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (१) हे खरे नाही.

शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र.एलआएफ-२६०४/२३४/प्र.क्र१७७०/ज-३ दिनांक २७.११.२००६ अन्वये मौ.बांद्रा, ता.अंधेरी स.नं.३४१, न.भू.क्र.६८९ पै 'एफ ब्लॉक मधील' भुखंड क्र.५ पैकी "मोकळी जागा व स्टेडीयम" आरक्षणाखलील एकूण क्षेत्रापैकी २०.०४५ चौ.मी. (वाटपासाठी शिल्लक ५६२७ चौ.मी. तसेच सीआरझेड-२ खालील १४४९८ चौ.मी) जमिन कल्चर क्रिकेट ॲकेडमी या संस्थेस क्रिकेट ॲकेडमीकरीता ३० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाने मंजूर केली आहे.

(२) हे खरे नाही.

मे.कल्चर क्रिकेट ॲकेडमीला मंजूर करण्यात आलेल्या शासकीय जमिनीपैकी एस.एम.आर.डी.ए.ला नाला रुंदीकरण व रस्त्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असलेली ४७९८ चौ.मी. जमीन मे. कल्चर क्रिकेट ॲकेडमीकडून काढून घेऊन सदर जमीन महसूलमुक्त / विनामुल्य एम.एम.आर.डी.ए. कडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदरची जमीन एम.एम.आर.डी.ए. कडे वर्ग केल्यावर कल्चर क्रिकेट ॲकेडमीला मंजूर करण्यात आलेल्या जमिनीची रुंदी कमी होणार असल्याने कल्चर क्रिकेट ॲकेडमीला बांधकाम करणे अडचणीचे होणार असल्यामुळे संस्थेकडे शिल्लक राहणाऱ्या उर्वरीत जमिनीचा वापर संस्थेस बहुविध खेळाचे केंद्र (Multipurpose sport center) कॉफी केंद्र कार्यकारी ऑफीस व इतर संलग्न बांधकामासाठी

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

वापरण्यास शासन महसूल व वन विभाग ज्ञापन दिनांक २४.९.२००८ व दिनांक १.१२.२००८ अन्वये काही अटी / शर्तीवर परवानगी देण्यात आली आहे.

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. १८७०६....

(३) व (४) याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. तथापि, हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याची बाब विचारात घेऊन, या प्रकरणी उचित कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक 18706...

(गोंधळ)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण आम्हाला न्याय दिला पाहिजे. हा आदिवासींचा अतिशय महत्वाचा प्रश्न असल्यामुळे आपण आम्हाला न्याय दिला पाहिजे...

(गोंधळ)

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते व विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न असल्यामुळे मी त्या वरील चर्चेकरिता 14 मिनिटांचा वेळ दिलेला आहे. दुसरी गोष्ट अशी की, या प्रश्नाला सन्माननीय मंत्र्यांनी कशा प्रकारचे उत्तर द्यावे हे सांगणे सभापतींचे काम नाही. या प्रश्नावरील चर्चेमध्ये सन्माननीय विरोधी पक्षनेते, सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता व सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांना प्रश्न विचारण्याची संधी देण्यात आलेली आहे. आता मी पुढील प्रश्नाकडे जात आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी आपला प्रश्न विचारावा.

(गोंधळ)

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, आपण माझा प्रश्न राखून ठेवावा...

(विरोधीपक्षाकडील सन्माननीय सदस्य घोषणा देतात)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे शासन आदिवासींच्या प्रश्नाला न्याय देत नाही याचा निषेध म्हणून आम्ही सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर...

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

**सभापती** : आता मी पुढील प्रश्न पुकारतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईतील तारापोरवाला मत्स्यालयाच्या आधुनिकीकरणाबाबत**

**(३) * १८६६१ श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.हेमंत टकले , श्री.अनिल भोसले , डॉ.दिपक सावंत , श्री.दिवाकर रावते :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील तारापोरवाला मत्स्यालयाच्या आधुनिकीकरणासाठी २५० कोटी रुपयांचा बीटीओ तत्वावरील प्रकल्प राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा प्रकल्प अंमलात आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, सदर प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. भास्कर जाधव, श्री.मधुकरराव चव्हाण यांच्याकरिता :** (१) हे खरे आहे. तथापि, सदर प्रकल्प २५० कोटी रुपयांचा आहे अथवा नाही याबाबतचा निर्णय निश्चितपणे झालेला नाही.

(२) तारापोरवाला मस्त्यालयाचे आधुनिकीकरण करण्यासंदर्भात एका सल्लागाराची तसेच अंतीम विकासकाची निवड करण्यासाठी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.मुविप्र-२००७/प्र.क्र.३३/०७/विशेष प्रकल्प, दि.५.१.२००८ अन्वये एक समिती गठीत करण्यात आली आहे.

(३) आता सदर समिती गठीत करण्याबाबतचे सामान्य प्रशासन विभागाचे उपरोक्त दि.५.१.२००८ चे आदेश अधिक्रमीत करुन शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र.मत्स्यआ-२००८/प्र.क्र.७८/पदुम-१२, दि.३०.६.२०११ अन्वये मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली तारापोरवाला मस्त्यालयाच्या आधुनिकीकरणाबाबत सुधारीत समितीचे गठन करण्यात आले आहे. ही सुधारीत समिती संयुक्तपणे चर्चा करुन प्राप्त निविदा स्वीकृत करावी किंवा फेरनिविदा मागवावी, याबाबत शिफारसवजा प्रस्ताव शासनास सादर करेल.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मुंबई या आंतरराष्ट्रीय शहरामध्ये एकही चांगल्या दर्जाचे मत्स्यालय नाही. आपण जगातील अनेक शहरे पाहिली आहेत, त्यामध्ये सिंगापूर, हाँगकाँग या शहरांमध्ये अत्यंत उत्कृष्ट दर्जाची मत्स्यालये आहत. त्याठिकाणी मरीन लाईफचा अभ्यास करण्याची संधी तेथील विद्यार्थ्यांना मिळते. दुर्दैवाची बाब अशी की, आपल्या शहरामधील मत्स्यालयाच्या आधुनिकीकरणाचे घोंगडे गेल्या चार वर्षापासून भिजत पडले आहे. माझा प्रश्न असा आहे की, चार वर्षापूर्वी प्रोसेस केलेले टेंडर आज ग्राह्य धरणार काय?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18661 . . ..

श्री.प्रकाश बिनसाळे . . ..

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या प्रकल्पासाठी जो कन्सल्टंन्ट नेमला होता, त्याबाबतीतही शासन पुनर्विचार करणार आहे काय ? तसेच हे मत्स्यालय लवकर व्हावे म्हणून शासन लोकप्रतिनिधींना बरोबर गांभीर्याने चर्चा करुन याबाबतीत कालबध्द कार्यक्रम आखणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी तीन प्रश्न विचारलेले आहेत. पहिला प्रश्न असा आहे की, यासंबंधातील पहिले टेंडर दि.5-1-2008 रोजी निघाले असून आता 2011 हे वर्ष सुरु आहे. त्यामुळे सदरहू टेंडर कालबाह्य झालेले असल्याने ते रद्द करणार आहात काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, या कामासाठी जो कन्सल्टन्ट नेमण्यात आला आहे, त्याबाबत फेर विचार करणार आहात काय ? मला याबाबतीत सांगितले पाहिजे की, दिनांक 30 जून 2010 रोजी याच विषयाच्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली होती. त्या बैठकीला माननीय उप मुख्यमंत्री, माननीय मत्स्य व्यवसाय मंत्री उपस्थित होते. त्या बैठकीमध्ये या सर्व गोष्टींबाबत फेर विचार करण्यासाठी जो कन्सल्टन्ट नेमण्यात आला आहे तो बदलावा काय, तसेच अगोदर काढलेले टेंडर कालबाह्य झालेले असल्यामुळे ते बदलावे काय आणि मत्स्यालयाचे काम कशा प्रकारे लवकर करता येईल यासाठी राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी गठीत करण्यात आली असून त्या अनुषंगाने शासन स्तरावर याबाबतीत निर्णय घेण्याचे काम सुरु आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, तारापोरवाला मत्स्यालय हे मुंबईच्या वैभवाच्या ज्या खूणा आहेत, त्यापैकी एक आहे.पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की,"सदर प्रकल्प 250 कोटी रुपयांचा आहे अथवा नाही याबाबतचा निर्णय निश्चितपणे झालेला नाही."माझा प्रश्न असा आहे की, गेल्या तीन वर्षामध्ये यासाठी निश्चित निधी ठरविण्यामध्ये शासनाला यश आलेले आहे काय ? तारापोरवाला मत्स्यालय केंद्रस्थानी धरुन, इतर जी जागतिक मत्स्यालये आहेत, त्यांचा अभ्यास करुन समुद्राच्या आत खोलपर्यंत जाऊन एक मोठे मत्स्यालय उभारण्याच्या बाबतीत सूचना असून, ती कार्यान्वित करता येण्यासारखी आहे जेणेकरुन त्याचा उपयोग पर्यटनाच्या दृष्टीने देखील होऊ शकतो. यादृष्टीने सदरहू प्रकल्प निश्चितपणे किती रकमेचा होणार आहे आणि तो किती कालावधी मध्ये कार्यान्वित करता येईल ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18661 . . ..

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या कामाच्या बाबतीत 2007 मध्ये कन्सल्टन्ट नेमण्यात आला, तेव्हा काही मुद्दे ठरविण्यात आले होते. त्यावेळी सदरहू प्रकल्प 200 ते 250 कोटी रुपयांपर्यंत जाईल असा अंदाज होता. पण प्रत्यक्षात हा प्रकल्प 250 कोटीचाच आहे असे निश्चित न झाल्यामुळे तो 250 कोटीचा आहे की नाही हे स्पष्टपणे सांगता येत नाही.कदाचित तो 250 कोटी रुपयांच्या पुढे सुध्दा जाईल.कारण तारापोरवाला मत्स्यालयाचे काम खूप चांगल्या प्रकारे करण्याचा प्रयत्न आहे.त्यामुळे यासाठी कितीही खर्च झाला तरी शासन तो करणार आहे.त्याच बरोबर इतर जागतिक पातळीवरील जी मत्स्यालये आहेत,त्यांचा देखील अभ्यास करुन, तशा प्रकारे ॲक्वेरिअम आपल्याकडे तयार करता येईल काय ? असा प्रश्न उपस्थित केला असून, त्याचे उत्तर "होय" असे आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात यासाठी एक ठिकाण निश्चित झालेले आहे आणि त्याबाबतीत शासन पावले उचलत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, तारापोरवाला मत्स्यालयाच्या आधुनिकीकरणाच्या संबंधातील टेंडर किती वेळा काढले ? कारण 2001-2002 मध्ये तारापोरवाला मत्स्यालयाच्या आधुनिकीकरणाच्या संबंधातील कामाचे टेंडर बी.ओ.टी.तत्वावर काढले होते हे खरे आहे काय ? अशा वेळी या कामासाठी एवढा कालावधी का लागत आहे ? तसेच या कामाचे स्वरुप काय आहे? संबंधितांकडे ते किती वर्षे रहाणार आहे आणि त्या बदल्यात संबंधित पार्टीला काय दिले जाणार आहे? या बाबी स्पष्ट होत नाहीत. त्यामुळे माननीय मंत्री महोदय यासंबंधातील धोरण जाहीर करतील काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या कामाच्या बाबतीत पूर्वी किती वेळा टेंडर काढले याची आता माझ्याजवळ माहिती नाही. माझ्याकडे दिनांक 5 जानेवारी 2008 मधील माहिती आहे. सदरहू काम बी.ओ.टी. तत्वावर देणार आहात काय? याबाबतीत निर्णय कधी होईल? असा प्रश्न विचारला असून ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

यानंतर कु.थोरात . ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ KTG/ प्रथम सौ. रणदिवे....... 11:0

ता. प्र. क्र. 18661...

श्री. भास्कर जाधव....

मी सांगितले की, दिनांक 30 जून, 2011 रोजी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि मत्स्यविकास मंत्री यांच्या उपस्थितीमध्ये जी बैठक झाली त्या बैठकीमध्ये राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आलेली आहे. या समितीमध्ये सन्माननीय सदस्यांची मागणी आहे त्याप्रमाणे सर्व गोष्टींचा विचार करुनच हा प्रकल्प बीओटी तत्वावर दिला तर तो व्हायेबल होण्याकरिता त्यामध्ये काय अटी असाव्यात, काय तरतुदी असाव्यात, याचाही विचार केला जाईल. सन्माननीय सदस्यांनी हा प्रकल्प प्रत्यक्षपणे शासन करणार आहे काय? असा प्रश्न विचारला होता. सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने या ठिकाणी माहिती देऊ इच्छितो की,. या समितीमध्ये या राज्याचे मुख्य सचिव, प्रधान सचिव, नगरविकास (1) आणि प्रधान सचिव नगरविकास (2), प्रधान सचिव, वित्त, प्रधान सचिव, प.दुम., प्रधान सचिव, पर्यावरण, सचिव, विशेष प्रकल्प, सामान्य प्रशासन विभाग, आयुक्त मत्स्यालय, महाराष्ट्र राज्य मुंबई आणि सह व्यवस्थापक संचालक अशा पध्दतीने सर्व विभागातील म्हणजे सी.आर.झेड., पर्यावरण, प्रदूषण या सर्व विभागातील सर्व अधिकाऱ्यांची एक सर्वकष समिती तयार करण्यात आलेली आहे आणि या प्रकल्पाला चांगल्या तऱ्हेने गती देण्याचे काम लवकरच होणार आहे.

----

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळाच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा कमी असल्याबाबत**

**(४) * १८९८६ श्री.सुभाष चव्हाण , श्री.राजन तेली , श्री.मोहन जोशी , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.हुसेन दलवाई , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.उल्हास पवार , श्री.जयप्रकाश छाजेड , डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळाच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा कमी असल्याने सदर उत्पन्नाच्या मर्यादेपर्यंतचे दाखले प्रशासनाकडून मिळत नाहीत त्यामुळे राज्यातील एक लाखांहून अधिक बेरोजगार कर्ज मिळण्यापासून वंचित राहत असल्याचे माहे मार्च-२०११ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही मर्यादा ६० हजारापर्यंत वाढविण्याची मागणी मागासवर्गीय बेरोजगारांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यशासनाने मागासवर्गीयांच्या उत्पन्नाची मर्यादा वाढविण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणताच निर्णय व कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवाजीराव मोघे :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत असणाऱ्या महामंडळांच्या प्रशासकीय कामात समानता आणण्यासाठी एक समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीमार्फत महामंडळाचे प्रशासकीय कामकाज, कर्मचारी/अधिकाऱ्यांचे सेवाप्रवेश नियम इत्यादी बाबींत समानता आणण्याची कार्यवाही सुरु आहे. समितीने अहवाल सादर केल्यानंतर त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मागासवर्गीयांच्या सर्वांगीण विकासासाठी महात्मा फुले विकास महामंडळाची स्थापना झाली आहे. या संदर्भात मी जो लेखी प्रश्न विचारलेला आहे त्यातील पहिल्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी 'होय' असे उत्तर दिलेले आहे. तसेच दुसऱ्या प्रश्नालाही 'होय' असे उत्तर दिलेले आहे. तिसऱ्या आणि चौथ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये प्रशासकीय कामात समानता, अभ्यास गटाची स्थापना, सेवाप्रवेश नियम वगैरे... म्हटलेले आहे. सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाचा दर वर्षी अर्थसंकल्प जाहीर होतो. त्या प्रत्येक अर्थसंकल्पात या मागासवर्गीयांच्या संदर्भात एक वाक्य असे असते, "पिढयानपिढया समाजाच्या मुख्य प्रवाहात घेता आले नाही, त्यांना शासनाच्या कोणत्याही सवलतींचा फायदा झाला नाही, त्यामुळे त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी" सभापती महोदय, मी विचारलेल्या प्रश्नातील प्रश्न क्रमांक 3 व 4 ला दिलेल्या उत्तरातील शेवटचे वाक्य असे आहे की,"समितीने अहवाल सादर केल्यानंतर त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल." या बाबतीत माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, मागासवर्गीय

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 18986.....

श्री. सुभाष चव्हाण....

महामंडळाची स्थापना कधी झाली व या संबंधीची जी समिती गठीत झाली आहे, त्या समितीचा अहवाल कधी तयार करण्यात येणार आहे आणि तो शासनाला कधी प्राप्त होणार आहे,त्या अनुषंगाने मिळणाऱ्या सवलतीचा फायदा या समाजाला कधी मिळणार आहे?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, बीपीएलच्या लाभार्थींना जास्त फायदा मिळावा असे केंद्र शासनाचे धोरण आहे. सन 2001 मध्ये बीपीएलच्या लाभधारकांची उत्पन्नाची मर्यादा ग्रामीण भागासाठी 19,654 होती व शहरी भागासाठी ती 27,247 होती. त्यानंतर सन 2002 मध्ये ही उत्पन्न मर्यादा जवळ जवळ दुप्पट झाली. ग्रामीण भागासाठी ती 39,308 झाली आणि शहरी भागासाठी 54,494 करण्यात आली आहे. ही उत्पन्नाची मर्यादा थोडीशी जास्त असती तर कदाचित जास्त लाभार्थींना या योजनेचा फायदा मिळू शकला असता असे केंद्र शासनाला कळविण्यता आले होते परंतु केंद्र शासनाने आतापर्यंत या बाबतीत निर्णय घेतलेला नाही. महाराष्ट्रात सहा महामंडळे असून या महामंडळाच्या प्रशासकीय कामात समानता आणण्यासाठी जी समिती स्थापन करण्यात आली आहे, त्या समितीची स्थापना कधी झाली असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. या समितीची स्थापना दिनांक 14 जानेवारी, 2011 ला करण्यात आली असून त्यांच्या बैठका झालेल्या आहेत. या समितीचा अहवाल आल्यानंतर केंद्र शासनाला शिफारस करण्यात येईल.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, अशा प्रकारच्या महामंडळाकडून सुशिक्षित बेरोजगारांना जो कर्ज पुरवठा करण्यात येतो त्या संदर्भात महामंडळ त्यांचे 30 टक्के भांडवल लगेच देते पण नॅशनलाईज्ड बँका कर्ज देण्याचे नाकारतात या बाबतीत शासनाचे धोरण काय असणार आहे?

श्री. शिवाजीराव मोघे : नॅशनलाईज्ड बँकाचा जो शेअर असतो त्यामध्ये सन 2009-2010 मध्ये महात्मा ज्योतिबा फुले विकास महामंडळातील लाभार्थींची संख्या 10929 होती. मागच्या वर्षी 14136 लाभार्थींना फायदा देण्यात आला आहे.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 18986.....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांना सांगावयाचे आहे की, महाराष्ट्र राज्य स्थापन करुन 63 वर्षे झालेली आहेत. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या नावाने हे शासन चालविले जाते, असे असताना 63 वर्षानंतर या समाजाच्या संदर्भात प्रश्न विचारण्याची वेळ आपल्यावर आलेली आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता प्र. क्र. 18986 ..... श्री. दिवाकर रावते .....

वाईट एवढेच वाटते की, आज या ठिकाणी मघाशी सुध्दा माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना आदिवासींच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले आहे, हे दुर्दैव आहे. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर आपण परवानगी दिली तर त्यावर आम्ही नक्कीच बोलणार आहोत. हे सर्व गंभीर आहे. मागच्या वर्षीचे 10 हजार आणि त्याच्या नंतरचे 14 हजार युवक यादीवर आहेत आणि त्यांना आर्थिक मदत पाहिजे आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी प्रश्न विचारला की, शासन या बाबतीत काय करणार आहे, 60 हजार रुपयांपर्यंत उत्पन्नाची मर्यादा वाढविणार की नाही ? त्याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिलेले नाही. मघाशी मत्स्यालयासंबंधीच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगण्यात आले की, समिती नेमलेली आहे. श्री. प्रमोद नवलकर मंत्री असताना त्या वेळचे मत्स्यालयाबाबतचे धोरण आहे. त्यावर मी आता काही बोलत नाही. परंतु आता ज्या प्रश्नावर चर्चा सुरु आहे त्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, समिती नेमलेली आहे. म्हणजे ही समिती आणखी वेळ काढणार. त्यानंतर त्या समितीच्या अहवालाच्या संदर्भात कार्यवाहीचा अहवाल तयार होणार. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाकडे असलेले 24 हजार आणि बाकीच्या मंडळाकडे असलेली मागणी अशा 1 लाखापर्यंत लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी पैसे कोठून आणणार ? कारण या महामंडळांकडे पैसे नाहीतच. या बाबतीत शासनाचे धोरण नाही, निर्णय नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी जो थेट प्रश्न विचारला की, त्यांची उत्पन्नाची मर्यादा वाढविणार का आणि अहवाल येईपर्यंत तातडीने मदतीची उपलब्धी संबंधित महामंडळाला करुन देणार का ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, यामध्ये उत्पन्नाची मर्यादा वाढविण्याचा जो विषय आहे तो केंद्र शासनाशी संबंधित आहे. मी सुरुवातीलाच सांगितले की, 2001 मध्ये जी उत्पन्नाची मर्यादा होती ती 2002 दुप्पट करण्यात आली. आम्ही आता केंद्र शासनाला यासंबंधी अशी शिफारस करणार आहोत की, ही उत्पन्नाची मर्यादा 1 लाख रुपये करण्यात यावी, जेणेकरुन जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ देता येईल.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

ता. प्र. क्र. 18986......

श्री. राजन तेली : सभापती महोदय, जी सहा वेगवेगळी महामंडळे आहेत आणि त्यांची उत्पन्नाची मर्यादा वेगवेगळी आहे. माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले की, समिती गठीत करण्यात आली आहे. ही समिती केव्हा गठीत करण्यात आली आणि त्या समितीचा अहवाल केव्हा प्राप्त होणार आहे आणि प्रत्यक्षात लाभार्थ्यांना कधी फायदा देण्यात येणार आहे ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, ही समिती 14 जानेवारी, 2011 ला गठीत करण्यात आली आहे. केंद्र शासनाशी संबंधित जेवढ्या योजना असतात त्या बाबतीत ते आहे. आपल्याकडे अपंगाच्या संदर्भातील महामंडळ आहे. त्या ठिकाणी उत्पन्नाची मर्यादा 6 हजार रुपये होती. ती मर्यादा 1 लाख रुपये केली तसेच प्रकल्पाची मर्यादा 25 हजार रुपयांची होती ती 1.50 लाख रुपयांपर्यंत केली आणि 30 टक्केपर्यंत सबसिडी सुध्दा दिलेली आहे.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या महामंडळांच्या सर्व लाभार्थ्यांची कर्जमाफी केली जाईल असे शासनाने जाहीर केले होते. या सर्व महामंडळांच्या कर्जदारांची कर्ज माफी केली आहे का ? जर एखाद्या महामंडळाच्या कर्जदारांची कर्ज माफी केली नसेल, माझ्या माहितीप्रमाणे खादी ग्रामोद्योग विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांची कर्जमाफी अजूनही झालेली नाही. ती जर झाली नसेल तर किती कालावधीमध्ये कर्जमाफी करणार ? आपल्या खात्याच्या अंतर्गत असलेल्या महामंडळांना आर्थिक निधीची उपलब्धता झाली आहे का ? असल्यास किती निधीची उपलब्धता केली आहे ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, शासनाने 2008 पूर्वीचे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला होता. महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळाचे 2008 पूर्वीचे कर्ज पूर्ण माफ केलेले आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाचे कर्ज पूर्ण माफ केलेले आहे. संत रोहिदास विकास महामंडळाचे कर्ज पूर्ण माफ केले आहे. फक्त वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळ आणि महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग महामंडळ या दोन महामंडळाचे काही पैसे राहिलेले आहेत. ते पैसे महिनाभरामध्ये देण्यात येतील.

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

ता. प्र. क्र. 18986 .....

श्री. एस.क्यू जमा : सभापति महोदय, मंत्री महोदय ने अपने उत्तर में कहा है कि अधिकारियों की एक समिति बनाई है. मेरा कहना है कि अधिकारियों की कोई भी समिति बनाई जाती है तो वह जन-प्रतिनिधियों की राय नहीं लेती है. मंत्री महोदय समिति को निर्देश दें कि इस बारे में पत्र लिखकर जन-प्रतिनिधियों को की राय ली जाए अथवा रीजन के हिसाब से मीटिंग लेकर जन-प्रतिनिधियों की राय ली जाए. क्या मंत्री महोदय इस प्रकार का निर्देश देंगे ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, हा प्रश्न उत्पन्नाची मर्यादा वाढविण्याबाबत केंद्र शासनाला शिफारस करण्यापुरता मर्यादित आहे. सन्माननीय सदस्यांना मी या बाबतीत विचारुन घेतो. आम्ही 1 लाखाच्या आत देण्यात यावे अशी शिफारस केलेली आहे.

----

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**हिंगोणा व पिंपरखेड तांडा (ता.यावल) येथे चक्रीवादळाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणेबाबत**

**(५) * १८०३६ श्री.मनीष जैन :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यावल तालुक्यात दिनांक ३० मे, २०११ रोजी हिंगोणा व पिंपरखेड तांडा येथे चक्रीवादळात ३६६ शेतकऱ्यांचे दोन कोटी एकोणीस लाख चौसष्ठ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, २७८ शेतकऱ्यांचे ५० टक्के पेक्षा अधिक नुकसान झाले व याच तालुक्यातील पिंपरखेड तांडा येथे चक्रीवादळात ४० घरांचे पत्रे उडाले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांना अद्यापही शासनाकडून नुकसान भरपाई मिळण्याची प्रतिक्षा आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या संबंधात शेतकऱ्यांवर व गावकऱ्यांवर ओढवलेल्या संकटात त्वरित मदत देण्यासाठी शासन काय ठोस उपाययोजना करत आहे ?

**डॉ.पंतगराव कदम :** (१) व (२) दिनांक ३०.५.२०११ रोजी झालेल्या वादळामुळे यावल तालुक्यातील ८ गावांमधील १०१ शेतकऱ्यांच्या २६.६२ हे आर क्षेत्रावरील केळी पिकांचे नुकसान झाले असून ११ गावांमधील ३४३ शेतकऱ्यांच्या २२८.२७ हे आर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. पिंपरखेड तांडा येथे नुकसान झालेले नाही. परंतु यावल तालुक्यातील हिंगोणे शिवारात वादळामुळे १५१ घरांचे एकूण रु.२,२१,३००/- इतके नुकसान झाले आहे.
(३) व (४) केळी पिकाच्या व इतर पिकांच्या नुकसानीसाठी मदत देण्याची बाब तपासण्यात येत आहे. घरांच्या झालेल्या नुकसानासाठी बाधितांना मदत देण्याची कार्यवाही सुरु आहे.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने वितरित करण्यात आलेल्या लेखी उत्तरामध्ये दुरुस्ती करु इच्छितो. उत्तराच्या दुसऱ्या ओळीमध्ये "केळी पिकांचे नुकसान" असे नमूद केले आहे, त्याऐवजी "केळी पिकांचे 50 टक्क्यांच्या आत नुकसान" असे वाचावे. तसेच तिसऱ्या ओळीत "पिकांचे नुकसान" असे नमूद केले आहे त्याऐवजी "पिकांचे 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान" असे वाचावे. उर्वरित उत्तर उत्तरित केल्याप्रमाणे वाचावे.

श्री.मनीष जैन : सभापती महोदय, केळीच्या पिकाला फळाचा दर्जा देण्याचे शासन मान्य करणार आहे काय, केळीला फळाचा दर्जा केव्हा दिला जाणार आहे तसेच प्रश्नात नमूद केलेल्या भागातील केळी उत्पादक शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झालेले आहे त्या शेतकऱ्यांना शासन हेक्टरी किती मदत करणार आहे ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, केळीला फळाचा दर्जा देण्याचे केंद्र सरकारने मान्य केलेले आहे. त्यानुसार राज्य सरकारने सुध्दा केळीला फळाचा दर्जा देण्याचा निर्णय घेतलेला

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आहे. सन्माननीय सदस्य श्री.मनीष जैन यांनी केळी उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्याचा प्रश्न उपस्थित केला आहे. त्या बाबत मी त्यांना सांगेन की, पूर्वी ऊसाच्या पिकाच्या नुकसानीसाठी हेक्टरी 10 हजार रुपये नुकसान भरपाई दिली जात होती त्या प्रमाणे केळीच्या पिकालाही हेक्टरी 10 हजार रुपये नुकसान भरपाई दिलेली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सध्याच्या मंत्रिमंडळात असलेले माननीय मंत्री महोदय डॉ.पतंगराव कदम हे एकमेव असे मंत्री आहेत की त्यांच्याकडे शेतकऱ्यांसंबंधी केलेली मागणी ते लगेच मान्य करतात.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मदत व पुनर्वसन मंत्री म्हणून माझ्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाने एक उपसमिती नेमलेली आहे. मी या उपसमितीची मंगळवारी बैठक बोलविलेली आहे. ज्या प्रमाणे द्राक्षाच्या पिकासाठी हेक्टरी 20 हजार रुपये नुकसान भरपाई दिली आहे त्या प्रमाणे त्या बैठकीत केळीच्या पिकासाठी सुध्दा विचार केला जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रश्न यावल तालुक्यातील असला तरी राज्यातील अनेक जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे शेतीचे नुकसान झालेले आहे. विदर्भातील बुलढाण, अकोला व वाशिम जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान झालेले आहे. या जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करुन खरडून गेलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना केव्हा दिला जाणार आहे आणि खरडून गेलेल्या जमिनीवर दुबार पेरण्या करण्यासाठी शासन शेतकऱ्यांना तातडीने खते व बियाणे उपलब्ध करुन देणार आहे काय ?

डॉ.पतंगराव कदम : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नासंबंधी शासनाने जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना स्थायी आदेशच दिलेले असतात. पिकाच्या नुकसानीसंबंधी शासनाकडून वेळोवेळी आदेश दिले जातात. ज्यावेळी चक्रीवादळामुळे किंवा अन्य नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांकडून शासनाकडे अहवाल येत असतात. त्या अहवालावर शासनाकडून कारवाई केली जाते. बुलढाणा जिल्ह्यातून नुकसानीचे अहवाल आल्यानंतर ते तपासून घेण्यात येतील. तेथून अहवाल यापूर्वीच आले असतील तर येत्या मंगळवारच्या बैठकीत ते ठेवण्यात येतील.

------

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सांगली जिल्ह्यातील बहुतांश जिल्ह्यात भीषण चारा टंचाई झाल्याबाबत**

**(६) * १८३२० श्री.रमेश शेंडगे , ॲड.उषाताई दराडे , श्री.हेमंत टकले , श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील बहुतांश जिल्ह्यात भीषण चारा टंचाई झाल्याचे माहे मे,२०११ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व तद्नुसार सदर जिल्ह्यातील चारा टंचाई दूर करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ.पतंगराव कदम :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, मी उपस्थित केलेल्या प्रश्नाला "हे खरे नाही, प्रश्न उद्भवत नाही" असे उत्तर दिलेले आहे. सभापती महोदय, सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ, आटपाडी आणि जत तालुक्यामध्ये आजही दुष्काळ आहे. माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम हे सांगली जिल्ह्याचे पालक मंत्री आहेत. त्यामुळे त्यांच्याकडे माझ्यापेक्षा अधिक माहिती असेल. कवठेमहांकाळ तालुक्याच्या केवळ पूर्वकडील भागात पेरण्या झाल्या आहेत. संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रात केवळ 20 ते 25 टक्के पेरण्या झालेल्या आहेत. आटपाडी व जत या पंचायत समित्यांनी आमच्या तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्याचा ठराव मंजूर केलेला आहे. तसेच सांगली जिल्हा परिषदेच्या कृषी समितीने दुष्काळ जाहीर करुन चाऱ्याच्या छावण्या सुरु करण्याबाबत ठराव मंजूर केलेला आहे. परंतु शासनाने प्रश्नाला नकारात्मक उत्तर दिलेले आहे. शासन त्या भागातील वस्तुस्थिती विचारात घेऊन चाऱ्यांच्या छावण्या त्वरित सुरु करील काय ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ AKN/ KTG/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 11:55

ता.प्र.क्र. 18320... श्री. रमेश शेंडगे.....

छापील प्रश्नाला "हे खरे नाही", "प्रश्न उद्‌भवत नाही" अशा प्रकारे दिलेली उत्तरे चुकीची आहेत. वस्तुस्थिती अशी आहे की, सांगली जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यामध्ये चा-याची भीषण टंचाई निर्माण झालेली आहे. दुभत्या जनावरांसाठी हिरवा चारा घ्यावयाचा झाला तर भिलवडी या ठिकाणी 25 रुपयाला 5 ऊस मिळतात. या भीषण परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी चारा छावण्या त्वरित सुरु करण्यात येणार आहेत काय ?

डॉ. पतंगराव कदम : सन्माननीय सदस्यांनी जे काही सांगितले त्यामध्ये काही अंशी तथ्य आहे. तासगाव, आटपाडी, जत, कवठेमहांकाळ, खानापूर, कडे या ठिकाणी आजच्या क्षणाला अडचण आहे. जर तेथे 8-15 दिवसात पाऊस पडला नाही तर टंचाईग्रस्त भागात चा-याची व्यवस्था करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदय हे सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सांगली जिल्ह्याच्या सन्माननीय पालकमंत्र्यांना मी माझ्या दालनात बोलावतो.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वरोरा (जि.चंद्रपूर) तालुक्यात शेतकऱ्यांची कोणतीही परवानगी न घेता अदानी कंपनीच्या वतीने शेतात टॉवर उभारणीचे काम मोठ्या प्रमाणात सुरु असल्याबाबत**

**(७) * १९१६१ श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. एस. क्यू. ज़मा , प्रा.सुरेश नवले , श्री.हुसेन दलवाई , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा (जि.चंद्रपूर) तालुक्यात शेतकऱ्यांची कोणतीही परवानगी न घेता अदानी कंपनीच्या वतीने शेतात टॉवर उभारणीचे काम मोठ्या प्रमाणात सुरु असल्याने अनेक शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे माहे मे, २०११ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परवानगी शिवाय टॉवर टाकण्याचे काम त्वरित थांबविण्याबाबत तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, छापील प्रश्नाला "हे खरे नाही", "प्रश्न उद्‌भवत नाही" अशी उत्तरे देण्यात आलेली आहेत. माझ्या माहिती प्रमाणे वरो-याचे कास्तकार श्री. जनार्दन साळवे यांनी अदानी कंपनीच्या अधिका-यां विरुध्द तक्रार केली असून त्या अधिका-या विरुध्द कलम 427 आणि 506 अनुसार गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. असे असताना माझ्या प्रश्नाला "हे खरे नाही" असे उत्तर दिलेले आहे. अदानी कंपनी आणि अन्य कोणतेही उद्योग शासनाची कोणतीही मंजुरी न घेता शेतक-यांच्या शेतामध्ये जबरदस्तीने टॉवर उभे करीत आहेत. याबाबतीत पोलीस स्टेशन आणि एसडीओकडे अनेक तक्रारी केलेल्या आहेत. तेव्हा याबाबतीत शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : प्रश्न असा विचारण्यात आलेला आहे की, "वरोरा (जि. चंद्रपूर) तालुक्यात शेतक-यांची कोणतीही परवानगी न घेता अदानी कंपनीच्या वतीने शेतात टॉवर उभारणीचे काम मोठ्या प्रमााणात सुरु केले आहे काय ?" या प्रश्नाला "हे खरे नाही" असे उत्तर दिलेले आहे. याचे कारण असे की, टॉवर उभे करीत अवताना इलेक्ट्रिसिटी ॲक्ट 2003च्या कलम 164 मध्ये कशा पध्दतीने नुकसान भरपाई द्यावी या संबंधी तरतूद आहे. त्या जागेचा मोबदला देण्याच्या संदर्भात शासन निर्णय आहे. टॉवर उभे करण्याच्या बाबतीत कंपनीला शेतक-यांचा विरोध

..3..



MSS/ AKN/ KTG/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 11:55

झाला. कंपनीला 109 टॉवर उभे करावयाचे होते. त्यातील 99 टॉवरचे काम झालेले आहे. याबाबतीत उपविभागीय अधिकारी यांनी कंपनीचे अधिकारी आणि शेतक-यांची एकत्र बैठक घेऊन त्यामध्ये मुच्युअल अंडरस्टॅण्डिंगने 1 कोटी 88 लाख रु. अदा करण्यात आलेले आहेत. तसेच पिकाच्या नुकसानीकरिता 27 लाख रु. अदा करण्यात आलेले आहेत. त्यामुळे त्याठिकाणी शेतक-यांचा विरोध होता ही वस्तुस्थिती खरी नाही.

प्रा. सुरेश नवले : चंद्रपूर जिल्ह्यामध्ये एकूण किती टॉवर उभे करण्यात आले ? एक टॉवर उभा करण्यासाठी किती जागा लागते ?

श्री. बाळासाहेब थोरात : 109 पैकी 10 टॉवर्स उभे करण्याचे बाकी आहे. एका टॉवरसाठी 3 ते 4 गुंठे जागा लागते.

...नंतर श्री. भोगले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ AKN/ KTG/ KGS/ 12:00

ता.प्र.क्र.19161.....

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, टॉवर उभे करीत असताना शेतकऱ्यांची संमती घेतली जात नाही. आम्ही वारंवार वीज मंडळाकडे, अंदानी कंपनीकडे तक्रारी केल्या आहेत. शेतकऱ्यांची संमती घेऊन टॉवर उभे करा. टॉवर उभे करीत असताना शेत जमिनीचे दोन भाग पाडले जातात. एका टॉवरसाठी 3 ते 4 गुंठे जमीन आवश्यक असते. पाऊस पडत असताना शेतकऱ्यांना विजेचा शॉक बसण्याची वा शेतामध्ये विद्युत तारा तुटून पडण्याची शक्यता असते. शेतकऱ्यांची संमती घेऊन शेत जमिनीचे दोन भाग पडणार नाहीत अशा पध्दतीने बॉर्डरवर टॉवर उभारण्याचे काम केले जाईल काय?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, टॉवर एका सरळ रेषेत उभारावे लागतात, त्याला पर्याय नसतो. एमएसईबी ॲक्ट अंतर्गत मोबदला दिला जातो. शेतकऱ्यांशी चर्चा करुन शासन निर्णयाप्रमाणे काम केले जाते. या व्यतिरिक्त कंपनीसोबत म्युच्युअल अंडरस्टॅण्डींग करार झालेला आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, शेतकऱ्यांची परवानगी का घेतली जात नाही? ती जागा शासनाच्या मालकीची नाही. माझ्या स्वत:च्या शेतात टॉवर उभारणी करण्यासाठी माझी परवानगी घेतली गेली नाही. शेतकऱ्यांची संमती घेण्याची व्यवस्था का केली जात नाही?

श्री एस.क्यू.जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री जी ने जो उत्तर दिया, उन्होंने सभी कुछ डिनाय किया ऐसी बात नहीं है. उन्होंने अभी विस्तारित उत्तर दिया है. माननीय मंत्री महोदय से मेरे दो ही प्रश्न है. एमएसइबी जो टॉवर लगाती है, उसके बारे में जी.आर. है. उसमें किसानों की सहमति ली जाती है. आपसी हिसाब से उनको पेमेन्ट किया जाता है. यह अदानी कंपनी प्राइव्हेट कंपनी है. ये आपको जानकारी देते है कि हमने चर्चा कर के जमीन की सहमति ली है. लेकिन इसका सरकारी रेकॉर्ड में कहीं भी वर्णन नहीं है. न एसडीओ के पास वर्णन होता है और न ही जिलाधिकारी के पास रेकॉर्ड होता है.

मेरा पहला प्रश्न यह है कि इस बारे में सारी जानकारी आप सदन के पटल पर रखेंगे क्या ? अदानी ने किसानों से 102 टॉवर्स लगाने के बारे में क्या समझौता किया है ? इस प्राइव्हेट अदानी कंपनी का टॉवर के संबंध में किसानों के जमीन का जो रेट है और एमएसइबी का जो रेट है, इसमें तफावत है. एक ही गांव में एक ही तालुका में इसके बारे में सरकार की कोई नीति है क्या ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.19161......

श्री.बाळासाहेब थोरात : विद्युत कायदा, 2003 च्या कलम 164 नुसार आणि इंडियन टेलिग्राफीक ॲक्ट नुसार मोबदला द्यावा असा शासन निर्णय आहे. त्यानुसार आतापर्यंत कार्यवाही करण्यात आली आहे व त्याप्रमाणे टॉवर उभारले जात आहेत. ज्या ठिकाणी शेतकऱ्यांचा विरोध झाला त्या ठिकाणी एकत्र बसून कॉम्पेन्सेशनची चर्चा घडवून आणली आणि समझोता करुन 1.88 कोटी आणि 27 लाख रुपये मोबदला दिलेला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी प्रश्न विचारला की, ज्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये टॉवर उभारले जातात त्यांची संमती का घेतली जात नाही? त्यांची परवानगी न घेता टॉवर उभे केले जात आहेत आणि टॉवर उभे केल्यानंतर कंपनीला वाटते तेवढा मोबदला दिला जातो. त्यामुळे यापुढे शेतकऱ्यांची संमती घेऊन त्यांच्याशी किंमतीबाबत चर्चा करुन शेतकऱ्यांना न्याय देण्याचा सरकार विचार करणार आहे काय?

श्री.बाळासाहेब थोरात : महापारेषण कंपनी आणि विद्युत विभाग यांच्याशी चर्चा करुन निश्चितपणे निर्णय घेण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना न्याय मिळावा म्हणून प्रश्नातून मार्ग काढण्यास आपण सहकार्य देता. या सभागृहातील सदस्य जेव्हा सांगतात की माझ्या शेतात टॉवर उभारताना मला विचारण्यात आलेले नाही तेव्हा शेतकरी बाजूला राहिला, मंत्री महोदय सांगतात की संमती घेतली गेली. परंतु माननीय सदस्या स्वत: सांगत आहेत की, माझी संमती घेतलेली नाही. चर्चा करण्यात येईल असे शासनाने उत्तर द्यावे. 2003 च्या कायद्यातील तरतुदीची माहिती का देत आहात? दिल्ली येथे मुख्यालय असलेली अदानी कंपनी शेतकऱ्यांवर अन्याय करीत असेल तर त्यांच्यावर कायदेशीर निर्बंध आणण्याबाबत मंत्री महोदयांनी ठोस भूमिका जाहीर करावी.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी लेखी पत्र द्यावे, निश्चितपणे त्या संदर्भात कारवाई केली जाईल.

---------

नंतर श्री.खर्चे...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील आदिवासी खावटी कर्जाच्या योजनेत अन्न धान्यांची खरेदी करताना पुरवठाधारकांकडून खरेदीत अनियमितता केली असल्याबाबत**

**(8) * 18419 श्री.विनोद तावडे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.संजय केळकर , श्री.माणिकराव ठाकरे , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.एम.एम.शेख** : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील आदिवासी भागात सावकारांकडून आदिवासींची पिळवणूक होऊ नये यासाठी शासनाने कायदा केला असून गोरगरीब आदिवासींची पावसाळ्यात उपासमार होऊ नये यासाठी शासनाच्या वतीने आदिवासींना अन्नधान्य व रोख स्वरुपात खावटी कर्जाने मदत करण्याची योजना आखली, हे खरे आहे काय,

(2) राज्यातील आदिवासींच्या खावटी कर्जाच्या योजनेत धान्यांची खरेदी करतांना पुरवठाधारकांकडून, ठेकेदार व कंत्राटदारांकडून सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील धान्यांच्या दरांपेक्षा तीन पट जास्त भावाने खरेदी करुन खरेदीत अनियमितता केली असल्याची बाब माहे मे, 2011 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(3) सदर योजने अंतर्गत अन्न धान्यांची खरेदी करतांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेत गव्हाचा भाव 415 रुपये क्विंटल असतांना आदिवासींसाठी 1870 रुपये तर तांदळाची किंमत सार्वजनिक वितरण व्यवस्थेत रुपये 650 प्रति क्विंटल असतांना या योजनेंतर्गत 2350 रुपयांनी खरेदी करुन गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, आदिवासींच्या खावटी योजनेतील होत असलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय,

(5) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (1) होय, हे खरे आहे.

(2) व (3) शासन निर्णय दि.15.4.2011 मधील तरतुदीनुसार खावटी कर्ज योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना वाटप करावयाचे अन्नधान्य व इतर वस्तू यांची खरेदी आयुक्त आदिवासी विकास,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18419....... श्री. बबनराव पाचपुते ....

नाशिक यांच्या अध्यक्षतेखालील समिती क्र.1 मार्फत चारही अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या स्तरावरील प्राप्त झालेले जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हा सांख्यीकी अधिकारी व मर्चंट असोशिएशन तसेच स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेले दर विचारात घेऊन त्याचप्रमाणे महाराष्ट्र स्टेट को.ऑ.कन्झुमर्स फेडरेशन लि.मुंबई यांनी सादर केलेले दर तसेच मालाच्या नमुन्याची पाहणी करुन व बाजारभावाप्रमाणे दर निश्चिती करुन करण्यात आली आहे. सदर दर हे बाजार भावाप्रमाणेच असून वाजवी आहेत.

(4),(5) व (6) प्रश्न उद्‌भवत नाही.

**सभापती** : मी प्रथम सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, वास्तविक प्रश्नोत्तराचा तास आता संपलेला आहे. पण मघाशी प्रश्नोत्तराच्या तासातील 19 मिनिटे दुसऱ्याच प्रश्नामध्ये गेल्यामुळे मी 10 मिनिटे प्रश्नोत्तरांसाठी अधिक वेळ वाढवून देत आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : महोदय, पावसाळ्याच्या चार महिन्यात आदिवासींची मोठ्या प्रमाणात पिळवणूक होते म्हणून शासनाने या चार महिन्यांच्या काळात आदिवासींना धान्य व रोख स्वरुपात मदत करावी असा निर्णय घेतलेला आहे. पण या योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार चालू आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून लोकल ठिकाणचे दर 415 रुपये एवढे असताना 1870 रुपयानी खरेदी करण्यात आली. तांदळाची किंमत सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये 650 रुपये असताना प्रत्यक्षात मात्र 2350 रुपयानी ती खरेदी करण्यात येते. दुसरा प्रश्न म्हणजे आदिवासींना खावटी कर्ज योजनेतून जी रक्कम धान्यासाठी मिळते ते धान्य त्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेतूनच देण्यात यावे असे आदेश उच्च न्यायालयाने दिलेले आहेत हे खरे आहे काय, तसेच कंत्राटदार निश्चित करण्यासाठी आदिवासी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती, त्याचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल काय ?

श्री. बबनराव पाचपुते : महोदय, सन्माननीय सदस्यांनी समितीच्या अहवालाबाबत जो तिसरा प्रश्न विचारला त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, सदर समितीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. त्यांचा दुसरा प्रश्न उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांच्या संदर्भात होता. त्याबाबत मी असे स्पष्ट करु इच्छितो की, उच्च न्यायालयात एक पीआयएल दाखल

......3



PFK/ MMP/ AKN/ पूर्वी श्री. भोगले..... 12:05

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

करण्यात आली होती. त्या अनुषंगाने शासनाच्या वतीने न्यायालयात एक प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. त्यावेळेस न्यायालयाने सांगितले की, आदिवासींना सार्वजनिक वितरण व्यवस्थेतूनच धान्य पुरवठा करण्याची योजना प्रायोगिक तत्वावर सुरु करावी. त्या अनुषंगाने आपण ही योजना अमरावती जिल्ह्यातील धारणी परिसरात सुरु केली. पण तेथील सरपंचांनी शासनाकडे पत्राने कळविले आहे की, आदिवासींसाठी अगोदर जी योजना सुरु होती तीच पूर्ववत सुरु करावी. पण आम्ही तसा निर्णय घेतलेला नाही, सध्या त्या परिसरात ही नवीन योजनाच सुरु आहे. खरे तर हा निर्णय शासनाने सन 2001 मध्येच घेतला होता. त्यानुसार खावटी कर्ज द्यावे असे ठरले होते. कारण जुलै ते सप्टेबर या चार महिन्यात आदिवासींना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते त्यासाठीच ही योजना सुरु केली होती. तसेच या योजनेच्या मार्फत युनिट सिस्टम आपण तयार केली होती. या युनिटच्या माध्यमातून 2 हजार ते 4 हजार अशी रक्कम आपण आदिवासींना देत असतो. त्यातील 30 टक्के रक्कम धान्यासाठी आणि 70 टक्के रक्कम रोख असे वर्गीकरण केले होते. या किंमतीच्या संदर्भात गट क्र.1, आयुक्तांच्या पातळीवर एक समिती तयार केली, त्यात राज्यातील चारही अप्पर आयुक्तांनी एकत्र येऊन बाजार भावाने माहिती मागवावी. तसेच स्थानिक पातळीवर भावासंबंधीची चौकशी केल्यानंतरच धान्याच्या किंमती अंतिम कराव्यात असे ठरविलेले आहे. शासनाच्या वतीने धान्याची खरेदी तीन विभागांमार्फत करण्यात येते. त्यात महिला व बाल विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग आणि आदिवासी विकास विभाग असे हे तीन विभाग आहेत. आताच सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, लोकल ठिकाणी भाव कमी असताना शासनाने मात्र 1870 रुपयाप्रमाणे खरेदी केली. यासंदर्भात मी असे सांगू इच्छितो की, लोकलचे भाव 1570 रुपये आहेत हे खरे आहेत. पण त्यासाठी लागणाऱ्या अनुषंगिक खर्चाचाही त्यात समावेश असल्याने ही किंमत 1870 रुपये एवढी दिसते. मग त्यात मार्केटची कटिंग, वाहतूक, विमा, भराई, उतराई, हमाली आणि गोडावूनपर्यंत पाठविण्याचे भाडे अशा बाबी अंतर्भूत आहेत. तसेच महाराष्ट्र स्टेट कंझ्युमर फेडरेशन यांच्या वतीने आणि बाजारभावाने म्हणजे 1570 रुपयाप्रमाणेच आपण ही खरेदी केली आहे.

...4...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18419.......

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले त्या निविदा कोणत्या वर्षीच्या आहेत ?

श्री. बबनराव पाचपुते : महोदय, दरवर्षीच धान्य खरेदीच्या निविदा काढण्यात येतात. त्यासाठी प्रत्येक वर्षी समिती नियुक्त केली जाते व त्या समितीच्या माध्यमातून दर निश्चित केले जातात. त्यानुसार या तीन विभागांचे दर वेगवेगळे आहेत. यापेक्षा आदिवासी विकास विभागांचे दर कमी आहेत. ही खरेदी करीत असताना आपण चारही एटीसी आणि आयुक्त यांनी एकत्र बसून फेडरेशनचा माणूस सुध्दा त्यात असतो. त्यामुळे हे दर वाजवी आहेत. तसेच जे 300 रुपये जास्त दिसत आहेत ती रक्कम आपण आदिवासींकडून घेत नाही, आदिवासींकडून मूळ रक्कमच घेतली जाते.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.:18419** .....

श्री. बबनराव पाचपुते ...

सर्व वस्तू खरेदी करण्यासाठी अधिकचे 300 रुपये लागत नाहीत. परंतु गहू व तांदूळ खरेदीमध्ये 300 रुपये लागत असतात व ते पैसे आपण त्यांच्याकडून वसूल न करता संबंधितांकडून मात्र मूळ रक्कम घेतली जात असते व वरचा खर्च शासनाच्या देयकामधून खर्च केला जात असतो व ही रक्कम बाजार भावापेक्षा जास्त नाही एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. दिवाकर रावते : 2300 रुपये क्विंटल हा भाव बाजारभावाप्रमाणे जास्त नाही असे माननीय मंत्री महोदयांना आपण रेकॉर्डवर म्हणावयास सांगावे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मी जे काही सांगितलेले आहे ते बरोबर आहे. माझ्याकडे तिन्ही डिपार्टमेंटचे रेट सुध्दा उपलब्ध आहेत. या ठिकाणी तांदळाची खरेदी 2050 रुपये प्रती क्विंटल या प्रमाणे करण्यात आलेली असून अधिकचे 300 रुपये या दराने माल खरेदी करण्यात आलेला आहे. विक्री कर समिती, मार्केट सेस, वाहतूक, विमा, जकात कर, भराई, उतराई या सर्वांसाठी 300 रुपये अधिकचे पैसे लावलेले आहेत.

**सभापती** : या विषयाच्या संदर्भात चार पाच दिवसांनी माझ्या दालनात बैठक आयोजित करण्यात येईल तसेच या बैठकीमध्ये काही सन्माननीय सदस्यांना सुध्दा बोलावण्यात येईल. खरेदीमध्ये जर अनियमितता किंवा गैरसमज असतील तर ते दूर झाले पाहिजेत. हा प्रश्न मी राखून ठेवणार नाही.

प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन बाबत</u>**

श्री. सुभाष चव्हाण : माननीय सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाने नियम 260 अन्वये सामाजिक न्याय विभागाचा प्रस्ताव मांडला होता. हा प्रश्न गिरणी कामगारांप्रमाणेच महत्वाचा आहे. परंतु हा प्रस्ताव काही कारणास्तव पुढे जात असल्यामुळे हा प्रस्ताव सोमवारी घेण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : आपला जो नियम 260 चा प्रस्ताव आहे तो आजच पूर्ण करु या असे मी त्या दिवशी म्हणालो होतो. परंतु त्या वेळेस आपण नकळत पुढच्या विषयाकडे गेल्यामुळे हा प्रस्ताव सुध्दा काही दिवस पुढे जाईलच.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनचा मुद्दा उपस्थित करण्यासाठी मी उभा आहे. बॉम्बस्फोटाच्या संदर्भात टीव्हीवरुन अधिकारी मोठया प्रमाणात वाटेल तशा मुलाखती देत आहेत. या राज्याचे माजी पोलीस अधिकारी श्री. सिंग यांनी बॉम्बस्फोटाच्या संदर्भात काही वक्तव्ये केलेली आहेत. या मुलाखतीमुळे राज्याच्या सुरक्षिततेच्या गुप्ततेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. सर्व्हीस रुल प्रमाणे अशा प्रकारच्या मुलाखती देण्याबाबत काही बंधने आहेत. सभापती महोदय, आपण गृहमंत्री म्हणून काम केलेले असल्यामुळे यासंदर्भात आपल्याला सर्व कल्पना आहे. बॉम्बस्फोटाच्या संदर्भात अधिका-यांनी वाटेल ती माहिती देणे ही संरक्षणाच्या दृष्टीने फार महत्वाची बाब आहे. रिटायर्ड झालेल्या अधिका-याने बॉम्बस्फोटाच्या संदर्भात किती माहिती द्यावी याला काही बंधने आहेत. अधिका-यांनी राजकारणावर बोलावे, आमदार, खासदार म्हणून उभे राहिले तरी त्यास माझा विरोध नाही. परंतु संरक्षणाच्या दृष्टीने मुलाखती देतांना अधिका-यांनी भान ठेवण्याची आवश्यकता आहे. गुप्तता पाळण्याच्या संदर्भात आपल्या राज्याचा काही कायदा आहे की, नाही ? जर अशा प्रकारचा कायदा नसेल तर तशा प्रकारचा कायदा निर्माण करण्याची गरज निर्माण झाली आहे असे मला वाटते. अधिका-यांनी अशा प्रकारच्या मुलाखती दिल्यामुळे हे अधिकारी पाकिस्तानमध्ये जाऊन किंवा इतर देशामध्ये जाऊन नोकरी सुध्दा करु शकतील. आपल्या देशाची धोरणे किंवा आपल्या देशाने जी काही शस्त्रास्त्रे खरेदी केलेली असतील व त्यासंदर्भात शासनाने काही आराखडे बांधले येणा-या 5-10 वर्षासाठी केले असतील तर असे आराखडे जाहीर रित्या सांगणे बरोबर नाही असे मला वाटते. मी अधिकारी होतो त्यावेळेस सन्माननीय मंत्री महोदय श्री. जयंत पाटील यांनी जे धोरण घेतले होते ते बरोबर

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील....

नव्हते असे सांगण्याचा अधिका-यांना काहीही अधिकार नाही असे मला वाटते. सर्व्हीस रुल्समध्ये जर अपूर्ण गोष्टी असतील तर त्याबाबत राज्य शासनाने कायदा करण्याची गरज आहे अशी मागणी मी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या निमित्ताने करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी जो मुद्दा मांडलेला आहे त्याला माझा पाठिंबा आहे. सन्माननीय सदस्यांनी जो उल्लेख केलेला आहे तो बरोबर आहे. मुलाखती देतांना अधिका-यांवर काही तरी निर्बंध असलेच पाहिजे. आपल्याकडे सुराडकर नावाचे आयजी होते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

श्री.सुराडकर नावाचे निवृत्त आय.जी.पोलीस पैसे कसे खातात हे टीव्ही वरून सांगतात. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, हा अधिकारी पाण्यात राहून सुकाच गेला काय ? त्यांनी त्यांच्या कारकिर्दीमध्ये काय केले हे शासन म्हणून आपण त्यांना विचारणार आहात की नाही ? निवृत्त झालेला आय.जी.आताचे पोलीस कसे भ्रष्टाचार करतात हे जाहीरपणे टीव्ही वर सांगतो. तेव्हा आपण त्यांच्या मालमत्तेची चौकशी करावी. मग आपल्याला निवृत्त होण्यापूर्वी ते काय होते आणि आता काय आहेत हे कळेल. निवृत्त झाल्यानंतर ते महाराष्ट्र शासनावर ताशेरे ओढत असतात. ते म्हणतील की, आम्हाला स्वातंत्र्य आहे. राम प्रधान समितीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्यानंतर माननीय गृह मंत्र्यांनी आम्हाला विनंती केली की, यातील काही मुद्दे हे गुप्त असल्यामुळे या अहवालावर आपण सभागृहामध्ये चर्चा करू नये. त्यामुळेच आमदारांची समिति नेमली व त्यास विरोधी पक्षा तर्फे आम्ही देखील संमती दिली. देशाच्या, राज्याच्या हिताच्या दृष्टीने जे महत्त्वाचे मुद्दे आहेत त्याची येथे चर्चा नको या उद्देशानाचे आम्ही अनुमती दिली. राज्याच्या हिताच्या दृष्टीनेच दोन्ही बाजूकडील सदस्य मान्यता देत असतात त्यावेळी हे टीव्ही चॅनलवर येऊन वाभाडे काढत असतात. श्री.सुराडकर आणि श्री.वाय.पी.सिंग हे ज्या पद्धतीने बोलतात ते बरोबर नाही. तेव्हा यावर निर्बंध घालणारा कायदा शासनाने निर्माण केला पाहिजे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने निवृत्ती नंतर शासकीय कर्मचाऱ्याचा केवळ 5 वर्ष शासनाशी संबंध रहात नसून मरे पर्यंत त्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचा शासनाशी संबंध रहात असल्यामुळे त्याच्यावर कारवाई करता येईल अशा प्रकारचा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे आता त्यांना देखील मुक्तता नाही.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो देशाच्या,राज्याच्या व शासनाच्या ऐक्याच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आहे. माझी विनंती आहे की, आपण नियम तपासून पहावेत. तशा प्रकारचे नियम नसतील तर ते करावेत. सेवानिवृत्त झाल्यानंतर, राजीनामा दिल्यानंतर शासकीय अधिकारी शासनाचे वाभाडे काढत असतील तर त्यांच्याविरूद्ध कारवाई केली पाहिजे. त्यांचे असे म्हणणे असते की, त्यांचे ऐकले असते तर महाराष्ट्राचे कल्याण झाले असते. सेवानिवृत्त अधिकारी ज्या प्रकारचे वक्तव्य टीव्ही चॅनेलवरून करीत असतात ते योग्य नाही. हा अपमान, मान यांचा प्रश्न नाही. हा राष्ट्रहिताचा प्रश्न आहे. त्यांचे वर्तन हे देशाला घातक आहे. त्याची गंभीर दखल शासनाने घ्यावी व कायद्यामध्ये दुरूस्ती करावयाची असेल तर ती देखील करण्यात यावी.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस.क्यू.जमा : सभापति महोदय, सम्माननीय सदस्यों ने जो चिंता जतायी है वह बहुत ही वाजिब है. कुछ पुलिस अधिकारी, केंद्र सरकार के कुछ आइएएस अधिकारी, आइपीएस अधिकारी टीवी चॅनल पर टीआरपी बढ़ाने के लिए.....आज चॅनलों में इतना कॉम्पीटेशन है कि घटनाओं को और न्यूज को कम दिखाते है और अपना व्यू ज्यादा जोड़ देते है. इस प्रसिध्दी में जो सरकारी अधिकारी होते है, जिनके ऊपर कुछ सिक्रेसी होती है, देश की सुरक्षा का सवाल है. इस तरह की बातें टेलीविजन पर जाकर की जाती है तो इस बारे में दो कार्रवाई होनी चाहिए. यह केंद्र सरकार का विषय है. लेकिन महाराष्ट्र शासन ने, जब कभी बम ब्लास्ट होता है या कोई घटना घटती है तो चॅनल ने क्या दिखाना चाहिए और क्या नहीं दिखाना चाहिए, इसके बारे में कोई कोड बनाया जाना चाहिए. यदि इस बारे में कानून में कोई बदल करने की जरुरत है तो उस तरह का बदल किया जाए. ऐसे एक्स अधिकारी जो सर्विस कन्डक्ट रुल्स से संबंधित होते है और जैसा कि सुप्रीम कोर्ट ने कहा है, उनके ऊपर रोक लगानी चाहिए. उनके ऊपर कार्रवाई करनी चाहिए. अगर कार्रवाई करने का कोई प्रावधान नहीं है तो उनके खिलाफ कोर्ट में जाकर सरकार ने रिस्ट्रेन करना चाहिए कि इस तरह की गैरजबाबदारी की बात चॅनलों पर जाकर न करें, धन्यवाद.

श्री.मनिष जैन : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी जो विषय मांडला आहे तो अत्यंत गंभीर आहे. आपल्या देशावर व राज्यावर अतिरेकी हल्ला होतो त्यासंबंधी त्यांचा विषय आहे. आपले मंत्री कोणता निर्णय घेतात, सीआयडीचा अहवाल काय असतो, तपास कसा सुरू आहे, इत्यादी सगळी गोपनीय माहिती निवृत्त अधिकारी टीव्ही चॅनेलवर उघड करतात. यासाठी कायद्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो अत्यंत गंभीर आहे. जे अधिकारी निवृत्त होतात ते आपल्या पूर्वायुष्यामध्ये कसे वागले आहेत याचा विचार न करता मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न टीव्हीवर जाऊन करतात.

यानंतर श्री.सरफरे....

अप्रकाशित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

ते या शासनाला मार्गदर्शन करतात व शासनाच्या चुका दाखवितात. मुंबईमध्ये बॉम्बस्फोट झाल्यानंतर रोज टी.व्ही. चॅनेलवर चर्चा सुरु असल्याचे दाखविले जाते. त्याठिकाणी पॅनल डिस्कशन सुरु असते. हे अधिकारी अशा पध्दतीने पॅनेलवर जावून चर्चा करणार असतील तर ती राज्याच्या दृष्टीने गंभीर बाब आहे. या अधिकाऱ्यांच्या सेवा नियमामध्ये शासनाला दुरुस्ती करावी लागेल किंवा कायद्यामध्ये दुरुस्ती करावी लागेल काय? एखादा अधिकारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्या अधिकाऱ्याने सरकारसंबंधी किंवा आपल्या खात्यासंबंधी कशाप्रकारे बोलू नये यासंबंधी नियमावली केली पाहिजे असे माझे म्हणणे आहे. या शहरामध्ये बॉम्बस्फोट झाल्यानंतर आपल्या राज्यामध्ये असलेला शस्त्रास्त्रांचा साठा किंवा सी.आय.डी., आय.बी. डिपार्टमेंट किंवा गुप्तचर खाते कशापध्दतीने काम करीत आहे, याबाबत दूरदर्शनवर जावून सांगणे बरोबर नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उल्लेख केल्याप्रमाणे राम प्रधान समितीचा अहवाल सभागृहाला सादर करण्यात आला त्यावेळी त्या अहवालावर चर्चा न करता तीन सन्माननीय सदस्यांची एक समिती गठीत करुन त्यामध्ये चर्चा करावी ती गोष्ट या राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक आहे असे सन्माननीय गृहमंत्र्यांनी आम्हाला सांगितल्यानंतर ती आम्ही देखील मान्य केली. त्यानंतर या सभागृहाच्या बाहेर सनदी अधिकारी जर अशापध्दतीची वक्तव्ये करणार असतील तर ती राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गंभीर बाब आहे. त्याबाबत शासनाने निश्चितपणे विचार केला पाहिजे.

**सभापती** : या राज्याच्या आणि देशाच्या हिताच्या दृष्टीने राष्ट्रीय संरक्षण म्हणून या बाबतीत शासनाने पुढाकार घेवून विचार करण्याची वेळ आली आहे. या बाबतीत सन्माननीय ग्राम विकास मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, या विषया संदर्भात सभागृहाच्या तीव्र असलेल्या भावना आपण सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणाव्यात. त्याचप्रमाणे आपण सन्माननीय गृह मंत्र्यांबरोबर या बाबतीत चर्चा करावी. हा प्रश्न अत्यंत महत्वाचा असल्यामुळे अनेक सन्माननीय सदस्यांना या बाबतीत तीव्र भावना मांडण्याची इच्छा होती, परंतु मी त्यांना परवानगी देऊ शकलो नाही. या बाबतीत मी स्वत: सन्माननीय गृह मंत्र्यांना सविस्तर पत्र लिहिणार आहे त्याच प्रमाणे सन्माननीय मुख्यमंत्र्यांना देखील वेगळे पत्र लिहून या बाबतीत पाठपुरावा करणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, हे अधिकारी दूरदर्शनवर या सरकारचा आणि लोकप्रतिनिधींचा ज्या प्रकारे अपमान करीत आहेत त्याच प्रकारे दूरदर्शनवर काही जाहिराती सुध्दा दाखविल्या जात आहेत. एका जाहिरातीमध्ये मंत्रीमहोदय म्हणतात की, "मै ट्रान्सपोर्ट मिनिस्टर हूँ, मुझे जाने दो" आणि तो माणूस म्हणतो की, "आपने यह बनियन पहनी है तो आगे जाओ" हे काय चालले आहे? कुठल्या तरी सिनेमात एका मंत्र्यांचा खून केल्याचे दाखविले जाते. हे प्रकार बंद होणे आवश्यक आहे. यामध्ये शासनाचा आणि लोकप्रतिनिधींचा अवमान होता कामा नये असे मला सुचवावयाचे आहे.

**सभापती** : अशा बाबीकडे शासनाचे बारकाईने लक्ष असणे गरजेचे आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपल्याला न पटणाऱ्या किंवा खटकणाऱ्या बऱ्याच गोष्टी विविध ठिकाणाहून मांडल्या जातात. मानवी स्वभाव असल्यामुळे आपल्याला न आवडणाऱ्या गोष्टींबद्दल मतभेद व्यक्त केले जातात. शासनाची यंत्रणा म्हणून ज्यावेळी आपण विचार करतो त्यावेळी आपण वेगवेगळया भूमिका बजावित असतो. उदा. जेव्हा एखाद्या अधिकाऱ्याकडून आपण जबाबदारीची अपेक्षा करतो त्या वेळी देश हितासाठी, राज्य हितासाठी त्या अधिकाऱ्याने भूमिका मांडली पाहिजे अशी त्यांच्याबद्दलची आपली अपेक्षा योग्य असली तरी सुध्दा आपण ज्या अधिकाऱ्यांचे नाव घेतो त्यामध्ये आदरणीय श्री. अरविंद इनामदार यांच्या सारखे निवृत्त पोलीस महासंचालक आहेत. ते शासनाच्या चौकटीमध्ये राहून वेगळया प्रकारची भूमिका मांडतात. अशावेळी समाजाच्या आत्मपरीक्षणाची, शासनाच्या आत्मपरीक्षपणाची, शासनाने सुधारण्याची संधी व सहिष्णुता ठेवून आपण विचार स्वीकारणार नसलो तर त्या ठिकाणी आपण देखील स्वत:चा मतभेदाच्या चष्मा काढून आत्मपरिक्षण केले पाहिजे. सर्व सन्माननीय सदस्यांबद्दल आदर ठेवून मला या ठिकाणी मत व्यक्त करण्याची आपण संधी दिली त्याबद्दल मी आभारी आहे. अशाप्रकारची सेन्सॉरशीप असण्यापेक्षा स्वत:हून आचारसंहिता पाळली गेली तर ते चांगले होईल. त्याचबरोबर विधान परिषदेमध्ये आमदार म्हणून काम करण्याबरोबरच मी अनेक समित्यांवर काम करते. त्या समित्यांचे कामकाज गोपनीय ठेवण्या संदर्भात आपल्यावर बंधन असते. प्रश्न असा आहे की, एखादी व्यक्ती निवृत्त झाल्यानंतर दहा-पंधरा वर्षानंतर त्या व्यक्तीला सत्य माहिती लिहावयाची असेल तर त्या व्यक्तीला ती माहिती लिहिता येणार नाही असे सांगून आपण त्या व्यक्तीच्या संपूर्ण अधिकारावर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ AKN/

डॉ. नीलम गोऱ्हे...

गदा आणीत आहोत. आज आपण सभागृहात असलो तरी सर्वसामान्य व्यक्तीला स्वत:ची मते मांडण्याचा अधिकार आहे. ती मते देशाच्या विरोधात असतील तर त्यावर नंतर बंदी आणण्याची कारवाई करण्याचा आपल्याला अधिकार आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

परंतु आपण याबद्दल थोडी जास्त जागरुकतेने पावले उचलली पाहिजेत. त्यावर बंधने आणू नयेत. सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी सांगितले, तोही एक भाग आहे की राजकारणातील लोकांबद्दल अतिशय अनादर व्यक्त केला जातो. पण मला असे वाटते की, आपण लोकांच्या आदराला कसे पात्र होऊ यादृष्टीने आपणच आपले आत्मपरीक्षण केले पाहिजे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सभागृहामध्ये महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु आहे. मी आपल्याला विनंती करतो. लोकशाहीने आपल्याला अनेक प्रकारचे अधिकार दिलेले आहेत. मग त्यामध्ये फ्रीडम ऑफ स्पीच असेल किंवा आपल्याला एखादी भावना व्यक्त करण्याचा अधिकार असेल अशा अधिकारांचे निश्चितपणे रक्षण झाले पाहिजे. पण देशाच्या आणि समाजाच्या हितासाठी काय आहे किंवा काय नाही हे सांगत असताना कोणाच्याही अधिकारावर मर्यादा न आणता त्याविषयी संवेदनशील आणि विवेकशील मनाने विचार करुन त्याचा ब्रेकींग पाईंट कुठे आहे हे पहाण्याचे काम देखील लोकशाहीतील या सर्वोच्च सभागृहाचे आहे. मी परवा लंडन येथे गेलो होतो. तेव्हा तेथे स्टार टी.व्ही.च्या मालकांची ट्रायल सुरु होती. त्यावेळी मला लंडनच्या पार्लमेंटमधील अध्यक्ष भेटावयास आले होते.तुम्हाला सर्व अधिकार मिळालेले आहेत पण दुसऱ्याचे वैयक्तिक आयुष्य डिस्ट्रॉय करण्याचा अधिकार मिळालेला नाही. कधी-कधी इतकी अडचण होते की, घराच्या दरवाजाच्या बाजूला जर कोणी एखादा साधा माणूस भेटावयास आला तरी मिडियाच्या कॅमेऱ्याशिवाय त्याला घरात येता येत नाही अशी देशातील स्थिती आहे. माझ्या सारख्यांना अनेक वेळा याचा अनुभव येतो आणि त्यामुळे व्यक्तीगत जीवन जगणे मुष्किल होते.

सभापती महोदय, मला एक विनंती करावयाची आहे की, निवृत्त झालेले अधिकारी हे सुरक्षिततेच्या विषयावर अधिकार आहे म्हणून मोकळेपणाने बोलतात, तसे त्यांनी बोलावे तो त्यांचा अधिकार आहे. निवृत्त होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीसाठी आचारसंहिता नाही आणि तशी ती बनविणे हे देखील लोकशाहीच्या स्पिरिटला घातक होईल. पण त्याच बरोबर त्यांनी एखाद्या संवेदनशील पदावर काम करुन निवृत्त झाल्यानंतर देशाच्या आणि समाजाच्या हिताच्या दृष्टीने जर ते बोलत असतील तर या बाबतीत त्यांनी अधिकाराचा, स्वातंत्र्यांचा कितपत उपयोग केला पाहिजे याचाही विचार करावयास पाहिजे. मिडियाच्या माध्यमातून बोलण्याची जी व्यवस्था आहे, त्या मध्ये आम्ही किती वाईट आहोत किंवा चांगले आहोत याचेही आत्मपरिक्षण केले पाहिजे आणि आम्ही चांगले वागावयास पाहिजे. जर चुका होत असतील तर त्या दुरुस्त केल्या पाहिजेत. पण ज्याच्यामुळे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . ..

आमच्या संपूर्ण व्यवस्थेवरील श्रध्दा नाहीशी होईल, त्या संपुष्टात येतील असा जर एकतर्फी प्रपोगंडा सुरु राहिला तर शेवटी या कोणत्याच व्यवस्थेला अर्थ उरणार नाही. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांनी ज्या संदर्भात विचार मांडलेले आहे, त्या बाबत सांगावयाचे तर सरकारने कोणाच्याही लोकशाही स्वातंत्र्याची गळचेपी होणार नाही याची काळजी घ्यावयास पाहिजे. तसेच राष्ट्र, समाज आणि विशेषत: आपण जी व्यवस्था स्वीकारलेली आहे, ती देखील टिकली पाहिजे, त्यावरील विश्वास टिकला पाहिजे.ज्यावेळी आपण एखाद्या व्यक्तीच्या विरोधात बोलतो तेव्हा ते त्या व्यक्तीच्या विरोधात नसते तर ते हळूहळू त्या व्यवस्थेच्या विरोधात बोलले जाते.त्यामुळे याच्या मर्यादा कुठे सांभाळल्या पाहिजेत, याचा ब्रेकींग पॉईंट कुठे असला पाहिजे हे निश्चितपणे ठरविण्याची गरज आहे.याठिकाणी जी भावना व्यक्त करण्यात आली, त्या बाबतीत शासनाने विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष यांच्याबरोबर एकत्रितपणे विचार करुन उच्चस्तरावर योग्य तो निर्णय घेणे हे लोकशाहीसाठी आणि राष्ट्राच्या सुरक्षेसाठी, आपल्या व्यवस्थेसाठी आवश्यक आहे असे मला वाटते.

**सभापती** : मी आपला आभारी आहे.

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, आता याठिकाणी केवळ सनदी अधिकाऱ्यांच्या बाबतीत चर्चा सुरु आहे. पण शिक्षण क्षेत्रामध्ये डायरेक्टर म्हणून सेवानिवृत्त झालेले लोक सुध्दा आणि विद्यापीठामध्ये रजिस्ट्रार सारख्या महत्वाच्या पदावरुन सेवानिवृत्त झालेले लोक सुध्दा पुन्हा कोणत्यातरी संस्थेमध्ये पगारी नोकरी करीत असतात किंवा मानधनावर नोकरी करीत असतात. अशा वेळी आपल्या शासनातील हितसंबंधांचा, माहितीचा उपयोग त्या संबंधित संस्थेतील एखाद्या व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या भल्यासाठी वापरत असतात. त्यामुळे माझे एवढेच म्हणणे आहे की, यासाठी कोड ऑफ कंडक्ट निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

-----

. . . .आर-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितचा सन 2002-2003 व 2003-2004 चा अनुक्रमे चौथा व पाचवा वर्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

----

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा (पुणे) सन 2009-2010 चा चौदावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, मला आपल्या निदर्शनास एक बाब आणावयाची आहे. अनेक वेळा सदनामध्ये विविध अहवाल ठेवण्यात येतात.परंतु याठिकाणी शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितचा 2002-2003 व 2003-2004 या वर्षाचे अहवाल आता ठेवण्यात आले आहेत.

यानंतर कु.थोरात . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे ....

सभापती महोदय, आज सन 2010-2011 हे वर्षे सुरु आहे. तेव्हा हे अहवाल सभागृहासमोर लवकर ठेवण्याच्या संदर्भात आपण निर्देश द्यावेत.

**सभापती** : मंत्री महोदयांनी याची स्वत: नोंद घ्यावी. तसेच या संदर्भात अन्य विभागाला कसे कळविता येईल ते बघावे. जे अहवाल सभागृहापुढे येतात ते तातडीने येणे गरजेचे आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी या संबंधीची नोंद घेतली आहे. तसेच संबंधित मंत्र्यांना या संदर्भात कळविण्यात येईल.

----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी. : औचित्याचे मुद्दे**

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, "रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या अनेक प्राथमिक शाळा असून या शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना ड्रेसकोड लागू करण्याचा प्रशासनाने निर्णय घेतला होता. मागील आठवडयात पुन्हा एकदा शिक्षण समितीची बैठक झाली. त्या बैठकीत ड्रेसकोड ऐवजी प्राथमिक शाळेत येणाऱ्या प्रत्येक शिक्षकाने ॲप्रन वापरावे असा धोरणात्मक निर्णय घेतला असून 15 ऑगस्ट पासून अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे.

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांना ड्रेसकोड अथवा ॲप्रन वापरण्याची सक्ती करणे, अन्यायकारक असून शिक्षकांच्या व्यक्ती स्वातंत्र्यावर व मूलभूत हक्कावर अतिक्रमण करणारा हा निर्णय आहे.

सभापती महोदय, ड्रेसकोड अथवा ॲप्रनचा वापर करण्याची सक्ती करणाऱ्या जिल्हा प्रशासनाच्या निर्णयास शिक्षकांचा विरोध असल्याने ही सक्ती रद्द करण्यात यावी, अशी सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून शासनास विनंती करतो.

---

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्रीमती शोभा फडणवीस यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, औचित्याच्या माध्यमातून मी एक महत्वाचा प्रश्न या ठिकाणी मांडते.

सभापती महोदय, आम्ही जेव्हा छत्रपती शिवाजी टर्मिनस या स्टेशनवर विदर्भ एक्स्प्रेसने किंवा दुरान्तो एक्स्प्रेसने उतरतो त्यावेळी सकाळी एकही टॅक्सी ड्रायव्हर जवळच्या प्रवाशांना घेण्यास तयार होत नाहीत. मागच्या वेळी या संदर्भात रेल्वे पोलिसांची मदत घेण्याच्या दृष्टीने आम्ही रेल्वे पोलिसांना शोधण्याचा प्रयत्न केला, त्यावेळी आमच्या असे लक्षात आले की, ते सर्वच्या सर्व पोलीस स्टेशनच्या बाहेर असलेल्या एका चहाच्या स्टॉलवर चहा घेत होते. टॅक्सी ड्रायव्हर आम्हाला प्रचंड त्रास देत होते. 50 ते 60 रुपयापेक्षा कमी रुपयात आम्ही नेणार नाही अशा पध्दतीने त्यांनी आमच्याकडे पैशाची मागणी केली. सभापती महोदय, आम्ही जेव्हा विधान भवनातून बाहेर पडतो त्यावेळी या ठिकाणी सुध्दा छत्रपती शिवाजी टर्मिनस स्टेशला जाणाऱ्या टॅक्सी उभ्या असतात, त्या जवळच्या प्रवाशांना घेण्यास तयार होत नाहीत. एखाद्या टॅक्सी ड्रायव्हरकडे आम्ही विचारणा केली तर ते असे म्हणतात की, पोलीस आम्हाला या ठिकाणी उभे राहू देत नाहीत. या ठिकाणी फक्त शेअर टॅक्सी उभ्या राहतात. सर्वसाधारण टॅक्सीला येथे उभे राहू दिले जात नाही. त्यामुळे सगळया बाजूने आमची कुचंबणा होते.

सभापती महोदय, मागच्या वेळी माझ्या पायाला मार लागल्यामुळे मला चालता येत नव्हते तरी देखील मला टॅक्सी न मिळाल्यामुळे मी शेवटी एका सन्माननीय आमदारांना मला सोडण्याची विनंती केली. टॅक्सी मिळण्याच्या बाबतीत जर आमची अशी अवस्था असेल आणि रेल्वे स्टेशन सारख्या ठिकाणी जर ट्राफिक पोलीस दिसत नसतील तर बॉम्बस्फोट झाल्यानंतर कोणाला जबाबदार धरण्यात येणार आहे? सभापती महोदय, टॅक्सी मिळण्याच्या बाबतीत सन्माननीय आमदारांचीच गैरसोय होते असे नाही तर प्रवाशांची सुध्दा अशाच प्रकारची गैर सोय होते. म्हणून या ठिकाणी ट्राफिक पोलीस असावेत आणि नियमाप्रमाणे सर्वांना टॅक्सी मिळेल, अशा प्रकारची व्यवस्था करण्यात यावी. सभापती महोदय, अशा प्रकारचा विषय आम्ही जेव्हा सभागृहात

...4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

मांडतो तेव्हा नेहमीच पत्रकार "हे ओरडतात, हे बोंबलतात" अशा पध्दतीचे आरोप करतात. परंतु शेवटी आम्हाला न्याय मिळाण्यासाठी हेच सभागृह आहे. त्यामुळे मी या ठिकाणी हा औचित्याचा मुद्दा मांडला आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील एक शब्द रेकॉर्डवरुन काढण्यात येईल. या ठिकाणी संसदीय कामकाज मंत्री उपस्थित आहेत. सन्माननीय आमदार जेव्हा रेल्वे स्टेशनवर येतात मग ते छत्रपती शिवाजी टर्मिनस असेल, दादर असेल किंवा अन्य कुठलेही स्टेशन असेल, त्या ठिकाणी सन्माननीय सदस्यांना प्रॉयॉरिटीने टॅक्सी कशी मिळेल या बाबतीत मंत्री महोदयांनी ट्रान्स्पोर्टच्या अधिकाऱ्यांना बोलावून त्यांना इन्स्ट्रक्शन्स द्याव्यात आणि त्यांच्याकडून या बाबतची खात्री करुन घ्यावी.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, होय.

---

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मुंबई महानगरपालिकेने कोट्यवधी रुपये खर्च करुन घेतलेल्या पाच अत्याधुनिक ॲम्ब्युलन्स गेल्या सहा महिन्यापासून विविध कार्यालयात वापराविना पडून राहणे, तसेच कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण न मिळाल्याने दिनांक 13 जुलै, 2011 रोजी झालेल्या बॉम्बस्फोटात सदर ॲम्ब्युलन्स वापराविना पडून राहणे, या बाबत सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन सदर ॲम्ब्युलन्सचा वापर करण्याची तसेच कर्मचाऱ्यांना तांत्रिक प्रशिक्षण देण्याची आवश्यकता, या बाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ AKN/

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी आणखी एक औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. दक्षिण मुंबईतील गजबजलेल्या ऑपेरा हाऊसच्या पंचरत्न इमारतीजवळ एक पोलीस चौकी होती परंतु ती चौकी हटविण्यासाठी तेथील हिरे व्यापाऱ्यांनी प्रयत्न करुन आज तेथे जम्बो वाडापावचा स्टॉल उभारण्यात आला आहे. परिणामी दिनांक 13 जुलै, 2011 रोजी झालेल्या बॉम्बस्फोटाच्या वेळी स्थानिक डी.बी.मार्ग पोलीस ठाण्याचे पोलीस घटना झाल्यानंतर तब्बल अर्धा तास उशिराने पोहोचले. कारण ट्राफीक जॅम होते. हा अत्यंत संवदेनशील असा विभाग आहे. त्यामुळे सदर ठिकाणी असलेली पोलीस चौकी पुन्हा उभारण्याची आवश्यकता, या बाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा व विधान परिषदेचे अमृत महोत्सवी वर्ष सुरु आहे. राज्यात 75 वर्षाच्या कालावधीमध्ये विविध समाजसुधारकांनी अपूर्व योगदान दिलेले आहे. तसेच दोन्ही सभागृहांच्या सदस्यांनी त्यांच्या अभ्यासपूर्ण योगदानामुळे सभागृहाची शोभा वाढवली आहे. या सर्वांच्या ॠणातून महाराष्ट्र कदापि मुक्त होणार नाही. परंतु त्यांचे कार्य स्मृतीरुपाने जपण्यासाठी राज्याच्या विधानसभा व विधान परिषदेच्या अमृत महोत्सवानिमित्त एखादे विशेष नाणे किंवा पोस्टाचे तिकीट काढण्याबाबत केंद्र शासनाला शिफारस करावी, यासाठी मी ही बाब औचित्याच्या मुद्याव्दारे उपस्थित करीत आहे.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ AKN/

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बांदा नवभारत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित प्रशासक नियुक्त 6 माध्यमिक शाळांचा ताबा प्रशासकांनी घेऊनही संबंधित शाळांचे हेडमास्तर शासनाचा प्रशासक नियुक्तीचा आदेश मान्य करीत नाहीत. त्याचप्रमाणे घोटगे (धापेश्वर विद्यालय) दोडामार्ग येथील शिक्षकांना मागील 20 महिन्यांपासून पगार मिळत नाही. अशा सिंधुदुर्ग जिल्ह्यात अनेक संस्था असल्याचे आढळून आले आहे. यामुळे शिक्षकांवर व त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. शासनाच्या आदेशाचे पालन न करणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई होण्याची तसेच शिक्षकांना त्यांचे वेतन त्वरित देण्याची गरज आहे. मला एवढेच सांगावयाचे आहे की, दोन वर्षापूर्वी प्रशासक नेमून सुध्दा आजपर्यंत त्या शाळांवर कारवाई झालेली नाही. या संदर्भात शिक्षण खात्याने योग्य ती नोंद घ्यावी. अशा या अतिशय महत्वाच्या व गंभीर विषयावर मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

---

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ AKN/

**सभापती** :सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मुंबई एअरपोर्ट केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहे त्यामुळे कामगार धोरणाच्या संदर्भात राज्य शासनाला त्यामध्ये मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप करता येत नाही. मुंबई एअरपोर्टवर काम करणाऱ्या कामगारांवर अन्याय होत आहे. त्या ठिकाणी जी.व्ही.के. कंपनीला एअरपोर्टने हे काम दिलेले आहे, 70 टक्के भांडवली पध्दतीवर त्यांनी एअरपोर्ट चालवावयाचे आहे आणि सुधारणा करावयाची आहे. पण त्या ठिकाणी वर्षानुवर्षे काम करणारे काही कर्मचारी आहेत. मी काही कंपन्यांची नावे घेऊ इच्छितो. त्या ठिकाणी फ्रेन्ड्स कम्युनिकेशन, कोंडुस्कर प्रा. लि. कंपनी, क्रिस्टल एव्हिएशन, लाईव्हवेल एव्हिएशन, सिलेबी नास कंपनी, या कंपन्या विमानतळावर विविध सोयीसुविधा वर्षानुवर्षे पुरवित आहेत. पण ज्यांची सेवा 15-20 वर्षे झालेली आहे अशा जुन्या कर्मचाऱ्यांना तातडीने कामावरुन कमी करुन ते कॉन्ट्रॅक्ट दुसऱ्यांना देण्यात येत आहे. जेव्हा आपण आपल्या कामगार मंत्र्यांकडे जातो तेव्हा ते म्हणतात की, ही बाब आपल्या शासनाची संबंधित नसून केंद्र शासनाशी संबंधित आहे. कामगार त्या ठिकाणी जर आवाज उठविण्यासाठी एअरपोर्टवर गेले तर त्यांना 500 मीटरपर्यंत जवळ जाता येत नाही. कारण सध्याची जी परिस्थिती आहे त्यामुळे त्यांना 500 मीटरपर्यंत जाऊन आंदोलन करता येत नाही. एअरपोर्टच्या आत जाण्यासाठी जो पास लागतो तो जी.व्ही.के. कंपनी बंद करते. त्यांना कामावरुन काढल्यानंतर प्राव्हीडंट फंड, ग्रॅज्युईट या ज्या महत्वाच्या गोष्टी मिळाल्या पाहिजेत त्याही मिळत नाहीत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ AKN/ MMP/ पूर्वी श्री.बरवड 12:40

श्री.किरण पावसकर....

त्यांना कामावरुन काढून टाकल्यावर त्यांना भविष्य निर्वाह निधीची रक्कम आणि अंशदानाची रक्कम सुध्दा दिली जात नाही. या संदर्भात हे कामगार आंदोलन करु शकत नाही. व्यवस्थापनासमोर आपले म्हणणेही मांडू शकत नाहीत. कारण हा विषय केंद्र सरकारशी संबंधित आहे. त्यासाठी सिटी सिव्हिल कोर्टात जावे लागते. सिटी सिव्हिल कोर्टात दाद मागितली तर तेथे 10-10 वर्षे, 15-15 वर्षे निकाल लागत नाही. सभापती महोदय, हे सर्व कामगार महाराष्ट्रात राहणारे आहेत विशेषत: मुंबईचे नागरिक आहेत. त्यांना त्यांच्या न्यायापासून वंचित ठेवण्यात आले आहे. या जीव्हीके कंपनीची मनमानी मोडीत काढण्यासाठी शासनाने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष द्यावे आणि त्या कंपनीविरुध्द त्वरित कारवाई करुन त्या कर्मचा-यांना न्याय मिळवून द्यावा अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी महत्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे. त्याचे मी समर्थन करतो. जीव्हीके कंपनीचा विषय केंद्र शासनाच्या अखत्यारीतीत येतो. तत्कालीन विमान वाहतूक माननीय केंद्रीय मंत्री श्री.प्रफुल पटेल यांचे खाते बदलले गेले हा भाग वेगळा आहे. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी मांडलेला मुद्दा कामगारांच्या दृष्टीने योग्य असेल. परंतु हा विषय महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीतीत नाही हे आपले दुर्दैव आहे. आपण या सदनामध्ये त्रिभाषा सूत्र मान्य केलेले आहे. परंतु त्रिभाषेचे सूत्र ही जीव्हीके कंपनी मानण्यास तयार नाही. त्यामुळे आपण स्वत: किंवा संबंधित अधिकाऱ्यांनी स्वत: लक्ष घालावे. या सदनाने त्रिभाषेचे सूत्र मान्य केलेले असल्यामुळे ही जीव्हीके कंपनी ते का मानत नाही ? आजच या संदर्भात महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रात एका वाचकाचे पत्रही छापून आलेले आहे. त्रिभाषा सूत्राचा त्या कंपनीकडून अवमान होत आहे. जसलोक हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याविरुध्द आपण हक्कभंग दाखल केला होता, त्याप्रमाणे या कंपनीच्या व्यवस्थापकाविरुध्द सु-मोटो हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करावा. त्या अनुषंगाने त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे अशी मी आपल्याला विनंती करतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मांडलेल्या मुद्यासंबंधी जरुर विचार करु. त्याबाबतची वस्तुस्थिती किंवा माहिती घेऊन काय करणे आवश्यक आहे ते देखील मी पाहतो.

------

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यात दिनांक 15.4.2010 रोजी महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने डोंगराळ प्रदेशाकरिता एकात्मिक मधमाशा पालन, प्रजनन व मध उत्पादन योजना लागू केली. सदर योजना 12 जिल्ह्यातील 63 तालुक्यात पश्चिम घाट विकास कार्यक्रम म्हणून राबविण्यात आली. विशेषत्वाने त्यात 75 टक्के कर्ज व 25 टक्के अनुदान या निकषाने ही योजना सुरु केली. परंतु याच महाराष्ट्र सरकारने दि.3.2.2011 रोजी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने मराठवाडा विकास कार्यक्रम अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या मधमाशा पालन व मध उत्पादन योजनेत 80 टक्के अनुदान व 20 टक्के कर्जाच्या धर्तीवर राबविली आहे. विदर्भ व डोंगराळ भागातील लाभार्थ्यांना 75 टक्के कर्ज व 20 टक्के अनुदान दिले जाते. याच्या उलट मराठवाड्यात 80 टक्के अनुदान व 20 टक्के कर्ज या निकषानुसार योजना राबविली जात आहे. अशा प्रकारची ही तफावत दिसून येत आहे. त्यामुळे विदर्भावर व डोंगराळ भागातील लोकांवर अन्याय होत आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. सगळयात जास्त मधाचे उत्पादन याच भागात होत आहे. त्यामुळे हा अन्याय दूर करुन दोन्ही योजना सारख्याच निकषानुसार लागू कराव्यात व योग्य ती कार्यवाही करावी अशी मी या ठिकाणी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

-----

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ AKN/ MMP/

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यातील कायम विना अनुदानित शाळांचा इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त कायम हा शब्द वगळून या शाळांना विना अनुदानित तत्वावर मान्यता देण्याबाबत तसेच सदर शाळांचे मूल्यांकन करण्याचा शासनाने निर्णय घेतला होता. हा निर्णय होऊन एक वर्ष उलटले तरी त्या बाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. राज्यातील सबंध शिक्षकांचे खच्चीकरण करण्याचे काम हे शासन करीत आहे. मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करीत आहे. या संदर्भात शासनाने निर्णय घेतला असल्याचे शासनाच्या उप सचिवांचे मला पत्र आलेले आहे, त्याला एक वर्ष झालेले आहे. म्हणून या निर्णयाची शासनाने तातडीने अंमलबजावणी करावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे आपल्यामार्फत शासनाला विनंती करीत आहे.

-------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ AKN/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 12:45

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अनिल भोसले यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. अनिल भोसले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"पुणे महानगरपालिकेमध्ये दिनांक 26.7.2011 रोजी माननीय आयुक्तांनी काही अधिका-यांना पदोन्नती दिली असलेल्या सदर अधिका-यांमध्ये श्री. श्रीनिवास कंदुल, विद्युत विभाग या भ्रष्टाचारी अधिका-यास अधीक्षक अभियंता या पदावर पदोन्नती देण्यात येणे, वस्तुतः सदर अभियंता हा नोकरीत रुजू झाल्यापासूनच सेवा वर्तणूक नियमांशी विसंगत वागत असणे, सदर अधिका-याविरुध्द आतापर्यन्त 2 वेळा खातेनिहाय चौकशी झाली असून दोन्ही वेळा आरोप सिद्ध होऊन सदर अधिका-यास शिक्षा झालेली असणे, तसेच अधिका-या विरुध्द तत्कालीन आयुक्त यांनी साक्ष देऊन आरोपीने 4 कोटी 58 लाखाचा अपहार केल्याचे कोर्टात कबूल करणे व तशी साक्ष देणे, महानगरपालिका सेवक वर्गाने सदर अधिका-यास पदोन्नती न देण्याबाबतचे पत्र आयुक्तांना देणे, त्याच प्रमाणे सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांनी माहिती अधिकारात दिलेल्या उत्तरानुसार सदर अधिका-याला शिक्षेच्या कालावधीमध्ये पदोन्नती देणे शक्य नसणे, अशी पार्श्वभूमी असताना सुध्दा अशा वादग्रस्त अधिका-यास पदोन्नती देऊन एकप्रकारे भ्रष्टाचाराचे समर्थन करण्याचा पायंडा पाडणे, पुणे महानगरपालिकेच्या प्रशासनामार्फत नोकरवर्गामध्ये निर्माण झालेला असंतोष व संभ्रमाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"महाराष्ट्र विधिमंडळाला 19 जुलै 2011 रोजी 75 वर्षे पूर्ण झाली. 19 जुलै 1937 रोजी पुणे येथील विधिमंडळात पहिले अधिवेशन भरले होते. विधिमंडळाची 75 वर्षाची ही ऐतिहासिक वाटचाल म्हणजेच महाराष्ट्रातील सदृढ लोकशाहीची वाटचाल आहे असे म्हणता येईल. दुसरे असे की, सुरुवातीची काही वर्षे पुणे येथील विधान भवनामध्ये अधिवेशन भरत होते. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी या नात्याने मुंबईमध्ये कायम स्वरुपी अधिवेशन भरणे हे योग्य असले तरी पुण्याला प्रबोधनाची पंरपरा आहे. तसेच जी काही राष्ट्रीयत्वाचा वारसा जपणारी शहरे आहेत त्यामध्ये पुणे हे राष्ट्रीयत्वाचा वारसा जपणा-या शहरांचे प्रतीक आहे. या विधानपरिषदेचे सभापती पद भूषविणारे श्री. जयंतराव टिळक हे देखील पुण्यातील होते. पुण्यातील अनेक ज्येष्ठ लोकप्रतिनिधींनी विधिमंडळामध्ये प्रतिनिधीत्व केलेले आहे. या पार्श्वभूमीवर पुणे शहर आणि पुण्याच्या आसपासच्या जिल्ह्यातील अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. प्रकल्पग्रस्त, धरणग्रस्त यांचे प्रश्न प्रलंबित आहेत. पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्याबाबत लोकांच्या भावना तीव्र आहेत. पुणे शहराचा विकास आराखडा अजून शासनाकडे प्रलंबित आहे. याच सोबत पश्चिम महाराष्ट्रातील अनेक नद्यांचे प्रदूषण, पंढरपूर, देहू, आळंदी, मांढरादेवी यासारख्या अनेक तीर्थक्षेत्रांचे प्रश्न प्रलंबित आहेत. पिंपरी-चिंचवड सारख्या उद्योग नगरीतील, पश्चिम महाराष्ट्रातील औद्योगिक कारखाने, कंपन्या बंद पडलेल्या आहेत. कामगारांचे अनेक प्रश्न अनिर्णित आहेत. आपणा सर्वांचे श्रध्दास्थान असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांची अनेक कर्मस्थळे म्हणजेच ऐतिहासिक किल्ले उदा. शिवनेरी, सिंहगड, अजिंक्यतारा, प्रतापगड इत्यादी सारख्या दुर्ग किल्ल्यांचे संवर्धन यासारखे विषय अजूनही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत.

माझी औचित्याच्या मुद्याद्वारे अशी विनंती आहे की पुण्यामध्ये अल्पकाळ का होईना पण एक अधिवेशन घ्यावे. पुण्याचे विभागीय आयुक्त दिलीप बंड यांनी असे सुचविलेले आहे की इतक्या सर्व आमदारांची निवासव्यवस्था करणे अवघड आहे. परंतु पुण्यातील विधान भवनाची जी वास्तू आहे त्यामध्ये अधिवेशन होऊ शकेल. सभापती महोदय, आपण या संदर्भात स्वत: लक्ष घातलेले आहे. अजून हे अधिवेशन 8-10 दिवस चालणार आहे. विधिमंडळाच्या अमृत महेत्सवाच्या पार्श्वभूमीवर

..3..





डॉ.नीलम गो-हे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पुणेकरांना वेगळया पध्दतीचे अधिवेशन पहाण्याची संधी मिळेल. पुणे आदरातिथ्याबद्दल फारसे प्रसिध्द नाही. तेव्हा हे पुण्याबद्दलचे मत बदलण्यासाठी आम्हाला देखील संधी मिळेल. तेव्हा पुण्याच्या विधान भवनामध्ये एक खास अधिवेशन घ्यावे अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करते.

**सभापती** : उच्चाधिकार समिती पुढे हा प्रस्ताव मी जरुर मांडेन. सन्माननीय सदस्या बोलत असताना त्यांनी पुण्याच्या आदरातिथ्याचा जो उल्लेख केला तेवढा मी कार्यवाहीतून काढून टाकतो.

--

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सध्या मेडिकलची ॲडमिशन्स सुरु आहेत आणि सीईटीच्या परीक्षेचा निकाल लागलेला आहे. सीईटीमध्ये अपंगाच्या यादीमध्ये तिसरा क्रमांक येऊन देखील रोशन शेख नावाच्या मुलीला वैद्यकीय क्षेत्रासाठी प्रवेश नाकारलेला आहे.

...नंतर श्री. भोगले....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

तिचे अपंगत्व जवळजवळ 95 टक्के आहे. या अपंगत्वावर मात करुन तिने सीईटी परीक्षेत तिसरा क्रमांक मिळविला असला तरी तिला डॉक्टर होण्यापासून वंचित ठेवले जाईल अशी ठाम शक्यता निर्माण झाली आहे. या प्रकरणी मंत्री महोदयांनी हस्तक्षेप करुनही तिला मदत होऊ शकली नाही. वैद्यकीय शिक्षण संचालकांनी असे सांगितले की, 40 ते 70 टक्के अपंगत्व असेल तर वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळू शकतो. 28 जुलै, 2011 पासून प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे. माझी आपल्यामार्फत मंत्री महोदयांना विनंती आहे की, या मुलीने हायकोर्टात जरी दाद मागितली असली तरी तिला वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळावा या दृष्टीने नियम शिथिल करण्याची बाब राज्य शासनाच्या अखत्यारित आहे. त्या संदर्भात तातडीने निर्णय घेऊन अपंगत्व असताना मेरिट प्राप्त केलेल्या मुलीच्या दृष्टीने कोर्टात म्हणणे मांडण्यासाठी प्रयत्न करावा आणि कायमस्वरुपी या विषयावर तोडगा काढण्यात यावा. धन्यवाद.

------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, निर्बुध्दता या शब्दाचा सन्मान करण्याचे काम महाराष्ट्र शासन आपल्या पध्दतीने करीत आहे. शिवतीर्थावर 26 जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाचा सोहळा आणि 1 मे रोजी महाराष्ट्र दिनाचा कार्यक्रम साजरा केला जातो. ती परंपरा अनेक वर्षापासून सुरु आहे. मी प्रत्येक कार्यक्रमाला उपस्थित असतो. 26 जानेवारीच्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने होणारे माननीय राज्यपालांचे भाषण आणि 1 मे रोजीच्या महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने होणारे माननीय राज्यपालांचे भाषण यामधील काही तफावत वगळता काडीमात्र फरक नसतो. तीच वाहने, तेच पोलीस, तीच परेड, सगळे काही तेच तेच असते हे खेदाने नमूद करावेसे वाटते. माझ्याकडे दोन्ही कार्यक्रमाच्या पुस्तिका आहेत. दोन्ही कार्यक्रमाचा क्रम देखील त्याच पध्दतीचा असतो. 26 जानेवारीचा प्रजासत्ताक कार्यक्रम हा देशाच्या संदर्भातील कार्यक्रम असतो. प्रजासत्ताक दिन साजरा होतो त्यावेळी देशाच्या सार्वभौमत्वाच्या संदर्भात निरनिराळी दृश्ये दाखविली जातात आणि ते योग्य असते. परंतु महाराष्ट्र दिनाच्या कार्यक्रमात देखील त्याच सर्व गोष्टी केल्या जातात. महाराष्ट्र दिनाच्या दिवशी महाराष्ट्राच्या उन्नतीच्या संदर्भातील दृश्ये, आदिवासींचे नृत्य, ग्रामीण भागाचे दर्शन असे काहीही दाखविले जात नाही. परंपरेनुसार 26 जानेवारी रोजी जे केले तेच 1 मे रोजी केले जाते. त्यात काडीमात्र फरक केला जात नाही. महाराष्ट्र गीत गायले जात नाही. सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ता हमारा या गीताची धून वाजविली जाते. त्या ऐवजी महाराष्ट्र गीताची धून वाजविण्यात यावी. शिवतीर्थावर महाराष्ट्र दिन साजरा होतो, तो कार्यक्रम महाराष्ट्राबद्दल ओलावा नसलेले अधिकारी साजरा करतात. महाराष्ट्र दिन हा महाराष्ट्राचा आहे हे दिसून आले पाहिजे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील संस्कृतीचे दर्शन झाले पाहिजे. दूरदर्शनच्या माध्यमातून हे दोन्ही कार्यक्रम सगळीकडे प्रसारित केले जातात, त्यात काहीही फरक केला जात नाही. बंजारा, आदिवासी इ.वेगवेगळ्या समाजाचे नृत्य, परंपरा, संगीत, महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेली उत्तुंगता, विद्यार्थ्यांनी जे वेगवेगळे शोध लावले त्याचे फ्लोट दाखविले पाहिजेत. वर्षानुवर्षे तेच तेच दाखविले जात आहे. महाराष्ट्र दिनी महाराष्ट्र दिनाचा सन्मान झाला पाहिजे व प्रजासत्ताक दिनी प्रजासत्ताक दिनाचा सन्मान झाला पाहिजे. या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्राचे प्राबल्य

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

नसते. मराठी भाषेचा सन्मान राखला जात नाही. महाराष्ट्र दिनाच्या दिवशी तरी मराठी भाषेचा सन्मान ठेवला पाहिजे. मागील वेळी मी भाषेचा अवमानाबद्दल उठून आक्षेप घेणार होतो. परंतु माझ्यासमवेत माननीय श्री.मनोहर जोशी होते, त्यांनी मला तसे करण्यापासून परावृत्त केले. या कार्यक्रमांना माननीय राज्यपाल, माननीय मुख्यमंत्री उपस्थित असतात. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्राला व मराठी भाषेला सन्मान मिळत नाही. 26 जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाचा सन्मान व्हावा व 1 मे रोजी महाराष्ट्राचा सन्मान व्हावा या दृष्टीने कार्यक्रमाचे आयोजन केले पाहिजे, अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे सरकारला सूचना करीत आहे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय संसदीय कार्य मंत्र्यांना मी असे निदेश देत आहे की, सभागृहात आज जे औचित्याचे मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत त्यांची संपूर्ण माहिती त्या त्या संबंधित विभागाला कळवावी तसेच विधान मंडळाला सुध्दा पाठवावी. तसेच ज्या विभागांशी संबंधित हे मुद्दे असतील त्या त्या विभागाकडून एक महिन्याच्या आत उत्तर मिळणे अपेक्षित आहे. हे उत्तर सन्माननीय सदस्यांपर्यंत कसे पोहचेल अशी व्यवस्था करावी.

सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय केळकर : महोदय, आदिवासी विकास विभागाशी संबंधित माझा औचित्याचा मुद्दा आहे. खरे तर ठाणे जिल्ह्यातील 7 तालुके हे आदिवासीबहुल तालुके आहेत. त्यांच्या अडचणी मांडावयाच्या तर संपूर्ण एक दिवस किंवा वेगळे अधिवेशनच घ्यावे लागेल. या निमित्ताने मी असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, केंद्र शासनाने सक्तीचे व मोफत शिक्षण हा कायदा लागू केला. दुसऱ्या बाजूला मात्र वसई तालुक्यातील कामण या गावाला 100 विद्यार्थी आजही आश्रमशाळेच्या बाहेरच आहेत, त्यांना शाळेत प्रवेश मिळाला नाही. यासंदर्भात मी अप्पर आयुक्त आदिवासी विकास विभाग व मंत्रालयातील संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार केला. पण अद्यापही या 100 विद्यार्थ्यांना प्रवेश मिळालेला नाही. यासंदर्भात अप्पर आयुक्त आदिवासी यांनी असे सांगितले की, आदिवासी विकास विभागाकडून तुकडीवाढ करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे, पण अद्याप त्याला मान्यता मिळालेली नाही. अशा तुकडीवाढीस मंजुरी देऊन या 100 विद्यार्थ्यांना लवकरात लवकर प्रवेश कसा मिळेल याबाबत शासनाने प्रयत्न करावेत. कारण दोन महिन्यांपासून हे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित आहेत.

--------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. रामनाथ मोते : महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बांदा तालुक्यातील बिलवली नावाच्या गावात जिल्हा परिषद शाळेमध्ये आजूबाजूच्या परिसरातील धनगरवाडी या 350 लोकसंख्येच्या गावातील 50-60 मुले शिकण्यासाठी येतात. वर्षानुवर्षे ही मुले त्याच शाळेत येत आहेत. केंद्र शासनाने सक्तीचे व मोफत शिक्षण लागू केला असताना या मुलांना त्यांच्या शिक्षणाच्या हक्कापासून वंचित ठेवण्याची वेळ आलेली आहे. या मुलांना शिक्षण प्रवाहात आणण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे. पण संबंधित गावातील नागरिक व शेतकऱ्यांनी वर्षानुवर्षे त्यांच्या शेतातून शाळेपर्यंत जाणारा रस्ता अचानक बंद केल्यामुळे ही धनगर वाडीची मुले शाळेत जाऊ शकत नाही. वास्तविक हे शेतकरी ग्राम शिक्षण समितीमध्ये आहेत, त्यात एक अध्यक्ष सुध्दा आहेत. त्यांना वारंवार सांगून विनंती केली तरी देखील या मुलांना शाळेत जाण्यासाठीचा रस्ता मोकळा करुन दिलेला नाही. त्यामुळे हे विद्यार्थी आज शिक्षणापासून वंचित आहेत. या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे की, ग्रामविकास विभाग व शालेय शिक्षण विभागाने तातडीने एकत्र येऊन या शळेपर्यंत जाण्याचा रस्ता मोकळा करण्याबाबतची उपाययोजना करावी.

-----

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नियम स्थगित ठेवणे

**मु.शी.**: नियम स्थगित ठेवण्याबाबतचा संसदीय कार्य राज्य मंत्र्यांचा प्रस्ताव

श्री. राजेंद्र मुळक (संसदीय कार्य राज्य मंत्री) : महोदय, कामकाज सल्लागार समितीच्या सभागृहाने मान्य केलेल्या शिफारशीस अनुलक्षून महाराष्ट्र विधान परिषद नियम 230 (2) अन्वये पुरवणी मागण्यां सादर केल्यानंतर तीन दिवसाच्या आत त्यावरील चर्चा घेऊ नये अशा आशयाची तरतूद पूरक मागण्यावरील चर्चेच्या संदर्भात स्थगित करण्यात यावी, असा प्रस्ताव नियम 289 अन्वये मी आपल्या अनुमतीने मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ AKN/ MMP/ पीएफके 13:00

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "शेतकऱ्यांना खत पुरवठा न करता आलेले खत नगर परिषद तुळजापूर यांच्या कॉम्प्लेक्समध्ये साठा करून त्याची काळ्या बाजारात विक्री करणे, परिणामी निर्माण झालेली खत टंचाई यामुळे शेतकऱ्यात पसरलेला तीव्र असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "माजगाव, ता.खालापूर, जि.रायगड ग्रुप ग्रामपंचायतीने दिनांक 22.6.2009 रोजीच्या ठराव क्र.24 अन्वये थरमॅक्स कंपनीचा कर रू.3/- प्रती चौरस फूट आकारण्याचा करार करूनही तत्कालीन सरपंचांनी बोगस ठरावाची प्रत देऊन ग्रामपंचायतीची केलेली फसवणूक" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "पंचायत समिती सावंतवाडी येथील गटशिक्षणाधिकारी यांनी आयुक्तांची परवानगी न घेता शिक्षकांचे प्रतिनियुक्तीचे आदेश काढल्याबाबतची माहिती म.वि.प.नियम 93 अन्वये सूचनेवर दिनांक 7.4.2011 रोजी झालेल्या चर्चेच्या वेळी माननीय गृह राज्यमंत्री यांनी अधिवेशन संपण्यापूर्वी पटलावर ठेवली जाईल असे आश्वासन देऊनही अद्याप कार्यवाही न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो गाणार, रामनाथ मोते, भगवानराव साळुंखे, चंद्रकांत पाटील, डॉ.रणजित पाटील यांनी "आदिवासी विकास खात्यामार्फत चालविल्या जाणाऱ्या आश्रमशाळा एकाच पाळीत करण्याबाबत, अप्पर आयुक्त नागपूर विभाग व प्रकल्प अधिकारी यांच्या कार्यालयात शेकडो प्रस्ताव धूळ खत पडणे, तसेच एकाही प्रस्तावाला मान्यता न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय सभापती....**

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पाशा पटेल, रामनाथ मोते, धनंजय मुंडे, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "अनुसूचित जाती, जमाती व विमुक्त भटक्या जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय, अभियांत्रिकी व अन्य व्यावसायिक शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती न झाल्यामुळे विद्यार्थी उच्च व व्यावसायिक शिक्षणापासून वंचित राहणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "पुणे शहर आणि जिल्ह्यातील सुमारे साडेतेरा हजार गृहनिर्माण सोसायट्यांपैकी 90 टक्के सोसायट्यांचे "कन्व्हेअन्स डीड" विकासकाने करून न देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, चंद्रकांत पाटील, नागो गाणार यांनी "नागपूर विभागातील विद्यार्थ्यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र दीड वर्षापासून प्रलंबित असल्यामुळे सुमारे दहा हजार विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा प्रश्न निर्माण होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "दिनांक 26 जुलै 2011 रोजी गोरेगाव पश्चिम येथील महिला श्रीमती राधा यांचे तोतया पोलीस कर्मचाऱ्याने सुमारे दोन लाख रूपयांचे दागिने लुटणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, संजय केळकर, पाशा पटेल यांनी "बीड जिल्ह्यात कृषी विभागाने मागील वर्षी शेतकऱ्यांना राष्ट्रीय कडधान्य विकास कार्यक्रमांतर्गत वाटप केलेल्या बियाणांमुळे उगवलेल्या पिकास तुरीच्या शेंगा न लागणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...... ...3



BGO/ AKN/ MMP/ पीएफके 13:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचनेचा क्रम बदलण्याबाबत.**

**सभापती** :आजच्या कामकाज पत्रिकेत दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेचा क्रम मी बदलत आहे. आजच्या कामकाज पत्रिकेत अनुक्रमांक 2 वर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना प्रथम चर्चेलाघेण्यात येईल. त्यामुळे मी आता लक्षवेधी सूचना क्रमांक 2 पुकारीत आहे.

यानंतर श्री.सरफरे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कापसाचे वाढते दर आणि सूताच्या दरातील अस्थिरतेमुळे आठवडयातून दोन दिवस सूत गिरण्या बंद ठेवण्याचा घेतलेला निर्णय

**मु. शी.** : कापसाचे वाढते दर आणि सूताच्या दरातील अस्थिरतेमुळे आठवडयातून दोन दिवस सूत गिरण्या बंद ठेवण्याचा घेतलेला निर्णय

यासंबंधी सर्वश्री जयप्रकाश छाजेड, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुभाष चव्हाण, राजन तेली, उल्हास पवार, मोहन जोशी, एस. क्यु. जमा,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वस्त्रोद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" राज्यातील कापसाचे वाढते दर आणि सुताच्या दरातील अस्थिरता या मुळे राज्यातील सूत गिरण्यांनी 23 मे पासून आठवडयातून पूर्ण दोन दिवस बंद आणि आठ तासाची एक पाळी बंद करण्याचा घेण्यात आलेला निर्णय, त्या मुळे कापड धंद्यातील लाखो कामगार बेकार होऊन त्यांच्या कुटुंबीयावर ओढवलेली उपासमारीची परिस्थिती, राज्य शासनाने या बाबत कोणतीच कार्यवाही न करता कामगारांच्या प्रश्नाकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सूतगिरणी कामगारांत पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, कामगारांचे कुटुंबीय व मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न पाहता, तातडीने या कडे लक्ष घालून कामगारांना न्याय मिळवून देण्याची गरज, यावर शासनाने केलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया"

श्री.प्रकाश सोळंके (पणन व वस्त्रोद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेवर शासनाने जे निवेदन केले आहे, त्यामुळे सूत गिरण्यांमधील कामगार देशोधडीला लागेल. आज इचलकरंजी, भिवंडी, मालेगाव, नांदेड या भागातील 10 लाख सूत गिरणी कामगार बेकार होणार आहेत. सूताचे अनिश्चित भाव आणि सरकारचे निश्चित नसलेले धोरण या मुळे अनेक पॉवरलूम आणि हँडलूम बंद पडण्याची वेळ आली आहे. संपूर्ण वस्त्रोद्योग धंदा मोडकळीस आला आहे. 10 लाख कामगारांवर बेकार होण्याची पाळी आली आहे. शासनाने निवेदनात "40 ते 45 टक्के इतर बाबीवरील खर्चाचा भाग" असल्याचे म्हटले आहे त्यानंतर मागील पानावर "त्या मुळे सहकारी सूत गिरण्यांचे उत्पादन किंचित कमी झालेले आहे" असे म्हटले आहे. मला वाटते की, ज्या उद्देशाने ही लक्षवेधी सूचना दिली आहे, त्या लक्षवेधी सूचनेसाठी हे उत्तर देण्यात आलेले नाही. जोपर्यंत सूताचे भाव नियंत्रित करण्याची जबाबदारी सरकार घेणार नाही, तोपर्यंत हा व्यवसाय अडचणीत राहणार आहे. या मुळे जवळपास 10 लाख कामगार देशोधडीला लागतील. म्हणून माझा प्रश्न आहे की, सूताचे भाव नियंत्रित करण्यासाठी शासन काही उपाय योजना करणार आहे काय? दुसरा प्रश्न असा की, यंत्रमाग कामगारांच्या संदर्भात माजी मंत्री सन्माननीय श्री. प्रकाश आवाडे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. त्या समितीने सादर केलेला अहवाल स्वीकारुन त्यामधील शिफारशींची अंमलबजावणी हे शासन केव्हा करणार आहे?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना यंत्रमागाच्या संदर्भात नसून ती सूत गिरण्यांच्या संदर्भात विचारण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितलेली वस्तुस्थिती आहे. मागील हंगामात कापसाच्या भावामध्ये चढ उतार होते त्या मुळे सूताच्या भावामध्ये चढ उतार राहिली. या परिस्थितीमुळे निश्चितपणे वस्त्रोद्योग अडचणीमधून जात आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी दोन प्रश्न विचारले आहेत. सूताचे भाव नियंत्रित करण्याची जबाबदारी राज्य सरकारने घ्यावी परंतु सदरील भाव नियंत्रित करण्याची जबाबदारी केंद्र सरकारची आहे. या बाबत राज्य शासनाने वेळोवेळी त्या साठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन सूताचे भाव नियंत्रित करण्याबाबत विनंती केली आहे. आणि या पुढेही पाठपुरावा सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी यंत्रमागाच्या संदर्भात नेमण्यात आलेल्या आवाडे समितीच्या अहवालाच्या शिफारशींबाबत दुसरा प्रश्न विचारला आहे. सदर बाब शासनाच्या विचाराधीन असून त्याबद्दल योग्य तो निर्णय घेतला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, आवाडे समितीच्या अहवालातील शिफारशींवर किती कालावधीत अंमलबजावणी करण्यात येईल?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या बाबतीत निश्चित कालावधी सांगता येणार नाही. आवाडे समितीच्या शिफारशी शासनाच्या विचाराधीन असून त्यावर लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी आदिवासींचे सुरु केलेले हत्यासत्र

**मु. शी.** : गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी आदिवासींचे सुरु केलेले हत्यासत्र यासंबंधी श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री जयवंतराव जाधव, हेमंत टकले, अनिल भोसले, रमेश शेंडगे, संदिप बाजोरीया, ॲड. उषाताई दराडे, श्री. विक्रम काळे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यात पिपली-बोरगी गावांतील राकेश गोटा, दलसूपाडा तसेच पोलीस खबऱ्या असल्याच्या संशयावरुन पुंजाराम दुर्वे, या तीन तरुणांची दिनांक ५ जुलै, २०११ रोजी केलेली निघृण हत्या, तसेच, धानोरा, ता.चिंचोला गावातील राजू उसेंडी या आदिवासीची दिनांक ९ जुलै, २०११ रोजी गळा चिरुन केलेली हत्या, त्यातच धानोरा, ता.टवीटोला गावाजवळ नक्षलवाद्यांनी दिनांक ६ मे, २०११ रोजी सुरुंग स्फोट घडवून त्यात लग्न वऱ्हाडीतील ६ व्यक्ती ठार तर ४ गंभीर जखमी होणे, त्याचप्रमाणे तालुका भामरागड येथे नक्षलवाद्यांनी केलेल्या गोळीबारात दिनांक १९ मे, २०११ रोजी दोन जवान ठार तर दोन पोलीस मित्र शहीद होणे, त्यातच तालुका एटापल्ली येथील बांधकाम विभाग अंतर्गत काम करणारे कंत्राटदार श्री.खेडेकर यांची नक्षलवाद्यांनी खंडणीसाठी दिनांक २ मे, २०११ रोजी केलेली हत्या, अशा प्रकारे गेल्या ४० दिवसांत १३ जणांची नक्षलवाद्यांनी हत्या केल्यामुळे तेथील परिसरात निर्माण झालेले दहशतीचे वातावरण, हत्या केलेल्या तरुणांवर आमच्या समोर अंत्यसंस्कार करा अशी धमकी देवून नक्षलवादी अंत्यसंस्कार होईपर्यंत त्याच ठिकाणी थांबून असणे, गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांचा वाढत असलेले उपद्रव व त्यांनी सुरु केलेले हत्यासत्र, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर आर. पाटील (गृह मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, जेव्हा जेव्हा या सभागृहामध्ये नक्षलवाद्यांच्या संदर्भातील प्रश्न विचारले जातात तेव्हा तेव्हा शासनाकडून देण्यात येणारी उत्तरे सारखीच असतात. गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी 43 दिवसात कमीत कमी 23 लोकांना मारले आहे. तेथील स्थानिक आदिवासींच्या माना कापायच्या, त्यांना गोळया घालायच्या, त्यांच्या घरी जायचे अशाप्रकारचा हैदोस सुरु केला आहे. 5 जुलै रोजी पिपली-बोरगी या गावातील राकेश गोटा, दलसू पाडा यांना नक्षलवाद्यांनी मारले आणि जोपर्यंत त्यांना जाळणार नाही तोपर्यंत आम्ही या ठिकाणाहून जाणार नाही असे नक्षलवाद्यांनी सांगितले. त्या मुळे गावकऱ्यांनी नक्षलवाद्यांच्या समोर त्या तरुणांना जाळल्यानंतर ते नक्षलवादी गावातून निघून गेले. नक्षलवादी निघून गेल्यानंतर त्या ठिकाणी पोलीस आले.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस . . . .

त्याठिकाणी 6 नक्षलवादी पकडले गेले आणि त्यांच्याजवळ 4 भरमार बंदुका सापडल्या, दारु गोळा सापडला अशा पध्दतीचे दुसऱ्या दिवशी पेपरमध्ये स्टेटमेंट आले होते. नक्षलवादी आणि माओवादी हे अद्ययावत साधन-सामुग्री वापरुन लढा देत असतात. त्यांच्याजवळ एके-47, एके-56, एलएसआर इ.साधने आहेत. अशा प्रकारे ते नवीन पध्दतीच्या बंदुका वापरतात. त्यांच्याकडे भरमार बंदुका होत्या. तेथील सहा नक्षलवादी पकडले गेले. माझा पहिला प्रश्न असा आहे की, आपण आदिवासींना नक्षलवादी ठरवून नक्षलवाद्यांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न करीत आहात काय ? तसेच आपणाकडून असे सांगितले जाते की, सध्या नक्षलवादी चिडलेले आहेत. कारण पोलिसांनी लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात काम केलेले आहे. तेथे विकासाची कामे झालेली आहेत. आपणही सिरोंचा आणि एटापल्ली येथे गेला होता. मला आपल्याला असे विचारावयाचे आहे की, आपल्याला तेथे रस्ते असल्याचे दिसून आले आहे काय, तेथे पाण्याची सुविधा आहे काय, सिंचना साठी तलाव केल्याचे दिसून आले आहे काय ? त्याठिकाणी आपण असा कोणता विकासाचा कार्यक्रम केल्यामुळे आदिवासी शासनाच्या बाजूला आले आणि नक्षलवादी मात्र बेभान वागत आहेत ? त्यामुळे मला आपल्याला सांगावयाचे आहे की, आपण कृपा करुन अशा पध्दतीने स्टेटमेंट करु नका.

सभापती महोदय, खऱ्या अर्थाने तेथील आदिवासींसमोर आपण मरावयाचे की जेलमध्ये जावयाचे असे दोनच विचार आहेत. त्यांना असे वाटते की, जर आपल्याला पोलिसांनी पकडून नेले तर फक्त सहा महिन्याची शिक्षा होईल पण जर आपण नक्षलवाद्यांच्या विरोधात पोलिसांना मदत केली तर मात्र उद्याच्या उद्या आमचे जीव जातील. या भीतीमुळे आज आदिवासी गप्प बसले आहेत आणि पोलीस त्यांना पकडून केसेस करीत आहेत. माझा आणखी एकच प्रश्न आहे की, आपण 48 नक्षलग्रस्त पकडले. लाहेरीचा श्री.रमेश वड्डे याला पकडले. पण कोर्टामध्ये आपण त्याच्या विरुध्द एकही पुरावा सादर करु शकला नाहीत. त्यामुळे कोर्टाने देखील त्याला गुन्हेगार म्हणून मान्य केलेले नाही. आपण नक्षलवादी म्हणून आदिवासींना पकडण्यापेक्षा जर खऱ्या अर्थाने नक्षलवादी पकडले आणि दुसरीकडे तुम्ही आदिवासींना आपले माणूस म्हणून वागविले तर मग ते तुमच्या बाजूला येतील.त्यावेळी त्यांच्या मनामध्ये मरण्यापेक्षा शिक्षा बरी असा ते विचार करतील. त्याठिकाणी बेभान झालेल्या नक्षलग्रस्तांचा बंदोबस्त करण्याकरता भविष्यात शासन कोणत्या उपाययोजना करणार आहे,पोलिसांची हिंमत वाढविण्यासाठी आणि नक्षलवाद्यांचा बंदोबस्त करण्याकरता भविष्यात शासन कोणता कार्यक्रम आखणार आहे? तसेच विशेष कृती योजनेअंतर्गत आपण नक्षलवाद्यांना ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस . . . .

कोणत्या प्रकारच्या विकासाच्या योजना जाहीर करणार आहात ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी फार व्यापक प्रश्न विचारलेला आहे.मी त्या जिल्ह्याचा पालक मंत्री सुध्दा आहे.सन्माननीय सदस्यांनी आता सांगितलेली वस्तुस्थिती खरी आहे. मागील काही दिवसामध्ये नक्षल ॲक्टीव्हीटी मध्ये तेथील निरपराध नागरिकांना मारण्याचे जे प्रमाण आहे त्याबाबत गांभीर्य व्यक्त करावे एवढे वाढलेले आहे. नक्षलवाद्यांनी आदिवासींना एवढ्या मोठया प्रमाणात मारण्याचे कारण काय असावे याची कारणे आम्ही सरेन्डर झालेल्या, अटक केलेल्या नक्षलवाद्यांकडून जाणून घेण्याचा प्रयन केला. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना सांगू इच्छितो आणि आपल्याला ही गोष्ट मान्य करावी लागेल की,पोलिसांनी आणि प्रशासनाने त्या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात अभियान सुरु केले होते. त्यातील काही इंटीरिअर भागातील मेळाव्यांच्या वेळी मी स्वत: तेथे उपस्थित होतो. काही महिन्यापूर्वी जर आपण सभेसाठी गेलो तर तेथील लोक लांब अंतरावर उभे राहून भाषण ऐकावयाचे, पण पुढे येऊन बसण्याची हिंमत करीत नव्हते. पण आता अगदी शेवटच्या टोकावर म्हणजे छत्तीसगडच्या बॉर्डरवर सुध्दा 4-4 आदिवासी पुढे येऊन बसतात आणि शांतपणे भाषण ऐकत आहेत आणि त्याला प्रतिसाद देत आहेत अशी स्थिती आहे. जर तेथे अधिकारी एखादी योजना घेऊन गेले तर त्याला प्रतिसाद देत आहेत.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते खरे आहे की, त्या परिसरातील लोकांना दिवसा पोलिसांकडून त्रास होत आहे आणि रात्री नक्षलवाद्यांकडून गोळ्या खाव्या लागतात असे सध्या तेथील वातावरण आहे हे मी नाकबूल करीत नाही. त्या परिसरामध्ये आदिवासी नक्षलवाद्यांना मदत करतात, मग कोणी जेवण देत असेल किंवा कोणी आणखी काही देत असेल. मी याबाबतीत सक्तपणे सूचना दिलेल्या आहेत की, ते लोक या सर्व गोष्टी मजबुरीमुळे करीत आहेत, बंदुकीच्या धाकामुळे करीत आहेत. त्यामुळे लगेच ते आदिवासी नक्षल समर्थक आहेत असा काढणे चुकीचे आहे. 10-20 आदिवासींच्या वस्त्या आहेत आणि नक्षलवाद्यांनी तेथे जाऊन काही मागितले तर तेथील माणसे त्यांना "नाही" म्हणण्याची हिंमत करीत नाहीत. पण या उलट आदिवासींनी पोलिसांना जर पाणी दिले किंवा त्यांच्याशी चार शब्द बोलले तर हा पोलिसांचा खबऱ्या आहे असे समजून नक्षलवादी त्यांना गोळ्या घालत आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

सभापती महोदय, मागील दोन महिन्यामध्ये घडलेल्या घटना या ॲव्हरेजपेक्षा थोडयाशा जास्तीच्या आहेत. म्हणून पोलिसांची अभियाने वाढविण्यात आलेली आहेत. पोलिसांच्या गावभेटी वाढविण्यात आलेल्या आहेत. पोलीस गावागावामध्ये जात आहेत. नक्षलग्रुपचे जे खबरे आहेत, सहानुभूतीदार आहेत आणि ॲक्टिव्ह लोक आहेत त्यांनाही पकडण्याचे काम पोलिसांनी सुरु केले आहे. नक्षलग्रुपमध्ये काम करणाऱ्या प्रत्येकाकडेच एके-47 दिली जात नाही. त्यांच्याकडे नाही म्हटले तरी शस्त्रांची कमतरता आहेच. प्रत्येकाला एक एके-47 देता येईल इतकी शस्त्रे त्यांच्याकडे असूच शकत नाहीत. दलामधील एखाद्याकडे एके-47 असते आणि बाकीच्यांकडे बंदुका असतात. ते सगळया प्रकारच्या साधनसमुग्रीचा वापर करतात. सभापती महोदय, या ठिकाणी ज्या गावाचा उल्लेख केला तेथे आदिवासींना मारल्यानंतर त्यांनी गावापुढे हट्ट धरला की, आमच्या डोळयासमोरच त्याचे दहन झाले पाहिजे तसेच या बाबतची माहिती गावातील कोणत्याही व्यक्तीने पोलिसांना देता कामा नये. जर ही गोष्ट पोलिसांना कळली तर उद्या ती माणसे जीवंत राहणार नाहीत, अशा पध्दतीची दमबाजी केल्यामुळे पोलिसांना ही माहिती मिळायला वेळ लागला. पण यामध्ये जे ॲक्टीव्ह होते, त्यांच्याकडून पोलिसांनी सगळी माहिती काढली. तसेच गाव भेटीच्या दरम्यान आणि सर्च ऑपरेशनच्या दरम्यान शस्त्रासह ही माणसे सापडलेली आहेत, त्यांचीही माहिती घेतलेली आहे. ज्या वेळी पोलिसांमार्फत असे लोक पकडण्यात येतात त्यावेळी केवळ स्थानिक अधिकाऱ्यांनी केलेली कारवाई पुरेशी मानण्यात येत नाही तर वरिष्ठ अधिकाऱ्याकडून त्याची पुन:पुन: तपासणी केली जाते. गरीब माणसाला आपल्या यंत्रणेकडून त्रास झाल्यामुळे नक्षलवाद्यांबद्दल सहानुभूती निर्माण होऊ नये आणि पोलिसांबद्दल गैर विश्वास निर्माण होऊ नये याची पूर्णपणे दक्षता त्या परिसरात पोलिसांमार्फत घेतली जाते.

सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, दुर्गम भाग हा विकास कामांपासून अजून खूप लांब आहे. लॅप्सेसमुळे, कमी असलेल्या अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांमुळे तसेच वाहुतुकीच्या असुविधेमुळे शासनाचे सर्व लाभ या दुर्गम क्षेत्रात मिळत नाहीत. विकासापासून ती गावे अनेक मैल दूर आहेत, ही गोष्ट कोणालाही प्रांजळपणे कबूल करावी लागेल आणि त्याच एका कारणाने नक्षल चळवळ वाढायला सुध्दा मदत होते. या संदर्भात काय उपाययोजना करण्यात येतील असा प्रश्न

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील....

विचारण्यात आलेला आहे. या नक्षलवादी चळवळीकडे दोन बाजूनी बघितले जाते. शासनाच्या उपाययोजना  या परिसरात प्रभावीपणे राबविण्याच्या बाबतीत शासनाने अनेक निर्णय घेतलेले आहेत. संजय गांधी निराधार सारखी योजना, वन हक्क जमिनीचे पट्टे देण्याची योजना अशा अनेक व्यक्तीगत लाभाच्या योजना आहेत. गेल्या वर्षभरात जवळ जवळ 1 लाख 22 हजार कुटुंबांना या योजनेतून मग कोणाला अपंगत्वाचा दाखला असेल, कोणाला वैद्यकीय सुविधा असतील, कोणाला संजय गाधी निराधार योजनेची पेन्शन असेल, या शासनाच्या व्यक्तिगत लाभाच्या ज्या योजना आहेत त्या खूप मोठया प्रमाणात आहे त्या तोकडया यंत्रणेच्या माध्यमातून पोहचविण्याचा प्रभावी प्रयत्न केला आहे. त्याचा परिणाम म्हणून आदिवासींना वन हक्क जमिनीचे पट्टे देण्याच्या बाबतीत आज गडचिरोली जिल्हा महाराष्ट्रात पहिल्या स्थानावर आहे.सर्वाधिक पट्टे त्या परिसरात दिले गेले आहेत. दोन राज्यांना जोडणारा पूल केंद्र शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे. नाही म्हटले तरी तेथील विकास कामाला पूरक वातावरण निर्माण झाल्याची भावना आहे. प्रत्यक्ष सर्व कामे सुरु झालेली आहेत, त्यामध्ये कुठल्याही प्रकारचे अडथळे नाहीत, अशातला कुठलाही भाग नाही.

सभापती महोदय, एका मिटिंगच्या दरम्यान माझ्या असे लक्षात आले की, 52 गावांचा विद्युत पुरवठा गेल्या 9 वर्षा पासून खंडित होता. विजेची बिले पाठविली जात होती. पण विजेचा पुरवठा खंडित झालेला आहे अशी तक्रार करण्यासाठी कोणी आले नव्हते, त्या संदर्भात साधी तक्रार देखील करण्यात आली नव्हती. त्या गावाचा विद्युत पुरवठा मात्र नऊ वर्षापासून खंडित होता. उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी सहकार्य केले आणि त्या 52 गावांचा विद्युत पुरवठा सुरु करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले पण दुर्दैवाने सगळयाच परिस्थितीचे गांभीर्य कळणारे लोक प्रशासनात असतात असेही घडत नाही. वन हक्क कायद्याचे उल्लंघन केले म्हणून जे लोक आणि जे कॉन्ट्रॅक्टर खंडित झालेला विद्युत पुरवठा सुरु करण्यासाठी गेले होते, त्या इंजिनियर्सना आणि कॉन्ट्रॅक्टरला वन खात्याच्या कायद्यांतर्गत अटक करण्यात आली. एका बाजूला त्या परिसरात कॉन्ट्रॅक्टर मिळणे अवघड आहे. त्यांच्याही हत्या होतात आणि दुसऱ्या बाजूने शासनाने केलेले सगळे कायदे आणि ते अतिशय चुकीच्या पध्दतीने राबविण्याचा केला जाणारा प्रयत्न, याचा परिणाम तो जिल्हा विकास कामापासून वंचित राहतो. त्या ठिकाणी केटी वेअरच्या बाबतीत, बॅरेजेसच्या बाबतीत, मोठे हाय-वे करण्याच्या बाबतीत मंजुरी दिली आहे. ही सगळी कामे टेंडर प्रक्रियेमध्ये

..3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर. पाटील....

आहेत. गेल्या वर्षभरात मी वेगवेगळया निमित्ताने गडचिरोलीला 26 वेळा प्रदीर्घ भेटी दिलेल्या आहेत आणि माझी निश्चितपणाने खात्री आहे की, सर्व राजकीय पक्षांनी मिळून त्या परिसरात थोडीशी लोकशाही प्रक्रिया सुरु करु शकलो तर या संकटावर मात होऊ शकते. एक अनुकूल वातावरण त्या परिसरात निर्माण होत आहे. त्याला आणखी थोडीशी चालना देण्याची आवश्यकता आहे, ती शासना मार्फत दिली जाईल.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, नक्षलग्रस्त भागाच्या संदर्भात मी माननीय मंत्री महोदयांना मनापासून धन्यवाद देणार आहे. बॉम्बस्फोटामुळे त्यांचे गृह खाते जावे काय या बाबतीत ज्यावेळी सगळीकडे चर्चा होते त्यावेळी नक्षलग्रस्त भागामध्ये त्यांनी स्वत:हून जो पुढाकार घेतलेला आहे ते मी स्वत: जाऊन बघून आलेलो आहे त्यामुळे त्यांच्याकडील ते खाते न जाता त्यांना त्या भागापुरते अधिक बळ कसे मिळेल या बाबत बोलणे आवश्यक आहे. आता माननीय मंत्री महोदयांनी सर्व परिस्थिती सांगितली. मी नक्षलग्रस्त प्रमुखांशी चर्चा केलेली आहे. तुमचे काय दुखणे आहे ते सांगा असे विचारले. त्यांनी सांगितले की, जोपर्यंत सिंचन वाढणार नाही तोपर्यंत आम्ही रस्ते बनवू देणार नाही. जोपर्यंत सिंचन वाढत नाही आणि उद्ध्वस्त झालेल्या आदिवासींना त्यांच्या स्वत:च्या शेतीचे उत्पन्न मिळत नाही तोपर्यंत रस्ते बनवू देणार नाहीत. यामध्ये वेगवेगळया अनेक गोष्टी आहेत.

सभापती महोदय, मला शासनाला अशी विनंती करावयाची आहे की, आपण ज्या प्रमाणे काश्मीर स्वायत्त केले आणि त्यांना सगळे काही वेगळे देतो त्याप्रमाणे हा जो नक्षलग्रस्त भाग आहे त्या भागात वनाच्या संदर्भातील कायदे वगैरे सर्व प्रशासकीय भानगडी आहेत. कोणी या ठिकाणी काम केले तर याला अटक करतात. त्या ठिकाणी काम केले तर त्याला अटक करतात. वन विभागाचे कायदे वेगळे आहेत. महसूल विभागाचे कायदे वेगळे आहेत. त्या भागापुरती तरी वेगळ्या कायद्याची निर्मिती करावी की, ज्यामुळे त्या भागातील जनतेला आपली प्रगती होत आहे याबाबत विश्वास निर्माण होईल. आपण खूप प्रयत्न करीत आहात. आपण आता जे सांगितले त्याच्या कितीतरी पटीने गोष्टी झालेल्या आहेत. आपण चार आदिवासींबाबत सांगितले. आता आदिवासी बैठकीला येऊन बसतात. परंतु प्रसिध्दी कमी देऊन हे सर्व काम झाले पाहिजे. आपण काय काम केले हे प्रसिध्दी माध्यमातून जगाला कळण्याची काही गरज नाही. कारण जगाला याबाबत काही देणे-घेणे नाही. आपल्या महाराष्ट्रात नक्षलग्रस्त भागात लोक मरत आहेत. गळे कापून लोक मरत आहेत. त्या भागातील लोकांमध्ये विश्वास निर्माण होणे गरजेचे आहे. तो पोलिसी धाकातून निर्माण होण्यापेक्षा वेगळ्या पध्दतीने झाला पाहिजे. कारण पोलीस हे शेवटी पोलीसच असतात. आपले जे प्रयत्न आहेत त्याला चांगले यश यावे, अशी सगळ्यांची इच्छा आहे. आपण विनंती केली की,

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. दिवाकर रावते .....

पक्षाच्या पलीकडे जाऊन सर्वांनी एकत्र आले पाहिजे. नक्षलग्रस्त भागाच्या विकासाच्या बाबतीत प्रशासन आणि शासन, आपण जे प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहात त्याच्या बरोबर आम्ही आहोतच आणि राहणार आहोत. कितीही मतभेद असले तरी त्या बाबतीत बरोबर राहणार आहोत. परंतु नक्षलग्रस्त भागाच्या बाबतीत कायद्यामध्ये वेगळ्या प्रकारची तरतूद करावी.

सभापती महोदय, यवतमाळ जिल्ह्यामध्ये नक्षलवाद हा विषयच नाही. पण यवतमाळ जिल्ह्यातील एक तालुका याला जोडल्यामुळे अधिकारी सोयीने त्या जिल्ह्यात आपली बदली करुन घेतात. नक्षलवाद दुसरीकडेच राहिला. त्यांना काही बघावे लागत नाही, सहन करावे लागत नाही. पण त्या ठिकाणी बदली केल्यानंतर जास्त पगाराचे, वेतनवाढीचे जे सगळे लाभ उठवितात ते सगळे काढून टाका. अधिकाऱ्यांचे योगदान अपेक्षित धरुन आपण हे सगळे लाभ दिलेले आहेत. परंतु ते योग्य पध्दतीने वापरले जात नाहीत. नको असलेली माणसे, ज्यांना काम करावयाचे नाही, ज्यांचे वय झालेले आहे असे वयोवृध्द, सेवानिवृत्तीला आलेले, ज्यांची सेवा दोन वर्षे, सहा महिने राहिलेली आहे असे अधिकारी नक्षलग्रस्त भागामध्ये पाठविले जातात. ते म्हणतात की, रजा वगैरे टाकून कसे तरी सहा महिने काढून निवृत्त व्हावयाचे आणि निवृत्तीनंतर सगळे लाभ घ्यावयाचे. अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. ज्यांचे वय 35 ते 40 वर्षे आहे असे प्रशासनातील त्या त्या खात्यातील अधिकारी काढून त्यांना तिकडे पाठवावेत. त्यांना भविष्याकरिता त्यांच्या नोकरीतील पाहिजे तो लाभ द्यावा. तीन वर्षे, पाच वर्षे अशा प्रकारची कॅडर गेली पाहिजे. कारण हे सर्व खात्यांचे मिळून काम आहे. नक्षलग्रस्त भागामध्ये वेगळ्या पध्दतीने प्रशासकीय व्यवस्थापन निर्माण करावे. ते आदिवासी असले तरी आपल्या महाराष्ट्रातील माणसे आहेत. त्यांच्या मनामध्ये भय आहे म्हणून ते नाईलाजाने करतात याची जाणीव शासनाला आणि आपणा सर्वांना आहे. त्या जाणिवेतून त्यांना बाहेर काढण्याकरिता आणि महाराष्ट्र राज्य सुरक्षित आहे हे सांगण्याकरिता हे करणे आवश्यक आहे. आपल्याकडे असे अधिकारी आहेत. असे अधिकारी नाहीत असे म्हणता येणार नाही.

सभापती महोदय, श्री. व्दादशीवार यांचे योगदान आपण विसरु शकत नाही. एक पत्रकार म्हणून त्या भागाचा पूर्ण अभ्यास करुन नक्षलग्रस्त भागामध्ये विधायक पध्दतीने ते लिहीत असतात.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्यांनी कधीही मारक लिहिलेले नाही. अशा पत्रकारितेला महत्व आहे. या महाराष्ट्राकडून जनतेच्या काय अपेक्षा आहेत या बाबतीत ते लिहीत असतात. म्हणून विधायक माध्यमातून आपल्याला जे जे करता येईल ते करावे. नकारात्मक कोठेही प्रसिध्दीला येता कामा नये, याची आपण काळजी घ्यावी. मी माननीय मंत्री महोदय श्री. आर. आर. पाटील यांना सांगू इच्छितो की, आपण पालकमंत्री म्हणून ते आव्हान स्वीकारलेले आहे आणि त्या बाबतीत आम्ही आपल्या बरोबर आहोत. आपले मनापासून कौतुक करावयाचे, धन्यवाद द्यावयाचे की आभार मानावयाचे हे मला माहीत नाही. पण आपण त्या बाबतीत असाच पुढाकार घ्यावा. आमची लागेल ती मदत आपल्याला देऊ. नक्षलग्रस्त भागातील त्या गोरगरीब आदिवासींना दिलासा मिळाला पाहिजे म्हणून तेवढ्या भागाकरिता कायद्यामध्ये योग्य ती सुधारणा करता आली तर नक्की परिस्थिती बदलेल. सर्व खात्याच्या अधिकाऱ्यांमधील अशा प्रकारचे कॅडर त्या ठिकाणी न्यावे. तसे केले तर त्या ठिकाणी फरक पडेल असे मला वाटते. अशा प्रकारची सूचना मी या माध्यमातून करीत आहे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, त्या भागातील रिक्त जागा भरण्याच्या बाबतीत मंत्रिमंडळाने मुख्य सचिवांना पूर्णपणे अधिकार दिलेले आहेत आणि लवकरात लवकर तीन महिन्याच्या आत त्या परिसरातील जास्तीत जास्त रिक्त पदे भरुन तेथील प्रशासन मजबूत करण्याच्या सूचना आणि प्रयत्न मुख्य सचिवांकडून सुरु आहेत.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

काही अधिकाऱ्यांना नेमण्यात आलेले आहे. साधारणपणे तेथे जाण्याची लोकांची मानसिकता नाही. तरी सुध्दा जे अधिकारी जात आहेत त्यांना सहकार्य करण्याची भूमिका मी घेतलेली आहे. तेथील रिक्त जागा भरण्याचा मी प्रयत्न करणार आहे. या भागात केंद्र व राज्य सरकारच्या बऱ्याच योजना लागू केलेल्या आहेत. कोणत्याही विकास कामासाठी पैशाची अडचण नाही. पण यंत्रणा कमी असल्यामुळे व तेथे काम करणाऱ्यांना सुरक्षिततेची खात्री वाटत नसल्यामुळे करण्यात आलेली तरतूद खर्च होत नाही. तेथे विकास कामे करीत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक तेवढे पोलीस संरक्षण देण्याच्या मी सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार अनेक विकासाची कामे पोलिसांच्या संरक्षणाखाली सुरु आहेत. पाटबंधारे विभागाच्या मोठ्या बंधा-यांना वन खात्याच्या अडचणी येत आहेत. या अडचणी सोडविण्यासाठी मी केंद्रीय पर्यावरण व वन मंत्र्यांबरोबर चर्चा केलेली आहे. त्यांनीही या कामी पूर्णपणे सहकार्य करण्याची भूमिका स्वीकारलेली आहे. आता तेथे विकास कामाला पूरक वातावरण निर्माण होत आहे. तेथील जनता सुध्दा शासनाच्या यंत्रणेवर विश्वास ठेवत आहे. नक्षलवादामुळे आपला विकास खोळंबतो, आपण इतरांच्या पाठीमागे राहत आहोत या जाणीवा लोकांमध्ये निर्माण होऊ लागल्या आहेत. दोन राज्यांना जोडणारे पूल व रस्ते झाले तर खऱ्या अर्थाने चालना मिळू शकेल. त्याच प्रमाणे त्यांना आर्थिक लाभ व्हावेत म्हणून तेंदू पत्त्याचा बोनस दिला जात आहे, बांबू कटाईचे दर वाढवून दिले जात आहेत. त्या ठिकाणी एमआरईजीएसच्या माध्यमातून मजुरांची चांगली उपस्थिती आहे आणि चांगल्या पध्दतीचा रोजगार तेथील गोरगरिबांना प्रशासनाने उपलब्ध करुन दिलेला आहे. शासनाच्या कोणत्याही योजना राबविण्याची भूमिका शासनाने घेतलेली आहे.

सन्माननीय सदस्य म्हणत आहेत ते खरे आहे. एका बाजूला पोलीस दलाला मजबूत करणे, लोकांना सुरक्षिततेची हमी देणे व त्यासाठी आपले पोलीस अधिक कार्यक्षम बनविणे हे काम करावे लागणार आहे. दुस-या बाजूला विकास कामामध्ये मागे राहिल्यामुळे तेथील विकासाची कामे अधिक गतीने हाती घ्यावी लागतील. तेथे जसा सुरक्षेचा प्रश्न आहे तसाच विकासाचा सुध्दा प्रश्न आहे. माननीय पंतप्रधान यांनी व्यक्त केलेली चिंता खरी आहे. आज देशामध्ये आतंकवाद्यांपेक्षा जास्त या नक्षलवाद्यांकडून निरपराध लोकांना मारण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. खऱ्या अर्थाने आतंकवादा इतकाच या देशात नक्षलवाद सगळीकडे आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.आर.आर.पाटील...

एका जिल्ह्यातील काही तालुक्यात नक्षलवादाला मर्यादा घालण्यामध्ये आपल्या पोलीस व्यवस्थेला व सगळयांना यश आले आहे. पण ते ठरावीक भागात आहे त्यामुळे तेथेही आणखी प्रयत्न करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, त्याच बरोबर एक गोष्ट तेथे घडलेली आहे. दलममधील सदस्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. पूर्वी 10-12 लोकांचे दलम असावयाचे आणि पोलिसांची संख्या 50 पर्यंत असावयाची. आता अनेक ठिकाणचे दलम एकत्र येत आहेत. काही वेळा छत्तीसगढ राज्यातून सुध्दा काही दलम राज्यात आणले जात आहेत. आंध्र प्रदेश सरकारने नक्षलवाद्यांवर ब-याचशा प्रमाणात नियंत्रण मिळविले आहे. गडचिरोलीत काम करताना सुध्दा अडचणी येत आहेत. एखाद्या माणसाला पोलिसांनी पकडले तर मानवी हक्क आयोगापासून ते इतर सिस्टिम्स पोलीस यंत्रणेवर तुटून पडतात. एखाद्या गरीब माणसाला नक्षलवाद्यांनी चिरुन मारले तर एकही उपटसुंभ तेथे उगवत नाही किंवा तेथे पोहोचत नाही. पण पोलिसांनी कोणाला चुकून अटक केली की टीका करण्याच्या कामात कोणीही मागे रहात नाही. एका विषम परिस्थितीत पोलिसांना नक्षलवाद्यांबरोबर लढावे लागत आहे. आज नक्षलवादी परिसरात पोलिसांचा वचक राहिलेला नाही असे म्हटले जाते. परंतु पोलीस त्यांना अटक करण्याच्या पलीकडे काही करु शकत नाही. नक्षलवादी मात्र लोकांना बेछूटपणे गोळ्या घालतात. म्हणून त्या परिसरात त्यांचा वचक असल्यासारखे आपल्याला दिसते. तेथे सगळा जंगली भाग आहे. हातातील बंदूक फेकून दिली की तो सामान्य नागरिक होतो. या ठिकाणी पुराव्याचा उल्लेख करण्यात आला. पण पोलिसांनी पुरावे कोठून शोधावयाचे हाही महत्वाचा प्रश्न आहे. हातात बंदूक घेतली की तो नक्षलवादी दिसतो आणि ती बंदूक ओढ्यात टाकून दिली की तो स्थानिक नागरिक दिसतो. त्यामुळे अनेक वेळा स्थानिक परिस्थितीमुळे लोक सुध्दा पुरावे देण्यासाठी पुढे येत नाहीत. जे पुरावे सापडतात ते कोर्टात प्रस्थापित करताना अडचणी येतात ही वस्तुस्थिती आहे. तरीही हे वातावरण बदलत जाईल. शासनाने अनेक विकासाची कामे हातात घेतलेली आहेत, अनेक सोयीसुविधा देण्याचे धोरण स्वीकारले आहे. ज्या कमतरता व त्रुटी आहेत त्या लवकरच दूर करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : प्रश्न असा आहे की, एटापल्ली पासून आजूबाजूच्या 22 गावांचा अजून विकास झालेला नाही. या 22 गावांच्या विकासाचा प्रश्न शासन ताबडतोब हाती घेईल काय ? श्री. रमेश वर्टी याला कोर्टाने निर्दोष सोडलेले असून सुध्दा त्याची अजून सुटका झालेली नाही. त्याची ताबडतोब सुटका करणार काय ? अभियानामध्ये मृत्यू पावलेल्या पोलीस मित्रांना कोणत्याही प्रकारची मदत केली जात नाही. तेव्हा अभियानामध्ये मदत करणा-या पोलीस मित्रांना शासन आर्थिक मदत करणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : स्वत:चा जीव धोक्यात घालून अल्पशा पगारासाठी पोलीस मित्र वाट दाखविण्यासाठी पोलिसांना उपयुक्त ठरत आहेत. अशा दोन पोलीस मित्रांचा मृत्यू झालेला आहे. एखादा पोलीस लढताना मृत्यू पावला तर त्याच्या कुटुंबीयांना चांगल्या प्रकारे मदत केली जाते. परंतु पोलीस मित्रांच्या संदर्भात अशा प्रकारे मदत करण्याचे धोरण आपल्या कायद्यामध्ये नाही. याबाबतीत आम्ही धोरण आखू. असे जे पोलीस मित्र, पोलीस पाटील आहेत त्यांचा जर नक्षलींनी मृत्यू घडविला तर त्यांच्या कुटुंबीयांना चांगल्या प्रकारे मदत देण्याची भूमिका मी स्वीकारतो. मी 14 तारखेला एटापल्ली येथे जाणार आहे. सन्माननीय सदस्यांनी एटापल्लीच्या संदर्भात नेमके काय करण्याची आवश्यकता आहे हे सांगितले तर त्याबाबतीत एखादी मिटींग आयोजित करुन त्या कामाला प्राधान्य देण्यात येईल.

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक 3 बाबत

**तालिका सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 3 पुढील आठवड्यात घेण्यात येईल.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.00 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 1.31 ते 2.00 मध्यंतर)

---

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**(सभापतीरस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)**

**विशेष उल्लेख**

**पृ. शी.** : पुणे शहरातील वाहतूक समस्या सोडविणे

**मु. शी.** : पुणे शहरातील वाहतूक समस्या सोडविणे याबाबत श्री.मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, पुणे शहरामध्ये वाहतुकीचा प्रश्न केवळ कोंडी होण्यापुरता मर्यादित राहिलेला नसून तो जीवघेणा होत चालला आहे. गेल्या पाच महिन्यामध्ये झालेल्या अपघातात 151 लोकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. सदोष रस्ते, मूलभूत सुविधांचा अभाव त्याचबरोबर वाहन चालकांची बेपर्वाई यामुळे अपघातांची संख्या वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. वाहतुकीची कोंडी सोडविण्याबाबत, अपघात टाळण्याबाबत उपाययोजना करण्याची गरज आहे. तसेच बेपर्वाईने वाहने चालविणाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज आहे. पुणे शहरातील वाहतुकीच्या संदर्भात 2010 च्या हिवाळी अधिवेशनामध्ये चर्चा झालेली होती. त्या वेळेला गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी या सभागृहात आश्वासन दिले होते की, सर्व लोकप्रतिनिधींची पुणे किंवा मुंबई येथे बैठक घेण्यात येईल आणि पुण्यातील वाहतुकीच्या प्रश्नाबाबत चर्चा करण्यात येईल. या पूर्वी पुण्याच्या वाहतुकीच्या प्रश्नाबाबत तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्या समितीची एक बैठक झाली व नंतर आजपर्यंत एकही बैठक झालेली नाही. पुण्याच्या वाहतुकीच्या प्रश्नाबाबत शासनाने त्वरित उपाययोजना करावी हा मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विषय मांडू इच्छितो.

------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बारामती, जि.पुणे येथील महिलांच्या असहाय्यतेचा वकिलांकडून फायदा घेतला जाणे

**मु. शी.** : बारामती, जि.पुणे येथील महिलांच्या असहाय्यतेचा वकिलांकडून फायदा घेतला जाणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

सभापती महोदय, पुणे जिल्हयातील बारामती येथील महिलांच्या असहाय्यतेचा फायदा घेणाऱ्या वकिलांवर कडक कारवाई करावी यासाठी यापूर्वी देखील हा विषय उपस्थित केला होता. आज पुन्हा एकदा मी अशी मागणी करते की, राज्य महिला आयोगाची नियुक्ती झाली तर अशा स्वरुपाच्या तक्रारी, ज्यामध्ये शासकीय किंवा वेगळ्या पध्दतीच्या न्यायालयीन व्यवस्थेमध्ये त्रुटी असल्यामुळे गैरफायदा घेण्याचे प्रकार वाढत आहेत, त्यांची चौकशी करण्यासाठी राज्य महिला आयोग सक्षम करणे, आयोगावर नियुक्ती करणे आवश्यक आहे. राज्य महिला आयोगावरील 50 टक्के नियुक्त्या यापूर्वी पाच वर्षे रिक्त होत्या. म्हणून अशा घटना वारंवार घडत असतात. राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष आणि सर्व नियुक्त्या ताबडतोब करण्यात यावा, त्यांना निधीची तरतूद करावी. जेणेकरुन प्रत्येक जिल्हयामध्ये तद्वत प्रत्येक ठिकाणच्या विभागीय आयुक्त स्तरावर या प्रकारच्या तक्रारींचा निपटारा करणे कायदा आणि न्याय व्यवस्थेला सोपे होईल, या विषयाकडे मी विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

-----

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आदिवासी दुर्गम भागातील रुग्णांना आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यासाठी दळणवळणाची सुविधा उपलब्ध करणे

**मु. शी.** : आदिवासी दुर्गम भागातील रुग्णांना आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यासाठी दळणवळणाची सुविधा उपलब्ध करणे याबाबत श्री.हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.हेमंत टकले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, नंदूरबार हा आपल्या राज्यातील आदिवासी जिल्हा आहे. या दुर्गम भागातील रुग्णांसाठी नजिकच्या आरोग्य केंद्रात पोहोचविण्यासाठी 200 पालख्या घेण्याचा विशेष प्रस्ताव मंजूर झालेला आहे. आजच्या विज्ञानयुगात अजूनही या भागातील गरीब आदिवासी रुग्णांना झोळीचा वापर करुन रुग्णालयात नेले जाते. विशेषत: धडगाव, अक्कलकुवा या तालुक्यासाठी या पालख्या उपयोगात आणण्यात येणार असून रुग्णवाहिका पोहोचू शकत नाही, मोबाईल रेंज नाही, पायवाटेशिवाय पर्याय नाही अशा परिस्थितीत या योजनेचे योग्य प्रकारे मुल्यमापन करुन रुग्णांना अधिक चांगल्या सोयी देण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावा. ही बाब मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून उपस्थित करीत आहे.

------

नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: भाभा अणुसंशोधन केंद्रातील अणुशास्त्रज्ञांनी केलेली आत्महत्त्या
**मु.शी.**: भाभा अणुसंशोधन केंद्रातील अणुशास्त्रज्ञांनी केलेली आत्महत्त्या याबाबत डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे)** : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :-

महोदय, दि. 29.4.2011 रोजी डॉ. उमा नरसिंह राव यांनी झोपेच्या गोळ्या घेऊन आत्महत्त्या केली. ही घटना दिसायला तशी छोटी वाटत असली आणि नेहमी घडणारी असली तरी त्यामागील कारणे पाहणे आवश्यक आहे. भाभा अणुसंशोधन केंद्रातील शास्त्रज्ञांचा एकंदर इतिहास पाहिला तर गेल्या 15 वर्षात 197 शास्त्रज्ञांनी अशा प्रकारच्या आत्महत्या केल्या आहेत, ही मी शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. यापैकी मुंबईत एकूण 57 अणुशास्त्रज्ञांनी आत्महत्या केल्या आहेत. खरोखरच या शास्त्रज्ञांची स्वप्ने खूप मोठी असतात. हे शास्त्रज्ञ एकदा सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या ज्ञानाचा फायदा देखील आपल्या देशाला होणे अत्यंत आवश्यक आहे. हे सर्व मृत्यू सन 1995 ते 2011 या काळातील आहेत. या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाला अशी विनंती करु इच्छितो की, इतक्या उच्च विद्या विभूषित शास्त्रज्ञांना अशा प्रकारे आत्महत्या करण्याची वेळ का आली याच्या मुळाशी जाणे आवश्यक आहे. तसेच याबाबत शासनाने लक्ष घालावे. या शास्त्रज्ञांमध्ये कॅन्सर सारख्या दुर्धर आजारामुळे आत्महत्या करणाऱ्यांचे प्रमाण देखील बरेच आहे. तसेच आपल्या राज्यात येऊ घातलेल्या जैतापूरसारख्या औष्णिक उर्जा प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर ही आकडेवारी सुध्दा महत्वाची आहे, याचा शासनाने विचार करावा.

-----------

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2011-12 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांना हे माहीतच असेल की, पूरक मागण्यांवरील चर्चेसाठी शुक्रवार आणि सोमवार हे दोन दिवस दिलेले आहेत. आज कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पूरक मागण्या आणि त्या खालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा मंत्रीनिहाय होत असल्याने संबंधित मंत्र्यांच्या सर्व विभागांबाबत सदस्यांनी बोलावे. त्यानंतर मंत्रिमहोदयांना एकदम उत्तर देणे सुलभ होईल. चर्चा संबंधित बाबीपुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही, हे सदस्यांना सांगावयास नकोच.

कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाचे आहे, हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे. अन्यथा आज राहिलेल्या पूरक मागण्या व सोमवार, दिनांक 1 ऑगस्ट, 2011 करिता असलेल्या सर्व मागण्यांवरील चर्चा सोमवार, दिनांक 1 ऑगस्ट, 2011 रोजी पूर्ण करावी लागेल.

-------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शीर्षक** : विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या

**तालिका सभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेला घेण्यात येतील :-

1. मुख्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्र.ए-1, ए-4, ए-5, ए-6, ए-7, बी-3, एफ-3, एफ-7, जे-1, जे-2, जे-3, क्यू-4, झेडएफ-1, झेडएफ-2
2. उप मुख्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्र. जी-4, जी-5, जी-7, के-6,, ओ-1, ओ-7, ओ-8, ओ-10, ओ-11, ओ-16, ओ-17, ओ-18, ओ-19, ओ-21, ओ-22, ओ-23, ओ-24, ओ-25, ओ-26, ओ-27, ओ-28, ओ-30, ओ-33, ओ-37, ओ-40, ओ-44, ओ-45
3. उद्योग व बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्र.बी-7, बी-11ए, के-3, के-7, के-8, झेडए-1
4. गृह मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्र. बी-1, बी-4, बी-5, बी-10
5. वने, पुनर्वसन व मदतकार्य आणि भूकंप पुनर्वसन मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्र. सी-5, सी-7
6. सामाजिक न्याय, विमुक्त/भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय कल्याण आणि व्यसनमुक्ती कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्र. एन-2 व एन-3
7. सहकार व संसदीय कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्र. व्ही-2, व्ही-3
8. राज्य उत्पादन शुल्क आणि अपारंपरिक उर्जा मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्र. बी-2, के-6
9. महसूल व खार जमीन मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्र.सी-1, सी-2, सी-4, आय-5
10. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्र. वाय-2, वाय-3
11. अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्र. एम-2, एम-3
12. वैद्यकीय शिक्षण आणि फलोत्पादन मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्र. एस-1, एस-3
13. आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्र. टी-4, टी-5, टी-6

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : माननीय सभापती महोदय, सन 2011-2012 च्या पुरवणी मागण्यावर विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 6, पृष्ठ क्रमांक 6, राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती यांची स्मारके व पुतळे यांचे बांधकाम या बाबीवर मी प्रथम विचार व्यक्त करणार आहे. राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती यांची स्मारके व पुतळे उभारुन त्यांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या आपण सादर करीत असतो. राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या विचाराचे अनुकरण घडावे व त्यातून प्रगल्भ मानसिकता तयार व्हावी यासाठी त्यांचे एक दिवस स्मरण करुन त्यांना आपण विसरुन जातो. शासन ज्या थोर व्यक्तींचे पुतळे उभारणार आहे त्या पुतळयांच्या देखभालीची व त्यांच्या विचाराची पायमल्ली होणार नाही याबाबत शासनाने ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. त्यामुळे पुतळे उभारणीच्या खर्चास मंजुरी देऊन शासनाने त्यांची स्मारके योग्य पध्दतीने ठेवावीत अशी सूचना मी या निमित्ताने करु इच्छितो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 13, पृष्ठ क्रमांक 9, विमानतळाच्या विकासाच्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. विमानतळांकरिता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस सहाय्यक अनुदान मिळावे यासाठी मी गेल्या अनेक महिन्यापासून शासनाकडे मागणी करीत आहे. रत्नागिरी येथील विमानतळ पूर्वी सुरु होते परंतु आता ते बंद आहे. त्यामुळे मुंबई-रत्नागिरी-गोवा किंवा मुंबई-रत्नागिरी-बंगरुळू किंवा मुंबई रत्नागिरी-कोल्हापूर अशी विमानसेवा सुरु केली तर कोकणातील पर्यटन व्यवसायाला चालना मिळू शकेल. कोकणातील आंबा जगात गेला पाहिजे व जगातील पर्यटक कोकणात आले पाहिजेत असे आपण सातत्याने म्हणत असतो. असे जर करावयाचे असेल तर शासनाने विमानतळाच्या बाबतीत प्राधान्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 33, पृष्ठ क्रमांक 25, तरंगत्या लहान धक्क्याच्या बांधकामासाठी व प्रवाशांना इतर सुविधा पुरवण्यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळाला सहाय्यक अनुदान यावर विचार व्यक्त करणार आहे. राज्यात झाई ते बांधा या 720 कि.मी. सागरी किना-यात स्वातंत्र्योत्तर काळात अनेक बंदरे प्रवासी वाहतुकीसाठी उपलब्ध होते. परंतु राज्य शासनाच्या दुर्लक्षामुळे आता केवळ रेवस ते मांडवा इथपर्यंतच प्रवासी वाहतूक होत आहे. शासनाकडे गत 5

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ....

वर्षापासून मी हर्णे बंदराचा विकास करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करीत आहे. परंतु या बंदराचे काम प्रशासकीय मान्यतेपर्यंत येऊन थांबलेले आहे. पुढे कुठलीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. मुंबई येथील लहान तरंगत्या धक्क्याबरोबर कोकणातील ग्रामीण बंदरांकडे लक्ष पुरवल्यास पूर्वीप्रमाणे रत्नागिरी-मालवणपर्यंत प्रवासी वाहतूक सुरु होऊ शकेल. त्यामुळे शासनाने यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 37, पृष्ठ क्रमांक 30, दुय्यम निंबधक कार्यालयामध्ये फर्निचर व सोयीसुविधा पुरविणे यावर माझे विचार व्यक्त करणार आहे. ठाणे जिल्हा हा लोकसंख्येच्या दृष्टीने राज्यात सर्वात मोठा आहे. ठाणे तहसील अंतर्गत मिरा-भाईंदर व नवी मुंबई महानगरपालिका हा दाट लोकवस्तीचा भाग आहे. त्यामुळे साहजिकच या ठिकाणी फ्लॅटच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार मोठया प्रमाणात होत असतात. दुय्यम निंबधक ठाणे यांचे एक ते पाच असे कार्यालयीन विभाग आहेत. ते सर्व विभाग तलाव पाळी जवळील अत्यंत छोटया इमारतीत आहेत. तेथे जतनेलाच काय पण कर्मचा-यांनासुध्दा कुठल्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध नाहीत. उदा. फर्निचर, वॉटर कुलर, स्वच्छतागृह या सुविधा अत्यंत अपु-या आहेत तसेच या ठिकाणी कर्मचारी वर्ग कंत्राटी पध्दतीने घेतला जात असल्यामुळे ठाणे दुय्यम निंबधकाचे कार्यालय हे भ्रष्टाचाराचे अगार झालेले आहे. शासनाने या पाचही विभागांना व्यवस्थित कार्यालय व फर्निचर पुरवल्यास ठाणे शहरातून फार मोठया प्रमाणात शासनास महसूल मिळू शकेल. त्यामुळे राज्य शासनाने याबाबत योग्य तो विचार करुन ठाणे दुय्यम निंबधक कार्यालय प्रशस्त जागेत नेण्याबरोबर तेथे सुविधाही उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

सभापती महोदय, बाब क्रमांक 55, पृष्ठ क्रमांक 39, वैयक्तिक लाभार्थींना दुभत्या संकरित गाई आणि म्हशींचा पुरवठा करणे यावर विचार मांडणार आहे. दुभत्या संकरित गाई व म्हशींचे वाटप वैयक्तिक लाभार्थींना करणे व त्यानुषंगाने लागणारी अवजारे व विमा यासाठी आवश्यक ते सहाय्यक अनुदान देण्याचे शासनाने धोरण आखले आहे. हे धोरण राबवितांना त्या त्या भागाचा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ....

भौगोलिक अभ्यास करुन तेथील हवामानात टिकून राहण्याची क्षमता असलेले, तसेच ते भाकड नसतील याची खात्री करुन दुधाळ जनावरे लाभार्थ्यांना देण्यात यावी. अन्यथा जळगाव, भुसावळ मधील उष्ण कटिबंधातील शेळया/मेंढया/गाई/म्हशी कोकणात दिल्यास त्या कोकणातील हवामानात तग धरु शकणार नाहीत.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ MMP/ AKN/ जुन्नरे... 14:15

श्री.संजय केळकर...

ही योजना केवळ कागदावरच पूर्ण केल्याचे समाधान मिळेल. त्याचा गरीब शेतकऱ्यांना लाभ मिळणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना हितकारक असे धोरण शासनाने राबवावे.

महोदय, या नंतर मी पान क्र.45 वरील बाब क्र.65 महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियिम, 1961याच्या कलम 182 जिल्हा परिषदांना अनुदाने यावर माझे विचार व्यक्त करणार आहे. राज्यातील जिल्हा परिषदां अतंर्गत प्राथमिक शाळेतील इयत्ता 1 ली ते 5 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेष पुरविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. आज या गणवेषाची अत्यंत वाईट परिस्थिती आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये आपण कापड पुरविले. पण 90 रूपयांमध्ये कुठलाही टेलर गणवेष शिवून देण्यास तयार नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेतील शाळेतील मुलांना आजही गणवेष मिळालेला नाही. आपली योजना कादावरच राहिलली आहे. कापड तेथेच राहिलेले आहे आणि ठाणे जिल्हा परिषदेचे अधिकारी मुख्याध्यापकांना जाब विचारण्याचा प्रयत्न करीत आहेत. या योजनेमध्ये कापड खरेदीतच गैरव्यवहार झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. शासनाची योजना कितीही चांगली असली तरी विद्यार्थ्यांना शालेय गणवेष मिळण्याची शक्यता धूसर होत चालली आहे. या बाबत शासनाने तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यामुळे ठाणे जिल्हा परिषदेतील शालेय विद्यार्थ्यांना 15 ऑगस्ट पूर्वी प्रत्येकी दोन गणवेष मिळतील अशा प्रकारचे निदेश शासनाने त्यांना द्यावेत अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

यानंतर मी बाब क्र.71 -महानगरपालिकांना त्यांच्या आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी कर्जे यावर बोलणार आहे. महाराष्ट्र राज्यात केंद्र व राज्य सरकार अनेक प्रकारचे कर वसूल करतात. उत्पादन शुल्क, कस्टम डयुटी, आयकर, सेवाकर या करातून राज्याला 32 टक्के हिस्सा मिळतो. त्याप्रमाणे राज्य सरकार देखील स्टॅम्प डयुटी, मुद्रांक कर, करमणूक शुल्क, उत्पादन शुल्क, व्यवसाय कर, मूल्यवर्धित कर, विक्री कर, पथ कर इत्यादीतून अनेक प्रकारची वसुली करते. केंद्र सरकार ज्या प्रमाणे राज्य सरकारला कराचा हिस्सा देते त्या प्रमाणे राज्य सरकारने देखील राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना हिस्सा दिला तर त्या देखील मजबूत होऊ शकतील. महानगरपालिका, नगरपालिका यांना विकासाची कामे करायला पैसाच शिल्लक रहात नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2

श्री.संजय केळकर...

त्यामुळे एमएमआरडीएच्या माध्यमातून कर्ज घ्यावे लागते. स्थानिक संस्थांना 74 व्या घटना दुरूस्ती नुसार सक्षम करणे ही राज्य शासनाची जबाबदारी आहे. सक्षमीकरणात आर्थिक वाटा उचलणे हे राज्य शासनाचे कर्तव्य आहे. तेव्हा 74 व्या घटना दुरूस्तीचा मान राखून केंद्र शासनाच्या कार्य प्रणालीनुसार ठाण्यासह राज्यातील अन्य महानगरपालिकांना करातील रकमेचा हिस्सा द्यावा अशा प्रकारची विनंती मी या निमित्ताने करतो.

या नंतर मी बाब क्र.90 महसूल विभागाच्या नवीन तहसील व प्रशासकीय इमारतींच्या बांधकामावरील खर्च भागविण्यासाठी तरतूद करणे यावर बोलणार आहे.

मागच्या वेळी माननीय मंत्र्यांकडे प्रस्ताव दिला होता. ठाणे जिल्हा प्रचंड मोठा आहे. आता विक्रमगड तालुक्याची नवीन निर्मिती झालेली आहे. भाईंदर, नवी मुंबई, ठाणे येथे प्रचंड लोकवस्ती असून ठाणे तहसलीमध्ये एकूण 30 लाख लोकवस्ती आहे. त्यामुळे येथील तहसील कार्यालय अपुरे आहे. त्यामुळे येथील तससील कार्यालयाची पुनर्बांधणी करणे गरजेचे आहे. वेगळ्या पद्धतीने त्या करिता तरतूद करून ठाण्याच्या तहसील कार्यालयाची पुनर्बांधणी करावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

. कल्याण तहसील कार्यालयाची देखील अशीच अवस्था आहे. कल्याण तालुक्यात देखील प्रचंड प्रमाणावर नागरीकरण होत आहे, त्यामुळे लोकसंख्या वाढत आहे. त्या मानाने हे कार्यालय अपुरे पडत आहे. त्यामुळे या दोन्ही तहसील कार्यालयांची नव्याने उभारणी करावी, अशी मी विनंती करतो. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011-2012 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्याकरिता उभा आहे. नगरविकास विभागाच्या बाब क्रमांक 71 व पृष्ठ क्रमांक 41 च्या संदर्भात मला या ठिकाणी असे सुचवावयाचे आहे की, सद्या महानगरपालिका व नगरपालिकांच्या निवडणुका होवू घातल्या आहेत. त्यांच्याकरिता वॉर्डची रचना तयार करण्याचे काम सुरु आहे. यामध्ये कालपर्यन्त महिलांकरिता, अनुसूचित जाती-जमातीकरिता राखीव असलेले वॉर्ड वगळण्यात आले आहेत. वॉर्डची रचना तयार करीत असतांना जे सर्वांना मान्य होईल अशाप्रकारचे सूत्र शासनाने ठरविले पाहिजे. त्या मुळे नगराध्यक्ष आणि महापौरांसाठी जे वॉर्ड तयार केले जातील ते ठरविलेल्या सूत्राप्रमाणे तयार केले पाहिजेत अशी माझ ी मागणी आहे. या करिता मी सन्माननीय मंत्र्यांना भेटलो असता त्यांनी शासनाने या संबंधी निश्चित असे सूत्र ठरविले नाही असे सांगितले. आपण ज्या वेळी सूत्र निश्चित कराल त्या वेळी एकाला एक सूत्र व दुसऱ्याला दुसरे सूत्र लागू असे होता कामा नये अशाप्रकारची मागणी या बाबीच्या निमित्ताने मी करीत आहे. राज्य सरकारने महापौरांना एक सूत्र ठरविले व वॉर्डाना दुसरे सूत्र ठरविले तर ते बरोबर होणार नाही त्याविरुद दाद मागण्याकरिता लोक कोर्टामध्ये जातील.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 16 व पृष्ठ क्रमांक 17 च्या बाबतीत मी शासनाचे अभिनंदन करतो. रायगड जिल्ह्यातील पेण अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या झालेल्या घोटाळयाचा तपास गृह विभागाच्या पोलिसांनी चांगल्या प्रकारे लावला. त्या बँकेच्या विरुध्द पोलिसांनी 1 हजार पानांचे आरोप पत्र तयार केले. या संपूर्ण तपासामध्ये रायगडच्या पोलीस अधिक्षकांनी महत्वाची कामगिरी पार पाडल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे तेथील पोलीस इन्स्पेक्टर श्री. पाटील यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता योग्य प्रकारे तपास केला. त्या मुळे बँकेच्या ठेवीदारांना काही तरी न्याय मिळेल अशाप्रकारची आशा त्यांच्या मनामध्ये निर्माण झ ाली. या बद्दल मी गृह विभागाचे पुन्हा एकदा अभिनंदन करतो.

सभापती महोदय, ऊर्जा विभागाच्या बाब क्रमांक 141 व पृष्ठ क्रमांक 142 च्या बाबतीत मला सांगावयाचे आहे की, या राज्यामध्ये 3 हजार कंत्राटी कामगार आहेत त्यांना कायम करण्याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करु असे आश्वासन सन्माननीय ऊर्जा मंत्र्यांनी मागील वेळी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ AKN/ MMP/

श्री. जयंत प्र. पाटील....

सभागृहामध्ये दिले होते. त्या आश्वासनाची पूर्तता लवकरात लवकर करावी आणि या कंत्राटी कामगारांना सेवेत समाविष्ट करुन घ्यावे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, सहकार विभागाच्या मागणीच्या निमित्ताने मला सभागृहामध्ये एक गोष्ट सांगावयाची आहे की, सहकार क्षेत्रामध्ये सुरु असलेल्या अनियमिततेच्या बाबतीत सन्माननीय सभापती आणि सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांकडे विनंती केली होती. आज राज्यातील सहकार क्षेत्रामध्ये जी अनिश्चितता निर्माण झाली आहे त्याबद्दल लोकांच्या मनामध्ये साशंकता निर्माण झाली आहे. या करिता या सभागृहामध्ये अंतिम आठवडा प्रस्तावाच्या किंवा अन्य प्रस्तावाच्या माध्यमातून एक स्वतंत्र चर्चा ठेवली पाहिजे. या राज्यातील सहकारी बँकांच्या माध्यमातून सहकारी चळवळ कोलमडली आहे. राज्याच्या सहकार क्षेत्रामध्ये एक अनिश्चिततेचे आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्या संदर्भात राज्य सरकारने कोणती ठोस पावले टाकली आहेत हे राज्यातील जनतेला समजले पाहिजे. काही ठरावीक सहकारी संस्थामध्ये अनियमितता झाल्यामुळे काही चांगल्या संस्थांवर देखील परिणाम झालेला आहे. लोकांमध्ये अविश्वासाचे वातावरण निर्माण झाल्यामुळे राज्याच्या सहकार क्षेत्रातील साडे तीन हजार कोटी रुपयांच्या ठेवी लोकांनी काढून घेतल्या आहेत त्या गोष्टीला चुकीच्या पध्दतीने प्रसिध्दी दिली जात आहे. या गोष्टीला कारणीभूत असलेल्यांना योग्य ते शासन मिळाले पाहिजे ते मिळत नाही. या दृष्टीने राज्यात निर्माण झालेले वातावरण बदलले गेले पाहिजे या करिता या सभागृहामध्ये चर्चा झाली पाहिजे. या अधिवेशनाच्या शेवटच्या आठवडयामध्ये मी सभागृहात अनुपस्थित राहणार असल्यामुळे त्या अनुषंगाने मी या ठिकाणी मागणी करीत आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे) `

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

मी माननीय मंत्री महोदयांना नम्रतापूर्वक सांगू इच्छितो की, मी माझ्या 11 वर्षाच्या कारकिर्दीमध्ये फक्त 7 वेळा सभागृहामध्ये गैरहजर राहिलो आहे. मात्र सभागृहाचे कामकाज सुरु झाल्यानंतर याठिकाणी पूर्णवेळ उपस्थित असणारा मी एक सभासद आहे.

सभापती महोदय, मला पीक धोरणाच्या बाबतीत मागणी करावयाची आहे की, या राज्यामध्ये सहकारी बँकांच्या मार्फत कर्ज वितरण होत आहे. मग ती मराठवाड्यातील उस्मानाबाद बँक असो, किंबहुना मराठवाड्यातील लातूर बँक ही सुध्दा एक चांगली बँक आहे असे मी स्वत: मानतो. परंतु त्यांनी गेल्या वर्षापेक्षा यावेळी पीक कर्जाचे वितरण 50 टक्क्यापेक्षा कमी केलेले आहे. कदाचित माननीय मंत्री महोदयांकडे याबाबतची आकडेवारी असेल. पण यामुळे एक वेगळा धोका निर्माण झालेला आहे आणि याबाबत येथे गंभीरपणे चर्चा व्हावयास पाहिजे. विशेषत: पुढील गाळपाच्या वेळेस याबाबत लक्ष देण्याची गरज आहे. खरे म्हणजे मी काही ऊस पिकविणारा शेतकरी नाही किंबहुना ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये काम करणारा कार्यकर्ता देखील नाही. पण मी माझ्या पक्षाचा प्रमुख असल्यामुळे महाराष्ट्रात फिरत असताना मला ऊसकरी शेतकऱ्यांचे प्रश्न जवळून समजून घेण्याची संधी मिळाली. पुढच्या वर्षी महाराष्ट्रामध्ये एक मोठा प्रश्न निर्माण होणार आहे आणि तो म्हणजे सहकार क्षेत्रातील अनेक कारखान्यांच्या बाबतीत पुढील वर्षी आर्थिक धोरण कशा प्रकारचे राहील याबद्दल साशंकता निर्माण झालेली आहे आणि त्याचा पुढील वर्षी गाळपाच्या बाबतीत मोठा परिणाम होत असल्याचे दिसून येईल.तसेच याठिकाणी मला एकच गोष्ट सांगावयाची आहे. मी केवळ दोन बाबींच्या संबंधात भाषण करणार आहे.

सभापती महोदय, याठिकाणी राज्याच्या सहकार विभागाच्या सचिवांनी राज्य बँकेच्या प्रशासकाच्या माध्यमातून एक सर्क्युलर काढलेले आहे की, जर साखर कारखान्यांनी किमान हमी भावापेक्षा जास्त भाव दिला तर आम्ही त्यांना कर्ज वितरण करणार नाही म्हणजे आम्ही कारखाना चांगल्या प्रकारे चालविला .......

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, .....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण उत्तराच्या भाषणामध्ये माहिती द्यावी. मी याबाबतीत पेपरमध्ये वाचल्यानंतर राज्य बँकेमध्ये फोन केला आणि मी मघाशी जे सांगितले, त्यासंदर्भातील सर्क्युलर देखील घेतले म्हणजेच तशा प्रकारचे सर्क्युलर काढलेले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

श्री.बाळासाहेब थोरात (खाली बसून) : आम्ही काढले नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, त्यांनी काढले नाही तर राज्य बँकेच्या प्रशासकांनी अशा प्रकारचे सर्क्युलर काढलेले आहे की, त्यांनी हमी भावापेक्षा जास्त भाव दिला तर आम्ही त्यांना कर्ज वितरण करणार नाही म्हणजे जर आम्ही वा सन्माननीय मंत्री महोदय श्री.बबनराव पाचपुते यांनी चांगल्या प्रकारे कारखाना चालविला आणि प्रशासकीय खर्च कमी केला असेल तर तो शेतकऱ्यांना पास ऑन करणे हेच सहकाराचे खरे उद्दिष्ट आहे आणि याच उद्दिष्टापासून आपण वेगळे जाणार असलो किंवा वेगळा टर्न देणार असलो तर ते योग्य नाही. त्यामुळे आज माझ्या सारखा सहकार क्षेत्रामध्ये काम करणारा कार्यकर्ता संभ्रमावस्थेमध्ये आहे. अशा प्रकारे जर काम होणार असेल तर ते बरोबर नाही. म्हणून राज्य शासनाने या अधिवेशनाच्या निमित्ताने यासंबंधातील एक वेगळे धोरण ठरवावे जेणेकरुन सहकार क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या सर्व संस्थांना आधार मिळेल.

सभापती महादय, मला बाब क्र.156, पान क्र.155 अन्न पुरवठा याबाबत विचार मांडावयाचे आहे. काल माननीय मंत्री महोदयांनी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये उत्तर दिले की, एफ.सी.आय. ने 7 लाख क्षमतेचे गोडाऊन बांधण्याचे ठरविलेले आहे. त्याला 50 टक्के सबसिडी आहे आणि आम्ही ही गोडाऊन 10 वर्षासाठी भाड्याने घेणार, याबाबत एफ.सी.आय.हमी देते. मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, मी काही चुकीचे बोललो काय ? काल माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर याच स्वरुपाचे होते. या गोडाऊनच्या कामासाठी एफ.सी.आय.ने तीन वेळा टेंडर्स काढली आणि प्रत्येक वेळी ती पुढे नेलेली आहेत.परंतु आज उत्पादन केलेला माल उघड्यावर पडून आहे. तो पावसात भिजत आहे, उन्हामध्ये पडून आहे आणि गोडाऊन नाही अशी स्थिती आहे. या बाबतीत एफ.सी.आय.कधी कार्यवाही करणार हे आम्हाला माहिती नाही. माननीय मंत्री महोदयांनी एफ.सी.आय.ला विनंती करावी, त्यांच्याबरोबर बैठक घ्यावी.परंतु त्याचबरोबर राज्य शासनाने देखील यासाठी वेगळी योजना तयार करावी अशी मी पूरक मागण्यांच्या निमित्ताने मागणी करीत आहे. केंद्र सरकारची 50 टक्के सबसिडी आणि राज्य शासनाची सबसिडी 25 टक्के असेल तर याबाबतीत आपल्याला वेगळे धोरण ठरवावे लागेल.

यानंतर कु.थोरात . . . .

SMT/ AKN/ MMP/ प्रथम सौ. रणदिवे.... 14:30

श्री. जयंत प्र. पाटील....

तर या ठिकाणी वेगळे धोरण शासनाला ठरवावे लागेल तरच या ठिकाणचा शेती उत्पादन केलेला माल आपण सुरक्षित ठेवू शकतो म्हणून या संदर्भात त्याचे एक वेगळे धोरण या अधिवेशनाच्या निमित्ताने राज्य शासनाने जाहीर करावे, अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाची बाब क्रमांक 6, पान क्रमांक 3 वर मी बोलू इच्छितो. सभापती महोदय, रायगड जिल्ह्यातले मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. भोसले यांनी ग्रामसेवकांच्या भरतीमध्ये उघड-उघड 8 ते 15 लाख रुपये घेतले. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी त्याला आक्षेप घेतला, तेव्हा "आमचे कोणी वाकडे करु शकत नाही" असे तो म्हणाला. रायगड जिल्हा हा इतर जिल्हयांपेक्षा वेगळा जिल्हा आहे हे सभापती महोदय, आपल्याला माहीत आहे. आम्ही त्या ठिकाणी वेगळी भूमिका घेतली आणि डीपीडीसीच्या बैठकीमध्ये त्या संदर्भात जाब विचारला. या भरतीच्या संदर्भात आम्ही कोर्टात गेलो, शासनाकडे दाद मागितली, परंतु शासनाने दाद दिली नाही. आता काल-परवा रायगडमधील ग्रामसेवकांची भरती रद्द करण्यात आली आहे. या भरतीमध्ये जवळ जवळ दोन ते तीन कोटी रुपयांचा भष्टाचार त्या ठिकाणच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने केला आहे. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष माझे बंधूच आहेत. ते माझ्यापेक्षा जास्त आक्रमक आहेत. त्यांनी त्याला त्यांच्या स्टाईलने जाब विचारला तसेच राज्य शासनाकडे तक्रार केली, आयुक्तांकडे अपील केले त्यावेळी सचिवांच्या महासंघाने जाणीवपूर्वक एक पत्र दिले. या राज्यामध्ये आणि देशामध्ये लोकशाही आहे. आपल्यावर कुठलीही फिर्याद दाखल केली तर वकील देण्याचा नियम आहे. आयुक्तांकडे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष स्वत: गेले. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांना राज्यमंत्र्यांचा दर्जा शासनानेच दिलेला आहे. पण आयुक्तांनी असे सांगितले की, तुम्हाला वकील देता येणार नाही. मी तुमचा वकील नाकारतो. तुम्ही तुमचे म्हणणे द्या. सभापती महोदय, राज्य शासन आदिवासींचा आणि अनुसूचित जातींच्या लोकांचा उध्दार करायला निघाले आहे. एखादा ठाकूर-कातकरी जातीचा जिल्हा परिषदेचा अध्यक्ष झाला तर तो स्वत:ची बाजू मांडू शकतो काय? तो आपली स्वत:ची बाजू मांडू शकत नाही. म्हणून आम्ही या संदर्भात हायकोर्टात गेलो. हायकोर्टाचा निकाल कालच लागला आणि वकील दिला पाहिजे अशा प्रकारची ऑर्डर मिळाली आहे. मंत्री सांगत असतील त्याप्रमाणे तेथील अधिकारी वागत असतील तर ते बरोबर नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील......

सभापती महोदय, घटनेच्या 73 व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने पंचायत राज व्यवस्थेला आपण पूर्ण अधिकार द्यावयास मागतो. रायगड जिल्हा परिषदेमध्ये श्री. भोसले यांनी दोन ते तीन कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे पण आता त्याठिकाणी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, ज्यांची भरती झाली होती आणि ज्यांनी पैसे दिले होते ते सर्वजण ग्रामसेवक जिल्हा परिषदेच्या दारात येऊन आमचे पैसे द्या अशी मागणी करीत आहेत. अशा प्रकारे राज्य शासनाचे धिंडवडे या ठिकाणी निघत आहेत. याची सखोल चौकशी होऊन संबंधितावर कारवाई झाली पाहिजे आणि त्या ठिकाणी जी बेकायदेशीर भरती झालेली आहे त्याची पुनरावृत्ती होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे, अशी मी या पूरक मागण्यांच्या निमित्ताने मागणी करतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

----

**तालिका सभापती ( श्री. रमेश शेंडगे )** : सर्व सन्माननीय सदस्यांना पुन्हा एकदा विनंती आहे की, आपल्याला आज पुरवणी मागण्यांवरील चर्चा संपवून अशासकीय कामकाम करावयाचे आहे. त्या नंतर गिरणी कामगारांच्या प्रश्नाच्या बाबतीत चर्चा करावयाची आहे व हे सर्व कामकाज सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत संपवावयाचे आहे. त्या मुळे सर्व सन्माननीय सदस्यांनी कमी वेळात आपले भाषण पूर्ण् केले तर बरे होईल.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मला गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 16 वरील बाब क्रमांक 15 व 16 च्या संदर्भात बोलावयाचे आहे. या सगळ्या मागण्यांमध्ये पोलीस प्रशिक्षण विद्यालयांसाठी तरतुदी केलेल्या आहेत पण ज्या प्रमाणात दिवसेंदिवस गुन्हेगारी किंवा आतंकवादाचे स्वरुप बदलत चालले आहे त्याला अनुसरुन या ठिकाणी जी तरतूद केलेली आहे त्यापेक्षा अधिकची तरतूद करावयास पाहिजे आणि त्याप्रमाणे यामध्ये दुरुस्ती केली पाहिजे. दुसरी बाब अशी की, न्याय सहाय्यक विज्ञान प्रयोगशाळेतील पुरवठा आणि सामुगी यामध्ये आवश्यक असलेल्या बांधकामासाठी आता जी तरतूद केलेली आहे त्यापेक्षा अधिकची तरतूद करण्याची गरज निश्चितपणे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला अन्न व नागरीपुरवठा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 154 वरील बाब क्रमांक 157 बाबत बोलावयाचे आहे. यामध्ये अन्न साठवण आणि वखार साठवण या संदर्भातील पुरवणी मागणी आहे. माझ्या माहितीप्रमाणे माननीय श्री. शरद पवार यांच्याकडे हे खाते असताना त्यांनी महाराष्ट्रामध्ये या साठवणुकीसाठी आणि वखारीसाठी मोठ्या प्रमाणावर प्रगती व्हावी म्हणून काही पावले उचलली होती. एफ.सी.आय. बरोबर आपला जो पत्रव्यवहार झाला किंवा दोन तीन वेळा टेंडर्स काढण्याच्या बाबतीत जो प्रकार आहे त्यामध्ये अधिकचे लक्ष देऊन आपण महत्वाचे एक तत्व मान्य केले पाहिजे की, आपल्याकडे उत्पादित होणारे सर्व धान्य आपल्याला साठविता येईल इतक्या क्षमतेची साठवणुकीची व्यवस्था आपल्याकडे असावयास पाहिजे. त्यामुळे यासाठी गरज वाटल्यास अधिकची तरतूद करावी अशा पध्दतीची मागणी मी या निमित्ताने करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी विधी व न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 131 वरील बाब क्रमांक 124 बाबत बोलणार आहे. पुणे न्यायालयातील वकिलांची आणि विशेषत: बार असोसिएशनची अत्यंत दयनीय अवस्था आहे. त्या ठिकाणी लोकांना बसण्यासाठी जागा नाही, फर्निचर नाही. पुण्यातील बार असोसिएशन आणि वकिलांसाठी वातानुकूलित व्यवस्था करण्याची गरज आहे. त्याचबरोबर डिजीटल केस डिस्प्ले यंत्रणा कार्यान्वित करण्याची अतिशय गरज आहे. कारण जे अनेक खटले प्रलंबित असतात त्याची माहिती लोकांना मिळण्याच्या दृष्टीने अशा प्रकारची व्यवस्था करणे महत्वाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला विधी व न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 135 वरील बाब क्रमांक 132 बाबत बोलावयाचे आहे. पुणे येथे सी.बी.आय.च्या विशेष न्यायालयाची स्थापना करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण सी.बी.आय. च्या अनेक केसेस प्रलंबित आहेत. त्यांचा लवकरात लवकर निकाल लागण्याच्या दृष्टीने त्याची आवश्यकता आहे. पुणे हे पश्चिम महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्वाचे केंद्र आहे.

सभापती महोदय, यानंतर मी सामाजिक न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 159 वरील बाब क्रमांक 163 बाबत बोलणार आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी इयत्ता 11वी पासून पदवीपर्यंतची जी शिष्यवृत्ती असते ती दोन दोन वर्षे मिळत नाही. शिष्यवृत्ती प्रलंबित असते. काही सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, चार वर्षापासून शिष्यवृत्ती प्रलंबित आहे. त्या निधीची तरतूद लवकरात लवकर करण्यात यावी. सभापती महोदय, आपल्या आदेशाप्रमाणे या दोन बाबी मांडून मी माझे भाषण संपवितो.

---

..3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ AKN/ MMP

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम प्रथम मी गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 20 वरील बाब क्रमांक 17 बाबत बोलणार आहे. हा विषय सामाजिक न्याय खात्याचाही आहे आणि गृह खात्याचा सुध्दा आहे. अमरावती येथे उत्तम जगलुजी गवई या व्यक्तीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलितमित्र पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार कसा देण्यात येतो या बाबत शासनाचे काही निर्णय आहेत. ते निर्णय वाचून दाखविण्याची गरज नाही. कारण शासनाने अधिकृतपणे ते जाहीर केलेले आहेत. त्याला गुन्हेगारी पार्श्वभूमी असता कामा नये.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

श्री.गवई यांना गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे की नाही याबद्दल मी संबंधित पोलीस प्रमुखांना विचारले होते. अमरावतीचे पोलीस आयुक्त श्री.अमितेशकुमार यांनी श्री.गवई यांना उत्तम चारित्र्याचे प्रमाणपत्र स्वत:च्या सहीने दिलेले आहे. माहितीच्या अधिकाराखाली मिळविलेली त्याची प्रत माझ्याकडे आहे. त्यांनी असे नमूद केले आहे की, "श्री.उत्तम जगलुजी गवई, विलासनगर, अमरावती यांनी चारित्र्याचा दाखला मिळण्यासाठी अर्ज केला होता. त्यांचे चारित्र्य पूर्व वृत्तांतानुसार चौकशी करण्यात आली असून त्यांचेविरुध्द आजपावेतो म्हणून 10.2.2011 पर्यंत पोलीस आयुक्तालयामध्ये फौजदारी गुन्ह्याची आक्षेपार्ह नोंद आढळून आलेली नाही." पोलीस आयुक्त अशा प्रकारचा दाखला देतात. तशाच प्रकारची माहिती माहितीच्या अधिकाराखाली तुरुंग अधिकाऱ्यांकडे मागण्यात आली होती. तुरुंग अधिकारी कार्यालयातील शासकीय माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त, राजारामपेठ यांनी माहिती दिली आहे. त्यात असे नमूद केलेले आहे की, पोलीस ठाणे, राजारामपेठ यांच्याकडून माहिती उपलब्ध झाली असून श्री.उत्तम गवई व त्यांच्या सहकाऱ्यांवर 1989 साली अपक्र.411/8, कलम 226, 302, 34, भा.दं.वि.147, 148 व 149 प्रमाणे गुन्हा दाखल असून दाखल गुन्ह्याची माहिती क्राईम रजिस्टर उताऱ्यावरुन सोबत जोडलेली आहे. सभापती महोदय, श्री.अमितेशकुमार यांनी श्री.गवई यांचेविरुध्द कोणत्याही फौजदारी गुन्ह्याची नोंद नसल्याचा दाखला दिला आहे आणि राजारामपेठच्या पोलीस स्टेशनने मात्र त्यांच्याविरुध्द कलम 302 चा गुन्हा नोंदविला असल्याचे म्हटले आहे. म्हणजे खुनाचा आरोप असलेला हा गुन्हेगार आहे असे या पत्रावरुन दिसते.

सामाजिक न्याय विभागाकडून हा पुरस्कार कशाच्या आधारावर दिला जातो याची माहिती माहितीच्या अधिकाराखाली मागितली होती. या विषयी गृह खात्याने उत्तर द्यावयाचे की, सामाजिक न्याय विभागाने द्यावयाचे ते ठरविण्यात यावे. गृह खात्याच्या संबंधित अधिकाऱ्याविरुध्द कारवाई झाली पाहिजे. जर कलम 302 नुसार खुनाचा आरोप असलेल्या गुन्हेगाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नाही अशा प्रकारचे प्रमाणपत्र दिले असेल तर ही बाब गंभीर आहे. म्हणजे त्यांनी त्या खात्याची दिशाभूल केली असा त्याचा अर्थ होतो. दलित मित्र

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

पुरस्कारासाठी, शेतमजूर, शेतकरी बांधव, दलित पँथर चळवळ, राजकीय चळवळ कोतवाली संघटना सक्रिय सहभाग, साप्ताहिक उपेक्षित, कोतवाली संपादक, आंबेडकर या सर्व चळवळींमध्ये या सद्गृहस्थाने भाग घेतला होता या माहितीच्या आधारे त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. तुरुंग अधिकाऱ्यांकडून माहिती मागविली होती, ती सुध्दा माहितीच्या अधिकाराखाली मिळालेली आहे. त्यात त्यांनी असे म्हटलेले आहे की, बंदी क्रमांक 2075 म्हणजे तो जेलमध्ये होता. "राजू गवई, बंदी क्रमांक 2076, उत्तमराव जंगलुजी गवई बंदी क्रमांक 2077, नाना वानखेडे या बंद्यांचे रजिस्टर क्र.3 व 4 तपासले असता सदर रजिस्टर जीर्ण झाले असून ते हाताळता येत नाही. तसेच रजिस्टर क्र.4 मधील क्र.4 वर वरील दोन बंदी 6.4.2002 व तिसरा बंदी 7.4.2002 रोजी कारागृहातून सुटले आहेत. सदर बंद्यांबाबत आतील बंद्यांकडे विचारणा केली असता बंदी हे उच्च न्यायालयाने दिलेल्या जामीनावर सुटका करुन गेलेले आहेत" असे त्यांनी सांगितले. अशा प्रकारे सामाजिक न्याय विभागाकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार एका गुन्हेगाराला दिला गेला आहे. माझ्यासमोर गवई हा विषय नाही. प्रशासन कसे चालू आहे ते मला दाखवावयाचे आहे. त्यांनी मी हे हे काम केलेले आहे, त्यामुळे मला पुरस्कार द्यावा अशी मागणी केली होती. छाननी करणाऱ्या यंत्रणेतील हे दोष आहेत. सरकार कसे चालत आहे त्याचे हे दिग्दर्शन आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ AKN/ पूर्वी श्री. खंदारे 14:45

श्री. दिवाकर रावते...

संसदीय कार्यमंत्र्यांच्या खात्याविषयी बोलायचे झाले तर त्याबाबतीत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन पक्षातील वाद विकोपाला गेलेले आहेत. संसदीय कार्यमंत्री हे काँग्रेस पक्षाचे आहेत आणि संसदीय कार्य राज्यमंत्री हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आहेत. संसदीय कार्यमंत्री श्री. हर्षवर्धन पाटील हे रुग्णालयात असल्यामुळे मी त्यांना भेटायला जाणार आहे. संसदीय कार्यमंत्री हे रुग्णालयात असल्यामुळे ते सभागृहामध्ये येऊ शकणार नाहीत. परंतु संसदीय राज्यमंत्री मंत्रिमंडाळामध्ये आहेत ना ? त्यांनी अधिवेशनामध्ये काम सांभाळले असते. परंतु मंत्र्यांचे अधिकार राज्यमंत्र्यांकडे देण्याची तयारी काँग्रेस पक्षाने दाखविली नाही. महसूल मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांच्याकडे संसदीय कार्य विभागाचा प्रभारी कार्यभार देण्यात आला. 8-10 दिवस देखील राज्यमंत्र्यांकडे कार्यभार सोपविला नाही. ही मंत्रिमंडळाची कोणती सुसंस्कृती आहे? संसदीय कार्यमंत्री हे मोठी उलाढाल करणारे पद नाही. राष्ट्रवादीच्या राज्यमंत्र्यांवर यांचा विश्वास नाही...(अडथळा)... मी आमच्या पक्षामध्ये ज्येष्ठ आहे आणि अधिकृत घटनेत आहे.. कायदा आणि सुव्यवस्थेवर आमच्या बाजूने सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे बोलणार आहेत.

श्री. बाळासाहेब थोरात : माझ्याकडे प्रभारी कार्यभार दिला यामध्ये चुकीचे काही नाही. दोन संसदीय कार्य मंत्री आहेत. आमच्याकडे कोणताही वाद नाही. विरोधी पक्षाला कामकाजामध्ये मदत व्हावी म्हणून माझ्याकडे प्रभारी कार्यभार देण्यात आलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी सांगितले की पुण्यामध्ये सीबीआय कार्यालय आणावे. त्यांचा रोख कुठे आहे ? श्री. कलमाडी हे तर दिल्लीमध्ये आहेत. त्यांचा रोख लवासावर की अन्य कुणावर आहे ?

सभापती महोदय, या संदर्भात संबंधित अधिका-यांनी जे काही दिलेले आहे त्याची निश्चितपणे चौकशी झाली पाहिजे. हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. सभागृहामध्ये बॉम्बस्फोटाची चर्चा झाली, व्यक्ती मृत्यू पावत आहेत, जखमी होत आहेत. आपण व्हिसेरा बंगळुरु येथील फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठवितो. आपल्याकडील फॉरेन्सिक लॅबमध्ये 306 पदे रिक्त आहेत. आपल्या राज्यामध्ये फॉरेन्सिक लॅब विषयात पास झालेले मराठी विद्यार्थी आहेत. त्यांची फॉरेन्सिक लॅबमध्ये भरती करावी. ते माननीय गृहमंत्र्यांच्या सतत संपर्कात आहेत. ते गृहविभागाच्या सचिवांना देखील

..2..

श्री. दिवाकर रावते....

भेटलेले आहेत. या महाराष्ट्रामध्ये फॉरेन्सिक लॅब प्रबळ करण्याच्या दृष्टीने या क्षेत्रातील ज्ञान असलेले जे जे विद्यार्थी आपल्या राज्यात आहेत त्यांना त्वरित सेवेमध्ये समाविष्ट करुन घ्यावे. हे सर्व विद्यार्थी गृहमंत्री महोदय श्री. आर.आर.पाटील यांना भेटले असून त्यांच्याकडे त्यांनी अर्जही दिलेले आहेत, नसेल तर आम्ही त्यांना माहिती देऊ. हे सर्व महाराष्ट्रातील चांगले ज्ञान घेतलेले मराठी विद्यार्थी आहेत. या विद्यार्थ्यांना सेवेत सामावून घेऊन आपल्याकडील लॅब अद्यावत कराव्यात. आयुक्तालयातील कोणाची बदली कुठे करायची हा वेगळा विषय आहे. मला डॉक्टरांनी सांगितले की, फॉरेन्सिक लॅबकडून 7-7 वर्षापासूनचे रिपोर्ट प्रलंबित आहेत. अशी परिस्थिती असेल तर पोलीस तपास योग्य दिशेने होणार नाही. याचा परिणाम तपासावर झालेला आहे. योग्य रीतीने पुरावे सादर करता न आल्यामुळे निकाल 7 ते 8 टक्कयावर आलेला आहे. या उणिवा आहेत. याबाबतीत कुणाला दोष द्यायचा ? पोलिसांना दोष द्यायचा काय ? तेव्हा आपण अत्यावश्यक सुविधा उपलब्ध केल्या नाहीत तर 5 हजार पोलीस भरती करुन देखील काही उपयोग होणार नाही. पोलिसांनी गुन्हे शोधल्यानंतर त्याबाबतीत प्रबळ पुरावे देण्यासाठीची व्यवस्था निर्माण होणार नसेल तर गुन्हेगार सुटतच रहातील. माझी माननीय गृहमंत्री महोदयांना विनंती आहे की, 5 हजार पोलिसांऐवजी 4 हजार पोलिसांची भरती करुन एक हजार पोलिसांवर होणार खर्च अशा गरजेच्या गोष्टी करण्यासाठी खर्च करा. तेव्हा फोरॅन्सिक लॅबच्या संदर्भात तातडीने दखल घ्यावी अशी शासनाला विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ AKN/ 14:50

प्रा.दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या पूरक मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सामाजिक न्याय, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग कल्याण पृ.क्र.159, बाब क्र.163 अन्वये मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या मॅट्रिकोत्तर शिक्षण व परीक्षा शुल्क प्रदान करण्यासाठी रु.79.63 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मागील 3-4 वर्षापासूनची शिष्यवृत्तीची रक्कम देण्यासाठी तरतूद केली पाहिजे.

बाब क्र.164 अन्वये अनुसूचित जातीच्या मुलांसाठी व मुलींसाठी नवीन शासकीय निवासी शाळा सुरु करण्यासाठी रु.13.14 कोटीची तरतूद केली, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, सहकार विभाग पृ.क्र.276, बाब क्र.229 अन्वये गट पातळीवरील ग्रामीण कारागिरांच्या बहुउद्देशीय सहकारी संस्थांसाठी केलेली तरतूद अतिशय अपुरी आहे, ही तरतूद वाढवून मिळावी अशी मी मागणी करतो. बाब क्र.231 अन्वये कृषी प्रक्रिया संस्थांना भाग भांडवली अंशदान देण्यासाठी व काजू प्रक्रिया युनिटसाठी 8 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. याच पध्दतीने इतर कृषी उत्पादनासाठी देखील तरतूद करण्यात यावी अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, महसूल व वन विभाग, पृ.क्र.30, बाब क्र.43 वर मालेगाव येथे गुन्हेगारांनी जीवे मारलेल्या दिवंगत यशवंत सोनावणे यांच्या कुटुंबीयांना सहाय्य म्हणून रु.25 लाखाची तरतूद करण्यात आली आहे. तसेच जर्मन बेकरी, पुणे येथील बॉम्बस्फोटात जखमी झालेल्यांच्या वैद्यकीय देयकाची प्रतिपूर्ती करण्यासाठी रु.82.60 लाखाची तरतूद करण्यात आली आहे. आपदग्रस्त जखमींसाठी तशा प्रकारची तरतूद करण्यात यावी.

सभापती महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, पृ.क्र.299, बाब क्र.271 अन्वये राष्ट्रीय ग्रामीण पिण्याचे पाणी कार्यक्रमांतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द कुटुंबांना वैयक्तिक पाणी पुरवठा नळ जोडण्या देण्यासाठी रु.57 कोटीची तरतूद करण्यात आली आहे. परंतु एस.सी., एस.टी. प्रवर्गातील कुटुंबाच्या तांडयांमध्ये व वस्त्यांमध्ये पाणी साठविण्यासाठी बैठ्या टाकीचे बांधकाम करण्याकरिता तरतूद करण्यात यावी, अशी मी शासनाला विनंती करतो.

पृ.क्र.155, बाब क्र.159 अन्वये अन्न व नागरी पुरवठा विभागाने भारत सरकारच्या सहाय्याने राज्यातील शाळांमध्ये ग्राहक क्लब स्थापन करण्यासाठी रु.45 लाखाचा हिस्सा देण्यासाठी तरतूद केली आहे, त्याबद्दल शासनाला धन्यवाद देतो.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.दिलीपराव सोनवणे

वैद्यकीय शिक्षण विभाग पृ. क्र. 257, बाब क्र. 210 अन्वये शिष्यवृत्त्या व विद्यावेतने देण्यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यात आली आहे. त्याबद्दल शासनाला धन्यवाद देतो.

आदिवासी विकास विभाग पृ.क्र.262, बाब क्र.213 अन्वये जनजाती क्षेत्र उप योजनेंतर्गत माध्यमिक शाळांच्या शिक्षकांना वेतनाची थकबाकी देण्यासाठी रु.7.64 कोटीची तरतूद करण्यात आली आहे. याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. बाब क्र.214 अन्वये जनजाती क्षेत्र उप योजनेंतर्गत गडचिरोली येथे गोंडवाना विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी रु.5 कोटीची तरतूद करण्यात आली आहे त्याबद्दल शासनाला धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या पूरक मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

पृ.क्र.9, बाब क्र.11 वर सामान्य प्रशासन विभागाने मिहान प्रकल्पासाठी 200 कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केलेली आहे. मिहान प्रकल्प का रखडला आहे तेच कळून येत नाही. प्रकल्पामुळे विकास होतो, आर्थिक सुबत्ता येते असे म्हटले जाते. 4025 हेक्टर जमीन शासनाने या प्रकल्पासाठी अधिग्रहित केली होती. शेत जमिनीशिवाय राहती घरे देखील संपादित करण्यात आली होती. विकास झाला तर त्याची फळे चाखायला मिळतील या आशेवर नागपूरमधील खापरी, फुलकुही, दहेगाव गावातील बहुतांश शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या होत्या. विकास तर दूर राहिला, परंतु राष्ट्रीय पुनर्वसन धोरण कायद्याप्रमाणे मिहान प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याच्या कामाला प्रचंड दिरंगाई होत आहे. शासनाने जमीन संपादन करण्यास सुरुवात केली त्यावेळी 9 लाख रुपये प्रती एकर भाव देण्याचे मान्य करण्यात आले. दीड वर्षानंतर दीड लाख रुपये प्रती हेक्टर भाव देण्याचे शासनाने निश्चित केले. पहिल्यांदा एकरी 9 लाख रुपये भाव कबूल केला आणि नंतर 1.5 लाख रुपये द्यायचे घोषित केल्यामुळे भूसंपादनामध्ये अडचणी येत आहेत. महापालिकेने ठरवून दिलेला 9 लाख रुपये प्रती एकर भाव मिळणे गरजेचे होते.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .......

या शेतकऱ्यांवर अन्याय होत असताना हैद्राबाद येथील उद्योगपती श्री. राव यांची जागा प्रकल्पाला गरज असतानाही संपादन क्षेत्रातून वगळण्यात आली. त्यामुळे श्री. राव या उद्योगपतीला 150 कोटीचा फायदा होणार आहे. पण त्याच वेळी शेतकऱ्यांवर मात्र प्रचंड अन्याय होत आहे. तसेच त्याचबरोबर शेतकऱ्यांना संपादित जमिनीचा त्वरित पैसा उपलब्ध होणे गरजेचे आहे. याकरिता 200 कोटी रुपये एवढे अनुदान उपलब्ध करुन दिले त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. पण तेथील संपादित जमिनीचा विचार केला तर ही रक्कम खूपच कमी आहे. पूर्ण जमीन संपादनासाठी एकंदरित 600 कोटीची गरज आहे. तरी हा निधी शासनाने लगेच उपलब्ध करुन द्यावा.

महोदय, बाब क्र. 14 व 17, पृ.क्र. 16 व 20 च्या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, या बाबीद्वारे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना सुधारित वेतनश्रेणी व विशेष सरकारी अभियांक्तांची देयके प्रदान करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. पण सरकारी अभियोक्ते सरकारची बाजू मांडताना खूपच तोकडे पडतात हे नुकतेच जाहीर झालेल्या आकडेवारीवरुन लक्षात आले आहे. सन 2009 मध्ये महाराष्ट्राचे कोर्टात गुन्हे शाबीत होण्याचे प्रमाण इतर राज्यांच्या मानाने फारच कमी होते. हे प्रमाण देशातील उत्तराखंड 69 टक्के, राजस्थान 60.7 टक्के, तामिळनाडू 62.01 टक्का, केरळ 57 टक्के, उत्तर प्रदेश 54 टक्के आणि आपल्या राज्याचे अत्यल्प म्हणजेच 10.12 टक्के असे होते. उत्तमात उत्तम वकील दिमतीला असताना सुध्दा सन 2009 साली गुन्हे शाबीत होण्याचे प्रमाण अत्यल्प राहिले होते. तरी याबाबतीत त्वरित योग्य ती सुधारणा करावी व गुन्हेगारांना शिक्षा व्हावी अशी या निमित्ताने माझी मागणी आहे.

महोदय, बाब क्र. 23, पृ.क्र. 21 - गृह विभागाच्या या मागणीच्या अनुषंगाने मी शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, न्याय सहाय्यक प्रयोगशाळेतील रसायनांची खरेदी करण्यासाठी निधीची मागणी करण्यात आली. या रसायनांची योग्य हाताळणी करुन गुन्हेगारांपर्यंत पोहचण्यासाठी योग्य ते निष्कर्ष काढणारे कर्मचारीच न्याय प्रयोगशाळेत नाहीत. हा मुद्दा येथे मांडण्यात आलेला असल्याने त्याची पुनरावृत्ती मी करणार नाही. पण नुकतीच माहिती मिळाल्यामुळे जी 315 पदे फोरेन्सिक लॅबमध्ये रिक्त आहेत ती ताबडतोब भरली पाहिजेत. याचाच परिणाम म्हणून की काय आज व्हिसेरा चाचणीची 11 हजार, डीएनए चाचणीची 500 व बॅलिस्टिकची 400 प्रकरणे प्रलंबित आहेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ........

महोदय, बाब क्र. 31-32, पृ.क्र.32 या माध्यमातून माझी अशी मागणी आहे की, मध्यवर्ती व जिल्हा कारागृहासाठी निधीची तरतूद केली पण जिल्हा कारागृहातील बरेच कैदी फरार झाल्याची बाब नुकतीच उघडकीस आली आहे. राज्यातील तब्बल 21 हजार आरोपी फरार असून पोलिसांना त्यांचा शोधच लागला नसल्याची धक्कादायक बाब एका याचिकेच्या सुनावणीच्या वेळेस न्यायालयाच्या समोर आली होती. याची गंभीर दखल घेत न्यायालयाने पोलीस यंत्रणेला चांगलेच धारेवर धरले होते. फरारी आरोपींचा शोध घेण्यासाठी तुरुंग महानिरीक्षक, गृह विभागाचे सचिव, सीआयडी विभागाचे प्रमुख यांची समिती स्थापन करुन आरोपीना लवकरात लवकर अटक करावी आणि तसा अहवाल सादर करावा असा आदेश गेल्या सुनावणीच्या वेळेला देण्यात आला होता. न्यायाधीश अजर खानविलकर आणि न्यायमूर्ती गाणू यांच्या खंडपीठासमोर याचिकेवर सुनावणी झाली. यावेळी राज्य सरकारने आपला अहवाल सादर करुन फरारी 21 हजार आरोपींपैकी गेल्या काही महिन्यात राज्यातील 1482 आरोपींना पकडण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले. पकडण्यात आलेले आरोपी फरार आरोपींच्या तुलनेत बरेच कमी असल्याने या परिस्थितीत सुधारणा करावी व जनतेच्या सुरक्षेत भर घालावी अशी मागणी या निमित्ताने मी करीत आहे.

यानंतर बाब क्र.44, पृ.क्र. 32, महसूल व वन विभागाच्या मागणीच्या संदर्भात मला असे सूचित करावयाचे आहे की, पुणे येथील जर्मन बेकरी बॉम्बस्फोटात जखमी झालेल्या व्यक्तींच्या वैद्यकीय देयकांची प्रतिपूर्ती करण्यासाठी या बाबीद्वारे रक्कम मंजूर करण्यात आली आहे. फेब्रुवारी, 2010 मध्ये हा स्फोट झाल्यानंतर त्यांच्या वैद्यकीय देयकाची प्रतिपूर्ती करण्यासाठी 15 महिन्यांचा कालावधी लागावा ही खेदजनक बाब आहे. किमान यापुढे तरी या परिस्थितीत सुधारणा झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. दि. 13 जुलै, 2011 रोजीच्या मुंबईतील बॉम्बस्फोटातील जखमींच्या वैद्यकीय देयकांची त्वरित प्रतिपूर्ती करण्यात यावी अशी मागणी करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

सभापती महोदय, बाब क्रमांक 71, पृष्ठ क्रमांक 49, अकोला महानगरपालिकेतील कर्मचा-यांच्या वेतनाकरिता शासनाने 16 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे परंतु अकोला महानगरपालिकेतील काही भ्रष्ट अधिका-यांना प्रशासनाने संरक्षण दिल्यामुळे त्यांच्यावर काहीही कारवाई होत नाही. अकोला महानगरपालिकेत मिश्रक या पदावर कार्यरत असलेले श्री. आर.पी. घनबहादूर यांच्या तांत्रिक पदाला पदोन्नतीचे कोणतेही पद उपलब्ध नसतांना त्यांना सहाय्यक जकात अधीक्षक, लेखापाल, सहाय्यक आयुक्त या पदावर नियमाचे उल्लंघन व अनियमितता करुन चुकीच्या पध्दतीने अतांत्रिक पदावर पदोन्नत्या देण्यात आल्या आहेत. श्री. घनबाहदूर हे वरिष्ठ पदास पात्र नसतांनाही त्यांना नियमबाहय वेतनश्रेणी देऊन आर्थिक फायदे देण्यात आले आहेत. श्री. घनबाहदूर यांना नियमबाहय पदोन्नती देण्यात आल्यामुळे अकोला महानगरपालिकेतील पदोन्नतीस पात्र असलेल्या अनेक कर्मचा-यांनी या प्रकरणी न्यायालयात दाद मागितली आहे. असे असतांनाही तांत्रिक पदावरील कर्मचा-यास नियमबाहयरित्या अतांत्रिक पदावर देण्यात आलेल्या पदोन्नत्या चुकीच्या पध्दतीने देण्यात आल्यामुळे या पदोन्नत्या रद्द कराव्यात अशी मागणी अकोला महानगरपालिकेच्या नगरसेवकांनी, पदाधिका-यांनी तसेच कर्मचारी संघटनेने शासनाकडे केलेली आहे. तरी या प्रकरणी त्वरित कारवाई करण्यात यावी अशी मागणी मी या पुरवणी मागणी वरील चर्चेद्वारे करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 130, पृष्ठ क्रमांक 134, मिरज हे शहर ऐतिहासिक शहर असून या ठिकाणी ब-याच वर्षापूर्वी दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर प्रथम वर्ग दंडाधिकारी ही न्यायालये कार्यरत आहेत. मिरज येथील न्यायालयात विशेष करुन ग्रामीण भागातील जनतेची दिवाणी दावे प्रलंबित असून फौजदारी खटल्यांची संख्या ग्रामीण पोलीस ठाण्यांतर्गत जास्त प्रमाणात आहे. मिरज शहरांतर्गतही बरेचसे न्यायालयीन कामकाज प्रलंबित असून जनतेला सुनावणीसाठी 40 ते 50 कि.मी. अंतरावरुन यावे लागते. मिरज तालुक्यातील दावे व फौजदारी केसेस यांची संख्या जास्त असल्याने तेथे दिवाणी वरिष्ठ स्तर व अतिरिक्त जिल्हा न्यायालय स्थापन करण्याची मागणी दि मिरज ॲडव्होकेट बार असोसिएशनने गेल्या 20 वर्षापूर्वी मुंबई हायकोर्टाकडे केलेली आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

तरी या प्रकरणी त्वरित कार्यवाही करावी अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 148, पृष्ठ क्रमांक 144 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. या बाबीमध्ये लघू, मध्यम व मोठया उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. ही बाब निश्चितच योग्य आहे. परंतु महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील काही अधिकारी हे व्यापा-यांशी संगनमत करुन औद्योगिक परिसरातील भूखंडाचे चुकीच्या पध्दतीने वाटप करीत आहेत. अहमदनगर जिल्हयातील एक उदाहरण मी आपण देऊ इच्छितो.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने विकसित केलेल्या औद्योगिक क्षेत्रातील मोकळया जागेच्या वाटपासाठी वृक्षारोपण/बागबगीचा/सुशोभिकरणासाठी दिनांक 31 जानेवारी, 2008 रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते. या परिपत्रकातील आदेश धाब्यावर बसवून अहमदनगर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिका-यांनी सन 2008 नंतर सुमारे 55 एकर भूखंडाचे वाटप भू माफियांना केले आहे. वितरित करण्यात आलेले हे भूखंड नियमित करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील भूमाफियांनी प्रयत्न सुरु केले असून हे भूखंड नियमित करण्यासाठी आवश्यक तो दंड न भरण्यासाठी दबावगट निर्माण केला आहे. अहमदनगर येथील या 55 एकर भूखंडाच्या दंडाची रक्कम कमीतकमी 12 कोटी व जास्तीत जास्त 48 कोटी रुपये आहे. परंतु ही रक्कम चुकविण्यामागेच या भूखंड माफियांचा कल आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

या बाबतची संपूर्ण चौकशी केली पाहिजे. 55 एकर जमीन भू भाफियाला दिली जात असेल आणि शासनाचा 48 कोटी रूपयाचा कर चुकविण्याचा प्रयत्न केला जात असेल तर ही गंभीर बाब आहे. ज्याने कोणी हे केले त्याची चौकशी करून त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला पाहिजे अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करतो.

यानंतर मी पान क्रमांक 210 वरील बाब क्रमांक 172 - आमदार स्थानिक विकास कार्यक्रमासाठी अतिरिक्त तरतूद करणे यावर बोलणार आहे. आमदार निधी बाबत नुकताच एक जी.आर.निघाला आहे. मागच्या वेळी देखील एक जी.आर.निघाला होता. शिवसेना पक्षाच्या, भारतीय जनता पक्षाच्या आमदाराने एखाद्या तालुक्यामध्ये, नगर परिषदेमध्ये, ग्रामपंचायतीमध्ये एखादे काम सुचविले असेल व त्या कामाला ना हरकत प्रमाणपत्र मिळाले नसेल तर ते काम तसेच रखडत राहते. तो निधी परत जातो. 100 टक्के बंजारा समाजाच्या तांडयासाठी 5 लाख रूपयाच्या सभागृहाचे काम मी प्रस्तावित केले होते. परंतु, तेथील काँग्रेसच्या सरपंचाने ना हरकत प्रमाणपत्र न दिल्यामुळे सभागृहाचे काम प्रशासकीय मान्यता मिळून, निधीची तरतूद करून देखील सुरू होऊ शकले नाही. आमदार हा व्यक्तिगत कामासाठी निधी खर्च करत नाही. ग्रामपंचायतीमध्ये राजकारण येत असेल तर आमदार निधी खर्चच होऊ शकत नाही. त्यामुळे जो जी.आर.आहे त्यामध्ये दुरूस्ती करावी. एखाद्या संस्थेने मग ती नगरपालिका असो, पंचायत समिती असो, ग्रामपंचायत असो त्यांनी 45 दिवसात ना हरकत प्रमाणपत्र दिले नाही तर त्या कामास त्या स्थानिक संस्थेची हरकत नाही व ना हरकत प्रमाणपत्र आहे असे समजण्यात यावे असा पूर्वी जी.आर.होता. पण तो बदलण्यात आला. नवीन जो जी.आर. आहे त्यात कुठल्याही प्रकारच्या सूचना दिलेल्या नाहीत. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमातील काम एखाद्या स्थानिक संस्थने अडविले तर 45 दिवसांचा अवधी देऊन त्यात त्यांनी ना हरकत प्रमाणपत्र दिले नाही तर त्या कामास अनुमती/परवानगी आहे असे गृहीत धरण्यात यावे असा प्रकारची सुधारणा जी.आर.मध्ये केली पाहिजे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

नवीन जी.आर.मध्ये आमदारांना शाळा खोल्या देण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. खाजगी संस्थांतील शाळांमध्ये खोल्या देण्यासाठी आमदार स्थानिक निधीच्या वापरास अनुमती देण्यात आली आहे. पण या जी.आर.मध्ये आणखी एक मुद्दा आहे. जो पर्यंत शाळा संस्थाचालक ती जमीन शासनाला हस्तांतरित करीत नाही तो पर्यंत तो निधी खर्च करता येणार नाही. एखाद्या आमदाराच्या मतदार संघात दोन शाळा खोल्या कमी आहेत व त्यांनी त्यासाठी आमदार स्थानिक विकास कार्यक्रमातून खोल्या घेण्यासाठी प्रस्तावित केले, पण जो पर्यंत तो संस्थाचालक ती जमीन सरकार दफ्तरी जमा करीत नाही तो पर्यंत निधी मिळणार नाही अशी तरतूद त्या जी.आर.मध्ये केली आहे. असे असेल तर मग शाळेच्या खोल्या कशा काय बांधून होतील? शाळेमध्ये विद्यार्थ्यांना बसण्याची सोय नाही, टीनटपऱ्यामध्ये विद्यार्थी बसत असतील अशा वेळी त्या आमदाराला विद्यार्थ्यांसाठी शाळा खोल्या उपलब्ध करून द्यायच्या असतील पण जमीन जो पर्यंत शासनाला हस्तांतरित होत नाही नाही तो पर्यंत शाळा खोल्या बांधल्या जाणार नाहीत. ती जमीन खाजगी मालकीची आहे. ती जमीन उद्या शासनाला हस्तांतरित केली तर त्या खोल्यांवर शासनाचा हक्क राहील म्हणून संस्थाचालक तसे करायला तयार नाहीत. जी.आर.मध्ये शाळा खोल्या बांधण्याच्या कामाचा समावेश आपण केला आहे, पण त्यातील अटींमध्ये दुरूस्ती होणे आवश्यक आहे. संस्थेला निधी उपलब्ध करून दिल्या नंतर त्या खोल्या शासकीय नियमाप्रमाणे बांधल्या गेल्या पाहिजेत, असे त्या जी.आर.मध्ये नमूद केले पाहिजे. सदर जमीन शासनाला हस्तांतरित करून देण्यात यावी अशी जमिनी संबंधात 8 (अ) ही अट आहे ती जाचक आहे.

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/ 15:10

श्री. पांडुरंग फुंडकर...

आमदारांना त्यांच्या मतदारसंघामध्ये हा निधी खर्च करता येत नाही. तेव्हा या ठिकाणी ही मागणी करीत असतांना निधीचे समतोल वाटप केले पाहिजे. आज भीक मागितल्यासारखे आमदारांना 15 लाख, 20 लाख रुपये अलॉट होतात. आपण आमदारांना त्यांच्या मतदारसंघातील विकास कामे करण्यासाठी निधी देण्याचे मान्य केले असतांना दर तीन महिन्यांनी 15 ते 20 लाख रुपये अलॉट केले तर कसे होईल? जोपर्यंत त्यांच्याकडे निधी येत नाही तोपर्यंत बांधकामे पूर्ण होत नाहीत. वर्षभरामध्ये 2 कोटी रुपयांचा निधी खर्च करावयाचा आहे. तो जर 31 मार्चपूर्वी खर्च झाला नाही तर लॅप्स होणार आहे, तो निधी लॅप्स होणार नाही अशाप्रकारची आपण तरतूद करावी.

सभापती महोदय, शासन निर्णयामध्ये असे म्हटले आहे की, स्थानिक विकास कार्यक्रमामधून घ्यावयाची कामे ग्रामीण भागातील असतील तर ती जिल्हा परिषदेच्या यंत्रणेला दिली पाहिजेत. नगरपालिकेच्या क्षेत्रातील कामे असतील तर ती नगरपालिकेच्या यंत्रणेला दिली पाहिजेत. आज जिल्हा परिषदांची अशी अवस्था आहे की, त्यांच्याकडे कामे करण्यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग नाही. नगरपालिकेमध्ये एखादा इंजिनिअर असतो तो कोणती कामे करणार आहे? नगरपालिकेची कामे पूर्ण होत नाहीत. कोणत्याही आमदारांच्या निधीचा विनियोग जिल्हा परिषद करु शकत नसल्यामुळे आपण ही अट घालू नका. आम्ही तेथील अधिकाऱ्यांना ही कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यास सांगितले तर अधिकारी ही कामे वर्ग करण्यास तयार नसतात. या करिता शासनाने या अटी शिथिल केल्या पाहिजे अशी माझी मागणी आहे. नाही तर महिन्याभरापूर्वी निघालेल्या नवीन शासन निर्णयाप्रमाणे आमदारांना आपल्या मतदारसंघामध्ये विकास कामे करणे कठीण होतील. ही मागणी करीत असतांना व या निधीचे वाटप करीत असतांना त्यामध्ये भेद भाव करता कामा नये. राज्याच्या सर्व विभागातील सर्व पक्षांच्या आमदारांना समान वाटप झाले पाहिजे अशा पध्दतीने या निधीचे वाटप करावे अशी मी या निमित्ताने मागणी करुन माझे भाषण संपवितो.

**तालिका सभापती (मोहन जोशी)** : सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, गिरणी कामगारांच्या महत्वाच्या प्रश्नावर आपल्याला 3 वाजून 45 मिनिटांनी चर्चा सुरु करावयाची आहे. ती चर्चा 3 वाजून 45 मिनिटांनी सुरु करावयाची असेल तर त्या पूर्वी मंत्रीमहोदयांच्या उत्तरासह ही चर्चा आपल्याला संपवावयाची आहे. या करिता सर्व सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण कमी वेळेमध्ये करुन मला सहकार्य करावे किंवा सन्माननीय सदस्यांनी मंत्री महोदयांकडे लेखी स्वरुपात सूचना दिल्या तरी चालतील.

29-07-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) TT 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, गेल्या अधिवेशनामध्ये एकाच दिवशी सर्व विभागांच्या मागण्या मान्य करण्यात आल्या होत्या. त्या प्रमाणे दोन्ही दिवसांच्या मागण्या एकत्रित जोडून घेऊन त्या सोमवारी मान्य करण्यात याव्यात. या गोष्टीला आमची मान्यता आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यापूर्वी अधिवेशनामध्ये एकाच दिवशी सर्व विभागाच्या मागण्या आपण मंजूर केल्या होत्या. अजून काही सन्माननीय सदस्यांची भाषणे झ ाल्यानंतर आपल्याला सोमवारी मागण्यांवरील चर्चा पूर्ण करता येईल. त्या दिवशी विधानसभेमध्ये गिलोटीन आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विधानसभेमध्ये गिरणी कामगारांच्या प्रश्नावर चर्चा होणार आहे आणि या सभागृहात देखील चर्चा होणार आहे. या चर्चेला सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे अशी आमची अपेक्षा आहे. विधानसभेतील चर्चेला उत्तर देण्यासाठी सन्माननीय मुख्यमंत्री थांबले असल्यामुळे या सभागृहात आले नाहीत असे होता कामा नये. त्या मुळे ही चर्चा आता सुरु करण्यात यावी अशी आमची मागणी आहे. तसेच, आपण मघाशी म्हटल्याप्रमाणे या चर्चेमध्ये आमच्या बाजूने मर्यादित सदस्य भाग घेणार आहेत. या चर्चेला सन्माननीय मुख्यमंत्री उत्तर देतील व त्यानंतर ते विधानसभेमध्ये जातील.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर व महत्वाचा विषय आहे. आपण सकाळपासून सर्व कामकाज घेतले आहे. आता मुंबईचा विषय आहे, मराठी माणसाचा विषय आहे, गिरणी कामगारांचा विषय आहे.

**तालिका सभापती** : साडे तीन वाजेपर्यंत जेवढे कामकाज होईल तेवढे आपण पूर्ण करु, आणि साडे तीन वाजता आपण चर्चा सुरु करु.

श्री. दिवाकर रावते : ठीक आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील सन्माननीय सदस्यांची भाषणे संपून मंत्रीमहोदयांची उत्तरे पूर्ण होणार असतील तर पावणे चार वाजता चर्चा सुरु करण्यास माझी हरकत नाही.

**तालिका सभापती** : ठीक आहे. मी सन्माननीय मंत्रीमहोदयांच्या भावनेशी सहमत आहे. सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांनी आपले भाषण सुरु करावे.

---

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 9 वरील बाब क्रमांक 13 मध्ये सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या खनिज विभागाला सहाय्यक अनुदान देण्यासाठी मागणी करण्यात आली आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये मोठया प्रमाणात खनिज उद्योग आहे. मागील पाच-सहा वर्षापासून ज्या जिल्ह्याला मायनिंग रॉयल्टीचे पैसे मिळतात त्यामधील 15 टक्के रक्कम खनिज निधी म्हणून त्या जिल्ह्यांना देण्याचे राज्य शासनाने मान्य केले आहे. त्याप्रमाणे आमच्या चंद्रपूर जिल्ह्याला देखील खनिज निधी मिळतो. परंतु त्यामध्ये ज्या ठिकाणी मायनिंग आहे त्याच्या 25 कि.मी. च्या परिसरामध्ये रस्ते, पिण्याचे पाणी, प्रदूषण नियंत्रण इत्यादी गोष्टींसाठी हा निधी खर्च करण्यात यावा अशी अट घालण्यात आली आहे. त्या निधीच्या खर्चाची जबाबदारी त्या जिल्ह्याच्या सन्माननीय पालक मंत्र्यांकडे सोपविण्यात आली. परंतु मागील दोन वर्षापासून काही कारणास्तव सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत:कडे अधिकार घेऊन त्या जिल्ह्यातील ठरावीक दोन-तीन आमदारांच्या विभागामध्ये 12 ते 14 कोटी रुपये खर्च केले असल्यामुळे आमच्या विभागामध्ये कामे करण्यासाठी आम्हाला हा निधी वाढवून देण्यात यावा अशी मी विनंती करतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी . . . .

तसेच याबाबतीत अशी अट आहे की, हा जो निधी दिला जातो, तो मायनिंगच्या 25 कि.मी.आत मध्येच खर्च केला पाहिजे. सदरहू निधीचे डी.पी.डी.सी.मार्फत वाटप व्हावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्र.41, पान क्र.31 मध्ये नवीन वाहनांची खरेदी करावयाची आहे. विभागीय व जिल्हास्तरावर मदत व पुनवर्सन विभागांतर्गत उप आयुक्त व उप जिल्हाधिकारी यांच्या साठी वाहनांची खरेदी करावयाची आहे.आमच्या येथे बायपास रस्ते तयार करण्यासाठी वनाची फार मोठी अडचण निर्माण होत आहे.त्यासाठी बल्लारपूर-बामणी या बायपास रोडसाठी वन विभागाकडून जमीन उपलब्ध होण्याची गरज आहे. या बायपास रस्त्यासाठी बजेट मध्ये देखील तरतूद करण्यात आलेली आहे.परंतु बल्लारपूर-बामणी या बायपास रोडसाठी वन विभाग जमीन उपलब्ध करुन देत नाही. त्यामुळे येथील हायवेवरुन दररोज 22 ते 30 हजार ट्रक वाहतूक करीत असतात आणि अशा वेळी त्यांना बल्लारपूर शहरात जाऊन मग बाहेर पडावे लागते. त्यामुळे बल्लारपूर-बामणी या बायपास रस्त्यासाठी वन विभागाची जमीन त्वरित मंजूर करावी असे मी मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने सूचित करतो.

सभापती महोदय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या बाब क्र.147, पान क्र.144 बाबत सांगावयाचे आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये विविध उद्योगधंद्यामुळे हायवे, जिल्हा परिषदेच्या तसेच नगरपरिषदेच्या अंतर्गत येणारे रस्ते आहेत. त्या मार्गावरुन ज्या प्रमाणात ट्रकची वाहतूक होत असते, त्यामानाने तेथील रस्त्यांची परिस्थिती चांगली नाही. तसेच तेथील नगर परिषद, जिल्हा परिषद, पंचायत समितीची आर्थिक परिस्थिती अशी नाही की ते या रस्त्यांची दुरुस्ती किंवा नवीन रस्ते तयार करु शकतील. म्हणून पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने माझी अशी विनंती आहे की, तेथे नवीन-नवीन उद्योगधंदे येत आहेत, त्यांच्यावर काही प्रमाणात सेस लावून या परिसरातील अंतर्गत रस्त्यांवरुन ट्रकची जी वाहतूक होत असते, त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती आहे.एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----

. . . .2 यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, बाब क्र.148, पान क्र.144 बाबत विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, लहान, मध्यम व विशाल प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी 400 कोटी रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे.एकीकडे ठाणे, कल्याण, डोंबिवली, तारापूर, अंबरनाथ या पट्टयातील एम.आय.डी.सी.मधील कंपन्या बंद होत आहेत. मला त्या कंपनींची नावे देखील सांगता येतील. 2010 मध्ये ठाणे येथील "पनामा" कंपनी बंद झाली आहे. तसेच या परिसरातील "रेमेंड कंपनी" देखील बंद पडल्याने 1800 कामगार बेकार झाले आहेत. डोंबिवलीतील "शारदा टेक्सटाईल" कंपनी बंद आहे.अंबरनाथमधील "धरमसी मोरारजी" कंपनी बंद आहे. कल्याण मध्ये "आय.डी.सी", "एन.आर.आय.सी." तसेच "अमरडाय" कंपन्या बंद झाल्याने एकंदर 15 हजार कर्मचाऱ्यांनी आपल्या नोकऱ्या गमावलेल्या आहेत. एकीकडे आपण विशाल प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी 400 कोटी रुपयांची पूरक मागणी करीत आहोत.पण माझे असे म्हणणे आहे की, ज्या कंपन्या बंद झालेल्या आहेत, तेथे कर्मचाऱ्यांना पुन्हा नोकरीमध्ये घेण्यासाठी किंवा आपण पूरक मागण्यांच्या निमित्ताने विशाल व इतर प्रकल्प सुरु करणार आहोत तेथे या कर्मचाऱ्यांना पुन्हा रोजगार उपलब्ध करुन देणार आहोत काय ? तसेच जे विशाल, मोठे प्रकल्प येत आहेत, त्यातून किती रोजगार उपलब्ध होणार आहे ? जर त्याठिकाणी रोजगार उपलब्ध झाले तर आपण तेथील स्थानिक लोकांना जास्तीत जास्त रोजगार मिळवून देण्यासाठी कोणते प्रयत्न करणार आहोत?

सभापती महोदय, त्याच बरोबर माझी एक सूचना आहे. बऱ्याच कंपन्या अशा आहेत की, त्या ठिकाणी विशाल किंवा मध्यम प्रकल्प येत आहेत. पण काही मोठया किंवा छोटया कंपन्या बंद झाल्यानंतर आपल्याकडून ना हरकत प्रमाणपत्र घेऊन तेथे इतर बांधकामे केली जात आहेत. पण अशा प्रकारे ना हरकत प्रमाणपत्र देताना कायदेशीररित्या कामगारांची देणी दिल्यानंतरच प्रस्तावित जागेवर बांधकाम करावे असा नियम आहे.पण सगळीकडे त्या नियमाचे पालन होत असल्याचे दिसून येत नाही. काही ठिकाणी तर कायद्यानुसार कामगारांची थकीत देणी सुध्दा मिळालेली नाहीत, त्यांना थकीत पगार मिळालेला नाही आणि स्वेच्छा निवृत्तीचा संपूर्ण हिशोब देखील देण्यात आलेला नाही.मात्र त्यापूर्वीच प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी जर आपण नियम बाह्य मदत करणार असू तर अशा एकूण कंपन्या किती आहेत आणि नवीन प्रकल्प येण्यापूर्वी संबंधित कामगारांना किती मदत दिली जाणार आहे किंवा त्यांना एन.ओ.सी.दिली असेल तर ती रद्द करणार आहात काय ?





श्री.किरण पावसकर . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असे मी विचारु इच्छितो.

सभापती महोदय, बाब क्र.145 बाबत सांगावयाचे तर राज्यात ई-गव्हर्नन्स् प्रकल्प अंमलात आणण्यासाठी 10 लाख रुपयांची पूरक मागणी केलेली आहे. पण ती अतिशय कमी आहे असे माझे म्हणणे आहे.याचे कारण म्हणजे अनेक शासकीय इमारती भाड्याच्या जागेमध्ये आहेत. रत्नागिरीमध्ये बेराजगारांना रोजगार देणारे जिल्हा रोजगार केंद्र आहे. 1982 पासून हे केंद्र भाड्याच्या इमारतीमध्ये आहे. तेथे कागदपत्रे ठेवण्यासाठी सुरक्षित अशी जागाही उपलब्ध नाही.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर.....

ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून शासकीय कार्यालयाचे संगणकीकरण कशा पध्दतीने करण्यात येणार आहे? जमिनीच्या खरेदी विक्री करुन रजिस्ट्रेशनच्या माध्यमातून शासन दरबारी पैसा येतो त्या ठिकाणी ई-गव्हर्नन्ससाठी लागणारे सॉफ्टवेअर असेल, फर्निचर असेल, मूलभूत सुविधा असतील तर या ई-गव्हर्नन्समुळे कामासाठी लागणारा वेळ कमी होणार आहे. कमी वेळात जास्त काम करण्यासाठी आपण ते करीत आहोत. पण या सर्व शासकीय कार्यालयांमध्ये या संदर्भातील मूलभूत सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत. सिंधुदुर्ग जिल्हयात तसेच मालवण येथील सब तहसीदार कार्यालयातील रजिस्ट्रेशन ऑफिसमध्ये साध्या खुर्च्या किंवा बण्यासाठी व्यवस्था नाही. या ठिकाणी ई-गव्हर्नन्ससाठी 10 लाख रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये जास्तीत जास्त रक्कमेची वाढ करुन ई-गव्हर्नन्ससाठी लागणारे इन्फ्रास्ट्रक्चर व मूलभूत सुविधांची व्यवस्था करण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 25 बाब क्रमांक 34 च्या संदर्भात मी बोलू इच्छितो. यामध्ये अक्कलकोट, जिल्हा सोलापूर व सातारा, जिल्हा औरंगाबाद येथे पोलिसांकरिता निवासस्थाने बांधण्यासाठी 15 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. बॉम्बस्फोटाच्या संदर्भातील चर्चा होत असताना काल यावर सविस्तर चर्चा झालेली आहे. मला वाटते या संदर्भात या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांचे एकमत असेल. 15 कोटी रुपयात पोलिसांच्या निवासस्थानाची व्यवस्था होऊ शकत नाही. म्हणून पोलिसांच्या निवासस्थानासाठी जेवढा जास्तीत जास्त निधी देता येईल तेवढा जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. याचे कारण असे की, या राज्याचा विकास साधावयाचा असेल तर या ठिकाणी कायदा, सुरक्षा आणि सुव्यवस्था असल्या शिवाय हा विकास साधता येणार नाही आणि त्याचे मूळ गृह विभागात आहे. मुंबईतील पोलिसांच्या वसाहती मोडकळीस आलेल्या आहेत. वरळी येथे असलेली पोलिसांची वसाहत अतिशय वाईट अवस्थेत आहे. तेथे हे पोलीस कशा पध्दतीने रहात असतील याचा विचार करणे देखील कठीण आहे. म्हणून पोलिसांच्या निवासस्थानासाठी जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करुन दिल्या तर त्याचा फायदा महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाला मिळेल. पोलिसांच्या निवासस्थानाची व्यवस्था केवळ तीन-चार जिल्ह्यात न करता सर्व जिल्ह्यात करण्यात यावी तसेच मुंबईतील पोलिसांसाठीही जास्तीत जास्त निवासस्थानांची व्यवस्था करण्यात यावी अशी मी मागणी करतो.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, पान क्रमांक 131, बाब क्रमांक 124 वर मी बोलू इच्छितो. या मागणी मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचा वकील कक्ष वातानुकूलित करण्यासठी 4 कोटी 68 लाख लाख रुपयांची तसेच न्यायालयाचा शताब्दी सुवर्ण महोत्सव साजरा करण्यासाठी 2 कोटी रुपयांची पुरक मागणी करण्यात आली आहे. सभापती महोदय, सध्या न्यायालयांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. आपल्यापैकी प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या कामासाठी न्यायालयात जात असतो. या न्यायालयांमध्ये साध्या प्राथमिक सुविधा देखील उपलब्ध नसतात. वाढत्या लोकसंख्येमुळे, प्रलंबित प्रकरणांची संख्या जास्त आहे. याचे कारण प्रत्येक कारणासाठी न्यायालयावर विश्वास ठेवणारे लोक जास्त आहेत. न्यायालयांची परिस्थिती मात्र विदारक आहे. म्हणून केवळ उच्च न्यायालयासाठी नाही तर सर्वच न्यायालयांमध्ये मूलभूत सोयी-सुविध उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. बाकीच्या कामांसाठी आपण तीन शिफ्ट चालवितो पण न्यायालयात एकाच शिफ्टमध्ये काम करण्यात येते. न्यायालयांमध्ये एका शिफ्टमध्ये करण्यात येणारे काम पुरेसे नाही. त्यामुळे न्यायालयांना जास्तीत जास्त मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देऊन या ठिकाणी दोन शिफ्टमध्ये कामकाज करुन प्रलंबित प्रकरणे मार्गी कशी लागतील यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. या न्यायालयाचा शताब्दी सुवर्ण महोत्सव चांगल्या तऱ्हेने साजरा करावयाचा असेल तर न्यायालयांमध्ये नागरिकांसाठी सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याची गरज आहे म्हणून न्यायालयांसाठी जास्तीत जास्त पैशांची व्यवस्था करण्यात यावी, अशी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 6, बाब क्रमांक 5. सामान्य प्रशासन विभाग, पृष्ठ क्रमांक 24, बाब क्रमांक 30. गृह विभाग अशा एकूण 28 बाबींची या पुस्तकात नोंद करण्यात आलेली आहे. त्यामध्ये ई-गव्हर्नन्सच्या नावाखाली संगणकाचा खर्च दाखविलेला आहे. तो साधारणत: 2 कोटी 80 लाख रुपयाचा खर्च दाखविण्यात आला आहे. हा खर्च दाखविणे आवश्यक आहे आणि हे ई-गव्हर्नन्स देखील काळाच्या दृष्टीने आवश्यक आहेत. सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मला शासनाला अशी विनंती करावयाची आहे की, आपण संबंध राज्यामध्ये ई-गव्हर्नन्स आणीत आहोत त्या दृष्टिकोनातून त्यासाठी एक स्वतंत्र खाते करता येईल काय आणि त्याचे नेटवर्क करता यईल काय? कारण हे काम प्रत्येक खात्या करिता वेगवेगळे विभागले जात आहे. तेव्हा त्याचे एकत्रित नियंत्रण कसे करता येईल याचा विचार शासनाने करावा.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 9 वरील बाब क्रमांक 13 मध्ये मिहान प्रकल्पाच्या जमीन संपादनासाठी 200 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे .....

त्याचप्रमाणे गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 23 वरील बाब क्रमांक 27 यामध्ये आपण धान्यापासून अल्कोहोल तयार करण्यासाठी 67 कोटी रुपयांचे अनुदान देत आहोत. या दोन्ही बाबींमध्ये आपण आकस्मिकता असा शब्द वापरत आहोत. मात्र यामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणावर तरतूद करीत आहोत. एवढ्या मोठ्या रकमा आकस्मिकतेखाली टाकत असताना आपले नियोजन आणि मंत्रिमंडळ यांच्यामध्ये सुसंवाद आहे की, नाही अशी शंका मनामध्ये येते. आकस्मिकता या नावाखाली एवढा मोठा खर्च टाकला जाणार नाही याची काळजी घ्यावी आणि त्यासाठी वेगळी तरतूद करता येईल काय याचा विचार केला जावा.

सभापती महोदय, यानंतर मी गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 23 वरील बाब क्रमांक 27 बाबत बोलणार आहे. यामध्ये धान्य वापरुन अल्कोहोल तयार करण्यासाठी 67 कोटी रुपयांचे अनुदान देत आहोत. खरे म्हणजे या बाबतीत राज्यातून फार मोठा विरोध झाला होता. प्रा. एन. डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली आझाद मैदानावर फार मोठे आंदोलन झाले होते. काही वेगळ्या परिस्थितीत आपण त्यांना धान्यापासून अल्कोहोल तयार करण्यास अनुमती देत आहोत पण त्या व्यवसायाला अनुदान देणे कितपत योग्य आहे, याचा शासनाने पुनर्विचार करावा. यापुढे अनुदान न देता केवळ अनुमतीवर भागवावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी सामान्य प्रशासन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 6 वरील बाब क्रमांक 5 बाबत बोलणार आहे. राज्यात बऱ्याच प्रमाणात मोडी लिपीमध्ये दस्तऐवज आहेत. ते दस्तऐवज आता नष्ट होत चालले आहेत. त्याचे वाचन करणारे लोक सुध्दा कमी होत चालले आहेत. माझी अशी विनंती आहे की, राज्यात अशा प्रकारचे जेवढे दस्तऐवज असतील त्याचे मराठीमध्ये रुपांतर करुन घ्यावे आणि त्यासाठी तरतूद करावी.

सभापती महोदय, यानंतर मी गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 21 वरील बाब क्रमांक 21 बाबत बोलणार आहे. अक्कलकोट, सोलापूर, सातारा, औरंगाबाद येथील पोलिसांच्या घरासाठी 15 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याची स्थापना 28 वर्षापूर्वी झाली. त्या ठिकाणी सिडकोचे बांधकाम होत असताना पोलिसांची जी घरे बांधावयाची होती ती अपूर्ण राहिलेली आहेत. त्यासाठी 6 कोटी रुपयांची तरतूद आवश्यक होती. अद्यापपर्यंत ती तरतूद दिलेली नाही. ती तरतूद झाली असती तर बरे झाले असते. त्याचप्रमाणे पोलिसांची जी जुनी घरे आहेत त्यासाठी 2 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. ती तरतूद सुध्दा अद्यापपर्यंत मिळालेली नाही. कणकवलीमध्ये डीवायएसपीचे कार्यालय भाड्याच्या जागेत आहे. त्यासाठी जर 15 लाख रुपयांची तरतूद झाली असती तर बरे झाले असते.

सभापती महोदय, यानंतर मी विधी व न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 131 वरील बाब क्रमांक 124 बाबत बोलणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये ऑक्टोबर, 2008 मध्ये ढगफुटी होऊन लोकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. एक प्रस्ताव सिध्दिविनायक ट्रस्टकडून आलेला होता. त्या प्रस्तावाचे काय झाले हे अजूनपर्यंत कळलेले नाही. गोरगरिबांना जर ते पैसे मिळाले असते तर दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या घरासाठी मदत झाली असती. त्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी सांगितले तर बरे होईल.

सभापती महोदय, यानंतर मी सामाजिक न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 159 वरील बाब क्रमांक 162 बाबत बोलणार आहे. वैश्य समाजाच्या संदर्भात माननीय श्री. शिवाजीराव मोघे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. राजन तेली .....

साहेबांनी आणि माननीय श्री. नारायण राणे साहेबांनी या ठिकाणी चांगली भूमिका घेतली. वैश्य समाज ओ.बी.सी. मध्ये यावा म्हणून जे प्रयत्न चालू आहेत त्या संदर्भात माझी या निमित्ताने एकच मागणी आहे की, हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे त्याची पुन्हा एकदा नोंदणी लवकरात लवकर करण्याच्या दृष्टीने सर्व्हे व्हावा.

सभापती महोदय, यानंतर मला सहकार विभागाच्या पृष्ठ क्रमांक 274 वरील बाब क्रमांक 223 बाबत बोलावयाचे आहे. महामँगोच्या संदर्भात दोन वर्षापूर्वी मंत्री महोदयांनी याच सभागृहामध्ये जे आश्वासन दिले होते त्याप्रमाणे जे दोषी असतील त्यांच्या बाबतीत कलम 88 प्रमाणे कारवाई करण्याच्या बाबतीत दोन महिन्यात निर्णय घ्यावयाचा होता. आज जवळजवळ चार वर्षे झालेली आहेत तरी सुध्दा महामँगोमध्ये दोषी असलेल्या लोकांवर शासनाने कारवाई केलेली नाही. ती कारवाई शासन करणार का ? माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर पाळणार का ? सह निबंधकाचे कार्यालय नवी मुंबईला आहे. आज सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी हे जिल्हे शिक्षणाच्या संदर्भात, आरोग्याच्या संदर्भात कोल्हापूरशी जोडलेले आहे. त्याचप्रमाणे सह निबंधकाचे कार्यालय जर आपल्याला कोल्हापूरला जोडता येत असेल तर त्या संदर्भात शासनाने प्रयत्न करावा.

सभापती महोदय, यानंतर मला जलसंपदा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 117 वरील बाब क्रमांक 111 बाबत बोलावयाचे आहे. रायगड जिल्ह्यामध्ये खार जमिनीच्या संदर्भात जवळजवळ 28 प्रस्तावांना मान्यता दिलेली आहे. त्याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांना मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, यानंतर मला महसूल व वन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 32 वरील बाब क्रमांक 45 बाबत बोलावयाचे आहे. वनसज्ञेच्या संदर्भात या सभागृहामध्ये सातत्याने विषय आलेला आहे. 1997 मध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 42 हजार हेक्टर क्षेत्राच्या बाबतीत वनसंज्ञा दाखविली होती. पुन्हा सर्वेक्षण केल्यानंतर वनसज्ञेचे क्षेत्र 18 हजार हेक्टरवर आले.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली...

सुप्रीम कोर्टात या केसेस प्रलंबित आहेत. या केसेसना 12 वर्षे झाली आहेत. या कालावधीत शासनाने कोणते प्रयत्न केले आहेत, यासंबंधी शासनाची नेमकी भूमिका काय आहे ते विशद करावे. तेथे तोंडवली, आंबवली, चौकूळ असे विविध भागातील कायम स्वरुपी रस्ते आहेत. या रस्त्यांच्या कामासाठी वन विभागाकडून नेहमी अडवणुकीची भूमिका घेतली जाते. म्हणून शासनाने खालच्या स्तरावरील अधिका-यांना योग्य त्या सूचना द्याव्यात अशी विनंती करतो. मला आपण बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

-------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2011-12 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 21 वरील बाब क्रमांक 23,24 व 25 वर मी बोलणार आहे. ही मागणी न्याय वैद्यक प्रयोगशाळेसाठी करण्यात आलेली आहे. मुंबई शहरात झालेल्या बॉम्बस्फोटासंबंधी सभागृहात चर्चा झाली त्यावेळी देखील मी या प्रयोगशाळेविषयी बोललो होतो. आज या न्याय वैद्यक प्रयोगशाळांची परिस्थिती कशी आहे ? आता डीएनए रसायने खरेदी करण्यासाठी व आयुधे खरेदी करण्याची मागणी करण्यात आलेली आहे. मुंबईतील कालिना, नागपूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती येथील या प्रयोगशाळांची परिस्थिती कशी आहे असा मंत्री महोदयांना मी प्रश्न विचारतो. आजच्या घडीला एकूण 11 हजार व्हिसेरा तपासण्यासाठी प्रलंबित आहेत. डीएनए चाचण्या 500 प्रलंबित आहेत. बॅलेस्टिक रिपोर्ट 400 प्रलंबित आहेत, लिकर वॉश तपासण्याची प्रकरणे 52,341 प्रलंबित आहेत. ब्लड अल्कोहोल तपासण्याची प्रकरणे 1500 प्रलंबित आहेत. नार्कोटिक्सची प्रकरणे 2,838 प्रलंबित आहेत. सायबरची प्रकरणे 200 प्रलंबित आहेत आणि फोटोग्राफी तपासण्याची प्रकरणे 800 प्रलंबित आहेत. अशा अनेक गोष्टी प्रलंबित आहेत. शासनाच्या न्याय वैद्यक प्रयोगशाळेचे 50 कर्मचारी नियुक्त्याविना बसून आहेत. शासनाने त्यांना प्रशिक्षण दिले आहे. परंतु त्यांना कोठेही कामावर सामावून घेतलेले नाही. या प्रयोगशाळेतील तातडीच्या ठिकाणी 306 कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या जातील असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. पण आज शासनानेच प्रशिक्षण दिलेला एकही कर्मचारी त्या प्रयोगशाळेत काम करीत नाही.

सभापती महोदय, यानंतर नियोजन विभागाच्या मागणीसंबंधी मी माझे विचार व्यक्त करतो. यामध्ये स्थानिक विकास निधीसाठी अतिरिक्त तरतूद केलेली आहे. मी आपल्यामार्फत माननीय उप मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, आम्ही रस्त्याच्या कामासाठी, इमारत दुरुस्तीसाठी, समाज मंदिर बांधण्यासाठी पैसे देतो. परंतु एखाद्या प्रयोगशाळेमध्ये एखादे उपकरण बसवावयाचे असेल, खरेदी करावयाचे असेल, एखाद्या रुग्णालयासाठी ब्लड सेल काऊण्ट मशिन खरेदी करण्यासाठी पैसे दिले तर त्याची विशेष बाब म्हणून गणना होते. मी राजावाडी हॉस्पिटलसाठी ब्लड सेल काऊण्ट मशिन

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

खरेदी करण्यासाठी आमदार निधीतून पैसे दिले. त्याच धर्तीवर अन्य 4 हॉस्पिटल्ससाठी अशा मशिन्स खरेदी करण्याच्या प्रस्तावासाठी निधी मंजूर करावा अशी नियोजन विभागाला विनंती केली होती. गेल्या 3 महिन्यांपासून श्री.सिताराम कुंटे यांना भेटून सुध्दा ती फाईल प्रलंबित आहे. ब्लड सेल काऊण्ट मशिन घेण्याच्या पाठीमागची भूमिका अशी होती की, मलेरिया, डेंग्यूची साथ आल्यास लोकांचे प्लेटलेटस् डाऊन होतात. दुर्दैवाने तो प्रस्ताव आजही मंजूर झालेला नाही. म्हणून अशा प्रकारची वैद्यकीय उपकरणे खरेदी करण्यासाठी प्राधान्य देण्याची गरज आहे. त्यामुळे आमदार निधी सत्कारणी लागेल.

सभापती महोदय, मी दुसरे एक उदाहरण देतो. जे.जे.हॉस्पिटलमध्ये बॉम्बस्फोटातील रुग्ण दाखल आहेत. त्यांच्या जखमा धुण्यासाठी तेथे कोणतीही व्यवस्था नाही. एवढेच नव्हे तर मुंबईतील कोणत्याही हॉस्पिटलमध्ये जखमा धुण्याचे युनिट नाही. बर्न वॉशिंग युनिट जर्मनीतून मागवावे लागते. ज्यावेळी मी त्या हॉस्पिटलमध्ये गेलो होतो त्यावेळी डॉक्टर रुग्णांचे ड्रेसिंग करीत असल्याचे मी पाहिले होते. पण त्यावेळी रुग्ण कण्हत होते, विव्हळत होते. त्यामुळे मी आमदार निधीच्या फंडातून 10 लाख रुपये लगेच देण्याचे ठरविले. त्यासाठी मी श्री.कुंटे साहेबांना भेटून सांगितले की, हे युनिट खरेदी करण्यासाठी विशेष बाब म्हणून मंजुरी द्यावी. परंतु आजपर्यंत त्यांनी त्याला मंजुरी दिलेली नाही. त्यामुळे मी स्वत:च्या पैशातून हे युनिट खरेदी करण्याचे ठरविले आहे. डॉ.लहाने यांनी मशिनची जर्मनीला ऑर्डर दिली आहे. जर आमचा आमदार निधी अशा प्रकारच्या कामासाठी उपयोगी पडत नसेल तर त्याचा काय उपयोग ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

बाकीच्या गोष्टी देखील महत्वाच्या आहेत. तेव्हा राज्य शासनाने या बाबतीतील धोरण बदलावे.

बाब क्रमांक 210 वरील वैद्यकीय शिक्षण विभागाकडे मी मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. बाब क्रमांक 210 मध्ये शिष्यवृत्ती, विद्यावेतन यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. काल मी वर्तमानपत्रामध्ये एक बातमी वाचली. त्या बातमीमध्ये 75 वैद्यकीय महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्यात आल्याचे नमूद केलेले होते. अपुरा स्टाफ, अपु-या सुविधा, अपुरी उपकरणे यामुळे होमिओपॅथी, युनानी, फिझिओथिअरपी, डेण्टल यासारखी अनेक महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्यात आलेली आहे. 75 आकडा फार मोठा आहे. त्यामुळे या वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत कोणता निर्णय घेणार आहात याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा.

दुसरे असे की, आपल्या राज्यामध्ये गेल्या काही वर्षापासून लातूर आणि अकोला सोडले तर एकही वैद्यकीय महाविद्यालय झाले नाही. परंतु आपल्या शेजारच्या गुजराथ, मध्यप्रदेश या राज्यांनी एमसीआयच्या धोरणानुसार त्यांच्या राज्यामध्ये मोठ्या संख्येने वैद्यकीय महाविद्यालये काढलेली आहेत. आपल्या राज्यामध्ये नंदूरबार, मुंबई आणि गोंदिया या ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्याच्या केवळ घोषणा झाल्या. मात्र काम सुरु झाले नाही. वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रस्ताव धूळ खात पडून आहेत. जी.टी.हॉस्पिटलमध्ये 13 मजल्यांची इमारत बांधण्याचे प्रस्तावित होते. परंतु ती देखील बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे ती इमारत बांधता येत नाही. सीईटीच्या परीक्षेमध्ये 14 मार्कांचे प्रश्न सिलॅबसच्या बाहेरचे विचारण्यात आले होते. प्रत्येक वर्षी असे प्रकार होत असतात. ज्यांना सिलॅबस माहीत नसेल असे परीक्षक कशासाठी नेमले जातात याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे.

आदिवासी विकास विभागाच्या पृ.क्र. 262 वरील बाब क्रमांक 214 मध्ये चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्याकरिता गडचिरोली येथे जनजाती क्षेत्र उपयोजने अंतर्गत गोंडवाना विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. आपण आदिवासी विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाची स्थापना करीत आहात ही चांगली गोष्ट आहे. परंतु आज शासकीय आश्रमशाळांची काय परिस्थिती आहे. अजूनही विद्यार्थ्यांच्या पाठीवर दप्तर नाही. विद्यार्थ्यांची पोटे रिकामी आहेत. अजूनही टेंडर



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

निघालेली नाहीत. याचे कारण मंत्री महोदयांची अकार्यक्षमता हे होय. सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना आव्हान करतो, त्यांनी कोणत्या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दप्तरे दिलेली आहेत हे दाखवावे. शैक्षणिक वर्ष सुरु होऊनही अजून विद्यार्थ्यांना दप्तर मिळालेले नाही. आश्रमशाळेतील शंभर टक्के विद्यार्थ्यांना दप्तर आणि शासनाने नेमून दिलेला पोषण आहार मिळतो का ते मंत्री महोदयांनी सांगावे. टेंडर प्रक्रिया कुठे अडकलेली आहे ? टेंडर प्रक्रियेमध्ये कुणाकुणाचे नातेवाईक आहेत, बेंच, न्युट्रीयण्टचे पुरवठादार कोणकोण आहेत याची यादी माझ्याकडे आहे. पाहिजे असेल तर ती मी वाचून दाखविण्यास तयार आहे. आदिवासी विकास मंत्री श्री. बबनराव पाचपुते हे ह.भ.प. आहेत. त्यांच्याकडून आम्हाला हे अपेक्षित नव्हते. आदिवासी विकास विभागाला बिगर आदिवासी मंत्री असेल तर आदिवासींना ऊर्जितावस्था येईल असे बोलले जात होते. परंतु आज आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना उपाशी पोटी विद्यार्जन करावे लागत आहे. मी पुनश्च आव्हान करतो की, महाराष्ट्रातील प्रत्येक शासकीय आश्रमशाळेतील मुलांना प्रिस्क्राईब केलेले अंडी आणि मांसाहारासहीत भोजन दिले जाते काय हे मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात सांगावे एवढे बोलून आणि सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

----

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या बाब क्र.107, पृ.क्र.114 संबंधी बोलत असताना सांगली जिल्हयातील कवठे महाकाळ तालुक्यात म्हैसाळ योजनेंतर्गत अनेक टप्प्यांची कामे पूर्ण झाली. त्या योजनेमध्ये पाणी सोडण्यासाठी वीज उपलब्ध नसल्यामुळे प्रकल्पातून पाणी जात नाही आणि शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही. शासनाला माझी विनंती आहे की, विद्युत कंपनीची जी काही थकबाकी आहे ती त्वरित भरण्यात येऊन म्हैसाळ योजनेतून पाणी सोडण्यात आले तर दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे त्या भागात शेतकऱ्यांना पिण्यासाठी आणि शेतीसाठी पाणी मिळू शकेल. या विषयाकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, निवडणुकीपूर्वी टेंभू योजनेंतर्गत कवठे महाकाळ तालुक्यातील ढालगाव भागातील 16 गावांचा समावेश करण्याचे शासनाने जाहीर केले होते. या 16 गावांचा सर्वे जाहीर करुनही अद्याप झालेला नाही. या 16 गावांचे तातडीने सर्वेक्षण करणे गरजेचे आहे. त्यामुळे या सर्व गावकऱ्यांच्या मनामध्ये पाणी मिळेल की नाही याबद्दल अविश्वासाची भावना निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, बाब क्र.156, पृ.क्र.155 वर अन्न व नागरी पुरवठा विभागाने पूरक मागणी सादर केली आहे. बीपीएल कार्डधारकांना रेशन दिले जाते. एपीएल कार्डधारकांना सुध्दा रेशन देणे आवश्यक आहे. कवठे महाकाळ तालुक्यातील एपीएल कार्डधारकांना कोणतेही धान्य दिले जात नाही. एक गॅस सिलिंडर संपल्यानंतर दुसरा येईपर्यंत रॉकेलची आवश्यकता असते. त्यांना रॉकेलचे वाटप केले जात नाही. या बाबीकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, बाब क्र.145, पृ.क्र.143 वर ऊर्जा विभागाने पूरक मागणी सादर केली आहे. कवठे महाकाळ तालुक्यामध्ये 400 केव्हीएचे सब स्टेशन मंजूर झाले असून त्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सर्वे होऊन निधी देखील मंजूर केलेला आहे. परंतु कामाला सुरुवात होणे आवश्यक आहे. त्वरित या सब स्टेशनच्या कामाला सुरुवात करावी अशी मी विनंती करतो. कवठे महाकाळ तालुक्यातील वीज बोर्डामध्ये 30 वायरमनची पदे कमी आहेत. त्यामुळे एका वायरमनकडे 5 ते 6 गावांचा चार्ज सोपविलेला आहे. एखाद्या खेडेगावात वीज पुरवठ्यामध्ये काही अडचण निर्माण झाली तर वायरमन येण्यास दोन ते तीन दिवस लागतात. कार्यालयीन कर्मचाऱ्यांची 8 पदे कमी आहेत, ही पदे त्वरित भरण्यात यावीत अशी मी शासनाला विनंती करतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे.........

सभापती महोदय, पृ.क्र.163, बाब क्र.159 वर सामाजिक न्याय, विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण विभागाने पूरक मागणी सादर केली आहे. गोरगरीब समाजाला आरक्षण दिले जाते. त्यांची शैक्षणिक, आर्थिक, व्यावसायिक क्षेत्रात प्रगती होण्यासाठी अ, ब, क व ड अशी वर्गवारी करण्यात आली आहे. परप्रांतातील लोकांनी महाराष्ट्रात येऊन भटक्या व विमुक्त जातीचे खोटे दाखले सादर करुन जात पडताळणी देखील करुन घेतली आहे, ही अतिशय गंभीर बाब आहे. यामुळे महाराष्ट्र राज्यातील गोरगरीब समाज मागे राहू लागला आहे. ज्यांना आरक्षण दिले आहे त्यांना त्याचा फायदा न मिळता परप्रांतीय लोकांचे भटक्या जमातीतील अ, ब, क व ड वर्गवारीमध्ये अतिक्रमण होत आहे. शासनाने या बाबीकडे गांभीर्याने लक्ष द्यावे.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्र.6, पृ.क्र.6 वर स्मारकांच्या बांधकामासाठी तरतूद करण्यात आली आहे. युती शासनाने गोंदिया जिल्हयातील आमगाव येथील पदमपूर नगरामध्ये महाकवींचे स्मारक व्हावे यासाठी 1 कोटी रुपये मंजूर केले होते. 12 ते 15 वर्षाचा काळ उलटून गेला आहे. या महाकवींच्या स्मारकासाठी निधी मंजूर करुनही काम सुरु झालेले नाही. आघाडीच्या शासनाने या स्मारकासाठी तरतूद करावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्र.13, पृ.क्र.9 वर मिहान प्रकल्पासाठी 200 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. 600 कोटी रुपयांची मागणी असताना 200 कोटी रुपये मंजूर केले आहेत. परंतु अन्य जिल्हयामध्ये आदिवासी प्रकल्प व गोंदिया जिल्हयातील विमानतळासाठी शासनाने शेतकऱ्यांची जमीन संपादित केली आहे. त्यांना त्या जमिनीचा मोबदला मिळालेला नाही. या प्रकल्पासाठी घेतलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्यासाठी तरतूद करण्यात यावी अशी मी मागणी करतो.

बाब क्र.22, पृ.क्र.21 वर गृह विभागाने कर्तव्य बजावत असताना जखमी झालेल्या व अपघातात मृत पावलेल्या पोलिसांच्या कुटुंबीयांना सानुग्रह अनुदान देण्यासाठी 4.32 कोटी रुपयांची तरतूद केली आहे, ही अतिशय चांगली गोष्ट आहे. परंतु पोलीस विभागातर्फे कुटुंबकल्याण कार्यक्रम राबविला जातो, त्यासाठी मोठया प्रमाणात निधी गोळा केला जातो. हा निधी कुठे खर्च केला जातो, कसा खर्च होतो याचा अहवाल सभागृहाला सादर होत नाही. माझी शासनाला विनंती आहे की, पोलीस कुटुंब कल्याण कार्यक्रमासाठी जो निधी गोळा केला जातो त्याचे विवरण सभागृहाला सादर करण्यात यावे.

पोलीस विभागाने गोंदिया जिल्हयात पोलिसांच्या मुलांसाठी शाळा उघडण्याकरिता निधी गोळा केला आहे. शासनाने या कामासाठी पोलीस अधीक्षक यांना परवानगी दिली होती का? पोलिसांच्या मुलांसाठी शाळा उघडण्यासाठी निधी मिळावा म्हणून माझ्याकडे मागणी करण्यात आली होती. परंतु शासनाने परवानगी दिली असेल तर आम्ही जरुर सहकार्य करु.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर .......

म्हणून या प्रकरणाची चौकशी करण्याची नितांत गरज आहे.

महोदय, बाब क्र. 52, पृ.क्र. 37 च्या अनुषंगाने पशुवैद्यकीय मंत्र्यांचे मी अभिनंदन करतो. कारण त्यांनी आमच्या गोंदिया जिल्ह्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांसाठी 7 नवीन पदे निर्माण करण्याचे ठरविले. या अनुषंगाने माझी विनंती आहे की, ही पदे तातडीने भरावीत.

यानंतर बाब क्र. 57,पृ.क्र.39 कृषी विभागाच्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, राज्यात खरे तर गोदामांच्या दुरुस्तीसाठी निधीची तरतूद करण्याची गरज आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात गोदामांची व्यवस्था करणे आवश्यक आहे. पण दुर्दैवाने सांगावयाचे तर आमगांव कृषी उत्पन्न बाजार मितीने दि. 11.7.2006 रोजी त्यांचे गोडावून भाड्याने दिलेले होते. त्याचे भाडे रु. 37644 एवढे अद्यापही पाटबंधारे विभागाकडून प्राप्त झालेले नाही. यासंबंधीची फाईल संबंधित विभागाकडून वित्त विभागाकडे गेली, त्याला तात्काळ मान्यता द्यावी अशी विनंती करतो.

महोदय, बाब क्र. 116-117,पृ.क्र. 120 लघू पाटबंधारे व मध्यम प्रकल्पासाठी असून गोंदिया जिल्ह्यातील कलपात्री हा प्रकल्प सन 1983-84 च्या सुमारास सुरु करण्यात आला आहे. प्रकल्पाचे 70 टक्के काम पूर्ण झालेले आहे. अद्यापही त्याचे मायनर आणि नहरचे काम पूर्ण होत नाही. या निमित्ताने माझी विनंती आहे की, या कामासाठी आवश्यक निधी देऊन या भागातील शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : महोदय, सामाजिक न्याय विभाग व विशेष सहाय्य विभागाच्या बाब क्र. 163, पृ.क्र.159, मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे मॅट्रिकोत्तर शिक्षण व परीक्षा शुल्क प्रदान करण्यासाठी अतिरिक्त तरतूद करणे या माध्यमातून मला सभागृहाच्या निदर्शनास आणावयाचे आहे की, मागासवर्गीयांसाठी स्थापन करण्यात आलेली वित्तीय महामंडळे आार्थिक व प्रशासकीय दृष्ट्या सक्षम व सुदृढ करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे. आताच सन्माननीय सदस्य व शेळी मेंढी महामंडळाचे अध्यक्ष श्री. रमेश शेंडगे यांनी आपल्या भाषणातून वस्तुस्थिती लक्षात आणून दिली आहे. त्यांच्या महामंडळाला एक रुपया सुध्दा मिळाला नाही. या अनुषंगाने शासनाने विचार करावा.

बाब क्र. 6, पृ.क्र.6 - राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती यांची स्मारके व पुतळे यांचे बांधकाम करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक दादर येथील हिंदू मिलची 12 एकर जमीन ताब्यात घेऊन उभारण्यात यावे. यासंबंधी माजी मुख्य मंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांच्या काळात वस्त्रोद्योग मंत्र्यांनी प्रेस कॉन्फरन्स घेऊन सांगितले होते की, दादर येथील हिंदू मिलची 12 एकर जागा या स्मारकासाठी दिली. तसेच दिल्ली येथे माननीय पंतप्रधान कार्यालयाचा कार्यभार सांभाळणारे सक्षम मंत्री आपल्या राज्यात मुख्यमंत्री म्हणून आले आणि त्यांनी आश्वासित केले होते की, यासंदर्भात माननीय पंतप्रधान यांच्याकडे जाऊन विनंती करण्यात येईल. माझी विनंती आहे की, त्यांनी माननीय सोनिया गांधी, माननीय शरदराव पवार तसेच आपले दोन माजी मुख्यमंत्री यांना बरोबर घेऊन हा प्रश्न सोडवावा अशी माझी आग्रहाची व कळकळीची विनंती आहे.

सामान्य प्रशासन विभाग, बाब क्र 1, पृ.क्र. 5-सचिवालय-सर्वसाधारण सेवा या अनुषंगाने माझ ी विनंती आहे की, येथे सचिवालय हा शब्द योग्य नाही. वास्तविक तेथे मंत्रालय असा शब्दप्रयोग करावा. मंत्रालय हे लोकशाहीचे एक मंदीर आहे. सर्वसामान्य व गोरगरीब जनता व दुर्बल घटकातील लोक मंत्रालयात सतत येत असतात. त्यांच्या अर्जावर मंत्र्यांनी जरी काही लिहिले नसले तरी त्या मंत्र्यांना हे लोक समोर दिसल्यानंतर एक प्रकारची शक्ती मिळते. पण त्यांना प्रवेश देताना मात्र दुपारी 2 वाजेनंतर प्रवेश देण्यात येतो. माझी विनंती आहे की, दोन वाजण्याची अट शिथील करुन त्यांना सकाळी 10 वाजल्यानंतर सायंकाळपर्यंत प्रवेश सकाळीच देण्यात यावा.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण .......

पृ.क्र. 8, सामान्य प्रशासन विभाग, माहिती व प्रसिध्दी संचालनालयाच्या अनुषंगाने मी ही बाब निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे की, माजी मुख्य मंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी आपल्या प्रदीर्घ काळात काही निर्णय घेतले. त्यात सहकार कायदा, रोजगार हमी योजना कायदा, पंचायत समिती कायदा, कुळ कायदा, कमाल जमीन धारणा कायदा, कापूस एकाधिकार खरेदी योजना या कायद्यांच्या अनुषंगाने जी भाषणे केली त्यांचा एक मार्गदर्शक ग्रंथ तयार करावा अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ....

सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना सांगितले होते की, सन्माननीय सदस्यांच्या पत्रांच्या आपण नोंदी घेणे आवश्यक आहे. नोंदी घेतल्यानंतर विभागाने त्या नोंदीच्या पोहच दिल्या पाहिजेत. अशा प्रकारच्या पोहच दिल्या जातील असे गेल्या वळेस मंत्री महोदयांनी आश्वासित केले होते त्यामुळे आश्वासित केल्याप्रमाणे नोंदी घेऊन सन्माननीय सदस्यांना त्याबाबत पत्र पाठवावे अशी अपेक्षा व्यक्त करतो. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

---

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेल्या ): सभापती महोदय, मराठी भाषा विभागासाठी सिंगापूर साहित्य संमेलन, साहित्य संस्कृती मंडळ, मराठी विश्वकोश मंडळ यांच्यासाठी 50 लाख व 30 लाख रुपयांची तरतूद मराठी भाषा विभागाने केलेली आहे. यासंदर्भात शासनाने श्री. नरेंद्र चपळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. परंतु त्यांची चांगल्या प्रकारे व्यवस्था न झाल्यामुळे त्यांनी नाराज होऊन राजीनामा दिला होता. त्यामुळे ज्या व्यवस्था मराठी अभ्यास केंद्राने सुचवल्या होत्या व ज्याला सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिली होती त्याची अंमलबजावणी गेल्या वर्षभरात कोणत्याही प्रकारे झालेली नाही याकडे मी सदनाचे लक्ष वेधू इच्छिते. श्री. नरेंद्र चपळगावकरांनी जो राजीनामा दिलेला आहे तो त्यांना परत घेण्यास भाग पाडावे व कामाच्या दृष्टीने त्यांच्या अपेक्षांची परिपूर्ती करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता हा विभाग अतिशय महत्वाचा आहे. नव बौध्द व अनुसूचित जाती जमातींच्या नळ जोडणीसाठी शासनाने तरतूद केल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग हा राज्याच्या मंत्र्यांना महत्वाचा वाटत असतो. परंतु तसा तो केंद्राच्या मंत्र्यांना महत्वाचा वाटत नाही. माझ्या माहिती प्रमाणे एका मंत्री महोदयांवर या विभागाची जबाबदारी टाकली असतांना त्यांनी तो विभाग स्वीकारला नव्हता ही फार खेदाची व चिंतेची बाब आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भात मी माझे विचार मांडणार आहे. विधान परिषदेचे माजी सन्माननीय सदस्य श्री. लक्ष्मण माने यांनी काल विधानसभेच्या गॅलरीमधून पत्रके फेकली होती. भटक्या विमुक्त जमातींपैकी काहींना एक्स क्रिमिनल ट्राईब मानले जाते ते एक्स क्रिमिनल नाव काढून टाकण्यात यावे तसेच त्यांच्या पुनर्वसनाचे कार्यक्रम शासनाने राबवावे अशी त्यांची मागणी असून त्यासाठी त्यांनी विधानसभेच्या गॅलरीतून पत्रके टाकली होती. या सभागृहाचे माजी सदस्य सातत्याने धर्मनिरपेक्षतेच्या भूमिकेतून आमच्यावर प्रखर टीका करत आलेले आहेत. परंतु त्यांच्या भूमिकेची दखल जर सामाजिक न्याय विभाग घेत नसेल तर ते योग्य होणार नाही. दिनांक 10 जून, 2011 रोजीच्या वर्तमानपत्रात दलितांच्या हक्काची सनद जाहीर करण्यात आली होती. दिनांक 9 जून, 2011 रोजी भीम शक्ती व शिव शक्ती मेळाव्याच्या दुस-याच दिवशी दलितांच्या हक्काची सनद जाहीर केली होती परंतु त्याचे कोणतेही प्रतिबिंब सामाजिक न्याय विभागात दिसत नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

सभापती महोदय, नियोजन विभागाने श्रीक्षेत्र जेजुरीसाठी 2.89 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे तसेच महालक्ष्मी देवस्थानासाठी तरतूद केलेली आहे ही बाब स्वागतार्ह आहे. परंतु एकवीरा देवी संस्थान, नाशिकची चर्तुश्रृंगी देवस्थान, मोहटा देवी संस्थान अशी अनेक देवस्थाने अजूनही दुर्लक्षित आहेत. शासन देवस्थानांसाठी पैशांची तरतूद करीत असतांना ज्या देवस्थानांना निधी मिळालेला नाही त्यांना निधी उपलब्ध करुन द्यावा ही विनंती आहे.

सभापती महोदय, मानव विकासाच्या संदर्भात शासनाने नियोजन विभागाच्या अंतर्गत पदांची निर्मिती केलेली आहे, अंगणवाडयांसाठी तरतुदी केलेल्या आहेत. परंतु सन 2003 नंतर मानव विकास अहवालाच काढलेला नाही. मानव विकास अहवाल प्रकाशित केला नाही तर गेल्या सात वर्षात काय बदल झाले, बॅकवर्ड रिजन ग्रॅंट फंड असेल किंवा सर्व नियोजनाचे विषय असतील तर त्यांचे आपण मूल्यमापन कसे काय करणार आहात ? त्यामुळे दर वर्षी मानव विकास अहवाल प्रकाशित करण्याची गरज आहे.

आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**दलितांच्या हक्काच्या सनदे बाबत**

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी दलितांच्या सनदेच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. सामाजिक न्याय विभागाला ही बाब निदर्शनास आलेली नाही. परंतु हा विभाग कॉंग्रेस पक्षाकडे असल्यामुळे राष्ट्रवादीच्या पक्षाची सनद कॉंग्रेसवाले कसे काय स्वीकारतील ?

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर): सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 20 वर मी बोलणार आहे.

रेडिओ ट्रन्किंग स्पेक्ट्रमसाठी 10 कोटी 82 लाखाची रूपयांची तरतूद करण्यात आली आहे.बॉम्बस्फोटाच्या वेळी असे लक्षात आले आहे की, अशा प्रकारच्या दुर्घटनेच्या वेळी एकाच वेळी अनेक एजन्सीज काम करीत असतात. त्यांच्याकडे संपर्क साधण्यासाठी वेगवेगळी माध्यमे असतात. कोणाकडे वायरलेस असते, कोणाकडे मोबाईल असतो, वायरेलस मधील VHM असतो. या सगळ्यांमध्ये समन्वय साधणारी यंत्रणा उपलब्ध झालेली आहे. त्याचा गृह विभागाने विचार करावा. त्यामुळे अनेक प्रकारच्या एजन्सीज मध्ये चांगल्या प्रकारचा समन्वय होऊ शकतो.

आमदार विकास निधी संबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत.

आमदार विकास निधीतून नवीन काही गोष्टी करायला परवानगी मिळत नाही. विशाळगडावरील मुंढा दरवाजा कोसळायला आलेला आहे. तो बांधण्यासाठी एक विशेष बाब म्हणून जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला. दीड वर्ष झाले तरी अजून त्याचे काहीही उत्तर आलेले नाही. रस्ते, गटार्स या कामामध्ये पैसे वाहून जातात. त्या ऐवजी असे विशेष काम करणारे जे आहेत त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

कोल्हापूरला मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ व्हावे यासाठी फार मोठी चळवळ सुरू आहे. येथे खंडपीठ होणे ही फार मोठी आवश्यकता आहे. हायकोर्टामध्ये केस असेल तर लोकांना मुंबई पर्यंत यावे लागते. त्यामुळे कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ व्हावे यासाठी शासनाने विचार करावा.

पोलीस चकमकीत मृत्यू झालेल्यांसाठी 35 लाखाची तरतूद करण्यात आली आहे. याचा अर्थबोध होत नाही. पोलीस चकमकीत मृत्यू झालेले हे कुणीनाकुणी तरी गुंडच असतात. त्यांच्यासाठी रूपये 35 लाखाची कशासाठी तरतूद करीत आहोत हे मला कळत नाही. पुन्हा एकदा कमी वेळामध्ये माझे मुद्दे मांडण्याचा प्रयत्न मी केलेला आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

...............

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, आदिवासी विभागाच्या बाब क्रमांक 213 वर बोलण्यासाठी मी उभा आहे.

आदिवासी क्षेत्रामध्ये ज्या शाळा आहेत त्या शाळांमधील शिक्षकांना थकबाकी देण्यासंबंधीचा विषय गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित होता. यासाठी शासनाने आता 7 कोटी 64 लाख रूपये मंजूर केले आहेत म्हणून मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. उशिराने का होईना ती रक्कम या पुरवणी मागण्यांमध्ये आलेली आहे. त्याचा लाभ आमच्या शिक्षकांना मिळेल. मागच्या अधिवेशनामध्ये सदर आश्वासन दिले होते. त्याची आता पूर्तता झालेली आहे. मागच्या अधिवेशनामध्ये आश्रमशाळांमध्ये पहारेकरी आणि स्वयंपाकी ही पदे निर्माण करण्याचा आणि त्यास मान्यता देण्याचा प्रयत्न करतो, पुढच्या अधिवेशनामध्ये आपणास हा विषय मांडावा लागणार नाही, इतके स्पष्ट आश्वासन माननीय मंत्र्यांनी दिले होते. ही पदे मंजूर करण्यासंबंधात आणि त्या संबंधातील पुरवणी मागणी या अधिवेशनात येईल अशी अपेक्षा होती. पण ती आलेली नाही. तेही लवकरात लवकर व्हावे अशी अपेक्षा आहे.

आदिवासी विभागाच्या मंत्रालय स्तरावरील जे अधिकारी आहेत त्यांच्याकडून आमदारांची पत्र गेल्यावर सुद्धा त्यास एक ते दीड वर्षे उत्तर मिळत नाही. अंतरिम व अंतिम कुठलेही उत्तर मिळत नाही. आमचा पी.ए.तेथे पाठपुरावा करण्यासाठी गेल्यानंतर त्यांना दुरूत्तर केले जाते. आम्हाला फक्त आमदारांचीच कामे आहेत काय, दुसरी कामे नाहीत काय असे विचारले जाते. मी आपणाकडे संबंधित अधिकाऱ्यांची नावे लेखी स्वरूपात देणार आहे. आपण त्यावर कोणती कारवाई करणार आहात हे लेखी कळवावे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

...........

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईतील गिरणी कामगारांना घरे देण्याच्या प्रस्तावावर चर्चा घेण्याबाबत.**

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आता 3.59 झाले आहेत. सकाळी सांगितले होते की, शेवटचे दोन तास गिरणी कामगारांच्या प्रश्नावर चर्चा होईल.

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : त्या साठी आज आपण शेवटच्या अडीच तासाचे अशासकीय कामकाम घ्यायचे नाही असे ठरविले आहे.

श्री,रामदास कदम : माननीय सभापती महोदय, सकाळी माननीय सभापतींनी स्पष्टपणे सांगितले की, शेवटच्या 2 तासामध्ये गिरणी कामगारांसंबंधीच्या प्रस्तावावर चर्चा होईल. आता दुपारचे 3.59 वाजले आहेत. गिरणी कामगारांचा प्रश्न महत्त्वाचा आहे. आम्ही आज 289च्या प्रस्तावाची सूचना दिली होती. सगळे कामकाज बाजूला ठेवून चर्चा करण्यात यावी असे आमचे म्हणणे होते. आपण गिरणी कामगारांवर, मराठी माणसांवर अन्याय करीत आहात. माननीय सभापतींनी सांगितले आहे की, शेवटच्या दोन तासामध्ये गिरणी कामगारांसंबंधीच्या प्रस्तावावर चर्चा होईल. माननीय सभापतींनी असेही सांगितले की, 11.00 ते 6.00 वाजे पर्यंत सभागृहाचे कामकाम होईल. 6.00 वाजता सभागृहाचे कामकाज थांबेल. शेवटच्या दोन तासामध्ये गिरणी कामगारांसंबंधीच्या प्रस्तावावर चर्चा होईल. आता दुपारचे 3.59 वाजले आहेत.

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

सभापती महोदय, गिरणी कामगारांवरील अन्याय आम्ही सहन करणार नाही...

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : आपण आज अशासकीय कामकाज घेणार नाही त्या ऐवजी ही चर्चा घेणार आहोत....

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, आम्ही नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर सन्माननीय सभापतींनी निर्णय दिल्याप्रमाणे आपण चर्चा सुरु केली पाहिजे. आता संध्याकाळचे 4 वाजले असून ही चर्चा आता सुरु झाली पाहिजे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावनेशी आम्ही सर्व सन्माननीय सदस्य सहमत आहोत. पुरवणी मागण्यांवरील चर्चेकरिता जो काही थोडा फार वेळ लागेल तो आपण संध्याकाळी वाढवून द्यावा. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना चर्चेकरिता दोन तासांचा वेळ देता येईल त्यामध्ये विशेष काहीही नाही. हा फक्त दोन तासाचा प्रश्न आहे, दोन तासाऐवजी अडीच तासाची चर्चा करा. आम्ही उशिरापर्यंत सुध्दा बसायला तयार आहोत.

श्री. दिवाकर रावते : आम्हाला हे अजिबात मान्य नाही. सन्माननीय सभापती महोदयांकडे बैठक झाली त्या संदर्भात आम्ही सर्व मान्य केले. आजचे अशासकीय कामकाज आमचे आहे, ते पुढे ढकलण्यास आम्ही सांगितले. या ठिकाणी सन्माननीय प्रभारी संसदीय कार्य मंत्र्यांनी घोषणा केली की, शेवटचे दोन तास म्हणजे 4 ते 6 वाजेपर्यन्तची वेळ ही गिरणी कामगारांच्या प्रस्तावावरील चर्चेकरिता राहील. त्या वेळी बाकीचे सर्व कामकाज बाजूला ठेवण्यात येईल. पुरवणी मागण्यांवरील आमची भाषणे झालेली आहेत त्यामधून आम्हाला जे काही मांडावयाचे होते ते आम्ही मांडले आहे. त्यांना जे काही मांडावयाचे आहे ते त्यांनी सोमवारी मांडावे आणि पुरवणी मागण्या मंजूर करुन घ्याव्यात. आता 4 वाजले असल्यामुळे गिरणी कामगारांच्या प्रस्तावावरील चर्चा आपण सुरु करावी.

**तालिका सभापती** : मंत्रीमहोदयांनी आपले उत्तर पूर्ण करावे...

(गोंधळ)

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सभापतींनी एकदा निर्णय दिल्यानंतर पुरवणी मागण्यांवर चर्चा होऊ शकते काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, गिरणी कामगारांच्या प्रस्तावावरील दोन तासाची चर्चा निश्चितपणे होईल.

(गोंधळ)

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, ही चर्चा दोन तासाची नाही तर चार ते सहा या वेळेतच झाली पाहिजे. पुरवणी मागण्यांवरील कामकाज आपण सोमवारी घ्यावे. सन्माननीय सभापतींनी दिलेल्या निर्णयावर चर्चा होऊ शकत नाही.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या विषयाबाबत चर्चा झाली होती परंतु निर्णय झालेला नव्हता ही वस्तुस्थिती आहे. गिरणी कामगारांच्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी आवश्यक असलेला वेळ मिळत असेल तर आपण ही चर्चा करुन घेऊ किंवा मग सोमवारी चर्चा घेऊ असे म्हटले होते. त्यावर आपला निर्णय झाला नव्हता.

(गोंधळ)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सभापतींनी दिलेला निर्णय आपण मानावयास तयार नाही ही बदमाशी आहे. ही बदमाशी आम्ही चालू देणार नाही. सन्माननीय सभापतींनी दिलेला निर्णय पाळणार नसाल तर आम्ही यापुढे सन्माननीय सभापतींच्या दालनामध्ये पाऊल टाकणार नाही....

(गोंधळ)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया शांत रहावे आणि माझे ऐकून घ्यावे.....

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सभापतींनी दिलेला निर्णय मानला जाणार नसेल तर आम्ही कशासाठी या ठिकाणी बसावयाचे? आम्ही आपले म्हणणे ऐकून घेणार नाही. सन्माननीय सभापतींनी दिलेला निर्णय तुम्हाला पाळावाच लागेल. ही कामकाज करण्याची पध्दत नाही, आम्ही या ठिकाणी हाताची घडी घालून बसण्यासाठी आलेलो नाही...

(गोंधळ)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदमजी आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेजी जरा आपण दोन मिनिटे खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील आपणास काही सांगावयाचे आहे काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, अर्ध्या तासापूर्वी आपण स्वत: जाहीर केले त्यावेळी सन्माननीय मंत्रीमहोदय श्री. बाळासाहेब थोरात उभे राहिले. साडे तीन वाजता मागण्यांवर भाषणे सुरु असतांना मंत्रीमहोदय म्हणाले की, आपण पावणे चार वाजता मागण्यांवरील चर्चा थांबवू आणि गिरणी कामगारांच्या प्रस्तावावरील चर्चा सुरु करु. पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये ज्यांना भाग घेण्याची इच्छा आहे ते सन्माननीय सदस्य सोमवारी भाषण करतील व त्यावरील मंत्रीमहोदयांचे उत्तराचे भाषण देखील सोमवारी होईल असे ठरले होते. अशाप्रकारे ठरल्यानुसार आता चार वाजले असल्यामुळे आपण गिरणी कामगारांच्या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करावी. यामध्ये आपली काही अडचण आहे काय?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, अशासकीय कामकाजावरील चर्चा अडीच तासाची असते ते कामकाज आपण आज घेणार नाही. त्यामुळे तो वेळ आपण गिरणी कामगारांच्या प्रस्तावावरील चर्चेकरिता देत आहोत. त्यामध्ये थोडा वेळ काढून आज पुरवणी मागण्यांवरील मंत्रीमहोदयांची उत्तरे होऊन जातील, ती सोमवारी होणार नाहीत....

(गोंधळ)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सोमवारी पुरवणी मागण्यांवर चर्चा ठेवली तर काय फरक पडणार आहे काय?

(गोंधळ)

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सभागृहामध्ये झालेल्या चर्चेनुसार दुपारी पावणे चार वाजता पुरवणी मागण्यांवरील चर्चा संपवावी असे ठरले होते.

(गोंधळ)

श्री. दिवाकर रावते : तुम्हाला मागण्या मंजूर करुन घ्यावयाच्या आहेत. तुमचा अट्टाहास असेल तर आता प्रत्येक विभागाच्या मागण्यांवर आम्ही मतदानाचा आग्रह धरु, मागण्या होऊन जाऊ द्या.....

**(सभापतीस्थानी सन्माननीय सभापती)**

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सोमवारी विधानसभेमध्ये मागण्यांवर गिलोटीन आहे. मी स्पष्टपणे म्हटले होते की, पुरवणी मागण्यांवरील चर्चा पावणे चार वाजता संपत असेल तर ती संपवून गिरणी कामगारांच्या प्रस्तावावरील चर्चा सुरु करता येईल.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सोमवारी गिलोटीन आहे. मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की, जर 03 वाजून 45 मिनिटांनी पुरवणी मागण्यांवरील चर्चा संपत असेल तर ते चांगले होईल. मग आपल्याला 03 वाजून 45 मिनिटांनी गिरणी कामगारांच्या संबंधातील चर्चा सुरु करता येईल.

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : पुरवणी मागण्यांवरील चर्चेचे उत्तर द्यावयास पाहिजे.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, आपण यासाठी वेळ वाढवून द्यावी.

**सभापती** : माझ्या दालनामध्ये दोन तासापूर्वी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री.बाळासाहेब थोरात यांच्या बरोबर चर्चा झाली. त्या वेळी आपण असे ठरविले की, गिरणी कामगारांच्या संबंधातील चर्चा महत्वाची असल्यामुळे आजच्या कामकाज पत्रिकेवरील अशासकीय कामकाज न घेता, पुरवणी मागण्यांवरील चर्चा ही माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह पूर्ण करु या व त्या नंतर गिरणी कामगारांच्या घरांच्या संबंधातील विषयाबाबत दोन तासाची चर्चा घेऊ या. सदरहू चर्चा 4.00 ते 6.00 वाजेपर्यंत होईल किंवा 4.00 ते 6.15 पर्यंत होईल किंवा 4.00 ते 6.30 वाजेपर्यंत सुध्दा होईल...

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, असे ठरले नव्हते. आम्हाला आपल्याकडून ही अपेक्षा नाही.

**सभापती** : माझ्या दालनामध्ये जी चर्चा झाली ......

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण आम्हाला सांगावे की, या विषयावर चर्चा करु नका. मग आम्ही ही चर्चा करीत नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**सभापती** : माझ्या दालनामध्ये जी चर्चा झाली, त्या वेळी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब,सन्माननीय महसूल मंत्री श्री.बाळासाहेब थोरात आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते होते. त्या वेळी तिघांनीही अशी सूचना केली की, गिरणी कामगारांच्या संबंधा-तील चर्चा होण्यासाठी आजच्या कामकाज पत्रिकेत दाखविलेले अशासकीय कामकाज आज न घेता



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर घ्यावे. आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या ज्या पुरवणी मागण्या आहेत. त्या वरील चर्चा पूर्ण करु आणि त्यानंतर गिरणी कामगारांच्या घराचा जो प्रश्न आहे, त्यावरील चर्चा सुरु करु अशा प्रकारे चर्चा झाली होती. याचा अर्थ असा नाही की, संध्याकाळी 6.00 वाजल्यानंतर सभागृहाचे कामकाज सुरु रहाणारच नाही असे काही नाही म्हणजे जरी आपण सकाळी 11.00 ते संध्याकाळी 6.00 वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज चालवावयाचे असा निर्णय घेतला असला तरी सुध्दा अपवादात्मक परिस्थितीमध्ये तो सभागृहाचाही अधिकार आहे आणि जर मला वाटले तर अशा वेळी ती बाब आपल्या समोर मांडून मी देखील त्याबाबत निर्णय घेऊ शकतो.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : तुम्हाला काय करावयाचे असेल ते करा. आम्हाला चर्चा करावयाची नाही. एवढे आम्हाला . .....

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते असे कसे होईल? पुरवणी मागण्यांवर जी चर्चा झाली, त्या संबंधीची उत्तरे आहेत, ती सन्माननीय मंत्री महोदयांनी . . . ..

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या पुरवणी मागण्या चर्चेसाठी सादर केल्या असून बाब क्र.1 ते 13 मान्य कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करते. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री.संजय केळकर, जयंत प्र.पाटील ......

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्हाला अत्यंत खेद होत आहे. आपण असे ठरविले होते की,पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सोमवारी उत्तर देण्याचे मान्य केले तरी चालेल .....

**सभापती** : तसे होणार नाही. पुरवणी मागण्यांवरील चर्चा आणि उत्तर आजच होईल. त्या नंतर गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नाबाबत दोन तास चर्चा होईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही मागण्यांच्या संबंधात कधी चर्चा केली ? या बाबतीत ट्रेझरी बेंचची जबाबदारी नाही, फक्त आमचीच जबाबदारी आहे काय ?

**सभापती** : दोघांचीही जबाबदारी आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

. . . .3 ई-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सामान्य प्रशासन विभागाच्या सन्माननीय राज्यमंत्री श्रीमती फौजिया खान यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतलेला आहे, त्या सर्व सन्माननीय सदस्यांचे मी आभार मानते. त्यांनी या मागण्यांच्या संदर्भात जे विचार व्यक्त केलेले आहेत त्याचा मी सन्मान करते. त्याबाबत जरुर विचार करण्यात येईल. माझी सभागृहाला विनंती आहे की, बाब क्र.1 ते 13 मंजूर कराव्यात.

(अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही या घटनेचा निषेध म्हणून सभात्याग करतो.

(यानंतर विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांचे असे मत आहे की, त्यांनी पुरवणी मागण्यांवर चर्चा केली असली तरी त्यांना आज शासनाकडून उत्तराची अपेक्षा नाही. या परिस्थितीत पुरवणी मागण्यांवरील चर्चा पूर्ण झाली आणि पुरवणी मागण्या मंजूर झाल्या असे मी जाहीर करतो.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण दिलेल्या कोणत्याही निर्णयाबद्दल किंवा आपल्या भूमिकेबद्दल मला काहीही बोलावयाचे नाही. पण मला हात जोडून आपल्याला एक नम्र विनंती करावयाची आहे.मी या सभागृहामध्ये जवळजवळ सव्वातीन वर्षे सदस्य म्हणून कार्यरत आहे. गेल्या 18 वर्षापासून मी विधान सभा आणि विधान परिषद या दोन्ही सभागृहांमध्ये काम करीत आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

सभापती महोदय, आपले वय आणि या विधिमंडळातील आपला गेल्या कित्येक वर्षाचा अनुभव असताना सुध्दा सभागृहात थोडे काही झाले तरी आपण सन्मानाने विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना बोलावून त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न करता. सभापती महोदय, थोडेसे काही झाले की, आपल्या निर्णयाच्या विरोधात या सभागृहात आकांडतांडव होते. म्हणून या पुढे जे काही निर्णय व्हावयाचे असतील ते सभागृहात होऊ द्यावेत. सभापती महोदय, आपण इतका सन्मान देऊन जर माननीय मंत्री महोदयाचे उत्तराचे भाषण पंधरा ते वीस मिनट ऐकण्याची तयारी नसेल तर ही वागण्याची पध्दत बरोबर नाही. म्हणून पुढच्या वेळे पासून सर्व निर्णय सभागृहात झाले पाहिजेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ही मस्ती आम्ही ऐकून घ्यावयाची काय?

**सभापती** : ही त्यांची मस्ती नसून त्यांनी वस्तुस्थिती सांगितलेली आहे.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात )

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, आपण कधीही उठून बोललात तर ते चालते आणि मंत्रिमहोदय बोलले तर त्याला मस्ती म्हणावयाचे, ही पध्दत बरोबर नाही.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात )

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, हा शब्द असंसदीय आहे तो रेकॉर्डवरुन काढण्यात यावा.

**सभापती** : तो शब्द रेकॉर्डवरुन काढण्यात येईल.

---



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ AKN/ MMP/

**पृ.शी.**: मुंबईतील बंद पडलेल्या गिरण्यांच्या जागेवर सर्व गिरणी कामगारांना घरे देणे.

**मु.शी.**: मुंबईतील बंद पडलेल्या गिरण्यांच्या जागेवर सर्व गिरणी कामगारांना घरे देणे या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे,रामदास कदम,जयंत प्र. पाटील,संजय केळकर, डॉ. दीपक सावंत,श्रीमती शोभा फडणवीस,डॉ. नीलम गोऱ्हे सर्वश्री कपिल पाटील, केशवराव मानकर,धनंजय मुंडे, चंद्रकांत पाटील, परशुराम उपरकर, रामनाथ मोते वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी 2 तास वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या अल्पकालीन चर्चेसाठी देण्यात आलेल्या दोन तसाच्या वेळेचे वाटप करण्यात यावे.

**सभापती** : सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना अर्धा-अर्धा वेळ देण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तरासाठी किती वेळ देण्यात आलेला आहे?

**सभापती** : सत्ताधारी पक्षासाठी 45 मिनिटे आणि विरोधी पक्षासाठी 45 मिनिटे अशा पध्दतीने दीड-तास वेळ देण्यात येईल. उत्तरासाठी 30 मिनिटे देण्यात येतील. केवळ माननीय मुख्यमंत्री उत्तर देतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"गुरुवार, दिनांक 28 जुलै, 2011 रोजी हजारोंच्या संख्येने गिरणी कामगारांचा विशाल मोर्चा मंत्रालयावर धडकणे, सदर मोर्चाला बहुतांशी राजकीय पक्षांचा पाठिंबा असणे, या विशाल मोर्चामध्ये कोकणासह पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडयातील कामगार देखील सामील असणे, सर्व गिरणी कामगारांनी एकत्र येऊन मोर्चाद्वारे स्वत:वर झालेला अन्याय निदर्शनास आणून देणे, हक्काची घरे मिळण्याच्या न्याय्य मागणीसाठी झगडत असलेल्या गिरणी कामगारांना न्याय मिळावा या करिता गिरणी कामगारांना घरे देण्या विषयीचे धोरण शासनाने जाहीर करण्याची आवश्यकता, या बाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, या चर्चेला सुरु करण्यापूर्वी आता या ठिकाणी झालेल्या चर्चेमध्ये मी केलेल्या उल्लेखमध्ये काही कमी अधिक झाले असेल आणि त्यामुळे आपण दुखावले असाल तर मी आपली मनस्वी क्षमा मागतो. कारण मंत्री महोदय, श्री. भास्करराव जाधव यांचे दुखणे मी समजू शकतो. तोंडघशी पडलेला मंत्री कसा असतो, त्याचे जीवंत उदाहरण श्री. भास्करराव जाधव हे आहेत. म्हणून ते गरम होऊन या ठिकाणी बोलत होते. माननीय मुख्यमंत्र्यांना कदाचित हे माहीत नसेल. ( अडथळा) मी गिरणी कामगारांच्या बाबतीत या ठिकाणी बोलत आहे. एक तर त्यांना फसवले आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी पेशन्स ठेवून माझे भाषण ऐकावे. श्री. भाई जगताप हे गिरणी कामगारांच्या बाबतीत प्रामाणिक आहेत. आमच्या ताई श्रीमती अलका देसाई या सुध्दा गिरणी कामगारांशी प्रामाणिक आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांच्या कारकिर्दीमध्ये आम्ही विधान परिषदेमध्ये हा प्रश्न उपस्थित केला होता. आदरणीय राज्य मंत्री श्री. भास्कर जाधव हे फार उत्साहात असतात, त्यांचा अभ्यासही चांगला असतो. ते उत्कृष्ट उत्तरे देतात. त्यांच्या कर्तृत्वाबद्दल माझे दुमत नाही. म्हणून आम्ही त्यांच्या उत्तरावर नेहमी विश्वास ठेवतो. सन्माननीय राज्य मंत्री श्री, सचिन अहिर हे त्यांच्या एवढेच किंबहुना काकणभर जास्त कार्यक्षम आहेत. पण त्यांच्या स्वभावामध्ये थंडपणा आहे. हास्य आहे. आक्रस्ताळेपणा नाही आणि मी हे केले आहे, असे सांगण्याची त्यांची वृत्ती नाही.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

त्यांचा या विषयाशी संबंध आहे. श्री. सचिन अहिर हे राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे प्रमुख होते. खरे म्हणजे त्यावेळी या सदनामध्ये गिरणी कामगारांच्या घराच्या संदर्भात श्री. सचिन अहिर यांनी उत्तर दिले असते तर ते जास्त उचित ठरले असते. कारण तो त्यांचा अधिकार होता. श्री. अशोक चव्हाण मुख्यमंत्री असताना या सदनामध्ये माननीय मंत्री महोदय श्री. भास्कर जाधव यांनी जोरात उत्तर दिले. ते उत्तर वाचण्यासारखे आहे. त्यांनी त्यावेळी हळहळ व्यक्त केली. त्यांनी उद्ध्वस्त गिरणी कामगारांबद्दल मत व्यक्त केले आणि सांगितले की, गिरणी कामगारांना मोफत घरे दिल्याशिवाय हे शासन गप्प बसणार नाही. त्यांनी या सभागृहात उत्तर दिल्यानंतर आम्हाला आनंद झाला. सन्माननीय सदस्यांनी बाके वाजविली. आम्ही त्यांचे कौतुक केले. ते हुरळून गेले. आपण गिरणी कामगारांकरिता फार मोठे काम केले असे त्यांना वाटले. मग ते विधानसभा सभागृहात गेले. त्या ठिकाणी सुध्दा त्याच प्रश्नावरच्या चर्चेत त्यांनी जाहीर केले की, गिरणी कामगारांना मोफत घरे देणार. सातव्या मिनिटाला तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण सभागृहात गेले आणि त्यांनी सांगितले की, राज्यमंत्र्यांनी जे जाहीर केले ते खरे नाही, आम्ही गिरणी कामगारांना मोफत घरे देऊ शकत नाही. हे त्यांनी रेकॉर्डवर सांगितले. तोंडघशी पडलेला मंत्री एवढा का चिडतो ते आता आम्हाला समजले. त्यांनी आमची दहा मिनिटे घालवली. मी त्यांची चीड समजू शकतो. पण उगाचच तुम्हा-आम्हाला सर्वांना संघर्षाप्रत उभे राहावे लागले. म्हणून मी माफी मागितली. मी माननीय मंत्री महोदयांची चीड सांगितली. त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांचा आदर्श घ्यावा. माननीय मुख्यमंत्री सभागृहात बसलेले आहेत. ते या चर्चेला सामोरे जाण्यासाठी आलेले आहेत. माननीय राज्यमंत्री आपल्या नेतृत्वाकडेही बघावयास तयार नाहीत. त्यांचे नेतृत्व कदाचित अजितदादा पवार असतील.

सभापती महोदय, मी पाच मिनिटांमध्ये गिरणी कामगारांच्या संघर्षाबद्दल सांगणार आहे. मला सगळेच सांगावयाचे नाही. पण 1982 साली मी कार्यरत होतो. आमची गिरणी कामगार सेना प्रचंड कार्यरत होती. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांना सगळा इतिहास माहीत आहे. कधी नव्हे ते त्यावेळच्या सर्व नेतृत्वावर अविश्वास दर्शवून गिरणी कामगार शिवसेनेच्या गिरणी कामगार सेनेकडे आकृष्ट झाले होते. मी त्या विभागामध्ये विभाग प्रमुख म्हणून काम करीत होतो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ AKN/ MMP/

श्री. दिवाकर रावते ...

बऱ्याचशा गिरण्या डिलाईल रोड, दादर, परळ भागामध्ये होत्या. अगदी कुर्ल्यापर्यंतच्या गिरण्या होत्या. त्यावेळी सगळ्याच गिरणी कामगार संघटनांनी संघर्ष उभारला होता. त्यांची अशी इच्छा होती की, कोणत्याही परिस्थितीमध्ये या संघर्षामध्ये आम्ही नेतृत्व करावे. त्यावेळी बॅ. अंतुले मुख्यमंत्री होते. त्यावेळी आदरणीय शिवसेनाप्रमुखांनी मुख्यमंत्री म्हणून बॅ. अंतुले यांची दोन तीन वेळा भेट घेतली आणि या संदर्भात तातडीने तोडगा निघालाच पाहिजे असा आग्रह धरला. बॅ.अंतुले मुख्यमंत्री असल्यामुळे नेहमीच्या पध्दतीने त्यांनी निर्णय घेण्यामध्ये काही अडचणी असल्याचे सांगितले. कामगार मैदानावर त्यावेळी गिरणी कामगारांची जी सभा झाली ती प्रचंड सभा होती. आदरणीय शिवसेनाप्रमुखांनी त्यावेळी सांगितले की, आपल्याला संप केव्हाही करता येतो आणि तो आपला अधिकार आहे. पण सरकार जर काही वेळ मागत असेल तर आपल्याला थोडा वेळ दिला पाहिजे. परंतु त्यावेळी भारावलेल्या सर्व गिरणी कामगारांच्या डोक्यामध्ये एकच भावना होती की, संप म्हणजे संप. असा मुंबईचा कामगार ज्वलंत आहे. तेथील सभा सोडून ते कामगार उठून गेले. त्या ठिकाणी शिवसेना थांबली. ते कामगार उठले आणि डॉ. दत्ता सामंत यांच्याकडे गेले. पुढचा सगळा इतिहास सर्वांना माहीत आहे. तो संप आजपर्यंत चालू आहे.

श्री. दत्ता इस्वलकर हे सर्व युनियनच्या नेत्यांना कंटाळलेले आहेत. त्यांनी कामगारांची एक कमिटी निर्माण केली. ते खटाव मिलच्या बाहेर उपोषणाला बसले होते. त्यावेळी मी मुंबईचा महापौर होतो. कोणत्याही राजकीय पक्षाच्या संघटनेच्या व्यतिरिक्त असलेली ही संघटना होती त्यामुळे गिरणी कामगारांच्या उपोषणाच्या संदर्भात महापौर म्हणून मी मुंबई महानगरपालिकेमध्ये चर्चा उपस्थित केली. त्यावेळी तत्कालीन आयुक्त म्हणाले की, आपला काय संबंध ? मी म्हणाले, मुंबईचे कामगार हे मुंबईचे वैभव आहे. त्याच्या व्यथा मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून व्यक्त होणार नसतील तर ती गोष्ट बरोबर नाही. त्यावेळी आम्ही सर्वपक्षीय एका भावनेतून त्यांच्या उपोषणाला मनापासून पाठिंबा दिला. ती सभा संपल्यानंतर श्री. दत्ता इस्वलकर उपोषणाला बसले होते त्या ठिकाणी महापौर म्हणून मी भेट दिली. ते म्हणाले की, रावते साहेब, तुम्ही आलात हे ठीक आहे. हा प्रश्न तुमच्या अखत्यारीतील नसला तरी तुमचा आदर करतो. मी म्हणालो की, हा प्रश्न कोणी सोडवावयाचा आहे ?

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

श्री.सुधाकरराव नाईक हे त्यावेळी मुख्यमंत्री होते. त्यामुळे मी तडक त्यांच्याकडे गेलो. सुदैवाने मला केव्हाही येण्यासाठी त्यांचे दरवाजे उघडे असायचे. श्री.सुधाकरराव नाईक यांच्यासंबंधी माझा अनुभव असा होता की, त्यांनी एखाद्या दिवशी संपूर्ण दिवसाच्या भेटी रद्द केल्यावरही नेमका त्याचदिवशी मी त्यांना भेटण्यास गेलो तर मला लगेच भेट दिली जात होती. काही मिळविण्याच्या उद्देशाने भेट घेतली जात नसे. सामाजिक विषयापुरते बोलणे एवढया मर्यादित विषयापुरती भेट होत असे. त्यानुसार मी त्यांना भेटून अशी विनंती केली की, गिरणी कामगारांचा प्रश्न घेऊन मी आलो आहे. ते मला म्हणाले की, हरकत नाही. त्यांनी ताबडतोब त्यांच्या सचिवांना विचारले की, श्री.रावते यांना उद्याची कोणती वेळ देता येईल ते सांगावे. मला चांगले आठवते की, आदरणीय श्री.सुधाकरराव नाईक हे दुपारी 2-3 वाजता माझ्याबरोबर श्री.दत्ता इस्वलकर व संबंधित गिरणी कामगारांना भेटण्यासाठी आले होते. त्यांच्यासोबत फुटपाथवर पाऊण तास बसले होते. मुख्यमंत्र्यांनी त्यांचे सर्व म्हणणे ऐकून घेतले. त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, मुख्यमंत्री या नात्याने मी तुम्हाला शब्द देतो. तुमच्या सर्व मागण्यांबाबत मी 100 टक्के प्रामाणिकपणे विचार करीन. मात्र आता निर्णय मी तुम्हाला देऊ शकत नाही. त्यांनी शब्द दिल्यामुळे त्यावेळी कामगारांनी उपोषण सोडले होते. कामगारांच्या प्रश्नासंबंधी आमचा असा संबंध आहे.

मी इतर बाकीच्या गोष्टीमध्ये जात नाही. कारण या चर्चेला वेळेची मर्यादा आहे. पण प्रत्येक वेळी आमच्याकडे बोट दाखविले जाते. तुम्ही सत्तेवर होता त्यावेळी काय केले ? आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये असलेले त्यावेळचे अनेक नेते काँग्रेसमध्ये होते. माजी सदस्य श्री.रोहिदास पाटील हे आज काँग्रेसमध्ये आहेत, त्यांनीही हा विषय मांडला होता. खास करुन सन्माननीय सदस्य श्री.मधुकरराव पिचड यांनी त्या चर्चेत प्रामुख्याने भाग घेतला होता. तत्कालीन सन्माननीय सदस्य व विद्यमान माननीय अध्यक्ष श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी शिवशाही सरकारला प्रश्न विचारण्यासाठी प्रश्नोत्तरात भाग घेतला होता. त्यावेळी मुख्यमंत्री म्हणून आदरणीय श्री.मनोहर जोशी सर यांनी जे उत्तर दिले होते ते 2-3 पानाचे आहे. त्यांचे संपूर्ण उत्तर मी वाचत नाही. त्यावेळी शिवशाही सरकारचे गिरण्यांसंबंधी धोरण जाहीर झाले होते ते सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रामाणिकपणे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ AKN/

श्री.दिवाकर रावते....

ऐकावे. कारण ते ऐकण्यासारखे आहे. त्यावेळी आदरणीय श्री.मनोहर जोशी यांनी असे सांगितले की, "पूर्वीच्या शासनाने कोणत्याही गिरणीची जमीन घेताना एक तृतीयांश मालकाजवळ ठेवावी. उर्वरित दोन तृतीयांश जमीन शासनाकडे द्यावी." पूर्वीच्या शासनाने म्हणजे माननीय श्री.शरद पवार हे त्यावेळी मुख्यमंत्री होते.  "यातील एक तृतीयांश जमीन महानगरपालिकेकडे, एक तृतीयांश जमीन स्वत:कडे ठेवावी" असा मूळ प्रस्ताव होता. त्यात करण्यात आलेला बदल सभागृहात अधिकृतपणे मांडण्यात आला. "एक चतुर्थांश जमीन मालकांना द्यावी, एक चतुर्थांश जमीन कामगारांना द्यावी, असा धोरणात्मक बदल केला आहे." असे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांनी सभागृहात अधिकृत धोरण जाहीर केले. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरद पवार यांनी धोरण जाहीर केले होते त्याच्या एक पाऊल पुढे टाकून एक चतुर्थांश जमीन कामगारांना द्यावी असा धोरणात्मक बदल मी जाहीर करीत असल्याचे सांगितले. "हे करीत असताना चार्ल्स कोरिया समितीच्या ज्या शिफारशी होत्या त्याही विचारात घेण्यात आल्या त्या माझ्याकडे आहेत व शासनासमोर विचारार्थ असलेले धोरण सुध्दा माझ्यासमोर आहे" असे त्यांनी जाहीर केले.

पुढे त्यांनी असे म्हटले की, "जमीन विक्रीचा कार्यक्रम म्हणून सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत तसा कार्यक्रम शासनाने हाती घेतलेला नाही.  पूर्वीच्या शासनाने ज्या जमिनी विकण्याचे ठरविले होते व ज्या कमिटमेण्ट केलेल्या आहेत तेवढयापुरते हे शासन बांधिल आहे, आमच्या सरकारने कोणत्या मिलची जमीन विकण्याचे धोरण ठरविलेले नाही." पुढे सन्माननीय सदस्य श्री.पिचड यांनी शिफारशीसंबंधी विचारलेल्या प्रश्नाबाबत श्री.मनोहर जोशी साहेबांनी "म्हाडा, मुंबई महानगरपालिका व जमीन मालक यांच्यातील विकसित एकूण क्षेत्र विचारात न घेता सरसकट एक तृतीयांश या प्रमाणे विभागणी व्हावी" असा समितीचा अहवाल असल्याचे सांगितले. "महानगरपालिकेच्या जमिनीचे हस्तांतरण करुन सामाजिक सुखसोयी, दवाखाने, शाळा याकरिता त्या परिसरातील गरजेनुसार त्याचा वापर करण्यात यावा. महानगरपालिकेच्या जमिनीचे हस्तांतरित करावयाच्या जागेचा टीडीआर मालकाला देण्यात यावा." असे म्हटले.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....

हा यामधील महत्वाचा भाग आहे. मधला भाग असा आहे की या वेळेला प्रथमच 1/4 जमीन ही कामगारांसाठी ठेवावी अशा प्रकारचा विचार करण्यात आलेला आहे. जी खुली जागा आहे त्या ठिकाणी रहिवाशी, वाणिज्य अनुज्ञेय औद्योगिक वापरासाठी त्या जागेचा उपयोग करण्यात येईल. शिवशाहीचे हे धोरण स्पष्ट शब्दात जाहीर करण्यात आले. जनहिताच्या दृष्टीने हा प्रश्न लवकर सुटावा म्हणून अधिनियमातील कलम 37च्या फेरबदलाच्या आदेशाबरोबरच अधिनियमातील कलम 154 अन्वये सदर फेरबदल शासनाने मंजुरीपूर्वक अंमलात आणण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेला आदेश देण्यात येतील आणि कामगार कल्याणासाठी वापरात आणवयाच्या जमिनीचा उपयोग व विनियोगासाठी 70 टक्के कामगारांनी योग्य तो प्रस्ताव सादर करावा, त्यावर शासनाद्वारे निर्णय घेण्यात येईल आणि हेच नियम एनटीसीच्या जमिनीच्या संदर्भात वापरण्यात येतील, असे स्पष्ट धोरण ठरविण्यात आले होते. एक गोष्ट मात्र नक्की की पूर्वी ज्या गिरण्यांना परवानगी देण्यात आलेली आहे ते सर्व प्रस्ताव बीआयएफआरच्या अटीनुसार आणि पूर्वीच्या सरकारने जे मंजूर केले होते तेवढेच फक्त या शासनाने मंजूर केले आहेत. नवीन निर्णय घेईपर्यन्त शासन नवीन गिरण्यांना परवानगी देणार नाही. हे शिवशाहीचे धोरण होते. युतीचे सरकार आले त्यावेळी काय केले हा प्रश्न विचारुन सतत बुध्दीभेद करण्याचा प्रयत्न केला जातो म्हणून शिवशाहीचे धोरण काय होते हे मी सांगितले. हे धोरण 13 मार्च 1998 रोजी जाहीर झाले. पुढच्याच वर्षी तुमच्याकडे सत्ता आली. त्यामुळे धोरणात बदल करण्याचा प्रश्न शिवशाहीकडे नव्हता. कामगारांसाठी 1/4 जमीन द्यावी असा निर्णय शिवशाहीने घेतला होता. हा निर्णय कोणी बदलला ?

सभापती महोदय, कामगारांच्या प्रतिनिधीने सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केलेली एक जनहित याचिका माझ्याकडे आहे. त्या याचिकेवर ओरल ऑर्डर्स दिलेल्या आहेत. 1991च्या या जनहित याचिकेवर न्यायमूर्ती सुजाता मनोहर यांच्या ओरल ऑर्डर्स आहेत. या सर्व ऑर्डर्स मी वाचणार नाही. यातील दोन तीन गोष्टींना तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शरद पवार साहेबांनी मान्यता देखील दिलेली आहे. आघाडी सरकारमध्ये दोन पक्ष एकत्र काम करीत आहेत. महाराष्ट्राचे नेतृत्व करणारे तत्कालीन मुख्यमंत्री सन्माननीय श्री. शरद पवार यांनी सर्वच नाही पण काही गोष्टी सहृदयतेने आणि कामगारांच्या हिताच्या दृष्टीने मान्य केल्या होत्या. म्हणून कामगारांच्या संदर्भात

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

आपण जे काही निवेदन करणार आहात ते करताना श्री. शरद पवारसाहेबांच्या त्यावेळच्या विचारांचा आदर करणारे निवेदन होणार नसेल तर राष्ट्रवादी पक्षाच्या मंत्र्यांसमोर आम्ही प्रश्न उपस्थित करु. मला विचारण्यात आले तर त्यावेळचे श्री. शरद पवार यांचे विचार काय होते हे मी सांगेन. परंतु ते सांगण्याची माझी जबाबदारी नाही.

सभापती महोदय, या सरकारने या गिरणी कामगारांना कसे भरडले आहे, या गिरणी कामगारांचे सर्वस्व कसे उद्ध्वस्त केले आहे, या गिरणी कामगारांना कसे टाचा घासत घासत मरायला लावले आहे याबाबतीत अधिक सांगण्याची आवश्यकता नाही. अडीच लाख कामगारातील सव्वालाख कामगार राहिले याचा अर्थ बरेचसे कामगार या सरकारला शिव्याशाप देऊनच गेले. उद्ध्वस्त जीवन जगत असताना कामगार मृत्यूमुखी पडत होते. आमचे घर कधी होणार, आमच्या वारसांचे घर कधी होणार याच्या प्रतीक्षेत गिरणी कामगार टाचा घासून गेले. ते शिव्याशाप देत गेले. ज्यांनी मुंबई घडवली, उभी केली, ज्यांनी मुंबईसाठी रक्त सांडले, ज्यांनी संयुक्त महाराष्ट्र मिळवून दिला, ज्यांनी या महाराष्ट्राला मुंबई मिळवून दिली, ज्यांच्या पुण्याईमुळे आणि रक्ताच्या सिंचनामुळे तुम्ही आणि आम्ही या विधान भवनामध्ये आहोत त्यांची उपेक्षा तुम्ही कशी केलीत ? मला सांगायला अत्यंत दु:ख होते. सुजाता मनोहर यांनी 24 डिसेंबर 2001 रोजी आदेश दिले होते. शासनाने मुंबईतील कापड गिरण्यांच्या जमिनीचा विकास व विक्रीतून उपलब्ध होणा-या निधीचा विनियोग व नियंत्रण ठेवण्यासाठी विकास नियंत्रण नियमावली 58(9) वरील तरतुदीनुसार समिती स्थापन करण्यात आली. हे सर्व आपल्याला माहीत आहे. संबंधित शासन निर्णय सोबत जोडलेला आहे. या शासन निर्णयानुसार संनियत्रण समितीने कापड गिरण्यांच्या कामगारांसाठी निवासस्थाने, पर्यायी नोक-या व त्यासाठी प्रशिक्षण उपलब्ध होते की नाही हे पाहण्यासाठी समिती नेमली.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

ती चर्चा दोन अधिवेशनात मी घडवून आणली. माजी आमदार श्री.मधु चव्हाण आणि मी या विषयावरील चर्चा घडवित होतो. श्री.बी.बी.चव्हाण, सेवानिवृत्त न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय यांना संनियंत्रण समितीचे अध्यक्ष करण्यात आले. डी.सी.रुल्स 58(7) मध्ये केलेल्या तरतुदीनुसार 'डायव्हर्सिफाय इंडस्ट्रीयल' असा शब्दप्रयोग होता, या शब्दाचा अर्थ काय अशी विचारणा त्या निवृत्त न्यायाधीशांनी सरकारकडे केली होती. 2003 च्या सभेमध्ये कामगार विभागाचे तत्कालीन सचिव श्री.खोत यांनी शब्दाचा अर्थ तीन महिन्यात स्पष्ट करतो असे सांगितले होते. आज 2011 पर्यंत शासनाने त्या शब्दाचा अर्थ या समितीला सांगितलेला नाही. कामगारांविषयी या सरकारला किती प्रेम आहे हे या उदाहरणावरुन दिसून येते. समिती उच्च न्यायालयाने नेमली होती. आजपर्यंत शासनाने त्या समितीला या शब्दाचा अर्थ सांगितलेला नाही. मालकांनी नोकरी देण्याबाबत समितीची हतबलता झाली. ही कोंडी फोडण्याकरिता कर्मचारी निवारा व कल्याण संघाने 2006 मध्ये जनहित याचिका दाखल केली होती. त्या जनहित याचिकेवर सुनावणी चालू असताना न्यायालयाने शासनाला वेळोवेळी फटकारले. शासनाचा नाकर्तेपणा विचारात घेऊन संबंधित न्यायाधीश उद्विग्न झाले आणि त्यांनी वाईट प्रकारे शासनाची निर्भत्सना केली. वृत्तपत्रांनी देखील या बातमीला प्रसिध्दी दिली. न्या.चव्हाण यांनी कोणतीही कारवाई करु नये असे आदेश दिल्यानंतर कामगार निवारा व कल्याण संघाने उच्च न्यायालयासमोर बाजू मांडून शासनाची भूमिका काय आहे हे निदर्शनास आणून दिले आणि उच्च न्यायालयाने शासनाचे ते आदेश रद्द ठरविले आणि असे सांगितले की, आम्ही दिलेल्या आदेशानुसार समितीला काम करावे लागेल आणि शासनाचे आदेश आम्ही रद्द केले आहेत. न्यायालयीन प्रक्रियेची गंभीर दखल घ्यावी लागली आणि 3 ऑक्टोबर, 2007 रोजी डी.सी.रुल्स 58(7)(ड) अंतर्गत गिरणी मालक, विकासक आणि कब्जेदार यांनी गिरणी कामगार आणि त्यांच्या वारसांना प्राधान्याने नोकरी दिली पाहिजे अशा प्रकारचे आदेश दिले. माजी न्यायमूर्ती श्री.चव्हाण यांनी कंटाळून राजीनामा दिला. कारण शासनाने प्रतिसाद दिला नाही. मराठी भाषेबाबत नेमलेल्या समितीचे अध्यक्ष न्या.नरेंद्र चपळगावकर यांचे जे झाले तेच न्या.चव्हाण यांचे झाले. न्या.चव्हाण यांनी राजीनामा दिल्यानंतर न्या.एस.एस.पारकर, उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश यांची त्या समितीवर नियुक्ती झाली. शासन प्रतिसाद देत नाही म्हणून तेही कंटाळले. मे, 2011 मध्ये संनियंत्रण समितीचा त्यांनी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

राजीनामा दिला. 1991 ते 2011 या काळात कामगारांच्या हिताकरिता सर्वोच्च न्यायालयाने दखल घेतली. निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण समिती नेमली. परंतु या समितीवर नियुक्ती झालेल्या दोन निवृत्त न्यायाधीशांना शासनाच्या नाकर्तेपणामुळे आणि मालकधार्जिण्या धोरणामुळे राजीनामा द्यावा लागला. त्यामुळे कामगारांच्या घराचा प्रश्न रेंगाळत राहिला.

सभापती महोदय, एनटीसी गिरण्यांच्या संदर्भात 1900 कोटी रुपये केंद्र सरकारने खर्ची घातले. गिरण्यांचे राष्ट्रीयीकरण करताना 1900 कोटी रुपये देऊन 22 गिरण्या केंद्र सरकारने ताब्यात घेतल्या. एनटीसीने या 22 पैकी काही गिरण्यांची 70.52 एकर जागा विकून 300 कोटी रुपये नफा मिळविला. अद्याप 199.83 एकर जागा एनटीसीच्या ताब्यात आहे. यापैकी निम्मी जागा मिळविण्यात राज्य सरकार यशस्वी ठरले तर कामगारांच्या घरासाठी जमीन कुठून आणायची हा प्रश्न उपस्थित होणार नाही. एनटीसीने मिळविलेला नफा तामीळनाडू राज्यात गुंतविला आहे. मुंबईतील गिरण्यांची जमीन विक्री केली. 70 एकर जमीन विकून 2500 कोटी रुपये उपलब्ध झाले. ती सर्व रक्कम तामीळनाडू राज्यात गुंतविली आहे. त्यात महाराष्ट्राच्या वाट्याला काही नाही. राज्य सरकारचा त्यात काही संबंध नाही का? अशा प्रकारची केंद्र सरकारची भूमिका आहे. केंद्रामध्ये तुमच्याच पक्षाचे सरकार आहे. सुदैवाने केंद्र स्तरावर वजन असलेले माननीय मुख्यमंत्री या राज्याला लाभले आहेत. एनटीसीकडून अमुक इतकी जागा उपलब्ध करुन घेता येईल आणि ती घ्यावीच लागेल अशा प्रकारची ग्वाही सभागृहाला देणार आहात का? गिरण्यांच्या जमिनी या मालकीच्या नव्हत्या. सगळ्या जमिनी लिजवर देण्यात आलेल्या होत्या.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत/ प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

सात कापड गिरण्या कार्यरत होत्या व त्यात 2.50 लाख कामगार काम करीत होते. या गिरण्याखाली एकूण 24.42 एकर क्षेत्रफळ होते. महापालिकेच्या लीजच्या या जागा होत्या. त्यात फिनीक्स मिल, मोरारजी मिल, श्रीराम मिल, रघुवंशी मिल, खटाव मिल यांचा समावेश आहे. सिम्प्लेक्स मिल ही महाराष्ट्र शासनाच्या भाडेपट्टयाच्या जागेवर होती. तसेच मुकेश मिल, बॉम्बे डाईंग, रघुवंशी व न्यू हिंद टेक्स्टाईल्स या गिरण्या सुध्दा शासनाच्याच जागेवर होत्या. त्यातील सिम्प्लेक्स मिलचा भाडेपट्टा सन 24.4.1983 मध्ये संपलेला आहे, ते या जागेचे मालक नसल्यामुळे शासनाने ती जागा ताब्यात घेणे आवश्यक आहे. तरी देखील त्या जागेवर त्या मिलच्या मालकांनी मॉल बांधून करोडो रुपये कमावले, हा खरा प्रश्न आहे व त्याचे उत्तर शासनाकडून मिळाले पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

त्यानंतर प्रश्न असा निर्माण होतो की, या मिलची लिज संपल्यानंतर पुन्हा ही जागा त्यांना कशी काय देण्यात आली याचाही खुलासा व्हावा. या जागेचे वार्षिक भाडे फक्त 48.81 पैसे इतकेच होते. त्यानंतर खटाव मिलचे लीज दि. 1.9.2005 मध्येच संपलेले आहे. त्या जागेचे वार्षिक भाडे फक्त 386 रुपये एवढेच होते, ही जागा शासन ताब्यात घेणार काय, याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. मफतलाल मिलचा भाडेपट्टा सन 2010-11 पर्यंतच आहे, तो करार आता संपुष्टात येत आहे. ही जागा सुध्दा शासनाचीच आहे. तसेच या मिलवरुन तत्कालीन वस्त्रोद्योग मंत्री श्री. रणजित देशमुख आणि माझा सभागृहात वादही झाला होता. मी त्या जागेवर प्रत्यक्ष जाऊनही आलो आहे. त्यांच्याच काळात पूर्णपणे मालक धार्जिणे होऊन ही जागा विकून टाकली, किती कोटी घेतले हे मला माहीत नाही, अशा दुर्दैवाच्या फेऱ्यात या गिरण्यांच्या जमिनी अडकल्या आहेत. पण राजकीय इच्छाशक्ती असेल तर सर्व काही करता येते, आणि तशी इच्छा नसेल आणि मालकांना मिळावे असे वाटत असेल तर ते योग्य नाही. मग आता कामगारांना शासन घरे देणार की नाही, जाता की राहता हा प्रश्न आता निर्माण झालेला आहे, पण हा निर्णय शासनाला घ्यावाच लागेल आणि तो घेण्यासाठी आम्ही भाग पाडू. आमची मागणी अशी आहे की, सन 1982 साली हजेरी पटावर असलेल्या सर्व कामगारांना घरे व नोकरी देण्याबाबत शासनाला विचार करावा लागेल. तसेच मृत कामगारांच्या वारसांना त्यांचा कायदेशीर हक्कही मंजूर करावा लागेल. कामगारांची पात्रता ठरविण्यासाठी कोणत्याही अटी घालू नयेत, तो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

कुठे राहतो वगैरे अटी असू नयेत. कारण या कामगारांच्या जिवावर मिलचे मालक शेकडो कोटीचे मालक झाले, त्यांनी रक्ताचे बुंद सांडले नाहीत. रस्त्यावर गोळीबारामध्ये मृत होऊन ज्या कामगारांनी मुंबई उभी केली त्यांना कोणत्याही अटी विचारु नयेत. तसेच संक्रमण शिबीरात ज्या जागा कामगारांसाठी राखून ठेवल्या त्या मोकळ्या करुन द्याव्यात. तसेच जी घरे सध्या बनविली त्यांची किंमत 12 लाख रुपये सांगितली, त्यानंतर काल 5 लाखाचा आकडा फुटला असे ऐकले. असे न करता ज्या मिल मालकांना हजारो कोटी रुपये कमावून दिले, त्यासाठी कामगारांनी श्रम केले, त्यांना या घरांचा प्रिमियम लावा व त्यांच्याकडून हे पैसे वसूल करावेत. ज्यांच्या रक्तावर, ज्यांच्या घामावर, ज्यांच्या श्रमावर मुंबई आपल्याकडे आहे, आपण त्यांच्या पुण्याईवर या सभागृहात बसलेलो आहोत त्यांचा आदर करण्यासाठी कोणत्याही प्रकारे हेवेदावे न करता त्यांना न्याय देण्याची संधी आली आहे. म्हणून या कामगारांना शासनाने मोफत घरे द्यावीत. 1.10 लाख रुपये एवढी किंमत या घरांची सन 1983 पासून मान्य केली ती घरे या कामगारांना कशी देणार आहात, किती वेळेत देणार व त्यासाठी निधीची तरतूद कशी करणार आहात हे उत्तरात स्पष्ट झाले पाहिजे, अशी विनंती करतो आणि मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

-----

.....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मुंबईतील गिरणी कामगारांच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या व नाजूक प्रश्नावर सभागृहात चर्चा सुरु आहे. या चर्चेत भाग घेण्याची संधी दिली त्याबद्दल प्रथम आपले आभार मानतो व माझे विचार व्यक्त करतो.

महोदय, या प्रश्नावर बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सन 1982 पासूनच्या काही घटना सांगितल्या, ते बरोबर आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

आता गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे परंतु हा प्रश्न त्यावेळी सुध्दा उपस्थित झालेला होता तसेच गिरणी कामगारांच्या देणी देण्याच्या संदर्भातील विषय सुध्दा मोठया प्रमाणात उपस्थित झाला होता. मागील काळात गिरणी कामगारांची देणी देण्याच्या संदर्भात अनेक आंदोलने तसेच चळवळी झाल्या होत्या याचा मला येथे उल्लेख करावासा वाटतो. कामगारांनी शिवसेनेच्या कामगारसेनेकडे पाठ फिरवली होती. त्यावेळेस शिवसेना प्रमुखांचा फार दबदबा होता. शिवसेना प्रमुखांच्या हेतू विषयी माझ्या मनात कसल्याही प्रकारची शंका नाही हे मी सुरुवातीलाच सांगू इच्छितो. त्यावेळेस कामगारांमध्ये इर्षा आणि उत्साह मोठया प्रमाणात होता. असे असतांनाही कामगारांनी सर्व गोष्टींकडे पाठ फिरवून दुसरा मार्ग चोखळला व दुर्दैवाने संप झाला आणि त्या संपाची परिणती अशी झाली की, त्यामध्ये लाखो कामगार कुटुंबे होरपळली गेली, लोखो कुटुंबे देशोधडीला लागली.

सभापती महोदय, कामगारांच्या घरांचा प्रश्न हा सुरुवातीपासूनच होता परंतु त्याच्याही अगोदर त्यांच्या अस्तित्वाचा व देणी मिळण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. कामगारांच्या सर्व चळवळीचा मी एक साक्षीदार आहे. गिरणी कामगारांच्या चळवळीमध्ये आरएमएमएस ही एकच मान्यता प्राप्त संघटना होती व आज सुध्दा ही संघटना कार्यरत आहे. आरएमएमएस संघटनेचे नेतृत्व आताचे माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री श्री. सचिन अहिर हे करीत आहेत. त्यामुळे आम्ही माननीय गृहनिर्माण राज्य मंत्र्यांकडून कामगारांचे प्रश्न सोडविण्याची अपेक्षा करीत आहोत. परंतु ज्या पध्दतीने गिरणी कामगारांच्या प्रश्नाचे आता राजकारण केले जात आहे त्याचे मला आश्चर्य वाटते. 1992 साली कामगारांनी कामगार सेनेकडे पाठ फिरवल्यानंतर गिरणी कामगारांच्या घरांचा, पोटापाण्याचा, पगाराचा प्रश्न लावून धरला नव्हता. एवढेच नव्हे तर गिरणी कामगारांची जी कुटुंबे स्थलांतरित झाली होती ती कुटुंबे कोठे गेलेली आहेत हे सुध्दा जाणून घेण्याचा प्रयत्न केला नव्हता. परंतु आज राजकीय हेतू डोळयासमोर ठेवून, येणा-या निवडणुका डोळया समोर ठेवून आज अचानक पुतना मावशीचे प्रेम कसे काय जागे झाले ? हा माझा प्रश्न आहे. या प्रश्नाचे कारण असे आहे की, ज्या कामगारांनी आपल्याकडे पाठ फिरवली होती त्या कामगारांनी आपल्याकडे येऊन आपल्या कानात काहीही सांगितलेले नाही हे मी येथे खात्रीपूर्वक सांगू इच्छितो. याचे कारण असे आहे की, आजपर्यंत आम्ही आपापल्या परीने चळवळी चालवत आलेलो आहोत.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

आरएमएमएस ही संघटना मान्यता प्राप्त असली तरी आज जवळ जवळ 9 संघटना त्यामध्ये काम करीत आहेत व त्यांची एक कमिटी असून या कमिटीची एक कृती समिती झालेली आहे. या कृती समितीने तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. विलासराव देशमुख, माननीय श्री. अशोक चव्हाण, तसेच आताचे मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या बरोबर ज्या बैठका घेतल्या होत्या त्या बैठकींमध्ये मला प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहण्याची संधी मिळालेली आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जी माहिती वाचून दाखवली ती बरोबर आहे कारण त्या नोंद केलेल्या गोष्टी आहेत.

सभापती महोदय, मला आपल्या माध्यमातून राजकारण करणा-या सर्व मंडळींना विचारावयाचे आहे की, ज्यावेळेला 1997-98 मध्ये याबाबत निर्णय झाला होता त्यावेळी आजचे शिवसेनेचे नेतृत्व करीत असलेले माननीय श्री. उध्दवजी ठाकरे यांनी श्रीनिवास मिलच्या मालकांना बरोबर घेऊन "मालकांना जमिनी द्या" म्हणून त्यांचे प्रतिनिधीत्व केले होते व तेच आज "कामगारांना घरे द्या" म्हणून कामगारांचे नेतृत्व करीत असल्यामुळे मला त्याचे आश्चर्य वाटत आहे. नेतृत्व कोणी, कसे करावे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. परंतु त्याच्या मागे हेतू काय आहे हा महत्वाचा प्रश्न आहे. जर खरोखरच आपल्याला 1लाख 10 हजार कामगारांना घरे मिळवून द्यावयाची होती तर आपण त्यावेळेस ज्या घोषणा केल्या होत्या त्या एकदा आठवा. आपण 40 लाख घरे व 27 लाख नोक-या देऊ अशा प्रकारच्या आपण घोषणा दिल्या होत्या त्या जरा आठवा. 40 लाख घरांपैकी यांनी लाखभर घरे जरी कामगारांना दिली असती तर हा प्रश्न त्याच वेळेस निकाली निघाला असता, त्याच वेळेस या प्रश्नाची उकल झाली असती.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

या सगळ्या गोष्टी करत असताना श्री.उद्धव ठाकरे स्वत: मालकांचे प्रतिनिधीत्त्व करीत होते. सरकारने जागा विकायला परवानगी द्यावी असे ते सांगत होते. त्यावेळी त्यांची कोंडी झाली होती. त्यावेळी त्यांना परमिशनच देता येत नव्हती. यासाठी केंद्र सरकारची परवानगी लागते. हे कसे देतील.? तत्कालीन मुख्यमंत्री सन्माननीय श्री.मनोहर जोशी यांनी दिल्लीमध्ये एनडीएचे सरकार दिल्लीमध्ये असताना परवानगी दिली. त्यानंतर सर्व गिरण्यांच्या जागा विकल्या गेल्या. त्यात त्यांनी स्वत:सुद्धा एका गिरणीची जागा घेतली. कामगारांचा पुळका असलेली ही मंडळी काल स्टेजवरून एक बोलत होती आणि इथे वेगळे करीत आहेत. ते रात्री कुठे बसतात हे मला माहीत नाही. तो माझा प्रश्न नाही आणि प्रांत देखील नाही. वर्षभराच्या अंतरावर असलेल्या महानगरपालिकेच्या निवडणुका लक्षात घेऊन अचानक प्रेम उभे रहात असेल तर मी सांगू इच्छितो की, या सगळ्या चळवळीचे आम्ही साक्षीदार आहोत. या सगळ्या चळवळीतील आम्ही एक छोटासा भाग आहोत. सगळ्या बैठकीमध्ये आम्ही हे सर्व सातत्याने मांडलेले आहे. मला मुद्दामहून सांगितले पाहिजे की, गिरणी कामगार हा स्वाभिमानी आहे. गिरणी कामगारांना भीक नको. त्यांनी कमिटीमध्ये सांगितले की, आम्हाला मोफत घर नको. आम्हाला आमची हक्काची घरे द्यावीत. ती वाजवी भावात द्यावीत. 9 पैकी 8 संघटनांनी या बाबतीत चर्चा केली होती. ती रेकॉर्डवर आहे, याचा उल्लेख मी येथे करीत आहे. या प्रत्येक बैठकीला सर्वसामान्य कामगारांचा पुढारी म्हणून मी देखील उपस्थित होतो.

मी नम्रपणे सांगू इच्छितो की, तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांनी एमएमआरडीएमध्ये बैठक घेतली होती. त्या बैठकीला कृती समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. त्या बैठकीमध्ये निर्णय झाला. कृती समितीचे म्हणणे होते की, कट ऑफ लाईन 1982 ठरवावी. ते आपले म्हणणे बरोबर आहे. आम्ही देखील ती मागणी केली. आजही आमची ती मागणी ठासून आहे. त्या वेळी किती कामगार आहेत असा प्रश्न उपस्थित झाला त्या वेळी तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या समोर 68 हजार आकडा समोर आला. तेव्हा त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, अस्तित्त्वात असलेली जमीन, कायदे,प्रोसेस याच्या अनुषंगाने सर्व लोकांना घरे देता येणार नाही. या घरांच्या बाबतीत काय करता येईल अशा प्रकारची सांगोपांग चर्चा झाली. त्यावेळी शिवसेनेचे प्रतिनिधी देखील

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ंश्री.भाई जगताप...

उपस्थित होते, याचा उल्लेख मला येथे मुद्दाम करावासा वाटेल. 58 मध्ये बदल का झाला असा उल्लेख येथे करण्यात आला. आपण सर्वजण या गोष्टीचे साक्षीदार आहोत. या कामगारांची देणी देण्याची वेळ आली तेव्हा सर्वानी हात वर केले. नव्हे आम्ही कोर्टात गेलो. स्वत: RMMS कोर्टात गेली. कोर्टाचे निर्णय कामगारांच्या बाजूने लागले. एकाही मालकाने दीडका सुद्धा दिला नाही. त्यावेळी या कामगारांचे काय करणार या बद्दल कोणीच बोलले नाही. 1995 ते 1999 पर्यंत या बाबतीत कोणी ब्र काढलेला मला तरी आठवत नाही. त्यावेळी आमच्याकडे एकच भूमिका होती. ती म्हणजे रस्त्यावर येऊन त्यांच्या बरोबर लढणे.

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

साडे चार वर्षे तुमचे दंडे खाल्ले. साडे चार वर्षामध्ये आम्ही कामगार क्षेत्रामध्ये जे काही पाहिले त्याचाच मी उल्लेख करीत आहे आणि म्हणून आपण डी.सी. रुलच्या कलम 58 मध्ये बदल केल्यामुळे गिरणी कामगारांची अडीच हजार कोटी रुपयांची देणी भागवू शकलो, याचा मला या ठिकाणी मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो.

सभापती महोदय, मला आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे की, अनेक गिरणी कामगारांनी स्वेच्छा निवृत्ती घेतली त्यावेळी गुजरात पॅटर्नच्या माध्यमातून कामगारांना दिलासा देण्याचे काम त्या ठिकाणी करण्यात आले. त्या वेळी सरकारने केवळ निधीचे वाटप केले नाही तर त्या संदर्भात नेमण्यात आलेल्या समितीसह सर्वांबरोबर चर्चा केली. मी या ठिकाणी आणखी एक माहिती सांगू इच्छितो की, ज्या वेळी गिरण्यांची जमीन वन थर्ड, वन थर्ड अशाप्रकारे वाटप करण्याकरिता नियमात बदल केला, तो करीत असतांना आपल्यापुढे दोन प्रकारच्या घरांचा प्रश्न होता. ज्या गिरण्यांच्या परिक्षेत्रामध्ये चाळी होत्या, त्यामध्ये रहात असलेल्या गिरणी कामगारांना घरे मिळणारच कारण त्यांचा तो हक्क होता. माझ्या माहितीप्रमाणे त्या गिरणी कामगारांची संख्या 2 हजार ते 2200 पर्यंत मर्यादित आहे. या ठिकाणी 2 हजार किंवा 2200 गिरणी कामगारांचा प्रश्न नाही तर सर्वच गिरणी कामगारांचा प्रश्न आहे. त्याबद्दल कुणाच्याही मनात शंका असण्याचे कारण नाही. लोकांना बरे वाटावे, लोकांनी अधिक भावनिक व्हावे अशाप्रकारची घोषणा आपणाकडून केली जाते त्यावेळी वस्तुस्थिती सुध्दा जाणून घेणे गरजेचे आहे. आज आपण झोपडपट्टी सुधारणा कायद्यात बदल करुन एस.आर.ए. च्या माध्यमातून लोकांना मोफत घरे देण्याची घोषणा केली. कुणाच्या मालकीच्या जागेवर बिल्डर एका बाजूला एस.आर.ए. खाली इमारत बांधतो व दुसऱ्या बाजूला मोठे मॉल तयार करतो. यामधून तो लोकांना मोफत घरे देतो हे सूत्र लक्षात ठेवणे गरजेचे आहे. एस.आर.ए. योजनेच्या माध्यमातून मिळालेल्या घरांमध्ये आज सुध्दा अनेक गिरणी कामगार रहात आहेत. त्यामध्ये रत्नागिरी, मंडणगड, खेडमधील लोक आहेत. गिरण्यांमध्ये काम करणारा जास्तीत जास्त कामगार हा कोकण पट्ट्यांमधील आहे. त्या मुळे त्यांना आज घर मिळणार नाही असे कुणालाही वाटण्याचे कारण नाही. परंतु ती घरे कशी देणार, त्या घरांचे वाटप कशा पध्दतीने करणार? हे आपल्याला ठरवावे लागेल. आपण उपस्थित केलेल्या एनटीसीच्या संदर्भातील मुद्याचे मी पूर्णत: समर्थन करतो. एनटीसीच्या बाबतीत राज्य शासनाने धोरण स्वीकारावे, आणि त्या

3 N 2/-



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ AKN/

श्री. भाई जगताप...

बाबतीत  केंद्र शासनाला सांगावे. त्या माध्यमातून मिळणाऱ्या जमिनीवर गिरणी  कामगारांसाठी घरे बांधण्याचा प्रयत्न करावा याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. हे करीत असतांना आपण या बाबतीत नक्की काय करणार आहोत? आज त्या ठिकाणी 7 हजार घरांचे लॉटरी सिस्टीमने वितरण करण्याचे जाहीर केल्यानंतर 1 लाख 9 हजार अर्ज आले. त्या मुळे या घरांचे वितरण कसे करावयाचे हे आपण सांगावे आणि ठरवावे. या बाबतीत सरकारचा हेतू स्पष्ट आहे, त्याबद्दल कुणाच्याही मनामध्ये शंका असण्याचे कारण नाही. गिरणी कामगारांच्या मागण्यांबाबत आम्ही देखील आग्रही आहोत व त्या बाबतीत मी सरकारला सूचना करणारच आहे.

सभापती महोदय, आपल्याला आणखी एक गोष्ट मला सांगावीशी वाटते की, या चर्चेच्या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्य भाषण करतील. या ठिकाणी केवळ कोहिनूर मिलच्या जमिनीचा प्रश्न नाही. मी आपणास नम्रपणे सांगतो की, विधानसभेचे सन्माननीय सदस्य श्री. मंगलप्रभात लोढा यांनी किती मिल घेतल्या? अपोलो मिल मंगलप्रभात लोढा, फिन्ले मिल मंगलप्रभात लोढा, श्रीनिवास मिल मंगलप्रभात लोढा यांचेच प्रतिनिधित्व उध्दवराव ठाकरे यांनी त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्र्यांकडे केले होते. आणि म्हणून हे पुतणा मावशीचे प्रेम या कामगारांना दाखविण्याचा कुणी प्रयत्न करु नये. हा कामगार स्वाभिमानी आहे, हा कामगार त्याच्या हक्कासाठी लढणारा आहे, हा कामगार त्याचे हक्काचे घर मागत आहे. तो मागत असतांना आम्हाला वाजवी दरामध्ये घर द्या असे स्वाभिमानाने सांगत आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप . . . .

म्हणून मी आमच्या शासनाकडे त्या गोष्टीचा आग्रह धरीन. याबाबत अनेक वेळा चर्चा झालेली आहे. पुढील फेब्रुवारी-मार्च मध्ये येणाऱ्या निवडणुका लक्षात घेऊन कोणाला तसे वाटत असेल. काल गिरणी कामगारांचा मोर्चा मोठया प्रमाणात होता याबद्दल वादच नाही.यापूर्वी सुध्दा ज्या-ज्या वेळेला या विषयाच्या बाबतीत कामगारांनी आंदोलन छेडले होते, त्या-त्या वेळेला प्रचंड मोठा प्रतिसाद मिळालेला होता आणि तसा तो भविष्यामध्ये सुध्दा मिळेल याबद्दल माझ्या मनामध्ये जराही शंका नाही. परंतु जर त्याचा अशा प्रकारे कोणी वापर करुन घेत असेल तर या गोष्टीला कामगार बळी पडणार नाहीत असे मला वाटते.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्यांनी श्री.दत्ता इस्वलकर यांचा उल्लेख केला म्हणून एक गोष्ट सांगू इच्छितो. मला असे वाटते की, याबाबतीत माननीय मंत्री महोदय चांगला प्रकाश टाकू शकतील. पण माझ्या माहितीप्रमाणे ज्यावेळेला गिरणी कामगारांच्या घराबाबत चर्चा झाली, त्यावेळी श्री.दत्ता इस्वलकर यांनी तत्सम सर्व लोकांसमोर चर्चा केली. 46 एकर जागा ही या कामगारांच्या घरांसाठी राखून ठेवण्यात यावी अशा प्रकारची चर्चा झाली होती. मी याठिकाणी चर्चा असा शब्द वापरत आहे, मला त्यातील पूर्णतः माहिती नाही.कारण मी त्या चर्चेच्या वेळी नव्हतो. आज ज्यावेळेला आपण 1 लाख 10 हजार लोकांच्या घरांच्या बाबतीत विचार करीत आहोत, त्यावेळेला यासाठी लागणारी जवळजवळ 150 हेक्टर जागा कुठून येणार आहे? म्हणून मला असे वाटते की, आज अस्तित्वात असलेली जी 7 हजार घरे आहेत ती तत्काळ वितरित करावीत आणि आम्ही तुम्हाला त्यासंबंधातील पध्दती देखील सांगू इच्छितो. आज आपल्याकडे माझ्या माहिती प्रमाणे कोहिनूर मिल नं.3 येथे जवळजवळ 211 घरे आहेत आणि त्याठिकाणी लाभधारक 206 आहे. मग अशा परिस्थितीत त्यांना ती घरे देऊन टाकावीत.तेथे लॉटरी काढण्याची काय गरज आहे तर कसलीही गरज नाही. माझ्या माहितीप्रमाणे आणखी एक मिल आहे ज्याच्या मध्ये . . ..

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.मला सन्माननीय सदस्यांच्या भाषणामध्ये व्यत्यय आणावयाचा नाही. पण कोणत्याही व्यक्तीवर आरोप करीत असताना जर ती व्यक्ती सदनामध्ये त्याबाबत उत्तर देण्यासाठी उपस्थित नसेल तर आपण त्या व्यक्तीचे नाव घेऊन कोणताही आरोप करु शकत नाही. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी श्री.उद्धवजी ठाकरे यांचे नाव घेतलेले आहे आणि असे सांगितले की,त्यांनी श्रीनिवास मिल विकण्याच्या बाबतीत नेतृत्व



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केले. याबाबतीत मी कन्फर्म करुन घेतले आहे. त्यानुसार श्री.उद्धवजी ठाकरे यांनी सांगितले की, मी श्रीनिवास मिलच्या मालकाला कधीही भेटावयास गेलो नाही. सन्माननीय तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्याकडे धारावीच्या लोकांना बरोबर घेऊन गेलो होतो.माझ्या त्याच्याशी कोणताही संबंध नाही. जर सन्माननीय सदस्यांकडे तसा काही पुरावा असेल किंवा बैठकीच्या संबंधातील काही टिप्पणी असेल तर त्यांनी तसे सांगितले पाहिजे. म्हणून सन्माननीय सदस्यांनी श्री.उद्धवजी ठाकरे यांचे नाव घेतलेले आहे ते तत्काळ कामकाजातून काढून टाकावे अशी माझी आपल्याला विनंती आहे. अन्यथा प्रेसमध्ये तशीच बातमी जाईल.

**सभापती** : ठीक आहे. मी तपासून घेतो आणि निर्णय देतो.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझा आग्रह राहील. याचे कारण असे की, माझे भाषण झाल्यानंतर विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य भाषण करणार आहेत. त्यांना याबाबतीत उत्तर देऊ द्यावे असा माझा आग्रह राहील.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे वक्तव्य केले ते रेकॉर्डवर आलेले आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, ते रेकॉर्डवर आणण्याचे कारण नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात)

**सभापती** : याठिकाणी गिरणी कामगारांच्या संबंधातील चर्चा अत्यंत योग्य पध्दतीने सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी जी हरकत घेतली आहे, त्याबाबतीत मी मघाशी सांगितले की, ती बाब तपासून घेतो आणि त्याबाबत निर्णय देतो.त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आरोप केलेले आहेत.

**सभापती** : मी ते तपासून निर्णय घेणार आहे.

श्री.भाई जगताप : आताच माननीय सभापतींनी रुलींग दिलेले आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आमचे ऐकून घ्यावे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मला असे वाटते . . .. .





(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना काही सांगावयाचे आहे काय ?

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य मला काही बोलण्याची संधी देतील तेव्हा ना? आता त्यांना प्रॉब्लेम आहे.

श्री.विनोद तावडे : तुम्ही नको ते म्हणता .....

श्री.भाई जगताप : मी नको ते म्हणत आहे, हे तुम्ही कोण ठरविणार? तुम्ही तिकडे जाऊन हवी ती घोषणा करणार, नको ते बोलतो असे म्हणणार. कारण तुम्हाला ते नकोच असणार. याचे कारण असे की, तुम्ही मढ्याच्या टाळूवरचे लोणी खाणारे लोक आहात. तुम्ही या लोकांना भरवसा देणार? तो आम्ही देणार. माझे सरकार देणार आहे. तुम्ही काय देणार? तुमच्या काळातील चार-साडेचार वर्षामध्ये 40 लाख घरे देणार असे सांगितले होते, पण किती जणांना घरे दिली ? ते सगळे शोधून काढावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सदनामध्ये जी व्यक्ती उपस्थित नाहीत, त्यांच्या बाबतीत कसे बोलता येईल ?

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ AKN/ KGS/ MMP/ प्रथम सौ. रणदिवे.... 17:00

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण म्हटल्याप्रमाणे खरेच गिरणी कामगारांच्या विषयावर या ठिकाणी अतिशय महत्वाची आणि गांभीर्याने चर्चा सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी त्यांच्या बोलण्यात ज्यावेळी माननीय उद्धवजी ठाकरे यांचे नाव घेतले त्यावेळी आम्ही लगेच सभागृहात उभे राहिलो नाही. आम्हाला राजकारण करावयाचे असते तर आम्ही तावातावाने या सभागृहात उभे राहिलो असतो. पण आमचे पक्ष प्रतोद सभागृहा बाहेर गेले त्यांनी कन्फर्म केले. माननीय श्री. उद्धवजी हे एका पक्षाचे कार्यकारी प्रमुख आहेत, त्यांच्या विषयी बोलल्यानंतर आम्ही या सभागृहात ताबडतोब उभे राहिलो असतो. पण आम्ही पहिल्यांदा माहिती घेतली, कन्फर्म केले आणि मग आमचे म्हणणे मांडले. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी त्यानंतर सन्माननीय सदस्य लोढा यांचे नाव घेतले. सन्माननीय सदस्य श्री. लोढा हे विधानसभेचे सदस्य आहेत. त्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी नियम 30 अन्वये पत्र दिलेले आहे काय मला हे माहीत नाही. सभापती महोदय, आपण तपासून पाहतो म्हटल्यानंतर ते सर्व उद्या होईल. पण वर्तमानपत्रात हे सर्व उद्या छापून येईल. त्यामुळे या सभागृहात ज्या गांभीर्याने चर्चा करावयाची आहे ते गांभीर्य यात रहाणार नाही. म्हणून मला असे वाटते की, आपण ती नावे रेकॉर्डवरुन काढावी. आम्ही या ठिकाणी राजकारण केले नाही. असे असेल तर मग पुढचे सन्माननीय सदस्य सुध्दा सर्वच पक्षाच्या सर्वच नेत्यांची नावे घेतील. सभापती महोदय, ही चर्चा गांभीर्याने व्हावयाची असेल तर मला असे वाटते की, आपण ती नावे आता रेकॉर्डवरुन काढावीत आणि उद्या तपासावे आणि ती नावे आवश्यक असतील तर ती उद्या पुन्हा घालण्यात यावीत, त्या बद्दल आमचे काही म्हणणे नाही. माझी विनंती एवढीच आहे की, या ठिकाणी ज्या गांभीर्याने चर्चा करण्यात येत आहे, त्याच गांभीर्याने चर्चा झाली पाहिजे. आम्ही राजकारण केले नाही. आम्ही कन्फर्म केले. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. लोढा यांच्या बाबतीतही सांगण्यात आले. सन्माननीय सदस्य श्री. लोढा यांनी दोन, तीन कां पाच मिल घेतल्या आहेत हे मलाही माहीत नाही. ते विधानसभेचे सभासद आहेत. त्यामुळे त्यांचे नाव घेताना आधी परवानगी घेतली असेल तर ते नाव घेऊ द्यावे, नसेल तर ते नांवही काढण्यात यावे. आपण ते उद्या कन्फर्म करावे आणि खरे असेल तर ते पुन्हा घालावे. पण आता ते सर्व रेकॉर्डवरुन काढावे असे आमचे म्हणणे आहे.

**सभापती** : मी या सगळया बाबींची तपासणी करण्याची व्यवस्था करतो आणि आजचे संपूर्ण कामकाज संपण्याच्या अगोदर या बाबतीतील माझा निर्णय मी देतो.

..2..

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, ज्यांची ज्यांची नावे मी या ठिकाणी घेतलेली आहेत त्या बाबतीतील पुरावे आम्ही सुध्दा द्यावयास तयार आहोत. हे मी ही या ठिकाणी सांगू इच्छितो. या सभागृहाचा मी आजच सभासद झालेलो नाही तर या सभागृहाच्या माझ्या सुध्दा दोन टर्म्स झालेल्या आहेत म्हणजे मला माहीत आहे. परंतु अशा पध्दतीने एखादी गोष्ट कोणी करीत असतील तर तुम्ही ते कन्फर्म केले हे चांगले झाले. जर कुणाची सदसदविवेक बुध्दी खरोखरच जागृत असेल तर त्यांनी हे सांगावे. त्यावेळेला तत्कालीन मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी सर यांच्याकडे ते डेलिगेशन गेले नव्हते, असे त्यांनी जाहीर करावे. सभापती महोदय, आज या ठिकाणी तळमळ दाखविली जात आहे. पण या चळवळीला आज जवळ जवळ 29 वर्षे झालेली आहेत. 1982 साला पासूनची ही चळवळ आहे. आज आपण सन 2011 मध्ये आहोत. 29 वर्षात आजच यांना जाग आली की काय? म्हणून हा प्रश्न महत्वाचा आहेच, असे जर नसते तर 7 हजार घरे तयारच झाली नसती. या शासनाने 7 हजार घरे तयार केली आहेत आणि सांगिलेल्या वेळेत तयार केली आहेत. आज ती घरे वाटपाच्या दृष्टीने शासनाने पाऊले उचलावीत अशा प्रकारची मी या ठिकाणी सूचना करतो.

सभापती महोदय, मुंबई मिलमध्ये जवळ जवळ 1177 घरे उपलब्ध झालेली आहेत. त्या ठिकाणी फक्त 751 लोक लाभधारक आहेत. मला असे वाटते की, ज्या ज्या मिलमध्ये घरे जास्त आहेत आणि लाभधारक कमी आहेत तेथील घरे तत्काळ वितरित करण्यात यावीत. सभापती महोदय, या चळवळीचा ज्यावेळी आम्ही उल्लेख करतो, संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा ज्यावेळी उल्लेख करतो त्यावेळी 106 हतात्म्यांपैकी 95 हुतात्मे हे गिरणी कामगार आहेत.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप....

म्हणून माझी शासनाला विनंती राहील की, ज्या वेळी आपण या घरांचे वितरण करणार आहात त्या वेळेला संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत ज्यांनी योगदान दिले, ज्यांनी हौतात्म्य पत्करले त्यांच्या सर्व वारसांना शोधून काढून त्याही सर्व 95 गिरणी कामगारांना आपण ती घरे द्यावीत.

सभापती महोदय, या ठिकाणी मी आपल्याला या बाबतीत एक गोष्ट सांगू इच्छितो. त्याचा उल्लेख सन्माननीय गटनेत्यांनी केला. एनटीसीच्या बाबतीत मला मुद्दाम परत एकदा सांगावेसे वाटते. एनटीसीच्या 22 गिरण्या आहेत. त्यांनी जो रिव्ह्यू वगैरे केला त्या सगळ्या बैठकीला आपण उपस्थित होतो. परंतु एवढे मात्र नक्की आहे की, शासनाने या बाबतीत एकतृतीयांश आणि दोनतृतीयांश असा जो फॉर्म्युला केलेला आहे तो मुंबईच्या दृष्टीने जास्त महत्वाचा आहे. आज त्या ठिकाणची एकतृतीयांश जागा ट्रान्झीट कॅम्पसाठी राखून ठेवलेली आहे. मुख्य मुंबईमध्ये म्हणजे ज्याला आपण आयलँड सिटी म्हणतो त्या भागामध्ये 16 हजार 400 डिलॅपिडेटेड इमारती आहेत. दर पावसाळ्यामध्ये एक दोन इमारती पडून माणसे मरतात. त्यांच्यासाठी ट्रान्झीट कॅम्पच्या संदर्भात ही जी तरतूद केलेली आहे त्यामध्ये बदल करु नये. कारण आज आपण सगळे ट्रान्झीट कॅम्प पाहिले तर त्यांची संख्या अडीच ते तीन हजारापेक्षा जास्त होत नाही. आज आपल्यासमोर 1 लाखापेक्षा जास्त लोकांना प्रश्न असला तरी यामुळे काही फरक पडणार नाही. ट्रान्झीट कॅम्प झाले पाहिजेत. कारण मुंबईच्या पुनर्बांधणीमध्ये ज्यावेळी डिलॅपिडेटेड इमारतींचा प्रश्न येणार आहे, ज्यावेळेला चाळींचा प्रश्न येणार आहे, त्यावेळेला आपल्याला त्याचा उपयोग होणार आहे. म्हणून एनटीसीकडून मिळणारी जागा तसेच इतर मिळणारी जागा, माझ्या माहितीप्रमाणे जी 16 हेक्टर जागा मिळणार आहे त्यामध्ये जेवढी घरे होतील ती लॉटरी पध्दतीने बाकीच्यांना द्यावीत अशी विनंती करतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. विनोद तावडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मुंबईचे अस्तित्व आणि मुंबईचे देशाची आर्थिक राजधानी म्हणून स्थान या गिरणी कामगारांमुळे आहे. मला असे वाटते की, मुंबई ही गुजरातमध्ये चालली होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये गिरणी कामगारांनी हौतात्म्य पत्करले आणि ही मुंबई वाचवली, मुंबई महाराष्ट्रात आणली. मुंबईचे अस्तित्व टिकविणारा गिरणी कामगार आणि या कापड गिरण्याच्या माध्यमातून आर्थिक उलाढालीतून मुंबईचा झालेला विकास आणि देशाच्या विकासात आर्थिक राजधानी म्हणून देशात निर्माण झालेले स्थान, हे जे मुंबईचे वैभव उभे राहिले ते त्या गिरणी कामगारांमुळे. आज त्या गिरणी कामगाराला आपल्या अस्तित्वासाठी लढावे लागत आहे. आज हा गिरणी कामगार आपल्या अस्तित्वाची लढाई लढत असताना ती लढाई आधी का केली नाही, 1995 मध्ये का केली नाही, आम्ही साडेचार वर्षे सत्तेत असताना किती करणार, तुम्ही इतक्या वर्षात काय केले, या सगळ्यापेक्षा मुळात लढाई सुरु झालेली आहे, कामगार संघटनांचे सगळे बावटे एकत्र आलेले आहेत आणि या लढाईला धार आली असताना एक संवेदनशील सभागृह म्हणून यातून कसा मार्ग काढता येईल हे पाहिले पाहिजे. काल मी त्या सभेमध्ये म्हटले की, मी आमदार म्हणून किंवा भारतीय जनता पक्षाचा नेता म्हणून आलेलो नाही तर गिरणी कामगारांच्या कुटुंबातील मी एक सदस्य आहे. त्यामुळे मी गिरणी कामगारांचे जीवन अनुभवलेले आहे, जगलेले आहे. आजही त्यातील जे लोक भेटतात त्यांची अवस्था पाहिल्यानंतर असे वाटते की, ज्या गिरणी कामगारांनी मुंबईचे अस्तित्व टिकवले, वैभव उभे केले, त्यांची ही अवस्था आहे. मला ते सगळे लहानपणचे दिवस आठवले. 10 तारखेचा पगाराचा दिवस आठवला. रविवारी त्या ठिकाणी ढोल-लेझीम खेळले जावयाचे. मिलचा मॉल झाला, ढोलचा डिस्कोथेक झाला पण दुर्दैवाने गिरणी कामगारांची अवस्था आजही अतिशय वाईट आहे.

सभापती महोदय, श्री. पवार साहेबांनी चांगला निर्णय घेतला, युती सरकारने पुढे त्या बाजूने निर्णय जोडला.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

जसे या राज्यात आदर्श घोटाळे होत गेले, करणारे कोण आहेत ते नंतर लक्षात आले. त्याच सचिवांनी डी.सी.रुलच्या कलम 58 मध्ये बदल केला होता. त्यावेळचे मुख्यमंत्री नवीन होते, त्यांना ते कळले नसेल की कळूनही त्यांनी मान्यता दिली होती ते माहीत नाही. पण डी.सी.रुलच्या कलम 58 मध्ये सुधारणा होऊ लागल्या. त्यांनी जावई शोध लावला की, ज्या रिकाम्या जमिनी असतील त्यांचे एकतृतीयांश जमीन, बांधकामाच्या एकतृतीयांश नाही. त्यामुळे मोठया प्रमाणात हातातून जमीन गेली. 200 एकरपैकी केवळ 32 एकर जागा उरली. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी म्हटल्या प्रमाणे व्हीआरएस द्यावी, 60 दिवसाचे वेतन द्यावे याबाबत करार झाला. हा करार झाल्यानंतर तो अंमलात येत नसल्यामुळे निवृत्त न्यायाधीशांना नेमल्यावर श्री.चव्हाण साहेबांचे सर्व बाहेर येऊ लागले. मग कोर्टातील केसचा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उल्लेख केला. जमिनीवर बांधकाम उभे आहे, मोकळया जागा आहेत, गिरणीचे मूळ बांधकाम पाडलेले नाही. अशांना ती जमीन देण्याची गरज नाही.

सभापती महोदय, फिनिक्स मॉल आहे त्या जागेवर आजही गिरणी उभी असल्याचे दाखविलेले आहे. कारण त्यांनी मूळ स्ट्रक्चर पाडलेले नाही. भिंत तशीच आहे. मॅक्डोनाल्डचे रेस्टॉरण्ट आहे ते महानगरपालिकेतून पाहिले तर आज त्या कामगारांचे कॅण्टीन दिसते. कारण श्री.तिवारी यांचे डोके जबरदस्त होते. फिनिक्स मिलच्या भिंतीच्या बाहेर काही बदल केला नाही, म्हणजे गिरणी चालू आहे असे वाटावे. आत पॅलेडियम चालू आहे. मोटर शॉपिंग मॉल आहे. त्यामुळे फिनिक्सच्या मालकाला सरकारला जागा देण्याची गरज उरली नाही. रघुवंशी मिलची बाहेरुन भिंत तशीच आहे. त्यावेळी मिलचे बांधकाम उंच असायचे. त्याचा फायदा घेऊन आत 2-2 मजले उभे केले, ऑफिसेस करण्यात आली, दुकाने टाकली आहेत, मॉल्स उभी केली आहेत. पण गिरणी तशीच आहे. त्यामुळे गिरणी कामगारांना जमीन देण्याचा प्रश्नच येत नाही. थँक्स टू यु.डी.सेक्रेटरी श्री.तिवारी.

कमला मिलचे एक स्ट्रक्चर उभे आहे, पण बाकीचे पाडण्यात आले आहे. पार्किंग लॉट पैसे घेऊन देण्यास सुरुवात केली. परंतु बाहेरुन स्ट्रक्चर उभे असल्याचे दिसते. ती मिल चालू आहे. त्यानंतर कलम 58 मध्ये आणखी एक दुरुस्ती करण्यात आली. त्यानुसार गिरण्यांची 30

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

श्री.विनोद तावडे...

टक्के जमीन विकसित करुन तो पैसा जर पुन्हा मिल चालविण्यासाठी वापरणार असाल तर तुम्हाला सरकारला काही देण्याची गरज नाही. मुंबईतील माणूस स्वातंत्र्य चळवळीत अग्रभागी असतो. त्याला काही तरी काहीतरी कामधंद्याला लावा मग चळवळ कमी होईल म्हणून जनतेच्या जमिनी कमी भावात खटाव, मफतलाल यांना देऊन मिल उभ्या कराव्या. 8-8 तास त्यांना तुमच्याकडे कामावर जुंपावे. म्हणजे ते महात्मा गांधीच्या मार्गाने रस्त्यावर येणार नाहीत. यासाठी इंग्रजांनी यांना दिलेल्या जमिनी आहेत, हे कुठले मालक ? परंतु 30 टक्के जमीन विकसित करण्याची दुरुस्ती करण्यात आली. मग वाडियाने प्रभादेवीची जागा व नायगाव येथील स्प्रिंग मिल एकत्र दाखविली व 60 टक्के जागा एका ठिकाणी विकसित केली आणि नायगावला एका कोपऱ्यामध्ये वाडियांची 60 कामगारांची मिल मात्र जोरात चालू आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 17:15

श्री. विनोद तावडे...

धन्यवाद तिवारी साहेब. कशा पध्दतीने मूर्ख बनविलेले आहे ते पहा. जे राज्यकर्ते बसलेले असतात त्यांना या पळवाटा दिसतात. अशा कार्यपध्दतीमुळे गिरणी कामगार नष्ट व्हायला लागला. 1/3 जमीन मुंबई महानगरपालिकेला देण्याचा निर्णय झाला. मुंबईतील सर्वसामान्य माणसांसाठी ह्या मोकळया जमिनी असणे आवश्यक होते. या जमिनीच्या संदर्भातील प्रकरण कोर्टात गेले. न्यायमूर्ती राधाकृष्ण आणि न्यायमूर्ती धर्माधिकारी यांनी या मोकळया जागेच्या संबंधात जे वक्तव्य केले त्याचा सरकारने गांभीर्याने विचार करायला पाहिजे. त्यांनी गर्भाशयातील अर्भकाचे उदाहरण देऊन सांगितले की, जर गर्भातील अर्भकाला 33 टक्के प्राणवायू मिळाला नाही तर ते मूल मेण्टली रिटार्डेड होते. मुंबईमधील गिरण्यांच्या विकासातून ज्या मोकळया जागा मिळणार आहेत त्या महापालिकेला दिल्या नाहीत तर प्रचंड गर्दी वाढेल. गिरणी कामगार कर्मचारी निवारा आणि कल्याणकारी संघ आणि सन्माननीय सदस्य श्री. नितीनजी गडकरी कोर्टात गेले होते. त्यानंतर श्री.चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कमिटी नेमली गेली. त्यामध्ये गिरणी कामगाराला घर, रोजगार आणि कामगारांच्या मुलांना प्रशिक्षण देण्याचे ठरले आणि त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सरकारने घेतली होती. पण या बाबतीत आपण दोन पावले देखील पुढे गेलो नाही. 68 हजार घरे होतील. परंतु अर्ज 1 लाख 25 हजार आहेत. आता तयार घरे किती आहेत ? 6900 घरे तयार आहेत. या तयार घरांची आज काय अवस्था आहे हे जरा जाऊन पहा. त्या ठिकाणी माणूस कसा राहाणार हा देखील प्रश्न आहे. हा गिरणी कामगार असे म्हणतो की, आम्ही मुंबई वाचवली, मुंबईचे वैभव आम्ही वाढवले असे असताना आम्हाला फुकटात घरे नाही. पण ज्यांनी मुंबईत येऊन मुंबई बकाल केली त्यांना मात्र फुकटात घरे दिली जात आहेत. आमच्या रक्ताने, घामाने आम्ही मुंबई जगवली आणि वाढवली असताना आम्ही मात्र बेघर आहोत असे गिरणी कामगार म्हणत आहेत. म्हणून याबाबतीत उपाय शोधले पाहिजेत.

एनटीसीने आतापर्यन्त 10 हजार कोटी रुपये मुंबईतील गिरण्यांच्या जमिनी विकून कमविलेले आहेत. विक्रीच्या काळत श्री. मारन हे मंत्री होते. एनटीसीच्या मिलचा सगळा पैस केन्द्रात गेला. या जमिनी विकल्यानंतर तेथे निवासी इमारती बांधल्या जातील, त्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण कराव्या लागतील म्हणून 10 हजार कोटीतील अडीच हजार कोटी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी द्यावेत अन्यथा गिरणीची जागा विकण्यास परवानगी देणार नाही, असे आपल्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

राज्य सरकारला सांगता आले नाही. अनेक बाबतीत मिलिजुली झालेली आहे किंवा कोअलिशन गव्हर्नमेंण्टच्या काही कम्पल्शन्स असतील. परंतु यामुळे मुंबईचे नुकसान झाले. मिलच्या जागी टॉवर आल्यानंतर त्यासाठी अधिकचे इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध झाले नाही तर त्यासाठी पैसा कोठून आणणार ? जे पैसे एनटीसीने कमविले ते मुंबईमध्ये कुठे खर्च झाले ?

एनटीसीच्या जमिनीचा येथे उल्लेख झाला. ते टेक्स्टाईल मुझियम काढत आहेत.

...नंतर श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

म्हणजे 61 हजार चौ.मी. एनटीसी जमीन आहे त्या जमिनीवर टेक्स्टाईल म्युझियम तयार करणार आहात. त्यामध्ये काय काय ठेवणार? गिरणी कामगारांचे उद्ध्वस्त झालेले संसार? म्युझियममध्ये दाखवायचे काय? 15-16 एकर जमिनीवर 10 हजार घरे उभारता येतील. परंतु प्राधान्यक्रम ठरला पाहिजे. मुंबईचा इतिहास दाखवावा यासाठी 15 एकर जागेवर टेक्स्टाईल म्युझियम उभारण्याची मागणी केली. परंतु प्राधान्य ठरविण्याची गरज आहे असे मला वाटते. कामगार संघटनांनी एकत्र येऊन ज्या मागण्या केल्या आहेत त्यामध्ये घरांचा एक मुद्दा आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार 1.22 लाख गिरणी कामगार आहेत त्यांना बीपीएल म्हणून मान्यता दिली पाहिजे. त्यासाठी पैसे लागणार नाहीत, जागा लागणार नाही. त्यांना बीपीएल म्हणून मान्यता मिळाली की अनेक सोयीसुविधा उपलब्ध होऊ शकतात. काही गिरणी कामगार सुस्थितीत असतील, मोर्चामध्ये सामील झालेला 50 हजार कामगारांचा मॉब पाहिल्यानंतर हे कामगार सन्मानाने राहतात, चांगल्या पोषाखात वावरतात हे जरी खरे असले तरी त्यांची खरी गरज आहे ती त्यांना बीपीएल म्हणून मान्यता मिळण्याची आहे. म्हणजे त्यांना अनेक सुविधा मिळू शकतील. जमीन, शिक्षणाचा प्रश्न आहे. किमान या गोष्टीसाठी पैसे लागणार नाहीत. सरकार जर संवेदनशील असेल, राजकारण करायचे नसेल तर हा निर्णय नक्की घेता येईल. घरे आपण देऊ की नाही हे माहिती नाही. परंतु आम्ही घरे देणार असा धोरणात्मक निर्णय घोषित केल्यानंतर त्यापासून माघार घेता येणार नाही. मागे एकदा भूमिका मांडल्यानंतर ती मागे घेतली गेली. 1.22 लाख गिरणी कामगार आहेत त्यांना टप्प्याटप्प्याने घरे देण्यात यावी. ज्यांना घाम गाळला, मुंबई वाचविली त्यांना घरे देणे हे आमचे काम आहे असे घोषित केले तर गिरणी कामगार नक्की स्वागत करतील एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या भावनिक प्रश्नावर चर्चा सुरु आहे. ही चर्चा सुरु असताना गिरण्यांची सुरुवात कशी झाली, गिरणगाव कसा घडला, संप कधी झाला, गिरण्यांसाठी काय काय प्रयत्न केले, युती शासनाच्या काळात काय प्रयत्न झाले, जमिनी विकण्यास कधी सुरुवात झाली हे देखील तितकेच महत्वाचे आहे. गिरणी कामगारांना घरे मिळालीच पाहिजेत या विषयी दुमत असण्याचे कारण नाही. मुंबई शहरातील गिरण्या आणि त्यांचा इतिहास माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी आपल्या भाषणात सांगितला आहे. कसवजी नाईक, डावर यांनी बेटांचे शहर म्हणून प्रसिध्द असलेल्या मुंबईमध्ये बॉम्बे स्पिनिंग मिल्स हा पहिला वस्त्रोद्योग सुरु केला. त्यानंतर मुंबईमध्ये टाटा, मोरारजी, खटाव, वाडीया, गोकुळदास आदींनी गिरण्या उभारण्यास सुरुवात केली. गिरणगावात काम करणारे 90 टक्के कामगार आणि त्यापैकी 25 टक्के लोक हे चाळीत राहणारे होते. एकट्या परळमध्ये 27 टक्के गिरणी कामगार रहात होते. लालबाग आणि परळ हा विभाग गिरणगाव म्हणून प्रसिध्द झाला. घोडपदेव ते परळ-हिंदमाता या भागात मिल नव्हत्या, परंतु इतरही उद्योगधंदे चालत होते त्यांनी हा भाग व्यापलेला होता. 1980 साली कामगारांचा पगार 600 ते 700 रुपये होता. 1974 साली कॉ.डांगे यांच्या नेतृत्वाखाली कामगारांनी संप पुकारला होता. त्यावेळी 4 रुपयांची पगारवाढ करण्यात आली होती. त्यानंतर 18 जानेवारी, 1982 रोजी 400 रुपये पगारवाढ मिळावी यासाठी संप करण्यात आला, त्याचबरोबर बोनससाठी देखील संप करण्यात आला. हे मागील काळातील संदर्भ मी यासाठी देत आहे की, संप होण्याबद्दल आणि संप करण्याबद्दलची माहिती मिळू शकते.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ........

त्यातून हा 18 जानेवारी, 1982 चा दिवस उजाडला, तोच काळा दिवस. डॉ. दत्ता सामंत यांनी कामगारांच्या पगारवाढीसाठी बेमुदत संपाची घोषणा केली आणि अहोरात्र धडधडणाऱ्या गिरण्या क्षणार्धात थांबल्या. दि. 2 ऑक्टोबर, 1989 रोजी गिरण्यांमधील कार्यकर्त्यांनी आपल्या मागण्यांसाठी नरे पार्क मैदानात "गिरणी कामगार संघर्ष समिती"ची स्थापना केली. हे मी यासाठी सांगतो की, सर्वच गिरणी कामगारांच्या संदर्भात आव आणण्याचा प्रयत्न करीत आहेत, गिरणी कामगारांना न्याय मिळाला पाहिजे, पण त्यांच्यासाठी काय केले हा संशोधनाचा भाग आहे.

सन 1982 पासून ज्या संपाला सुरुवात झाली त्यातून कामगारांना बाहेर काढावे, कामगारांनी कामावर जावे यासाठी प्रथम माननीय शिवसेना प्रमुखांनी सुध्दा प्रयत्न केले, पण कामगारांनी ऐकले नाही. त्यानंतरची परिस्थिती अशी निर्माण झाली की, गिरणी कामगार संघ काढण्यात आला. त्यानंतर हा संप कसा फोडता येईल याचे प्रयत्न सुरु झाले. हे सांगण्याचे तात्पर्य एवढेच की कालच्या मोर्चाच्या निमित्ताने झालेली भाषणे टी.व्ही. वर बघताना परिस्थिती दिसून आली. यापूर्वीच्या काळात सुध्दा सन 1908 मध्ये लोकमान्य टिळकांना अटक झाली तेव्हा संप झाला होता, त्यात 15 कामगारांचा मृत्यू झाला होता. अशा प्रकारे या मुंबईत गिरणी कामगारांनी इतिहास घडविला आहे. आज जे छातीठोकपणे सांगत आहेत त्यांनीच पहिल्यांदा हा संप फोडण्याचा प्रयत्न केला. नंतर स्वत:च्या संघटना काढण्याचे प्रयत्न झाले. हे सर्व झाल्यानंतर आता सन 2011 मध्ये आम्ही तुमच्या बरोबर आहोत असे दाखविण्याचा प्रयत्न केला जात आहे. ते सुध्दा येणाऱ्या महापालिकेच्या निवडणुका लक्षात घेऊन हे गिरणी कामगारांबद्दलचे प्रेम समोर आले. अन्यथा या प्रेमाचा संबंध नाही.

महोदय, या निमित्ताने मी पिरामल मिलच्या बाबतीतील उदाहरण देऊ इच्छितो की, सन 1994 ते 1996 मध्ये या मिलमधून 800 लोकांना कामावरुन कमी करण्यात आले. या मिलमध्ये काय झाले होते हे सर्वांना माहीत आहे. येथे जे डी.सी. रुलबाबत बोलता, इन्फ्रास्ट्रक्चरबाबत सर्वच बोलता पण पिरामल मिलच्या जागेवर काय झाले, त्या मिलचे मालक कोणाचे खास आहेत, हे सांगण्याची गरज नाही. आपण मला फोनवर विचारा, मी नाव सांगण्यास तयार आहे. खरे तर कामगारांची कोणाकडून कुचंबणा झाली, त्यांना रस्त्यावर आणण्याचे काम कोणी केले याची कामगारांना चांगली जाण आहे. म्हणूनच गिरणी कामगारांनी युती सरकारच्या मालक धार्जिण्या

.....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ........

धोरणाचा निषेध करण्यासाठी काळा चौकी, वरळी, करी रोड अशा वेगवेगळ्या परिसरात रास्ता रोको केले होते. त्यात लाल बावट्याखाली अहिल्या रांगणेकर, गंगाधार चिटणीस, मिल मजदूर युनियनचे चिटणीस प्रभाकर मोरे, गिरणी कामगार संघर्ष समिती अशा वेगवेगळ्या संघटनांनी हा रास्ता रोका केला होता. सन 8.10.1996 मध्ये कोणाच्या विरोधात हे गिरणी कामगार उतरले होते याची सर्वांनाच माहिती आहे. युती शासनाच्या काळात मालक धार्जिण्या धोरणामुळे पिरामल मिलमधील 800 कामगारांना कामावरुन कमी केले व उरलेल्या 300-400 कामगारांना सांगण्यात आले की, आपण राष्ट्रीय मिल मजदूर संघाशी चर्चा करावी, संपूर्ण काम आम्ही करु शकत नाही. या ठिकाणी मी "सुपारी" हा शब्द वापरणार नाही.......

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

सभापती महोदय, पिरामल मिल झाल्यानंतर रघुवंशी मिलकडे मोर्चा वळविण्यात आला. 1993 मध्ये बीआयएफआर कडून मंजुरी मिळाल्यानंतर 850 कामगार रघुवंशी मिलमध्ये काम करीत होते. 1996 मध्ये नवीन मशीन्स मिलमध्ये आणल्या जातील असे सांगण्यात आले व त्यानंतर रघुवंशी मिल बंद पडली. कोणाच्या काळात रघुवंशी मिल बंद पाडली गेली व त्या गिरणीतील कामगारांना कसे काढण्यात आले, किती कामगारांना हिशोब देण्यात आले, किती कामगारांचे हिशोब ठेवण्यात आले? या मिलचे मालक कोण आहेत ? याची सन्माननीय सदस्यांना सर्व कल्पना आहे. या मिलचे मालक श्री. नयन मेहता, वल्लभ भाई ठक्कर होते. श्री. वल्लभभाई ठक्कर यांच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांना काही माहिती हवी असेल तर ती मिळू शकेल. या संदर्भात कोणाला काही विचारावयाचे असेल तर वल्लभभाई ठक्कर यांना फोन करुन विचारुन घेऊ शकता. युती शासनाच्या वेळी यासंदर्भातील सर्व कल्पना कामगारांना असल्यामुळे कामगार आपल्या हक्कासाठी भांडत होते. कामगारांच्या घराच्या संदर्भात अगोदर कोणते नियम ठरले होते याची माहिती सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी वाचून दाखवली आहे.

सभापती महोदय, दिनांक 19 मार्च 1991 मध्ये मुंबई शहर विकास नियमाच्या संदर्भात सभागृहात चर्चा सुरु होती. त्यावेळी माननीय श्री. मनोहर जोशी यांनी सभागृहात भाषण केलेले आहे. त्यांनी आपल्या भाषणात म्हटले होते की, "माननीय सदस्य श्री. दत्ता नलावडे यांनी सांगितल्या प्रमाणे आपण एका अर्थाने मुंबई शहरावर दरोडा घालावा अशा प्रकारचे काम करीत आहात. आज मुंबई शहरात स्मगलर्स आणि बिल्डर्स लोकच फक्त जमिनी घेऊ शकतात. साधा माणूस मुंबईत जमीन घेऊ शकत नाही." रावते साहेब आपण दादर मध्ये राहता परंतु आपण मिलसाठी जागा तर सोडा परंतु साधे गॅरेज सुध्दा सुरु करु शकला नाहीत. कोहीनूर मिल कधी घेतली गेली ? ही मिल 400 करोडला घेऊन 1200 करोड रुपयाला कशी विकली याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. सन्माननीय सदस्यांना यासंदर्भात काही विचारावयाचे असेल तर जरुर विचारावे. आता तुम्ही कोणत्या तोंडाने सांगत आहात की, गिरणी कामगारांना फुकट घरे मिळाली पाहिजेत ? आम्ही गिरणी कामगारांसाठी भांडणार आहोत, आम्ही तुमच्यासाठी चालत जाणार आहोत ? तुम्ही कोणत्या अधिकाराने हे सांगत आहात ? "लाज नाही मला आणि भेटावयास आलो तुला" अशा प्रकारची परिस्थिती आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

सभापती महोदय, यामध्ये सत्य परिस्थिती अशी आहे की, गिरणी कामगार हा गांजलेला आहे, रंजलेला आहे. गिरणी कामगाराने मुंबईला औद्योगिक नगरी म्हणून घडवले आहे. औद्योगिक मुंबई ही गिरणी कामगारांच्या घामातून आणि रक्तातून घडलेली आहे. काही लोक फक्त टीव्ही कॅमे-यासमोर जातात आणि चमकतात त्यांच्यावर मुंबई शहर घडलेले नाही. ख-या अर्थाने जर यांना गिरणी कामगारांना आणि त्यांच्या वारसांना घरे द्यावयाची होती तर युती शासनाच्या वेळी सर्व नियम बाजूला सारुन 10 टक्के व 5 टक्क्यातील घरे कोणा-कोणाला देण्यात आली ? ही सर्व घरे काका, मामा, आत्त्या, पीए, पीएंचे पीएंना देण्यात आलेली आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या 106 मृतांच्या वारसांना ही घरे दिली असती आणि कालच्या मोर्च्यात हे फिरले असते तर एक वेळेस ते चालले असते. युती शासनाने 5 टक्के व 10 टक्क्यांची जी घरे दिलेली आहेत त्याची लिस्ट खरे म्हणजे सभागृहात ठेवण्याची आवश्यकता आहे. ज्याचे मुंबईत एकच घर नाही तर 2-2,3-3 घरे आहेत त्यांनाही मुंबईत घरे देण्यात आलेली आहेत. एवढेच नाही तर मुलाच्या किंवा मुलीच्या नावाने पुण्यामध्ये सुध्दा घरे देण्यात आलेली आहेत. युती शासनाच्या काळात 5 टक्क्याची व 10 टक्क्यांची घरे फक्त नातेवाईकांनाच देण्यात आलेली आहेत. गिरणी कामगारांना तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये शहीद झालेल्यांच्या वारसांना घरे देण्याच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन केलेले आहे की, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये जे शहीद झालेले आहेत त्यांच्या वारसांना घरे दिली जातील. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये शहीद झालेल्यांच्या वारसांना घरे देण्याचा महत्वाकांक्षी निर्णय झालेला असल्यामुळे मी माननीय मुख्यमंत्र्यांचे तसेच शासनाचे अभिनंदन करतो. खरे म्हणजे हा निर्णय अगोदरच व्हावयास पाहिजे होता. संयुक्त महाराष्ट्राच्या हुतात्म्यांना केवळ श्रध्दांजली देण्यासाठी स्मारकाजवळ जायचे, एक मिनिट उभे रहावयाचे, फोटो काढावयाचे आणि निघून जावयचे असे तुम्ही किती वर्षे करणार आहात ?

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ KTG/ KGS/ जुन्नरे.. 17:35

श्री.किरण पावसकर...

मी कालच्या पेपरमधील एका वाक्याकडे सभागृहाचे लक्ष वेधतो. गिरणी कामगारांना मोफत घरे द्यावीत अशी मागणी आम्ही केलेली नाही. उलटपक्षी गिरणी कामगारांकडून 20 वर्षे महिना पाचशे रूपये भोगवटा शुल्क घ्यावे असे आमचे म्हणणे आहे. संबंधित प्रस्ताव आम्ही दोन वर्षापूर्वी राज्य सरकारकडे ठेवला होता. असे गिरणी कामगार कर्मचारी निवारा व कल्याणकारी संघाचे श्री.किशोर देशपांडे म्हणत आहेत. 7-8 युनियचे हेच म्हणणे आहे.

गिरणी कामगारांची एकच मागणी आहे की, आमच्या मुलाला गिरण्यांच्या जागेवर उभ्या असलेल्या मॉल्स, मल्टीप्लेक्समध्ये नोकरी लागावी. ज्या विभागामध्ये गिरण्यांच्या चाळी आहेत तेथे त्यांना घर मिळणार आहे. गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना घरे मिळावीत यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. पण सर्वांना घरे कशी वाटायची हा प्रश्न आहे. असे असताना दुसरीकडे या रंजलेल्या-गांजलेल्या कामगारांना त्यांच्याकडे पैसे नसताना देखील गावावरून बोलाविले जात आहे व त्यांना रस्त्यावर उतरवून त्यांची ससेहोलपट केली जात आहे वर त्यांना सांगता की, आपल्याला मोफत घरे मिळाली पाहिजेत. सरकार आपल्याला घरे द्यायला तयार आहे. पण त्यांना आपण मोफत घरे द्यावीत म्हणून भडकवत आहात. आपल्याला त्यांचे जैतापूर करायचे आहे की, रत्नागिरी करायची आहे. पुन्हा तेथे आपल्याला कोणाला तरी बळी द्यायचा आहे काय ? खरोखरच कामगारांना न्याय द्यायचा असेल तर मग आपल्याकडे सत्ता असताना त्यांना न्याय का दिला नाही ? गिरणी कामगारांनी आपल्याला वेळोवेळी का धुडकारले आहे. गिरणी कामगार सेनेचे नेतृत्त्व का धुडकारले आहे ? अशी कारणे विचारात घेतली तर त्यांची गिरणी कामगारांविषयी कुठलाही मुद्दा मांडण्याची नैतिकता नाही. युती शासन असताना गिरणी कामगारांसाठी काहीही केले नसल्यामुळे त्यांना गिरणी कामगारांसाठी मागण्या करण्याचा नैतिक अधिकार नाही. गिरणी कामगारांना न्याय देण्याचे काम हे आघाडी शासन करेल, अशी मी ग्वाही देईन. मी या सभागृहाला विनंती करतो. मी मागे देखील सांगितले होते ज्या गिरण्यांना आगी लावण्यात आलेल्या आहेत त्याची चौकशी व्हावी. एकीकडे गिरण्यांना आगी लावण्याचे प्रकार झाले होते. ज्या मालकांच्या यांच्याकडे जाऊन सुपाऱ्या फुटल्या नाहीत त्यांनी नंतर आगी

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

लावण्याचे प्रकार केले. त्याचीही चौकशी व्हावी. मॉल, मल्टीप्लेक्स या द्वारे व्यवसाय होत असतील तेथे गिरणी कामगाराच्या एका तरी मुलाला नोकरी लागावी. ज्या मुलाची शैक्षणिक पात्रता नसेल त्यांना प्रशिक्षण द्यावे व त्यांच्या वारसांना नोकरी द्यावी. फुकट घर आजही कामगार शासनाकडे मागत नाही. ही मागणी मीडियाला हाताशी धरून राजकीय कारणासाठी केली जाते. त्याही नंतर अशी मागणी करणारे असतील तर दोन तासांची वेळ अपुरी पडेल. आपण पाच ते आठ तासांची वेळ द्यावी. मी सर्व पुराव्यांसह आपल्यापुढे येईन. तेव्हा कशा पद्धतीने मालकांबरोबर बैठका झालेल्या आहेत, याची माहिती मी आपल्याला पुराव्यानिशी देईन. त्यानंतर कोणाचे साटेलोटे कोणत्या मालकांबरोबर कसे आहेत हे सांगेन. कोणी मिल आपल्याकडून विकल्या जाव्यात यासाठी प्रयत्न केले आहेत हे मी सभागृहापुढे मांडू शकेन. मी पुन्हा एकदा शासनाला विनंती करणार आहे. आज आपल्या समोर गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न आहे. गिरणी कामगार घरे मोफत मागत नाही. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांना आपण काय देऊ शकू याचा विचार करावा आणि यांच्या राजकारणाकडे लक्ष न देता गिरणी कामगारांना न्याय देण्यासाठी खऱ्या अर्थाने प्रयत्न करावा एवढीच विनंती मी या निमित्ताने करता व माझे भाषण संपवितो..

.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये गिरणी कामगारांना न्याय देण्यासाठीचा प्रस्ताव आम्ही दिला होता. तो आपण मंजूर करून त्यावर बोलण्यासाठी मला संधी दिल्या बद्दल मी आपला आभारी आहे. त्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. मी सुरूवातीलाच आपल्याला विनंती करणार आहे की, आपण मला थोडा अधिक वेळ दिला तर मी आपला आभारी राहीन.

**सभापती** : या चर्चेसाठी मर्यादित वेळ आहे.

श्री.रामदास कदम : आपण लवकर बेल वाजवू नका अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : अत्यंत चांगले मुद्दे फार कमी वेळात सुद्धा मांडता येतात.

श्री.रामदास कदम : मी कमी वेळात माझे मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करतो. सभापती महोदय, एका बाजूला या शासनाने शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि दुसऱ्या बाजूला सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकरजी, गिरणी कामगारांना देशधडीला लावण्याचे काम या शासनाने केलेले आहे, असे माझे ठाम मत आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नामध्ये आमच्या पाच हजार भगिनी विधवा झाल्या आहेत, त्यांचे कुंकू पुसले गेले, त्यांचे मंगळसूत्र तोडले गेले. त्या शेतकऱ्यांचे सरकारने खून पाडले. तेथे आपण शिवसेना प्रमुखांचे नाव न घेतल्याबद्दल मी सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांचे आभार मानतो. त्यांना धन्यवाद देतो.

सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी येथे असा प्रश्न उपस्थित केली की, यांना आजच पुतना मावशीचे प्रेम कसे काय आले ? मला त्यांना एक गोष्ट मुद्दाम सांगितली पाहिजे.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

मला या ठिकाणी दै. नवाकाळच्या संपादिका श्रीमती जयश्री खाडिलकर यांचे मनापासून आभार मानले पाहिजेत व त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. गेल्या अनेक वर्षापासून या शासनाची ब्रिटीश पॉलीसी सुरु होती. या गिरणी कामगारांमध्ये वेगवेगळे गट तयार झाले होते. ते सर्व नऊच्या नऊ गट एकत्र आणण्याचे काम श्रीमती जयश्री खाडिलकर यांनी केले. त्या स्वत: सर्व पक्षाच्या नेत्यांना जाऊन भेटल्या. त्यामध्ये सन्माननीय श्री. उध्दवजी ठाकरे असू देत, सन्माननीय श्री. राज ठाकरेजी असू देत, सन्माननीय श्री. रामदासजी आठवले असू देत, सन्माननीय मुख्यमंत्री साहेब असू देत, सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार साहेब असू देत अशा सर्व पक्षाच्या नेत्यांना त्या भेटल्या. त्या मुळे आजच हे पुतणा मावशीचे प्रेम आले नाही तर त्यांनी हे जुळवून आणले, त्याबद्दल त्यांना मला धन्यवाद दिले पाहिजेत. आपण आरोप करण्यापूर्वी थोडी माहिती करुन घेतली पाहिजे व त्यानंतर आरोप केले पाहिजेत. आपण चांगले वक्ते आहात या बद्दल दुमत नाही. याचा उल्लेख करणे आवश्यक होते म्हणून मी सांगितले. आपण दुसरा मुद्दा मांडतांना असे म्हणालात की, 40 लाख घरे देणार होते, 40 लाख झोपडपट्टीवासीयांना घरे देणार होते. आपण पहिल्यांदा ते शब्द तपासून घ्यावेत. ज्या वेळी ही घोषणा केली त्या वेळी 6 लाख कुटुंबे होती. सन्माननीय शिवसेना प्रमुखांनी एस.आर.ए. ची योजना तत्कालीन सन्माननीय मुख्यमंत्री श्री. शरद पवार साहेबांच्या हातामध्ये दिली हे आपण एकदा पाहून घ्या, त्याचा अभ्यास करुन घ्या आणि नंतर या सभागृहामध्ये बोला. त्यावेळी 40 लाख घरांची मागणी नव्हती तर 40 लाख झोपडपट्टीवासीय मुंबईमध्ये होते. त्यानंतर गेल्या 25 वर्षामध्ये त्यांच्या संख्येमध्ये वाढ झाली. त्या मुळे आपण काय बोलतो याचे थोडेसे भान ठेवले पाहिजे. "उचलली जीभ" हे मी बोलणार नाही परंतु आपण जे बोललात ते अभ्यासाशिवाय, चुकीचे बोललात.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मला सुध्दा त्याबाबतीत पूर्ण माहिती आहे. राजकारणामध्ये, चळवळीमध्ये आपण मला थोडेसे सिनियर असाल परंतु कामगार क्षेत्रामधील कृपया आपण मला सांगू नये. तत्कालीन सरकारने लोकांना लुभावणारे जे निर्णय घेतले होते, घोषणा केली होती तिचा मी उल्लेख केला. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम म्हणतात ते खरे असले तरी आणि 6 लाख कुटुंबे असली तरी त्यामधील 1 लाख कुटुंबे गिरणी कामगारांची होती. त्यांना घरे दिली असती तर तुमच्यावर आजची वेळ आली नसती.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यासंदर्भात माझा हरकतीचा मुद्दा होता. सन्माननीय सदस्यांनी आमच्यावर आरोप करतांना म्हटले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

होते की, 40 लाख झोपडपट्टीवासीयांना घरे देणार होता त्याचे काय झाले? त्याबाबत खुलासा करतांना मी म्हटले की, 40 लाख घरे नव्हती तर त्यावेळी 40 लाख झोपडपट्टीवासीय होते. त्यावेळी 6 लाख कुटुंबे होती. आपण असेही म्हटले की, सन्माननीय श्री. उध्दवजी ठाकरे हे श्रीनिवास मिल विकण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री सन्माननीय श्री. मनोहर जोशी सरांकडे शिष्टमंडळ घेऊन आले होते.

**सभापती** : आपण त्यावेळी घेतलेल्या हरकतीवर मी निर्णय प्रलंबित ठेवला आहे. त्यामुळे त्याच नावाचा पुन्हा उल्लेख करणे योग्य होणार नाही.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी जो मुद्दा मांडला त्या संदर्भात मी आपल्याला सांगितले. मला आपल्याला एवढेच सांगावयाचे आहे की, या सरकारचे सन्माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण साहेबांना भेटण्यासाठी यांच्या पक्षाच्या अध्यक्षा सन्माननीय श्रीमती सोनियाजी गांधी शिष्टमंडळ घेऊन येतील काय? तत्कालीन मुख्यमंत्री सन्माननीय श्री. मनोहर जोशी सरांना भेटण्यासाठी सन्माननीय श्री. उध्दवजी ठाकरे यांना शिष्टमंडळ घेऊन येण्याची आवश्यकता काय? सन्माननीय श्री. उध्दवजी ठाकरे हे सन्माननीय श्री. मनोहर जोशी सरांना बोलावून घेतील. या ठिकाणी आपण बालिशपणासारखे आरोप कां करीत आहोत हे आपल्याला समजले पाहिजे. आपण आपल्या पक्षाला आणि आपल्या नेत्यांना खूष करण्यासाठी बोलत आहोत, रेकॉर्डवर आणीत आहोत परंतु त्यामध्ये तथ्य आहे काय? शेंबडे मूल तरी त्यावर विश्वास ठेवील काय? सन्माननीय श्री. उध्दवजी ठाकरे शिष्टमंडळ घेऊन आले, असे कुठे होते काय? असे कधी होत नाही. आणि तुमच्या पक्षाच्या अध्यक्षा श्रीमती सोनियाजी गांधी तुमच्या सन्माननीय मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी शिष्टमंडळ घेऊन कधी येणार नाहीत. त्याची त्यांना आवश्यकता नाही. या बाबत आपल्याला समजून घेण्याची गरज आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, संयुक्त महाराष्ट्राच्या लढयामध्ये 105 हुतात्मे झाले त्यामध्ये जवळ जवळ 90 ते 95 गिरणी कामगार होते. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात प्रत्येक लढयामध्ये गिरणी कामगारांचा सहभाग होता याची संपूर्ण महाराष्ट्राला कल्पना आहे. देशाची औद्योगिक राजधानी असलेल्या मुंबईच्या विकासामध्ये देखील त्यांचे मोठे योगदान आहे, याची आपणा सर्वांना कल्पना आहे. त्यांच्या बलिदानातून आणि त्यांच्या त्यागातून महाराष्ट्राची निर्मिती झाली, मुंबई उभी राहिली याची देखील आपणा सर्वांना कल्पना आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम . . . .

सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या घामातून मुंबई उभी राहिलेली आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामध्ये प्रसंगी आपल्या जेवणाच्या डब्यातून दगड आणून, त्यावेळी काँग्रेसच्या कै.मोरारजी भाई यांची गिरगाव चौपाटीच्या मैदानावरील सभा उद्‌वस्त करण्याचे काम देखील या गिरणी कामगारांनी केलेले होते. तसेच आपल्या पोटाला चिमटा घेऊन संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या माध्यमातून मुंबई मिळविण्याचे काम ज्यांनी केले, त्याच गिरणी कामगारांना आता 50 वेळा माननीय मुख्यमंत्र्यांकडे यावे लागत आहे आणि आपण येथे अशी भाषणे ठोकता? सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांना सांगू इच्छितो. मला आपल्याकडून एक गोष्ट समजली पाहिजे की, एका बाजूला संयुक्त महाराष्ट्रासाठी ज्यांनी बलिदान केले, त्यांना न्याय मिळाला पाहिजे असे सांगत आहात पण या कामगारांना घरे मिळणे तर सोडूनच द्या पण गिरणी कामगारांचे असे म्हणणे आहे की, आम्हाला माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक घ्यावयाची आहे, त्यांच्याकडे आमच्या व्यथा मांडावयाच्या आहेत, आमच्या घरांच्या बाबतीत काय झाले? याबाबत विचारणा करावयाची आहे.परंतु महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री या गिरणी कामगारांना एकेक महिना वेळ देऊ शकत नाहीत. महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री हे गिरणी कामगारांनी दिलेल्या बलिदानामुळे आज याठिकाणी बसलेले आहेत, त्या माननीय मुख्यमंत्र्यांना गिरणी कामगारांच्या व्यथा ऐकण्यासाठी एक महिना वेळ नाही. असे असतानाही या ठिकाणी जी भाषणे केली जात आहेत, त्याचे मला आश्चर्य वाटते.

सभापती महोदय, आजही गिरणी कामगारांना असे वाटते की, ही मुंबई माझी आहे. मुंबई आमच्या श्रमातून, घामातून आणि यासाठी आमचे जे रक्त सांडलेले आहे त्यातून निर्माण झालेली आहे याची देखील आजही त्यांना जाणीव आहे. म्हणून त्यांना असे वाटते की, ही मुंबई माझी आहे, आमची आहे अशी भावना त्यांच्या मनामध्ये आहे. सभापती महोदय, होय, 1992 साली पहिला संप झाला. मी सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांना सांगू इच्छितो की, पावसकरजी, आपणही माननीय शिवसेना प्रमुखांना ओळखता आणि मी देखील ओळखतो. आपणही कुठे होतात आणि मी देखील कुठे होतो याची जाणीव तुम्हालाही आहे आणि मलाही आहे, मग आज तुम्ही कुठेही असा. पण जगामध्ये एकच नेता हा असा आहे की, एकदा मी बोललो म्हणजे बोललो.त्यांनी आतापर्यंत दिलेला शब्द कधीही मागे घेतलेला नाही आणि नि:स्वार्थीपणे काम करणाऱ्या नेत्याबद्दल सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर,आपण असे बोलणे योग्य नाही हे मी आपल्याला सांगेन.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, .....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मला पुढे काय बोलावयाचे आहे ते ऐकून घ्यावे आणि मग सन्माननीय सदस्यांनी बोलावे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मी माननीय शिवसेना प्रमुखांविषयी बोललो नाही. शिवसेना प्रमुखांविषयी कोणीही बोलणार नाही. पण शिवसेना प्रमुखांचे नाव घेऊन पुढे जगणारे आहेत, त्यांच्याविषयी बोललो आहे आणि बोलत रहाणार आहे हे देखील पुन्हा सांगतो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकरजी हे संप फोडण्याच्या बाबतीत बोलले. तसे ते बोलले. त्यांच्याकडून चुकून ते शब्द गेले.पण माननीय शिवसेना प्रमुख यांनी ते पाप कधीही केलेले नाही. त्यावेळी माननीय शिवसेना प्रमुखांची एकच भूमिका होती की, बॅरिस्टर ए.आर.अंतुले हे आताच नव्याने माननीय मुख्यमंत्री झालेले आहेत. अशा वेळी तुम्ही लगेच आता संपाच्या बाबतीत निर्णय घेऊ नका. मी त्यांच्याशी बोललो आहे आणि त्यांनी मला असे सांगितले आहे की, मला या सर्व बाबी पाहू द्याव्या, अभ्यास करु द्यावा आणि मग मी याबाबतीत निर्णय देईन. म्हणून आजच्या आज ताबडतोब संप करण्याची भूमिका घेऊ नका. म्हणून संप फोडण्याचे काम, गिरणी कामगारांना उद्ध्वस्त करण्याचे पाप शिवसेना प्रमुखांच्या डोक्यावर टाकू नका. त्यांनी अशा प्रकारचे पाप कधीच केलेले नाही. पण त्यावेळेला अशी परिस्थिती होती की, कामगार काही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. मग ते कै.दत्ता सामंत यांच्याकडे गेले आणि तो संप आज देखील सुरु आहे. 1982 मध्ये सुरु झालेला संप आज देखील मिटलेला नाही, तो सुरु आहे ही आमची आणि त्या सर्वांची व्यथा आहे.

सभापती महोदय, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे आणि या मुंबईमधून केंद्र शासनाकडे 40 टक्के निधी मिळतो.एका बाजूला मुंबईमधून 40 टक्के निधी देत असताना आपल्याला केंद्र शासनाकडून काय मदत मिळणार आहे हा आमच्या समोरील प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी मला एक गोष्ट सांगितली पाहिजे की, डी.सी.रुल्स्मध्ये बदल झाला. माननीय श्री.मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना 604 एकर जागा होती आणि त्यावेळी 1/3-1/3 बाबत निर्णय झ ाला आणि तो त्यावेळचे तत्कालीन सन्माननीय मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांनी घेतला होता. जर तोच निर्णय आजही कायम असता तर आज आपल्यासमोर ही समस्या उभी राहिली असती काय? तर याचे उत्तर "नाही" असे येईल हे मी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप
यांना सांगू इच्छितो आणि त्या निर्णयानुसार गिरणी कामगारांची घरे बांधण्यासाठी आज आम्हाला



श्री.रामदास कदम . . . .

200 एकर जागा मिळाली असती. पण गिरणी कामगारांना 200 एकरावरुन 32 एकरावर कोणी आणले? 2003 मध्ये डी.सी.रुलमध्ये कोणी बदल केला? त्यावेळी सरकार कोणाचे होते? त्यावेळी माननीय मुख्यमंत्री कोण होते ? सत्ता कोणाची होती? म्हणजे यातील मुद्दा बाजूला ठेवावयाचा आणि साप-साप म्हणून जमीन थोपटावयाची. आपण कशासाठी राजकारण करीत आहोत. शिवशाही सरकारने जो निर्णय घेतला.

यानंतर कु.थोरात . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम.....

त्यामुळे या गिरणी कामगारांना आज ती 200 एकर जागा मिळाली असती, पण नाही! ते बदलण्यात आले. बांधकाम केलेले आहे ते सोडून फक्त जी मोकळी जागा आहे त्यापैकी 1/3 जमीन मिळेल. हा बदल कोणी केला. का केला, कशासाठी केला, किती मिठाई घेतली, किती खाल्ले, कुणी खाल्ले, का खाल्ले? सभापती महोदय, एका बाजूला या गिरणी कामगारांना या शासनाने उद्ध्वस्त केले. डी.सी. रुल्स बदलण्यात आले. गिरणी मालकांच्या बाजूने या शासनाने निर्णय घेतला आणि आज पुन्हा या ठिकाणी वेगळया पध्दतीने भाषणे करण्यासाठी तुम्ही उभे आहात काय? म्हणून मी पहिल्यांदा याचा निषेध करतो. या शासनाने, या सत्ताधाऱ्यांनी सन 2003 मध्ये गिरणी कामगारांचे नुकसान केलेले आहे. आज देखील या गिरणी कामगारांना शासनाने मनात आणले तर आपण मोफत घरे देऊ शकतो. या शासनाला ते शक्य आहे. या शासनाची प्रामाणिक इच्छा असेल, माननीय मुख्यमंत्र्यांची प्रामाणिक इच्छा असेल तर या गिरणी कामगारांना आपण मोफत घरे देऊ शकतो. ते कशा पध्दतीने देऊ शकतो हे मी सांगतो. सभापती महोदय, त्यावेळेला अडीच लाख गिरणी कामगार होते. त्या कामगारांचे हजेरीपट आहे, त्यांचे रेकॉर्ड आहे. किती गिरणी कामगार आहेत हे तपासण्याची आवश्यकता नाही. खरे तर हे सर्व नाटक आहे. फॉर्म भरणे, अमुक-तमुक याची काहीही आवश्यकता नव्हती. पण आज 1 लाख 10 हजार गिरणी कामगारांनी फॉर्म भरले आहेत. 1 लाख 10 हजार घरे आपण कसे देणार यावर चर्चा झाली पाहिजे. एकमेकांची उणीदुणी काढण्यापेक्षा या गिरणी कामगारांना आपण न्याय कसा देऊ शकतो यावर अधिक चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, खरे तर या गिरण्या ज्यावेळी बंद पडल्या त्याचवेळी या गिरण्यांकडे असलेल्या जमिनी ताब्यात घ्यावयास पाहिजे होत्या. कारण या जमिनींचे मालक हे शासन आहे. एक रुपया लिजने या जागा त्यांना दिलेल्या आहेत. त्यामुळे ज्यावेळी या गिरण्या बंद पडल्या त्यावेळी या शासनाने त्या जागा ताब्यात घेतल्या असत्या तर हा प्रश्नच उभा राहिला नसता. मग याला जबाबदार कोण आहे? याला हे शासन जबाबदार आहे? या गिरण्यांच्या जागा शासनाच्या असताना, शासन मालक असताना ज्यांनी आपल्या घामाने ही मुंबई उभी केली त्यांना रस्त्यावर ठेवण्यात आले आणि गिरणी मालकांच्या घशामध्ये या जागा घालण्याचे पाप काँग्रेसने केले आहे,





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

राष्ट्रवादी काँग्रेसने केले आहे, तुम्ही केले, तुमच्या सहकाऱ्यांनी केले आहे हे मला या ठिकाणी मुद्दाम सांगावयाचे आहे. या मुंबईमध्ये 60 गिरण्यांपैकी फक्त 18 ते 20 गिरण्यांनी नियमाप्रमाणे जागा दिलेल्या आहेत. बाकीचे जे गिरणी मालक माजलेले आहेत, धनाढय झालेले आहेत, अब्जोपती झालेले आहेत. त्यांचे तुम्ही नाक दाबून तोंड कां उघडत नाही, हेच मला माहीत नाही. तुमचे सरकार आहे, तुमचे शासन आहे, मुख्यमंत्री तुमचे आहेत. जर गिरणी मालक तुमचे ऐकत नसतील, कायदा मानत नसतील, कायदा मोडत असतील तर त्यांना उचला आणि टाका आतमध्ये. कशासाठी त्यांचे लाड करण्यात येत आहेत? तुम्ही त्यांच्याकडून मिठाई घेतली आहे की काय असा त्याचा अर्थ होतो. म्हणून हे शासन त्यांचे लाड करीत आहे आणि कामगारांचे नुकसान करीत आहे असे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे. या गिरण्यांच्या जमिनी देतांना ज्या अटी आणि शर्ती घालण्यात आल्या होत्या त्या सगळया अटींचा भंग गिरणी मालकांनी केला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात सांगावे. अटी व शर्तींचा भंग करुन सगळया गिरणी मालकांनी या जमिनी आपल्या घशात घालण्याचे काम केले आहे आणि ते शासनाने त्यांना करावयाला लावले आहे असे मी म्हणेन.

सभापती महोदय, गिरणी कामगारांसाठी जागा देऊन जी 7 हजार घरे बांधण्यात आली आहेत, ती 225 स्क्वेअर फुटाची घरे बांधण्यात आलेली आहेत. या घरांसाठी जे दर लावण्यात आलेले आहेत ते 414 स्क्वेअर फुटा प्रमाणे लावण्यात आले आहेत. ही घरे 225 स्क्वेअर फूट कार्पेट एरियाची आहेत. सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने या संदर्भात एक कायदा केला आहे. भविष्यामध्ये कोणत्याही बिल्डरने कार्पेट एरियाच्या व्यतिरिक्त बिल्टअप किंवा सुपर बिल्टअप एरिया धरुन जर घरे विकली तर त्यांच्यावर तत्काळ कायदेशीर कारवाई केली जाईल. पण सरकारच गिरणी कामगारांच्या घरांचा 225 स्क्वेअर फूट कार्पेट एरिया असताना 414 स्क्वेअर फुटाचा सुपर बिल्टअप एरियाचा भाव लावीत आहे. त्यामुळे गुन्हेगार म्हणून महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्याना आतमध्ये टाकण्यात यावे. गिरणी कामगारांची फसवणूक करण्यात येत आहे. 225 स्क्वेअर फूट कार्पेट एरिया असेल तर कार्पेट एरिया गुणिले एक हजार रुपये बांधकामाचा खर्च

..3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम......

म्हणजे सव्वा दोन लाख रुपये होतात. या सव्वा दोन लाख रुपयापैकी केंद्र शासन दोन लाख रुपये मदत देणार आहे. त्यामुळे या गिरणी कामगारांना शासन मोफत घरे देऊ शकते. पण या बाबत या ठिकाणी बोलले जात नाही. फक्त एकमेकांची उणीदुणी काढण्याचे काम केले जात आहे.

सभापती महोदय, राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाने या ठिकाणी गिरण्यांची जागा घेतलेली आहे. खरे म्हणजे गिरण्यांना जोपासणे, गिरण्या वाढविणे, गिरणी कामगारांना मदत करणे हे राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाचे काम आहे. पण गिरणी कामगारांच्या जमिनी घेऊन तेथे मॉल बांधणे हे राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाचे काम नाही. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी जो मुद्दा मांडलेला आहे, तोच मुद्दा मी पुन्हा मांडतो. आपल्या मताशी मी शंभर टक्के सहमत आहे. राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाने गिरणी कामगारांच्या ज्या जमिनी घेतल्या आहेत त्या सगळया जमिनी महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारकडे जाऊन ताब्यात घेतल्या पाहिजेत.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

माननीय मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारकडे जावे आणि सांगावे की, त्या जमिनीवर आमचा हक्क आहे. या जमिनी जर आपल्याला मिळाल्या तर निश्चितपणे आपण 110 गिरणी कामगारांना घरे देऊ शकतो.

सभापती महोदय, या वस्त्रोद्योग महामंडळाने जमिनी विकून 5 हजार कोटी रुपये घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. आताच माननीय केंद्रीय मंत्र्यांनी ती भूमिका जाहीर केलेली आहे. या जागा आमच्या मुंबईच्या आहेत, या जागा गिरण्यांच्या आहेत आणि त्या जागा विकून तुम्ही 5 हजार कोटी रुपये दिल्लीत घेऊन जाणार. ते 5 हजार कोटी रुपये जर या ठिकाणी गिरणी कामगारांना दिले तर सगळ्या कामगारांना घरे देऊ शकतो, फक्त इच्छा पाहिजे. त्या विषयाकडे कोणी येत नाही. माझ ी आपल्या मार्फत महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, आपण या राज्यातील गिरणी कामगारांच्या वतीने, गिरणी कामगारांच्या घामातून, त्यांच्या श्रमातून, त्यांच्या मेहनतीतून, त्यांच्या बलिदानातून या ठिकाणी मुख्यमंत्री म्हणून बसला आहात. आपली नैतिक जबाबदारी आहे. तुमचे वस्त्रोद्योग महामंडळ असू द्या किंवा मालक असू द्या, तुम्ही मालकांना दंड करा. त्यांच्याकडून पैसे वसूल करा. या सगळ्यातून आपण महाराष्ट्रातील गिरणी कामगारांना न्याय देऊ शकतो. आपण जर त्यांना न्याय दिला नाही तर त्याची फळे या सरकारला भोगावी लागतील. जर गिरणी कामगारांच्या बाबतीत दुर्लक्ष केले, पुन्हा कमिटी नेमणे, पुन्हा बासनामध्ये गुंडाळणे असे जर केले तर नियती आणि गिरणी कामगार तुम्हाला माफ करणार नाही, महाराष्ट्रातील मराठी माणूस तुम्हाला माफ करणार नाही आणि मराठी माणूस या सरकारला गाडल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा देऊन मी माझे दोन शब्द संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ AKN/ KGS/ KTG/

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मघापासून गिरणी कामगारांच्या घरांविषयी सन्माननीय सदस्य काही तरी ठोस बोलतील आणि तसे ऐकावयास मिळेल असे मला वाटत होते पण तसे ठोस काही ऐकावयास मिळालेले नाही. 1974-75 पर्यंत गिरणी कामगारांच्या पगारामध्ये किंवा एकूणच त्यांच्या कामकाजामध्ये प्रगती झाली नव्हती. गिरणी कामगार उद्विग्न होता. त्याला रस्ता सापडत नव्हता. माझा जन्म कामगारांच्या वस्तीमध्ये झालेला आहे. मी गिरणी कामगारांच्या वस्तीमध्ये मोठी झाली आहे. गिरणी कामगार म्हणजे काय, त्यांचा लढा म्हणजे काय हे डॉ. दत्ता सामंत यांच्या बरोबरीने प्रत्येक मिलच्या गेटवर जाऊन मी अनुभवलेले आहे. नुसतेच अनुभवले नाही तर भोगलेले सुध्दा आहे.

सभापती महोदय, 23 नोव्हेंबर, 1981 रोजी या गिरणी कामगारांना आपल्या मागणीचा, आपल्या विषयाचा रस्ता सापडत नव्हता. कामगारांची कोंडी झालेली होती. या मिल मालकांसमोर मी काय करणार अशा प्रकारचे विदारक चित्र जेव्हा त्यांना समोर दिसले तेव्हा गोदरेज कंपनीतील कामगारांनी डॉ. दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली आपल्या मागण्या मान्य करुन घेतल्या. प्रिमियर कंपनीच्या कामगारांनी डॉ. दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली आपल्या मागण्या मान्य करुन घेतल्या. असा एक लढवय्या नेता त्यांनी शोधला. गोदरेजच्या कामगारांच्या बाबतीत काय झाले, तो लढा तोडण्यासाठी कोण गेले होते ? मी त्यांचे नाव घेऊन त्यांच्या नावाला आणि त्यांना मोठेपणा देणार नाही. काळ ते सगळे शोधून काढील आणि काळाने ते शोधून काढलेले आहे. आमच्यासारख्या माणसांचे संसार रस्त्यावर आले. या ठिकाणी शेतकऱ्यांच्या मंगळसूत्राचा विषय निघाला म्हणून सांगते. ज्या वेळेला कारण नसताना गोदरेजचा कामगार चार चार वर्षे जेलमध्ये गेला तेव्हा त्यांच्या संसाराची कोणी चिंता केली ? त्या कामगारांच्या स्त्रियांचे मंगळसूत्र त्यांच्या गळ्यात राहिले नाही. या ठिकाणी डी.सी.रुल्सची चर्चा होते पण कामगारांच्या प्रश्नाविषयी कोणीही बोलताना ऐकावयास मिळाले नाही. म्हणून मी हा उल्लेख करीत आहे. तेव्हा या मंडळींच्या डोळ्यातील अश्रू का आटले होते ? श्री. मनोहर जोशी यांनी ते सगळे आंदोलन गोदरेजच्या कामगारांच्या गळ्यात घातले म्हणून अश्रू आटले होते का, असा माझा प्रश्न आहे. जे कामगार रस्त्यावर आले, जे 105 हुतात्मे आमच्या काळाचौकीसारख्या भागामध्ये झाले त्यांना घर मिळाले पाहिजे. याबद्दल माझ्या मनामध्ये तीळमात्र शंका नाही. सरकारचा जो निर्णय असेल तो शिरोधार्ह आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई...

मी येथे दोन महत्वाचे मुद्दे मांडणार आहे. 1981 साली या संपामध्ये जो कामगार सामील होता त्यांचे या यादीमध्ये नाव होते. त्या सगळ्यांना कायद्याच्या चौकटीमध्ये बसवून घर दिले पाहिजे, ही माझी प्रमुख मागणी आहे. दुसरे असे की, एनटीसीने 10 मिल्स आपल्या ताब्यात घेतल्या आहेत. तेथे त्यांना टेक्सटाईल पार्क उभे करावयाचे आहे. पण ज्या जागेवर गिरण्याच नाही, जेथे गिरणी कामगारच नाही तेथे टेक्सटाईल पार्क उभे करुन त्यांना शो पीस उभा करावयाचा आहे काय ते समजत नाही. ती जमीन सरकारने विना अट आपल्या ताब्यात घ्यावी. राहिलेल्या कामगारांना कायद्याच्या चौकटीत बसवून त्या जागेवर घरे द्यावीत अशी माझी व माझ्या पक्षाची मागणी आहे. गेली 29 वर्षे गिरणी कामगार डॉ.दत्ता सामंत व त्यांच्या सर्व नेत्यांचे नाव घेऊन या संपाबरोबर चालले. मी पुतनाबाईंचा हा लळा, माया आहे असे काही बोलणार नाही. परंतु येणाऱ्या फेब्रुवारी महिन्यात मुंबई महानगरपालिकेच्या व ठाणे महानगरपालिकेची निवडणूक आहे. सगळया बाजूने कोंडी झालेली काही मंडळी एकत्र आली आहेत. 29 वर्षांपैकी साडेचार वर्षे विरोधी पक्षाच्या नेतृत्वाने कामकाज केले आहे. तेव्हाही ते निर्णय घेऊ शकले असते, परंतु त्यांनी त्यावेळी का निर्णय घेतला नाही, मग आताच ही वेळ आली ? मी काल घरी जाताना रस्त्यावर एक बोर्ड वाचला. तो बोर्ड वाचून मी स्वत:शीच हसले. "मुंबई नाही कोणाची, ती आहे गिरणी कामगारांची" असे त्यावर लिहिले होते. होय, हे बरोबर आहे. मुंबई ही गिरणी कामगारांचीच आहे हे आम्हीही मान्य करतो. पण हे सांगण्यासाठी तुम्हाला 29 वर्षे का लागली, 29 वर्षात गिरणी कामगारांचे प्रश्न तुम्हाला समजले नाही ? ते तुम्हाला कळायला पाहिजे होते. हे नाटक आता थांबवावे.

**सभापती** : आता संध्याकाळचे 6 वाजून गेलेले आहेत. सभागृहात सुरु असलेली चर्चा व त्या वरील मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होईपर्यंत मी सभागृहाची वेळ वाढवित आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, या सर्व संघटनांनी, या मंडळींनी आता हे नाटक थांबविले पाहिजे. त्या सर्वांनी एकमुखी असे सांगितले पाहिजे की, या सर्व गिरणी कामगारांना सरकारच्या चौकटीमध्ये बसवून घरे देण्यात यावीत. अशा प्रकारची मी देखील मागणी करुन मी माझ ो भाषण संपविते. जय हिंद.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

NTK/ KGS/ KTG/ AKN/

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सभागृहात गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नासंबंधीची सर्व सन्माननीय सदस्यांनी केलेली भाषणे मी काळजीपूर्वक ऐकत आहे. त्यामुळे माझ्या डोक्यात एका मुद्याबाबत थोडासा गोंधळ निर्माण झालेला आहे. तो सुटावा म्हणून मी आपल्याला माहिती विचारु इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी आपल्या भाषणात महात्मा गांधी यांची चळवळ मोडून काढण्यासाठी काही लोकांना गिरण्या काढण्यास सांगितले असे सांगितलेले आहे. परंतु टिळकांसाठी लोकांनी मोर्चा काढला होता, मोर्चावर गोळीबार झाल्यावर काही लोक मृत्युमुखी पडले होते. त्यानंतर गांधी युग सुरु झाले होते त्यामुळे गिरणी त्यांच्या अगोदर पासून होती की नव्हती अशा प्रकारचा एक प्रश्न मला पडला आहे.

**सभापती** : ते रेकॉर्ड तपासून दुरुस्त करावे लागेल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अशा प्रकारच्या स्वातंत्र्य चळवळीत लोकांनी जाऊ नये यासंबंधीचे मी एक उदाहरण दिले आहे. मी नेताजी सुभाषचंद्र बोस, टिळक यांच्यासंबंधी आणखी बोलू शकतो. पण टिळकांचे नाव कॉँग्रेसवाले घेत आहेत हे चांगले आहे. भाजपवाले महात्मा गांधींचे नाव घेत आहेत आणि कॉँग्रेसवाले टिळकांचे नाव घेत आहेत हे फार चांगले झाले.

**सभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना मघाशी सांगितले आहे की, या चर्चेच्या दरम्यान जे उल्लेख योग्य नाहीत ते तपासून पाहून मी वगळणार आहे. सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे झ ााल्यावर मी याबाबत पुन्हा सांगणार आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या संदर्भात जी चर्चा याठिकाणी उपस्थित करण्यात आलेली आहे त्यामध्ये भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, ज्यांनी मुंबईचा इतिहास घडविला अशा मुंबईतील गिरणी कामगारांचा हा अतिशय जीवनमरणाचा आणि अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. आतापर्यन्त या प्रश्नाच्या संदर्भात अनेक आरोप प्रत्यारोप झाले, एकमेकांवर कुरघोड्या करण्याचा प्रयत्न झाला. खरा प्रश्न आहे तो गिरणी कामगारांना घर मिळण्याचा. हे घर मिळण्यासाठी गेली 28 वर्षे ते झगडत आहेत. 16 जानेवारी 1982 पासून गिरणी कामगारांचा संप सुरु झाला. त्यानंतर अडीच लाख कामगारांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळी कॉ. डांगे यांना गिरण्यांच्या आस्थापनांचा प्रचंड अभ्यास होता. त्यांच्या आणि डॉ. दत्ता सामंत यांच्या कामगार चळवळीविषयक धोरणामध्ये मूलभूत फरक होता. कॉ. डांगे पासून ते आतापर्यन्तचे कामगार चळवळीतील नेते, श्री.दत्ता इस्वलकर, श्री. प्रवीण घाग, श्री. किशोर देशपांडे यांनी कामगारांच्या प्रश्ना विषयी सतत लढा दिला. नवाकाळच्या संपादिका श्रीमती जयश्री खाडीलकर यांनी देखील कामगारांच्या पाठीशी उभे राहून त्यांच्या प्रश्नाला सतत वाचा फोडली.

सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या प्रश्नाबाबत बोलत असताना या ठिकाणी असे सांगण्यात आले की, गिरण्यांच्या जमिनीचा विकास करीत असताना 1/3 जमीन गिरणी मालकाला, 1/3 जमीन म्हाडाला घरे बांधण्यासाठी आणि 1/3 जमीन मुंबई महानगरपालिकेला देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु डीसी रुलमध्ये बदल करुन हा जो निर्णय घेण्यात आला त्यामध्ये गिरणी मालकांचाच अधिक फायदा झालेला आहे. तेव्हा हा निर्णय कसा झाला याची चौकशी व्हायला पाहिजे. जवळपास 58 गिरण्या आहेत. त्यापैकी 18 गिरणी मालकांनी जमिनी दिलेल्या आहेत. अजून 40 गिरणी मालकांनी जमिनी दिलेल्या नाहीत. खरे म्हणजे सरकारने गिरण्या चालविण्यासाठी गिरणी मालकांना ह्या जमिनी दिलेल्या होत्या. गिरण्या बंद पडल्यानंतर या जमिनी गिरणी मालकांनी सरकारच्या ताब्यात द्यायला पाहिजे होत्या. तेव्हा ज्या गिरणी मालकांनी 1/3 जमीन दिलेली नाही त्यांच्यावर कडक कारवाई व्हायला पाहिजे. आज मुंबईमधून जात असताना गिरण्यांच्या ठिकाणी मोठमोठे टावर्स आणि मॉल्स उभे राहिलेले दिसतात. माझे म्हणणे एवढेच आहे की, सर्व गिरणी कामगारांना घर मिळाले पाहिजे. आपल्याकडे फक्त 8-9 हजार घरे असतील

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ AKN/ पूर्वी श्री. खंदारे 18:05

श्रीमती विद्या चव्हाण....

आणि ज्यांचा हक्क आहे अशा गिरणी कामगारांना घरे मिळणार नसतील तर त्यांच्यावर घोर अन्याय होईल. तेव्हा जे गिरणी मालक 1/3 जमीन देत नाहीत त्यांच्यावर कडक कारवाई करायला पाहिजे. 28 वर्षातील साडेचार वर्षे विरोधी पक्ष सत्तेवर होता बाकीची वर्षे आघाडी सरकार होते असे येथे सांगितले गेले. सत्तेवर कोणीही असले तरी अजूनपर्यन्त गिरणी कामगारांना घरे मिळालेली नाहीत हा मुख्य प्रश्न आहे. या गिरणी कामगारांना घरे मिळाली पाहिजेत आणि हे काम आपल्या आधाडी सरकारने तातडीने केले पाहिजे. आज अनेक गिरणी कामगार उपेक्षित जीवन जगत आहेत. अनेक गिरणी कामगार आज हयात नाहीत.

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण........

त्यांच्या विधवा पत्नी आहेत, वायडिंग विभागात मोठया प्रमाणात महिला कामगार म्हणून काम करीत होत्या, यापैकी अनेकजण गावी निघून गेले आहेत. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत त्यांनी दिवस काढले आहेत. शासनाने तातडीने या कामगारांच्या हिताचा निर्णय घेतला पाहिजे. सेंचुरी मिलला महानगरपालिकेने 1927 मध्ये 29 वर्षासाठी भाडे तत्वावर जागा दिलेली होती. 1955 मध्ये हा करार संपला होता. महापालिकेचे सहाय्यक आयुक्त श्री.वसंत प्रभू यांनी थकित भाडे वसूल करण्याचा रितसर प्रस्ताव तयार करुन महापालिकेच्या वित्त विभागाकडे सादर केला होता. महापालिकेचे अधिकारी श्री.राजेंद्र वळे यांच्याकडे कायदेशीर तपासणीसाठी 10 महिन्यापासून हा प्रस्ताव पडून आहे. महापालिका किंवा शासनाच्या माध्यमातून अनेक गिरण्यांमधील जमिनी मिळण्यासारख्या आहेत. फक्त 9 ते 10 हजार सदनिका आहेत आणि तेवढ्याच कामगारांना दिल्या जाणार असतील तर ते अन्यायकारक होईल. राष्ट्रीय मिल मजदूर संघाने अनेक प्रयत्न केले, आपण सगळेजण प्रयत्न करीत आहोत. परंतु डी.सी.रुल्सनुसार 1/3, 1/3, 1/3 प्रमाणात मुख्य बांधकाम सोडून उर्वरित जमिनींपैकी जमीन घ्यावी असे सांगितले आहे. यामुळे कामगारांवर अन्याय होत आहे. पक्षीय मतभेद बाजूला ठेवून या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे.

गिरणगावात आज जे टॉवर उभे राहिले आहेत, तेथे धनिक लोक रहात आहेत. उदाहरण द्यायचे झाले तर लोअर परळ येथील श्रीनिवास मिलच्या जागेवर लोढा बिल्डर्सकडून 117 मजली टॉवर उभारला जात आहे. वर्षभरापूर्वी या टॉवरची जाहिरात प्रसिध्द झाली होती. त्यावेळी एका फ्लॅटचे बुकिंग 70 कोटी रुपयांचे होते. 41 ते 80 मजल्यावरील फ्लॅटमध्ये 4 हजार चौ.फुटाचा स्वीमिंग पूल असणार आहे. एका टॉवरमध्ये 70 कोटी रुपयांचा एक फ्लॅट विकला जाणार असेल तर संपूर्ण टॉवरची किंमत किती असेल याचा अंदाज येऊ शकत नाही. अब्जावधी रुपयांची उलाढाल या माध्यमातून होणार आहे. गरीब गिरणी कामगारांच्या श्रमावर मुंबई उभी राहिली, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात गिरणी कामगारांचा सिंहाचा वाटा होता, या कामगारांवर अन्याय होऊ नये, या प्रश्नामध्ये बिलकूल राजकारण करु नये, पक्षीय राजकारणाच्या पलीकडे काही गोष्टी ठेवल्या पाहिजेत. गिरणी कामगारांच्या मोर्चामध्ये कोणकोण सामील होते, महापालिकेच्या निवडणुका जवळ आल्या म्हणून राजकीय फायदा किती घ्यायचा हे मुद्दे बाजूला ठेवून फक्त कामगारांना न्याय मिळण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. कामगार संघटनांकडे कामगारांची यादी आहे, त्यांच्याशी एकत्रपणे चर्चा करुन मार्ग काढणे आणि जास्तीत जास्त कामगारांना कशी घरे मिळतील

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

हे पहावे एवढी विनंती करुन माझे भाषण संपविते.

------ ..2..



डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, अतिशय ऐतिहासिक स्वरुपाची चर्चा सदनामध्ये सुरु आहे. मागे वळून बघू तेव्हा या चर्चेमधून फलित काय आले होते हे स्पष्ट झाले पाहिजे. चर्चेसाठी मान्य करतो की आम्ही योग्य नाही. विरोधी पक्षाचे वर्तन योग्य नाही असा आरोप असू शकतो. परंतु सत्ताधारी पक्षाने काय निर्णय दिला याकडे लक्षावधी गिरणी कामगारांचे लक्ष लागलेले आहे. इतकेच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील श्रमिकांचे लक्ष लागलेले आहे. गिरणी कामगारांच्या कृती समितीने काही मुद्दे आणि मागण्या शिवसेनेचे कार्यकारी प्रमुख श्री.उध्दवजी ठाकरे यांच्याकडे सादर केलेल्या आहेत. त्या मी रेकॉर्डवर आणणे आवश्यक आहे असे समजते. त्यानुसार एक म्हणजे केंद्र सरकारने अपोलो युनायटेड नं.1 आणि न्यू सिटी गिरण्या जॉईंट व्हेंचर करुन खाजगी मालकांना चालवावयास दिल्या, ही धूळफेक आहे. 100 ते 200 शिलाई मशिन्स आणून कपडे शिलाईचा उद्योग तेथे सुरु आहे. नाममात्र लोकांना रोजगार दिलेला आहे. त्याची सरकारने चौकशी केली पाहिजे.

सभापती महोदय, आधुनिकीकरणाच्या नावाखाली रुबी आणि बॉम्बे डाईंग या गिरण्यांच्या जमिनी विकसित केल्या आणि फार कमी कामगारांना काम दिले. सरकारची फसवणूक केली म्हणून या मालकांची चौकशी करावी.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे.........

तिसरा मुद्दा म्हणजे मॉडर्न मिल, मातुल्य मिल, हिंदुस्थान मिल, वैस्टर्न इंडिया युनायटेड, सेंचुरी, न्यू प्रकाश कॉटन, हिंदुस्थान प्रोसेस, हिंदुस्थान क्राऊन, खटाव मिल, बॉंबे डाईंग, रुबी मिल्स, श्रीनिवास मिल, न्यू ग्रेट या गिरण्यांनी जमिनी दिलेल्या नाहीत, त्यांचे बांधकाम त्वरित थांबवावे. तसेच रघुवंशी, फिनीक्स आणि कमला या गिरण्यांच्या मालकांनी जमीन देण्यास नकार दिल, त्यांच्यावर ठोस कारवाई करावी अशी माझी मागणी आहे. यासोबत मफतलालच्या मिल मालकांनी गिरणी विकून अन्य राज्यात हा पैसा गुंतविलेला आहे, त्या मालकावर कारवाई करावी व त्या मालकाला आपल्या राज्यात गुंतवणूक करण्याचे आदेश द्यावेत. तसेच दि. 1.1.1982 ला हजेरी पटावर असलेल्या सर्व कामगारांना घराचा अधिकार मिळावा. जे मृत असतील त्यांच्या वारसांना घरे मिळावीत. कालच्या मोर्चात सिंधुदुर्ग व कोकणातून लक्षावधी कामगार मुंबईत आले होते. त्यात तरुण मुलांचा सुध्दा सहभाग होता. त्या तरुणांना रोजगारामध्ये प्राधान्य मिळावे. गिरणी कामगारांची पात्रता ठरविताना कोणत्याही अटी घालू नये. तसेच ज्या गिरण्यांच्या जागी घरे बांधण्यात येतील ती घरे त्याच गिरणीत काम करणाऱ्या कामगारांना किंवा त्यांच्या वारसांना मिळावीत. तसेच या घरांची किंमत बांधकामाचा खर्च प्रति चौरस मीटर जेवढा असेल त्या व्यतिरिक्त शासनाला कर मिळणार आहे, कामगारांना घरे देण्याबाबत किंमतीचा विचार व्हावा. तसेच कामगारांच्या वारसांना सुध्दा म्हाडाची घरे मिळण्याबाबत अर्ज करण्याची संधी मिळावी. डी.सी. रुल्सप्रमाणे गिरण्यांची 1/3 टक्के एवढी जमीन देण्यास टाळाटाळ करीत असतील व त्याबद्दल कायद्यात त्रुटी असतील तर कायदा कठोर केला पाहिजे अशा प्रकारच्या मागण्या गिरणी कामगार कृती समितीने केल्या आहेत.

सभागृहात मघाशी अनेक मुद्दे मांडण्यात आले, त्यांची पुनरावृत्ती मी करणार नाही. पण मी महत्वाचे तीन मुद्दे मांडणार आहे. त्यातील पहिला भाग असा आहे की, त्यावेळी माननीय शिवसेना प्रमुखांची जी भूमिका होती त्या भूमिकेला अनुसरुन पुढे चालत जाऊन या सर्व संघटना माननीय उध्दव ठाकरेंच्या सहकार्यासाठी पुढे आल्या आहेत, हे नियतीने दिलेले उत्तर आहे. मग सन 1996 मध्ये काय झाले, 1992 मध्ये काय झाले, 1984 मध्ये काय झाले किंवा सन 2010 मध्ये काय झाले हा भाग महत्वाचा नाही. या सर्व गिरणी कामगार संघटना आमच्याबरोबर आलेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

आहेत, जुन्या काळात काय झाले हा विषय आता नाही. पुवीच्या ज्या घटना घडल्या त्याबद्दल वेगवेगळी मते असू शकतात म्हणून मला वाटते त्यावेळेस माननीय शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांची भूमिका गिरणी कामगारांना पटली नसली तरी ........

श्री. उल्हास पवार : महोदय, आपण त्यासंबंधीची भूमिका स्पष्ट केलेली आहे. रेकॉर्ड तपासून निर्णय देतो असे सांगितल्यानंतर देखील तोच तोच विषय सभागृहात उपस्थित केला जातो, हे योग्य नाही.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, हे संपूर्ण रेकॉर्ड तपासून मी नंतर त्याबाबतचा निर्णय देणार आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, सन 1996 मध्ये काय झाले, 2002 मध्ये काय झाले हा प्रश्न नसून 2010 मध्ये काय झाले एवढेच मी बोलले. मी कोणताही दोषारोप केलेला नाही.

श्री. सचिन अहिर : महोदय, सन्माननीय सदस्या जो खुलासा करीत आहेत त्या अनुषंगाने मला एक बाब निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, त्यांनी बोलण्याच्या ओघात सांगितले की, गिरणी कामगारांच्या संदर्भात नियतीने उत्तर दिले आहे, नियतीला हे मान्य नव्हते. आपण गिरणी कामगारांच्या प्रश्नावर राजकारण बाजूला ठेवून चर्चा करण्याचे ठरविल्यानंतर असे म्हणणे योग्य नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, सभागृहातील सर्वच भाषणे विषयाला धरुनच झालेली आहेत, त्यात कोणतेही राजकारण नव्हते. मला वाटते की, माननीय शिवसेना प्रमुख आणि उध्दव ठाकरे यांच्यावर सर्व संघटनांनी विश्वास टाकला........अडथळा......माननीय राज ठाकरे साहेब सुध्दा आले होते. त्यांनी कोणती भूमिका घेतली त्याबद्दल मी बोलणे योग्य होणार नाही.

**सभापती** : मघाशी ज्या पध्दतीने सभागृहात आक्षेप घेतले गेले त्याबाबत मला पुन्हा सांगावयाचे आहे की, जे या सभागृहात हजर नाहीत किंवा येऊ शकत नाहीत त्यांचा उल्लेख करावयाचा नसतो. तरी देखील तो उल्लेख करण्यात आला म्हणून संपूर्ण रेकॉर्ड तपासून यासंबंधीचा निर्णय मी सभागृहात जाहीर करीन असे सांगितले होते.

यानंतर श्री. जुन्नरे ......

अशुध्दप्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती** ....

परंतु आपण 3-4 वेळेस हा मुद्दा रिपीट केलेला आहे त्या मुळे अशा प्रकारचे रिपीटेशन टाळणे गरजेचे आहे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, मी आपली आभारी आहे. मला आपला निर्णय मान्य आहे. गिरण्यांच्या संदर्भात विरोधी पक्षाच्या नेत्यांकडून काही अयोग्य वर्तन घडले असेल व त्याबाबत आपल्याला आतमधून माहिती मिळाली असेल तर आपण सीआयडी चौकशी करु शकता. तुमच्या हातामध्ये सत्ता आहे, गृह विभाग आहे त्यामुळे अशा सर्व व्यवहाराच्या संदर्भात आपण चौकशी करा व त्यांच्या विरोधात योग्य ती कारवाई करावी असे मी आपल्याला आव्हान देते. तुमच्याकडे गिरण्यांच्या भ्रष्टाचाराचे जे जे पुरावे असतील ते देऊन त्यामध्ये जे जे कोणी असतील त्या आरोपींना शिक्षा देण्याचा आपण प्रयत्न करावा. कोर्ट जेव्हा सर्व माहिती खणून काढेल तेव्हा सह आरोपी म्हणून अजून कोणाकोणाची नावे सापडतील त्याचीही आपण तयारी ठेवावी एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, गिरणी कामगारांच्या घराच्या प्रश्नाच्या संदर्भात कोण आवाज उठवतो आहे त्यापेक्षा गिरणी कामगारांच्या प्रश्नाला न्याय देण्याचा कोण प्रयत्न करीत आहे हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. कालच्या मोर्चाने सत्ताधारी पक्ष घाबरला असून त्यांच्या पायाखालची जमीन सरकली आहे. (अडथळा) गिरणी कामगारांना घरे मिळण्यापेक्षा ही चर्चा डायव्हर्ट करुन विरोधी पक्षाने चिडवून,भडकवून त्यांचे निलंबन झाले पाहिजे असा सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांचा विचार असावा असे मला वाटते. परंतु तसे मात्र काहीही होणार नाही. हा सूर्य, हा जयद्रथ यासारखे तुम्ही जर कामगारांच्या बाजूने असाल तर, मला सांगा की, गिरणी कामगारांना घरे मोफत मिळतील व मोफत घरे मिळाली नाही तर शासन काय करणार आहे ? हे सुध्दा सांगण्याची गरज आहे. माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री श्री. सचिन अहिर यांना मी अगोदर सुध्दा सांगितले आहे की, आम्ही तुम्हाला गिरणी कामगारांच्या बरोबरचे मानतो. आपली परिस्थिती कारगीलच्या हुतात्म्यांसारखी झालेली दिसते आहे. गिरणी कामगारांच्या घराच्या संदर्भात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

आपल्याकडून कोणत्याही प्रकारची भूमिका स्पष्ट होत नाही. गिरणी कामगार न्यायाच्या अपेक्षेमध्ये आहेत. "उषःकाल होता होता, काळ रात्र झाली, अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली." या प्रमाणे तुम्ही सातत्याने जनतेची फसवणूक करु शकत नाही. माननीय शिवसेना प्रमुखांचा शब्द खरा होणार हे मी येथे मुद्दाम सांगते व एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

धन्यवाद.

------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले ): सभापती महोदय, सदनामध्ये गिरणी कामगारांना तसेच त्यांच्या वारसांना घरे मिळाली पाहिजेत या बाबतच चर्चा सुरु आहे. या चर्चेमधून गिरणी कामगारांना घराचे वाटप कशा प्रकारे झाले पाहिजे याबाबतीतील भूमिका शासनाकडून मांडली जाणार आहे. गिरणी कामगारांना घरे देण्याच्या संदर्भात प्रदेश काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात या विषयाच्या संदर्भात 1-2 वेळेस बैठका झालेल्या आहेत. ज्यावेळेला या प्रश्नाच्या संदर्भात मोठया संख्येने गिरणी कामगार माझ्याकडे आले होते त्यावेळी या प्रश्नाबाबत सविस्तर चर्चा झाली होती.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांनी देखील या संबंधी बैठक घेतली होती. तेव्हा त्यांनी यातून काही मार्ग काढला पाहिजे व गिरणी कामगारांना स्वस्त दरामध्ये घरे दिली पाहिजेत अशी भूमिका घेतली. घरे बांधून झाल्यानंतर ती कोणाला द्यायची हा विषय पुढे आला व त्यासंबंधी चर्चा सर्वत्र व्हायला लागली. गिरणी कामगारांना घरे दिली पाहिजेत, त्यांच्या कुटुंबीयाना घरे मिळाली पाहिजेत ही भूमिका पूर्वी पासून काँग्रेस पक्षाची होती आणि लोकशाही आघाडीची देखील होती. त्या दृष्टीनेच पावले उचलली जात आहेत. मला मंत्री महोदयांना एकच सांगावयाचे आहे की, ही घरे परवडेल अशा किंमतीने दिली पाहिजेत. यासाठी दोन पावले मागे घेण्याची आवश्यता असेल तर ते देखील शासनाने घ्यावे. असे करीत असताना गिरणी कामगारांना घरे मिळाली पाहिजेत अशा प्रकारची भूमिका शासनाने घ्यावी अशी देखील अपेक्षा मी येथे व्यक्त करतो. कामगारांची घरे पूर्ण बांधून झाल्यानंतर ती त्यांना मिळवून देण्यासाठी सर्वांनी भूमिका घेतली. कामगारांना घरे मिळण्यासाठी व ती बांधण्यासाठी राज्य शासनाने प्रयत्न केले. त्यामुळे शासनाच्या वतीने कुठेही मागे राहण्याचा प्रश्न नाही. आज आम्ही घरे मागतो म्हणून शासन घरे देण्यास पुढे आलेले आहे असे विरोधी पक्षाने असे समजू नये. सर्वांना घरे स्वस्त दरात दिली पाहिजेत अशी शासनाची भूमिका आहे. त्यातून सर्वांना फायदा मिळाला पाहिजे ही भूमिका निश्चितपणे राज्य शासनाची आहे. त्या दृष्टीने दोन पावले मागे टाकण्याचे काम राज्य शासनाला करावे लागले तरी ते करावे. उपलब्ध असलेली घरे कशा पद्धतीने वाटावीत त्यासंबंधी देखील सदनामध्ये चर्चा झाली असेल व त्यासंबंधी कोणता मार्ग राज्य शासन अवलंबित आहे यासंबंधीची भूमिका राज्य शासनाने घ्यावी. तात्काळ उपलब्ध असलेली घरे, घरांच्या किंमतीसंबंधी, घरे वाटपासबंधी योग्य ती भूमिका घेऊन शासनाने निर्णय घ्यावा. उर्वरित कामगारांना घरे द्यायची किंवा मोबदला द्यायचा या संबंधी देखील चर्चा करावी. ज्या गिरणी मालकांनी अद्याप पर्यंत जमीन उपलब्ध करून दिलेली नाही, त्यांच्याकडून जमीन कशी काढून घ्यावी याचा विचार करावा. अजूनही गिरण्यांच्या जमिनीवर मोठ-मोठे टॉवर उभे रहात आहेत. गिरणी कामगारांना जागा उपलब्ध करून देण्यात येत नसेल तर त्या संबंधी कठोर पावले राज्य शासनाने उचलणे गरजेचे आहे व तशी भूमिका राज्य शासनाने घ्यावी अशा प्रकारची सूचना या सदनामध्ये करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

.......... ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आजच्या चर्चेच्या ओघामध्ये सदनामध्ये काही सन्माननीय सदस्यांनी काही नावांचा उल्लेख केला आहे. त्या वक्तव्याला आक्षेप देखील घेतला गेला. त्या मुळे आजच्या चर्चेत झालेली संपूर्ण भाषणे मी तपासण्याचा प्रयत्न केला. आपण सर्वांनी एक बाब कायम लक्षात ठेवणे जरूरीचे आहे. बाहेरच्या व्यक्तिचा उल्लेख करायचा असेल तर नियम 35 अन्वये आदल्याच दिवशी लेखी सूचना देणे गरजेचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी आपल्या भाषणामध्ये श्री.उद्धवजी ठाकरे व  सन्माननीय सदस्य श्री.मंगलप्रभात लोढा या दोन नावांचा उल्लेख केला. आपली अशी पद्धत आहे की, विधान परिषदेतील एखाद्या सन्माननीय सदस्याचा उल्लेख विधान सभा सभागृहात कोणाला करायचा असेल तर त्या बाबतची माहिती माननीय अध्यक्षांकडे अगोदर दिली जाते व त्यानंतर ती माहिती ते माझ्याकडे पाठवतात. मी त्या माहितीच्या अनुषंगाने चौकशी करतो. त्या मुळे सर्व परिस्थती विचारात घेऊन मी सन्माननीय सदस्य श्री.मंगलप्रभात लोढा यांच्या नावाचा उल्लेख कामकाजातून काढून टाकतो. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांच्या भाषणात देखील अनवधानाने श्री.मंगलप्रभात लोढा यांच्या नावाचा उल्लेख आला.  तोही उल्लेख मी कामकाजातून काढत आहे.

सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांच्या भाषणात श्री.उद्धवजी ठाकरे यांचा उल्लेख आलेला आहे तो देखील मी कामकाजातून काढून टाकत आहे.  सन्माननीय सदस्य श्री.विनोदजी तावडे यांचे भाषण चांगले झाले.

या नंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

त्या मध्ये सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी त्या बाबत उल्लेख करुन जो आक्षेप घेतला तो सुध्दा मी तपासून पहातो. आणि त्या मध्ये गांधीजींच्या बाबतीत असलेला उल्लेख सुध्दा मी कामकाजातून काढून टाकतो. या व्यतिरिक्त या गंभीर वातावरणामध्ये झालेल्या चर्चेमध्ये अन्य सन्माननीय सदस्यांनी केलेला उल्लेख तपासून पाहून तो देखील कामकाजातून काढून टाकण्यात येईल. त्याच प्रमाणे सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांना देखील तोच नियम लावावा लागेल. सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी सभागृहामध्ये उल्लेख करण्यापूर्वी त्या संबंधीची नोटिस काल देणे आवश्यक होते. त्या मुळे त्यांनी केलेले दोन्ही उल्लेख मी कामकाजामधून काढून टाकीत आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांचे भाषण वेगात झाल्यामुळे ते अधिकाऱ्यांना तपासण्यास सांगितले असून नकळत उल्लेख झाला असल्यास तो कामकाजातून काढून टाकण्यात येईल. सन्माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री महोदयांना काही सांगावयाचे आहे काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, आदरणीय मुख्यमंत्री महोदय हे विधानसभेमध्ये चर्चेला उत्तर देत देऊन सरकारची भूमिका मांडण्याचे काम करीत आहेत. या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांची तयारी असेल तर मी आता या चर्चेला उत्तर देऊ शकतो. आदरणीय मुख्यमंत्री महोदयांची आपणा सर्वांना विनंती आहे की, त्यांचे उत्तर आपल्याला हवे असल्यास ते सोमवारी देण्यात येईल.

**सभापती** : ठीक आहे, या चर्चेवरील सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तराचे भाषण सोमवारी होईल.

सभा□हापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□हाची बैठ□ आता स्थ□ि□ होऊ□ सोमवार, दि□ां□ 1 ऑगस्ट 2011 रोजी स□ाळी 11.00 वाजता पु□ भरेल.

( सभा□हाची बैठ□ 6 वाजू□ 32 मि□िटां□ी,सोमवार, दि□ां□ 1.8.2011 च्या स□ाळी 11.00 वाजेपर्य□त स्थ□ि□ झाली )

---------